**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनेबाबत**

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री.विनोद तावडे,नितीन गडकरी, मधुकर चव्हाण आणि संजय केळकर यांनी नियम 289 अन्वये "शहिदांना देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदाना" संदर्भात सूचना दिलेली आहे. दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबई झालेल्या आतंकवादी हल्ल्याच्या अनुषंगाने या सभागृहात सविस्तर चर्चा होऊन या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना श्रध्दांजली अर्पण केलेली आहे. या हल्ल्याच्या अनुषंगाने कोणत्या प्रकारच्या उपाययोजना केल्या हे देखील शासनाने स्पष्ट केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या सूचनेतील एक-दोन मुद्यांबाबत गृह विभागाने कोणती कार्यवाही केली आहे त्याबाबतचे निवेदन करावे. सन्माननीय सदस्यांनी दिलेली नियम 289 अन्वये सूचना मी नाकारत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबई झालेल्या आतंकवादी हल्ल्याला आज एक महिना होत आहे. या हल्ल्यात शहीद झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना शासनाने 25 लाख रुपयांची मदत जाहीर केलेली आहे. त्या व्यतिरिक्त कामावर असताना मरण पावलेल्या पोलिसांना गृह विभागाच्यावतीने 13 लाख रुपये सानुग्रह अनुदान दिले जाते. आता गृह विभागाने जो जी.आर.काढलेला आहे त्यामध्ये नमूद करण्यात आलेले की, "शहीद पोलिसांना 25 लाख रुपये देण्याचे ठरविण्यात आल्याने त्यांना गृह विभागाकडून 15 लाख रुपये मिळणार नाहीत." त्या जी.आर.ची कॉपी मी आपल्याकडे देतो.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी मला दालनात येऊन भेटावे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, पोलीस इन्स्पेक्टर श्री.ढवळे हे देखील आतंकवादी हल्ल्यात जखमी झाले. त्यांच्या चेहरा आगीत भाजला होता. त्यांनी बॉम्बे हॉस्पीटलमध्ये उपचार घेतले. परंतु आता बॉम्बे हॉस्पीटलने त्यांच्यावर पुढील उपचार करण्याचे नाकारले आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी माझ्याकडे माहिती द्यावी. पोलीस इन्स्पेक्टर श्री.ढवळे यांच्यावर पुढील उपचार करण्यासंदर्भात पाठपुरावा करण्यात येईल.

-----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**उदगीर येथील पशुवैद्यक विद्यापीठ उपकेंद्राचा विकास करण्यासाठी उपकुलगुरु पद निर्माण करुन मास्टर प्लॅन तयार करण्याबाबत**

**(1) * 46699 श्री.सय्यद पाशा पटेल , श्री. गुरुमुख जगवानी , श्री.केशवराव मानकर : तारांकित प्रश्न क्रमांक 43113 ला दिनांक 24 जुलै, 2008 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात**
: सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) माहे मार्च, 2007 मध्ये मा. मुख्यमंत्र्यांच्या दालनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत उदगीर येथील पशु वैद्यकीय विद्यापीठ उपकेंद्राचा विकास करण्यासाठी उपकुलगुरु पद निर्माण करुन मास्टर प्लॅन तयार करण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्याप्रकरणी महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यान विद्यापीठ नागपूरच्या उपकुलगुरुचे पद दिलेले नसून ते पद निर्माण करणेबाबत मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन प्रस्तावानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री. रविशेठ पाटील यांच्याकरिता** : (1) होय

(2) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कायदा 1998 व विद्यापीठ परिनियम 2002 मध्ये दुरुस्तीची योग्य ती व्यवहार्यता तपासण्यात येत आहे.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, हा प्रश्न न बोलू न शकणाऱ्या जनावरांचा आहे. उदगीर येथे सुरु असलेले पशुवैद्यक विद्यापीठ उपकेंद्र हे महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्याच्या बॉर्डरवर असून ते डोंगराळ भागात आहे. सध्या त्या विद्यापीठात देवणी म्हैस आणि मराठवाडी म्हैस या जातीच्या जनावरांवर संशोधनाचे काम सुरु आहे. या उदगीर पशुवैद्यक विद्यापीठाच्या परिसरात पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, पशु वैद्यकीय दवाखाना, पशुवैद्यक अभ्यासक्रम असे वेगवेगळे अभ्यासक्रम सुरु आहेत. या सर्वांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपकुलगुरु पद निर्माण करणे आवश्यक आहे. उत्तरात नमूद करण्यात आले की, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ कायदा 1998 व विद्यापीठ परिनियम 2002 मध्ये दुरुस्तीची व्यवहार्यता तपासण्यात येत आहे." माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, ही नियमावली तपासून एक महिन्यात उपकुलगुरुचे पद भरले जाईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, पशु वैद्यक विद्यापीठाच्या अंतर्गत दोन-तीन उपकेंद्रे आहेत. त्याठिकाणी उपकुलगुरूचे पद देण्यासंदर्भात मागणी झाल्यानंतर एक बैठक झाली होती.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र..46699... श्री.हसन मुश्रीफ ..

परंतु या संबंधीचे सगळे कायदे तपासून पाहिल्या नंतर असे दिसून आले की, या विद्यापीठाच्या कायद्यात कुलगुरु, प्र कुलगुरु इत्यादी पदामध्ये उप कुलगुरुचा उल्लेख करण्यात आलेला नाही त्याचप्रमाणे देशात ज्या ठिकाणी कृषी विद्यापीठे आणि पशुवैद्यकीय विद्यापीठे आहे त्यात उपकुलगुरु या पदाचा उल्लेख नाही त्यामुळे उदगीर येथील उपकेन्द्रात ज्या दोन तीन शाखा आहेत त्यासाठी 16400 रु. या वेतनश्रेणीत परिसर संचालकाच्या पदाची निर्मिती करावी असा प्रस्ताव असून तो लवकरात लवकर मंत्रिमडळाच्या बैठकी समोर ठेऊन हे पद मंजूर करुन घेण्यात येईल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, मार्च 2007 मध्ये ही बैठक घेण्यात आली हाती ती बैठक होऊन आता 21 महिने झाले आहेत.. या प्रश्नाच्या दुस-या उत्तरात असे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यान विद्यापीठ कायदा 1998 व विद्यापीठ परिनियम 2002 मध्ये दुरुस्तीची योग्य ती व्यवहार्यता तपासण्यात येत आहे. " ही व्यवहार्यता तपाण्यासाठी इतका कालावधी लागण्याची कारणे काय आहेत ? महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर येथे उपकुलगुरुचे पद दिलेले नसून हे पद उद्गीर येथील पशु वैद्यकीय विद्यापीठ उपकेन्द्रासाठी हे पद निर्माण करण्यात येणार आहे काय? माननीय मंत्रिमहोदयांनी मघाशी उत्तर देतांना असे सांगितले की, उप कुलगुरुच्या पदा ऐवजी परिसर संचालक हे पद निर्माण करण्यात येईल परंतु हे पद योग्य राहणार नाही तेव्हा यासाठी उप कुलगुरुचे पद निर्माण करण्यात येणार आहे काय आणि किती कालावधीमध्ये हे पद निमार्ण करण्यात येणार आहे?

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय, मघाशीच मी असे सांगितले होते की, हे पद निर्माण् करण्यामध्ये कायदेशीर अडचणी फार आहेत. महाराष्ट्र पशु व मत्स्य विद्यान विद्यापीठ कायदा 1981 मधील तरतुदीमध्ये शासनाला बदल करावा लागणार आहे त्याचप्रमाणे आय.सी.आर. ची त्यासाठी परवानगी घ्यावी लागणार आहे. देशातील विद्यापीठातील या पदासाठी आयसीआर ची परवानगी मिळेल याबद्दल साशंकता आहे. तीनही शाखांचे एकत्रीकरण करण्यासाठी आणि ते काम चांगले करण्यासाठी परिसर संचालक हे पद निर्माण करावे असा शासनाचा प्रस्ताव आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, उदगीर येथील पशुवैद्यक विद्यापीठ उपकेन्द्राचा विकास करण्यासाठी उप कुलगुरुचे पद निर्माण करण्यामध्ये कायदेशीर अडचणी आहेत असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र..46699 श्री.भास्कर जाधव...

माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. या संदर्भात माझा असा प्रश्न आहे की, मागच्या वर्षी शासनाच्या वतीने असे सांगण्यात आले होते की, मत्स्य विद्यापीठ कोकणामध्येच होईल. कोकणाच्या बाहेर हे विद्यापीठ होणार नाही. या बाबतीत माजी कुलगुरु श्रीरंग कद्रेकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती त्यांच्या अध्यक्षंतेखाली समिती कोकणामध्ये मत्स्य विद्यापीठ निर्माण करण्याच्या बाबतीत लवकर निर्णय घेण्यात येईल असे धोषित करण्यात आले होते . या निर्णयामुळे कोकणामध्ये मत्स्य विद्यापीठ स्थापन होणार आहे. त्या निर्णयाला कोणती बाधा येण्याची शक्यता आहे काय ? कोकणातच मत्स्य विद्यापीठ स्थापन करण्यात येईल यानिर्णयाशी शासन ठाम आहे काय की त्या निर्णयापासून शासनाने फारकत घेतली आहे ?

श्री.हसन मुश्रीफ :सभापती महोदय, मत्स्य विद्यापीठाच्या बाबतीत शासनाने घोषणा केली होती आणि त्याबाबतीत शासनाने एक समितीसुध्दा नेमली होती परंतु आता जो मूळ प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे तो वेगळा आहे. उदगीर येथील पशुवैद्यक विद्यापीठ उप केन्द्राचा विकास करण्यासाठी उपकुलगुरुचे पद निर्माण करण्यासंबंधी मूळ प्रश्न विचारण्यात आला आहे .

श्री.भास्कर जाधव :कोकणामध्ये मत्स्य विद्यापीठ स्थापन करण्याच्या निर्णयाला बाधा येणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : नागपूर येथे मत्स्य व पशु विद्यापीठ नवीन स्थापन करण्याच्या बाबतीत जाहीर केले होते. कोकणवासीयांची अशी इच्छा आहे की , मत्स्य विद्यापीठ फक्त कोकणातच स्थापन करण्यात यावे यास शासनाने तत्वत: मान्यता दिली आहे आणि त्या निर्णयाला बाधा येण्याची शक्यता नाही कारण त्या ठिकाणी मत्स्य विद्यापीठ स्थापन करावे असा धोरणामक निर्णय झाला आहे.तो अहवाल आल्यानंतर त्याबाबातीत सुध्दा योग्य ती कार्यवाही करण्यात येईल

श्री.पाशा पटेल :सभापती महोदय, मार्च 2007 मध्ये माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांच्या दालनात झालेल्या बैठकीत उप कुलगुरु पद निर्माण करण्यात यावे अशा अधिका-यांना अशा सूचना दिल्या होत्या अशी माहिती आम्हाला उपलब्ध झाली आहे . त्या बैठकीत तशा प्रकारच्या सूचना दिल्या असतांना सुध्दा आता हे पद निर्माण करण्यामध्ये दोन तीन कारणांची मालिका सांगितली जात आहे ही पाहिल्या नंतर आमचा मृत्यू झाल्यानंतरही त्या ठिकाणी उप कुलगुरुचे पद निर्माण केले जाईल किंवा नाही हे सांगता येत नाही. सभापती महोदय, आपल्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र..46699 श्री.पाशा पटेल.....

मार्फत मला माननीय मंत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे तसेच हा डोंगराळ भाग आहे तेव्हा या भागातील भौगोलिक परिस्थिती विचारात घेऊन एक महिन्याच्या आत हे पद निर्माण करण्यात येणार आहे काय ? नियम हे माणसासाठी असतात, माणसांचे भले होण्यासाठी काही नियमांकडे दुर्लक्ष करावे लागते, किंवा त्यातून काही तरी मार्ग काढावयाचा असतो. हा विषय वेगळा आहे असे समजून या विषयाला न्याय दिला जाणार आहे काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय , तत्कालीन मुख्यमंत्र्याकडे ही मागणी करण्यात आली होती त्यावेळी या विद्यापीठाचे अधिनियम तपासावेत असे ठरले होते.

नंतर श्री.सुंबरे

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KTG/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 11:10

श्री. हसन मुश्रीफ (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 46699 .....

आणि तपासल्यानंतर असे माहीत झाले की, यामध्ये कायदेशीर अडण निर्माण झालेली आहे आणि त्यामुळे हे उपकुलगुरू पद लवकर होणार नाही म्हणून आता तेथे 'परिसर संचालक' नेमावा असा नवीन प्रस्ताव केलेला आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, उपकुलगुरु का पद निर्माण करना यह एक विषय तो है ही लेकिन मैं एक गंभीर तथा धोरणात्मक विषय की ओर आपका और शासन का ध्यान खींचना चाहती हूं. शासन ने पशुवैद्यक विद्यापीठ एक नोबल उद्देश्य के साथ शुरु किया है लेकिन हाल ही में इस विद्यापीठ में कर्मचारियों की जो नियुक्तियाँ हुई है, उनमें करीब 450 नियुक्तियाँ अवेध रुप से हुई है. इस प्रकार की खबर कई अखबारों में प्रकाशित हुई है. टाईम्स ऑफ इंडिया ने अपनी खबर में यह भी लिखा है कि उनके पास इस बात के सुबूत है. इस संबंध में तारांकित प्रश्न क्रमांक 47195 का कुलगुरु की ओर से जो उत्तर दिया गया है वह गुमराह करने वाला और असत्य है. इस बारे में सरकार की ओर से एक कमेटी नियुक्त की गई थी और डॉ समद जांच अधिकारी नियुक्त किए गए थे.

सभापति : प्रश्न का डेव्हीएशन हो रहा है.

Smt. Fouzia Khan : Hon. Chairman, Sir, it is not deviation. The University has to function properly. अगर इतना गंभीर आरोप है तो इस मामले की जांच होनी चाहिए. राज्यपाल महोदय के पास इस विद्यापीठ के वाईस चांसलर के खिलाफ 25 शिकायते दी गई हैं. सारे सुबूत हैं. मैं ये सारे सुबूत आपके पास भेजती हूं. इसलिए मेरा यह प्रश्न है कि क्या कुलगुरु के खिलाफ उच्च स्तरीय जांच की जाएगी ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी जो प्रश्न येथे विचारला आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, या विद्यापीठामध्ये नोकर भरती असेल वा प्रमोशन्स असतील त्याबद्दल बऱ्याच तक्रारी शासनाकडे आणि माननीय राज्यपाल महोदयांकडे प्राप्त झालेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे. म्हणूनच या भरतीच्या बाबतीत तेथे जे कुलगुरू आहेत त्यांची चौकशी उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांकडून करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे आणि लवकरात लवकर आपण ते करणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2

ता.प्र.क्र. 46699 .....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाने या लेखी उत्तराच हे मान्य केले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात या संबंधात जी बैठक झाली होती त्या बैठकीत चर्चा झाली होती की, या विद्यापीठाला उपकुलगुरू पदाची आवश्यकता आहे आणि हे बैठकीत चर्चेअंती सगळ्यांना पटले होते त्यामुळेच तेव्हाच माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना दिली होती की, हे पद नियमामध्ये बसवा. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना देऊनही आता त्याबाबत 'बघू आणि तपासू' असेच सांगितले जाणार असेल तर ते योग्य नाही. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांबरोबरच्या बैठकीत चर्चा होऊन सर्वांना या पदाची गरज पटल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी सूचना दिली त्याप्रमाणे आता किती दिवसात या विद्यापीठासाठी उपकुलगुरूचे पद निर्माण होणार आहे ? का होणारच नाही ? नसेल तर तसे स्पष्ट आपण सांगावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात या संदर्भात बैठक झाली होती हे खरे आहे. त्यामध्ये या विद्यापीठासाठी उपकुलगुरू पद निर्माण करण्या बाबत चर्चा झाली होती हेही खरे आहे. मात्र त्यांनी त्यावेळेस हे पद निर्माण करण्याच्या दृष्टीने कायद्याची तपासणी करण्यास सांगितले होते. या विद्यापीठाचा कायदा, 1998 आणि विद्यापीठ परिनियम 2002 मधील तरतुदी व सुधारणा ज्या केल्या गेल्या आहेत त्यात हे पद निर्माण करण्यात अनेक कायदेशीर अडचणी येत असल्याचे दिसून आले. त्यात आयसीआरची अडचण मुख्य आहे शिवाय देशामध्ये कोठेच हे पद नसल्याने आयसीआर यासाठी मान्यता देईल की नाही याबद्दल साशंकता आहे. त्यामुळेच हे पद निर्माण न करता 'परिसर संचालक' पद निर्माण करण्याचे ठरविण्यात आले असून त्याप्रमाणे प्रस्ताव आता सादर आपण करणार आहोत.

***

( यानंतर श्री. सरफरे .... डी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कृषी विभागाच्या योजना व कर्मचारी जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित करण्याबाबत**

**(२) * ४६९१० श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. चरणसिंग सप्रा, श्री.सय्यद जामा, श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. नितीन गडकरी , डॉ. एन. पी. हिराणी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्रीमती अलका देसाई : तारांकित प्रश्न क्रमांक ४४९२३ ला दिनांक १७ जुलै, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि विभागाच्या योजना व कर्मचारी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्याबाबतची सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप, निर्णय घेतला नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुरेश वरपुडकर, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) कृषि विभागाच्या कर्मचारी आकृतीबंध अंतिम करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी शासनाकडील योजना मोठया प्रमाणात जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित करण्याचा शासनाने निर्णय घेतला त्याची अद्यापि अंमलबजावणी पूर्ण झाली नाही. बजेट अधिवेशनानंतर झालेल्या पावसाळी अधिवेशनात या संबंधी प्रश्न विचारला होता. त्यावेळी कार्यवाही सुरु आहे असे मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले होते. आता सुध्दा तेच उत्तर देण्यात आले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या दरम्यानच्या काळात या कामामध्ये नेमकी काय प्रगती झाली आहे? याबाबतीत विलंबाची कारणे काय आहेत? आणि किती दिवसात हे काम पूर्ण होईल?

श्री.सुरेश वरपुडकर : शासनाच्या धोरणानुसार जिल्हापरिषदेकडे व शासनाकडे योजना हस्तांतरित करण्याच्या संदर्भात जिल्हा परिषदेच्या ३७ योजना होत्या आणि शासनाच्या २७ योजना होत्या. अशा ६४ योजना शासनाकडे हस्तांतरित झाल्या. त्यापैकी २३ योजना बंद झाल्या व नवीन १३ योजना हस्तांतरित करावयाच्या आहेत. त्या हस्तांतरित करण्याबाबत आकृतिबंध तयार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. ४६९१०...

श्री. सुरेश वरपुडकर....

करण्यासाठी शासनाने दोन-तीन समित्या नेमल्या होत्या. त्यापैकी १७ मे २००१ रोजी श्री.आर.डी.मुळे यांची समिती नियुक्त केली. त्यांनी २२ जुलैला आपला अहवाल दिला. त्यानंतर श्री. सरंगी साहेबांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. त्या समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार ५ हजार जागा रिक्त झाल्या. त्या दृष्टीकोनातून या बाबत अंतिम निर्णयाच्या स्टेजला विचार सुरु आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : शासनाने राज्य पातळीवर निर्णय जाहीर केला त्याला दोन वर्षे झाली. यामध्ये शासनाकडे आणि जिल्हा परिषदेकडे असलेले विभाग एकत्र करुन काही विभाग जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या निर्णयाची अंमलबजवणी कधी होणार आहे?

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, आकृतिबंधामध्ये जवळपास १० हजार पदे रिक्त झाली. वित्त विभागाची मान्यता घेऊन जोपर्यंत ही पदे भरण्याबाबत निर्णय होत नाही तोपर्यंत...

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्या जागा वाढणार आहेत तो नंतरचा विषय आहे.सद्या कर्मचारी पॅरेलल स्वरुपामध्ये काम करीत आहेत. जिल्हा परिषदेकडे व राज्य शासनाकडे कृषी व बांधकाम खाते आहेत. हे दोन्ही खाते जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता त्याची अंमलबजावणी अजून झाली नाही. राज्य पातळीवरील अधिकारी, कर्मचारी जिल्हा परिषदेमध्ये काम करण्यास उत्सुक नाहीत. त्यादृष्टीकोनातून या निर्णयाची अंमलबजावणी शासन केव्हा करणार आहे?

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, ६४ योजनांपैकी जवळपास २४ योजना बंद झाल्या आहेत. बंद झालेल्या योजना जिल्हा परिषदेकडे ट्रान्सफर झाल्या असत्या तर त्याठिकाणी काहीच राहिले नसते. म्हणून कोणत्या योजना कंटिन्यू रहाणार आणि कोणत्या रहाणार नाहीत या संदर्भात अंतिम स्वरुपात निर्णय झाल्यानंतर कोणत्या योजना ट्रान्सफर करावयाच्या आणि कोणत्या करावयाच्या नाहीत याबाबत निर्णय घेण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पेढी बॅरेज बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाचे बांधकाम**

**(३) * ४६१९४ प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री. दिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक ४२१५५ ला दिनांक १७ जुलै, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पेढी बॅरेज या प्रशासकीय मान्यता प्राप्त बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाचे व बोर्डीनाला प्रकल्प स्थळी दिनांक १० मे, २००८ रोजी मा. मुख्यमंत्र्यांच्या व मा. जलसंपदा मंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत शिलापूजन समारंभ पार पडलेल्या प्रकल्पाचे बांधकामाच्या निविदा अंतिम करण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या प्रकल्पाच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे,

(३) अजूनही बांधकामास सुरुवात झालेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अजित पवार यांच्याकरिता :** (१) बोर्डीनाला मध्यम प्रकल्प त्या प्रकल्पाची निविदा अंतिम करण्यात येवून प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे.

पेढी बॅरेज जिल्हा अमरावती ह्या प्रकल्पास दि.३०/४/२००८ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून ह्या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(२) बोर्डीनाला प्रकल्पाच्या धरणाचे मातीकाम सुरु आहे. पेढी बॅरेज प्रकल्पाची निवदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) बोर्डीनाला प्रकल्पाचे बांधकाम सुरु असून विलंब झालेला नाही. पेढी बॅरेज प्रकल्पाबाबत, निविदा प्रक्रिया सुरु आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देण्यात आले नाही. सर्वात जास्त अनुशेष, महत्तम अनुशेष असलेल्या जिल्हयांचा लघुपाटबंधारे प्रकल्पाचा अनुशेष १९८४ मध्ये १३४ हजार हेक्टरने वाढला. त्यानंतर १९९४ मध्ये २०९ हजार हेक्टरने वाढला, त्यानंतर २००७ मध्ये २२३ हजार हेक्टर इतका झाला. याठिकाणी असे उत्तर दिले आहे की, "या प्रकल्पास दि.३०.४.२००८ ला प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली". माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत, माननीय जलसंपदा मंत्र्यांच्या उपस्थितीत या योजनेचा शिलापूजन समारंभ मे महिन्यात झाला. तरीसुध्दा अजूनपर्यंत काम सुरु झाले नाही. लघुपाटबंधारे प्रकल्पामध्ये

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

ता.प्र.क्र. ४६१९४....

प्रा.बी.टी.देशमुख....

महत्तम अनुशेष असलेला जिल्हा तो काय? माननीय मुख्यमंत्री त्याचे शिलापूजन करतात ते काय? माननीय पाटबंधारे मंत्री त्या कार्यक्रमाला हजर रहातात ते काय? तरीही अजूनपर्यंत त्या प्रकल्पाचे काम सुरु होत नाही, निविदा फायनल होत नाही. It is highly unfortunate ही अतिशय दुर्दैवाची बाब आहे. एकेक महिन्यात निविदा फायनल केल्याची उदाहरणे माझ्याकडे आहेत. हा इतिहास याठिकाणी मी सांगितला, परंतु त्याचे उत्तर याठिकाणी आले नाही. माझा पहिला प्रश्न असा आहे की, याबाबतीत निविदा फायनल करुन हे काम केव्हा सुरु केले जाईल? एवढा छोटासा प्रकल्प वर्ष - दीड वर्षात केव्हा पूर्ण केला जाईल?

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 46194 .....

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी यापूर्वी पावसाळी अधिवेशनामध्ये सुध्दा हा प्रश्न उपस्थित केला होता. हा प्रश्न पेढी बॅरेज व बोर्डीनाला प्रकल्प या दोन प्रकल्पांच्या संदर्भात विचारलेला आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये बोर्डीनाला प्रकल्पाचा उल्लेख त्या स्थळी भूमिपूजन केलेले होते एवढ्यापुरताच मर्यादित आहे. दोन-तीन प्रकल्पाचा प्रश्न एकत्र झ ााल्यानंतर लहानही काम होणार नाही आणि मोठे काम सुध्दा होणार नाही. हा लघु पाटबंधारे प्रकल्पाबाबतचा प्रश्न आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी त्यांनी दिलेले उत्तर काळजीपूर्वक न वाचता मूळ प्रश्न काळजीपूर्वक वाचावा. त्यामुळे आम्हाला न्याय मिळेल. या ठिकाणी उत्तर देत असताना दोन प्रकल्पांच्या बाबतीत दिलेले आहे. त्याबद्दल माझा काही आक्षेप नाही. परंतु मी प्रश्न विचारताना लघु पाटबंधारे प्रकल्पापुरता विचारलेला आहे. बोर्डीनाला प्रकल्पाचा उल्लेख हा त्या ठिकाणी भूमिपूजन झाले एवढ्यापुरताच मर्यादित आहे. पेढी बॅरेज या लघु पाटबंधारे प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता एप्रिलमध्ये मिळाली आणि भूमिपूजन समारंभ मे महिन्यामध्ये झाला. आतापर्यंत त्या प्रकल्पाचे काम सुरु व्हावयास पाहिजे होते. या प्रकल्पाच्या बाबतीत निविदा केव्हा फायनल करणार आणि हे काम आठ दिवसात, पंधरा दिवसात सुरु करणार काय ? हा लहानसा प्रकल्प असल्यामुळे तो केव्हा पूर्ण करणार ?

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, हे खरे आहे की, यामध्ये थोडा विलंब झालेला आहे. मूळ प्रश्न पेढी बॅरेजच्या संदर्भात आहे. या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या प्रकल्पाच्या कामाची निविदा प्रक्रिया जवळपास पूर्ण झालेली आहे. ही प्रक्रिया फेब्रुवारीमध्ये पूर्ण होईल आणि वर्कऑर्डर दिली जाईल. त्यानंतर हे काम आम्ही तातडीने सुरु करु. फेब्रुवारी-मार्च, 2009 मध्ये या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, प्रयत्न करणार म्हणजे काय ? माननीय मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजन केलेले आहे आणि आता प्रयत्न करु असे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT

ता. प्र. क्र. 46194 .....

आहेत. 8 महिने झाले तरी शासनाने काम सुरु केले नाही. ही काय पध्दत आहे ? अधिवेशनासाठी नागपूरला येऊन आमची थट्टा करता काय ? माननीय मुख्यमंत्र्यांनी भूमिपूजन केले. माननीय पाटबंधारे मंत्री उपस्थित होते. एप्रिल महिन्यामध्ये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. निविदा प्रक्रियेच्या बाबतीत अधिकाऱ्यांचे एवढे काय अडले आहे ? या ठिकाणी दिलेले उत्तर बरोबर नाही.

**सभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, पेढी बॅरेजच्या कामाला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. टेंडर प्रक्रिया जवळजवळ पूर्ण झालेली आहे. म्हणजे नोव्हेंबर महिन्यामध्ये ती प्रक्रिया जवळजवळ पूर्ण झालेली आहे. आपले असे म्हणणे आहे की, ती प्रक्रिया डिसेंबर अखेर पूर्ण होऊन जाईल. जानेवारी महिन्यामध्ये या प्रकल्पाचे काम सुरु होणार काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांना सांगू इच्छितो की, या प्रकल्पाच्या कामाची सुरुवात कोणत्याही परिस्थितीमध्ये एप्रिल महिन्यामध्ये करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या पेढी बॅरेज प्रकल्पाला 30.4.2008 ला प्रशासकीय मान्यता मिळाली. आता माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, निविदा प्रक्रिया सुरु आहे. एप्रिल महिन्यापासून डिसेंबर महिन्यापर्यंत ही निविदा प्रक्रिया सुरु आहे. आता माननीय मंत्रिमहोदयांची सांगितले की, ती प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे. लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरु आहे आणि आता तोंडी उत्तरामध्ये असे सांगितले की, निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. एखाद्या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर निविदा प्रक्रियेला एवढा विलंब लागण्याचे कारण काय ? मंत्रिमहोदयांनी सांगितले की, वर्क ऑर्डर देऊन या प्रकल्पाचे काम एप्रिल महिन्यामध्ये सुरु करु. वर्क ऑर्डर देण्यामध्ये विलंब झालेला आहे. निधी नाही म्हणून विलंब केला काय ? या कामासाठी निधी उपलब्ध आहे काय ? निधी उपलब्ध असेल तर वर्क ऑर्डर देण्यामध्ये विलंब लागण्याचे कारण काय ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46194....

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, अमरावती जिल्हयातील हा प्रकल्प आहे. या प्रकल्पाच्या कामासाठी निधीची कमतरता नाही. कारण त्या जिल्हयात सिंचनाचा अनुशेष आहे. प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर डीएसआर वाढल्यामुळे निविदा सुधारित करावी लागली. ही निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन मार्च महिन्यात संबंधित यंत्रणेला या कामाची वर्क ऑर्डर दिली जाईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. निविदेत बदल करावा लागला असे आताच माननीय राज्यमंत्री महोदय म्हणाले. त्यांनी तसे लेखी उत्तरामध्ये का नमूद केले नाही ? मंत्री महोदयांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. शासन ही बाब गंभीरपणे घेत नाही असेच यावरुन दिसून येते.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले की, या कामाच्या एस्टिमेटला प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर नवीन डीएसआरमुळे निविदा बदलावी लागली. फेब्रुवारी, मार्च महिन्याला निविदा फायनल होईल आणि एप्रिल महिन्यामध्ये या कामाला सुरुवात होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विदर्भातील एका छोटयाशा प्रकल्पाचे हे काम आहे, त्याची वासलात कशी लावली जाते त्याचे हे जीवंत उदाहरण आहे. कशाय काय आणि फाटक्यात पाय अशी या प्रकल्पाची स्थिती झाली आहे, असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळून सुध्दा या प्रकल्पाच्या कामाला फावडा मारुन सुरुवात झालेली नाही. कामाला इतक्या विलंबाने सुरुवात करावयाची होती तर मग तेथे नारळ तरी कशाला फोडला होता ? शासनाकडून सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. कामाची टेंडर प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, हे काम एप्रिल महिन्यात सुरु होईल. त्यांना वाचविताना कॅबिनेट मंत्री असे म्हणाले की, हे काम मार्च महिन्यात सुरु होईल. म्हणजे या कामाबाबत दुमत आहे. दिनांक 31 मार्चला या कामाचा निधी लॅप्स होईल. हे काम सुरु करण्यासाठी फावडा मारावयाचा नव्हता तर उद्‌घाटन का केले ?

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी प्रश्न विचारला, त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनीही प्रश्न विचारला आहे. परंतु मी यापूर्वीच स्पष्टपणे सांगितलेले आहे की, निविदा प्रक्रिया पूर्ण होत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46194......... श्री.विजय वडेट्टीवार.........

आहे. कोणत्याही परिस्थितीत एप्रिल महिन्यामध्ये या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात केली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : या कामाला फेब्रुवारी महिन्यात, मार्च महिन्यात की एप्रिल महिन्यात सुरुवात होईल दोन्ही मंत्री महोदयांच्या उत्तरावरुन स्पष्ट होत नाही. आपण दोघांनीही यासाठी इतके कष्ट घेऊ नये. मंत्री महोदयांनी ठामपणे सांगावे की, फेब्रुवारी महिन्यात वा मार्च महिन्यात या या तारखेला हे काम सुरु होईल. मी माननीय मुख्यमंत्री सभेत काय बोलले होते ते येथे सांगणार नव्हतो. पण नाईलाजाने सांगत आहे. त्यांनी असे म्हटले होते की, "या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. आता या कामाला लवकरच सुरुवात होईल." निदान तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या विधानाची तरी इज्जत राखावी. हा लहानसहान प्रकल्प आहे. त्यामुळे विभागाकडून या तारखेला हे काम सुरु होईल असे सभागृहाला उत्तर द्यावे.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, 20 एप्रिल रोजी या कामाची वर्क ऑर्डर देऊन या कामाला सुरुवात केली जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, कॅबिनेट मंत्र्यांनी माझ्या दुस-या प्रश्नाला उत्तर दिले नाही.....

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी 20 तारखेला या प्रकल्पाचे काम सुरु होईल असे उत्तर दिले आहे. हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होईल. या प्रश्नाला 12 मिनिटे झाली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी कृपया खाली बसावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण असे म्हटल्यावर मी खाली बसणार आहे. परंतु हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होईल असे आपण म्हणत आहात, परंतु माननीय कॅबिनेट मंत्री असे उत्तर देण्यासाठी उभे रहात नाहीत किंवा माननीय राज्यमंत्रीही उभे राहण्यास तयार नाहीत.

श्री.विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या प्रकल्पाचे काम अडीच वर्षामध्ये पूर्ण केले जाईल.

-------

यानंतर श्री.शिगम....

अपुनरीक्षित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील हाजीमलंग गडावर पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(४) * ४७७२७ श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. राजेंद्र जैन , डॉ. वसंत पवार , श्री.रमेश शेंडगे , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक ४४२८६ ला दिनांक २४ जुलै, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ऐतिहासिक हाजीमलंग गडावरील सुमारे दोन हजार लोकवस्तीला पाणीपुरवठा करण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत सदर योजनेचे आराखडे व अंदाजपत्रके तयार करण्याचे सुरु असलेले काम पूर्ण झालेले आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. रामराजे नाईक-निंबाळकर** : (१) होय,
(२) हाजीमलंग,ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे यांचेकडून योजना स्विकृतीचा ठराव प्राप्त झाला असून, त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : हाजीमंलग गडवरील वस्तीला किती महिन्यात वा किती वर्षात पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येईल ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : खास बाब म्हणून हाजीमलंग तीर्थक्षेत्राला आपण पाणी देण्याचा प्रयत्न करीत आहोत. हे गाव कॅप 1999- भारत निर्माण योजनेमध्ये समाविष्ट झालेले आहे. 16 कोटी रुपयाचा प्रस्ताव तयार केलेला आहे. हाजीमलंग,ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीने या शासकीय योजनेला स्वीकृती दिलेली आहे. लोकवर्गणीची अपेक्षा त्यांच्याकडून पूर्ण व्हायला पाहिजे. ती पूर्ण झाल्यानंतर प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर टेंडर काढण्यात येईल आणि त्यानंतर या योजनेला सुरुवात करण्यात येईल.

श्री. रमेश शेंडगे : हाजीमलंग ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समितीकडून स्वीकृतीचा ठराव केव्हा प्राप्त झाला ? हाजीमलंग गडावरील लोकांना तसेच तेथे येणा-या भाविकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नाही. तेव्हा या योजनेला प्राथमिक स्वरुप देऊन ही पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचा प्रयत्न करण्यात येईल काय ?

श्री. राजराजे नाईक-निंबाळकर : लवकरात लवकर प्रयत्न करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र.47727....

श्री. जयंत प्र. पाटील : रायगड आणि ठाणे या दोन जिल्ह्यांच्या मध्ये हे हाजीमलंग तीर्थक्षेत्र आहे. हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे लोकवर्गणी माफ करण्याचा शासन विचार करील काय ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : लोकवर्गणी माफ होणार नाही. परंतु हाजीमलंग ग्रामपाणी पुरवठा व स्वच्छता समिती, जिल्हा परिषद आणि ग्रामपंचायत यांची संयुक्त बैठक घेऊन लोकवर्गणीचा प्रश्न कसा सोडविता येईल या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल. तेथील सरासरी लोकसंख्या दीड लाख आहे. येथे 10 दिवस यात्रा चालते.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 11:30

## जळगांव, धुळे, नंदुरबार, औरंगाबाद या जिल्ह्यातील शेतांमधील कापूस पिकांवर विविध रोगांचा झालेला प्रादुर्भाव

**(५) * ४६२७४ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री. वसंतराव खोटरे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री.अरुण गुजराथी , श्री.विक्रम काळे , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. सतीश चव्हाण , श्रीमती उषाताई दराडे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव, धुळे, नंदुरबार, औरंगाबाद या जिल्ह्यात शेतकऱ्यांनी लागवड केलेल्या कापूस पिकांवर मावा, तुडतुडे, कुकडा, लाल्या पिठ्या ढेकून इत्यादी रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय, असल्यास पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व सदर साथीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासन स्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) संबंधीत शेतकऱ्यांच्या पिकांचा पंचनामा करुन नुकसान भरपाई अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री. सुरेश वरपुडकर, श्री बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (१) व (२) यासंदर्भात प्राथमिक तपासणीअंती जळगांव,धुळे औरंगाबाद जिल्ह्यात काही प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला. नंदुरबार जिल्ह्यात प्रादुर्भाव आढळून आला नाही. शेतकऱ्यांना आकाशवाणी व वृत्तपत्रामार्फत पिकसंरक्षणासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत आवश्यकती माहिती देण्यात आली.

(३) पिकांचे नुकसान ५०% पेक्षा कमी असल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. दिलीपराव सोनवणे : "प्राथमिक तपासणीअंती जळगांव, धुळे, औरंगाबाद जिल्ह्यात काही प्रमाणात प्रादुर्भाव आढळून आला. तसेच पिकांचे नुकसान 50% पेक्षा कमी असल्यामुळे नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. परिस्थिती अशी आहे की, सुरुवातीला पाऊस कमी झाला, त्यानंतर अवेळी पाऊस आल्यामुळे तसेच अतिवृष्टीमुळे कापसाच्या पिकावर मावा, तुडतुडे, कुकडा, लाल्या पिठ्या ढेकून इत्यादी रोग पडल्यामुळे शेतक-यांचे फार मोठ्याप्रमाणावर नुकसान झालेले आहे. एकरी एक क्विंटल देखील उत्पादन आलेले नाही. असे असतना पिकांचे नुकसान 50%पेक्षा कमी असल्याचे म्हटलेले आहे हे खरे नाही. तेव्हा पुन्हा तपासणी करुन शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ?

श्री. सुरेश वरपुडकर : मावा, तुडतुडे, कुकडा, लाल्या पिठ्या ढेकून इत्यादी रोगांच्या झालेल्या प्रादुर्भावाच्या संदर्भात उभ्या पिकाची पूर्ण तपासणी करण्यात आली. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात पिकाचे नुकसान झालेले नसल्याचे आढळून आले. लाल्या रोगामुळे कापसाच्या पिकाची 36 ते 45 टक्के हानी झालेली आहे. ही हानी 50 % पेक्षा जास्त नाही.

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : पिकांचे नुकसान 50%पेक्षा कमी असल्याचे उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. परंतु हे खरे नाही. प्रत्यक्षात फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. नाफेड आणि सीसीआयच्या माध्यमातून 2850रु. भाव दिलेला आहे. कापसाचे पीक एकरी क्विटंलपेक्षा कमी आलेले आहे. अशा प्रकारे अनेक शेतक-यांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी.....

खानदेशातील मोठया प्रमाणातील शेती कापसाच्या लागवडी खाली आहे. यासंदर्भात पुनर्सर्वेक्षण करण्यासंदर्भात आणि आर्थिक सहाय्य देण्यासंदर्भात शासन त्वरेने निर्णय घेईल काय?

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, 2004-05 पासून बी.टी.कापूस घेण्यास शेतक-यांनी सुरुवात केलेली आहे. 2004-05 मध्ये बी.टी.कॉटन उत्पादनाचे पर्सेंटेज 5 टक्के होते. या वर्षी बी.टी.उत्पादनाचे पर्सेंटेज 92 टक्क्े आहे. बी.टी.कापसाची शेतक-यांनी लागवड केल्यामुळे त्याचे उत्पादन वाढले आहे. उत्पादन कमी झालेले नाही.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. चंद्रकांत सूर्यवंशी : सभापती महोदय, कापसाच्या झाडाला बोंडेच आली नाहीत. त्यामुळे उत्पादन कसे काय वाढले ? 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी असलेली असंख्य गावे आहेत. या ठिकाणी मंत्री महोदय, कापसाचे उत्पादन वाढले आहे अशा प्रकारची माहिती देत आहेत, ती माहिती सभागृहाची दिशाभूल करणारी आहे.

( गोंधळ )

**सभापती** : आपण सर्वांनी एकाच वेळी उभे राहून बोलू नका. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांच्यासह सर्व सदस्यांना सांगू इच्छितो की, एकाच वेळी उभे राहून सर्वांनी बोलण्याचा प्रयत्न करु नये.

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांना माझे म्हणणे पूर्णपणे ऐकून घेण्यास सांगावे.

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्य खाली बसल्यानंतरच सन्माननीय मंत्र्यांनी आपल्या उत्तरास सुरुवात करावी.

( सत्ताधारी पक्षातील सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री. दिवाकर रावते : आपण उभे राहून निर्णय देत आहात, असे असताना सत्ताधारी पक्षातील उभे असलेले सदस्य आपल्या जागेवर बसण्यास तयार नाहीत. आपण आदेश देऊनही ते खाली बसत नाहीत याचे मला वाईट वाटते.

**सभापती** : कधी कधी आपल्याकडूनही असे होते. काही वेळेला मी निर्णय देण्यासाठी उभा असतो, त्यावेळी आपणही उभे राहून बोलत असतात. कधी कधी असा प्रकार घडतो. कृपया

2...

सभापती...

सन्माननीय सदस्यांनी सभागृहात शांतता ठेवावी अशी माझी विनंती आहे. राज्यातील शेतक-यांच्या दृष्टीने कापसाचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. या प्रश्नाच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या सदस्यांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. राज्यात कापूस उत्पादक शेतक-यांना न्याय मिळाला पाहिजे अशी दोन्ही बाजूच्या सदस्यांची मागणी आहे. या प्रश्नावर सभागृहात चर्चा करुन यावर काही तड लागेल असे वाटत नाही. आपली सर्व सदस्यांची इच्छा असेल तर माननीय कृषी मंत्र्यांना मी माझ्या दालनात बोलावितो.( अडथळा )

श्री. अरविंद सावंत : हा विषय सभागृहाचा आहे.

**सभापती** : माझे पूर्ण म्हणणे ऐकून घेण्यास काही हरकत आहे काय ? एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र होतात, अशा वेळी सभापती पुढाकार घेऊन काही वेळा प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न करतात. या ठिकाणी सन्माननीय कृषी राज्य मंत्री या प्रश्नास उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. या प्रश्नाला खरा न्याय मिळवून घ्यावयाचा असेल तर मी माझ्या दालनामध्ये माननीय कृषी मंत्री, कृषी राज्य मंत्री, तसेच सर्व सदस्य यांना बोलावितो. या प्रश्नाच्या बाबतीत तेथे चर्चा करुन त्या चर्चेच्या अनुषंगाने काही निष्कर्ष निघतील, त्या निष्कर्षाची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची व्यवस्था केली जाईल. मी हा प्रश्न राखून ठेवणार नाही. फक्त या प्रश्नाच्या अनुषंगानेच सन्माननीय सदस्यांनी उप प्रश्न विचारावेत. माझ्या दालनात या प्रश्नासंबंधी बैठक घेईल, त्यात जे निष्कर्ष निघतील, ते सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची मी व्यवस्था करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्न मुळात माननीय कृषी मंत्र्यांचा नाही...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46274......... श्री.दिवाकर रावते....

हा विषय महसूल विभागाशी संबंधित आहे. 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आली किंवा नाही हे महसूल विभागाकडून जाहीर केले जाते.

**सभापती** : या बाबतीत महसूल मंत्री, कृषि मंत्री या दोघांनाही मी बैठकीसाठी निमंत्रित करतो, म्हणजे या प्रश्नाला न्याय मिळेल. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांचे म्हणणे तेच होते. 50 टक्क्याच्या आत आणेवारी आहे असे उत्तरात सांगितले. परंतु प्रत्यक्ष तशी परिस्थिती नाही, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याचे मी ऐकले आहे. मी यासंबंधी उद्या बैठक आयोजित करतो.

ॲड.उषा दराडे : बीड जिल्हयाचा या प्रश्नामध्ये उल्लेख आलेला नाही. बीड जिल्हयाचा देखील विचार केला जावा.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**चिंचणी (ता.डहाणू, जि.ठाणे) रिफाई मोहल्ला येथील पाण्याच्या टाकीची दुरुस्ती करणेबाबत**

**(६) * ४९६६५ श्री.जैनुद्दीन जव्हेरी : तारांकित प्रश्न क्रमांक ४१५३३ ला दिनांक ८ एप्रिल, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचणी (ता.डहाणू, जि.ठाणे) रिफाई मोहल्ला येथील परिसराला पाणी पुरवठा करणारी तीन लाख लीटर पाण्याची क्षमता असलेल्या पाण्याच्या टाकीची दुरुस्ती करण्याऐवजी सदरच्या ठिकाणी नवीन टाकी बांधण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(२) सदरहू टाकीच्या दुरुस्तीसाठी अथवा बांधकामासाठी माहे ऑक्टोबर, २००८ अखेर किती निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे व त्यापैकी किती निधी खर्च झाला आहे,

(३) उक्त टाकीचे काम अद्याप हाती न घेतल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.रामराजे नाईक-निंबाळकर** : (१) रिफाई मोहल्ला येथील परिसराला पाणी पुरवठा करणारी उंच साठवण टाकी नादुरुस्त असल्यामुळे त्याच टाकीच्या जागी नवीन ३ लाख क्षमतेची टाकी बांधण्याचा प्रस्तावास जिल्हा परिषद, ठाणे कडून प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

(२) व (३) सदर टाकीच्या बांधकामासाठी प्रोत्साहन निधी अंतर्गत रु.८८.०४ लक्ष इतका निधी प्राप्त झाला आहे. टाकीच्या बांधकामाचा प्रस्ताव तांत्रिक मंजूरीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आला असून तांत्रिक मंजुरी प्राप्त होताच निविदा प्रक्रिया पूर्ण करुन बांधकामास सुरुवात करण्यात येत आहे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, जिल्हा परिषद, ठाणे यांच्याकडून प्रशासकीय मान्यता केव्हा देण्यात आली? टाकीच्या बांधकामाचा तांत्रिक मंजुरीचा प्रस्ताव म.जि.प्रा.कडे केव्हा सादर करण्यात आला? तांत्रिक मंजुरी लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत? म.जि.प्रा.कडून तांत्रिक मंजुरी मिळण्यास विलंब होण्याची कारणे काय?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, 10.8.2008 रोजी अधीक्षक अभियंता, म.जि.प्राधिकरण यांच्याकडे प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी सादर झाला, त्यावर त्यांनी काही रिमार्क्स दिले होते. एम.एस.ई.बी.कडून कोटेशन प्राप्त न झाल्यामुळे विलंब झाला. सगळे काम पूर्ण होत आलेले असून 88 लाख रुपये जिल्हा परिषदेस प्रोत्साहन निधीमधून उपलब्ध होत असल्यामुळे 3.1.2009 पर्यंत तांत्रिक मान्यता प्रदान केली जाईल. 18.2.2009 ला निविदा प्रक्रिया 45 दिवसांसाठी काढली जाईल आणि 25.2.2009 पर्यंत कार्यादेश देऊन जलकुंभाचे काम 25.10.2009 पर्यंत पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.49665.........

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या टाकीचे बांधकाम लवकर सुरु होईल असे मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले आहे. परंतु त्या भागात तीव्र पाणी टंचाई जाणवत असून तेथे खारे पाणी मिळत असल्यामुळे होणाऱ्या आजाराची जबाबदारी कोण स्वीकारणार आहे? मंत्रीमहोदयांनी सांगितलेल्या कालावधीत हे काम पूर्ण होईल का?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, जर पाणी टंचाई उद्‌भवली तर टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येईल. ही टाकी नादुरुस्त असली तरी वापरात असल्यामुळे तेथे पुरेसे पाणी पुरविले जात आहे.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे येथील इंडियन रबर रिजनरेटींग कंपनीमधील कामगारांची देणी देणेबाबत**

**(७) * ४७१७१ श्री. संजय केळकर , श्री. विनोद तावडे , श्री. रामनाथ मोते :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वागळे इस्टेट, ठाणे येथील इंडियन रबर रिजनरेटींग कंपनी गेली २७ वर्षे बंद असून कंपनी व्यवस्थापनाने ४२५ कायम कामगारांची कायदेशीर देणी अद्यापपर्यन्त दिलेली नसताना व्यवस्थापनाने कंपनीची जागा बँकेच्या मदतीने परस्पर विकून कोट्यावधी रुपये कमावले असून कामगार मात्र कायदेशीर घेणी घेण्याबाबत गत २७ वर्षापासून वंचित राहिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोर्टाने कामगारांची देणी त्वरीत द्यावीत असा आदेश देऊनही अद्याप पर्यंत शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कामागारांची कायदेशीर देणी त्वरीत देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक** : (१) अशंत: खरे आहे. वागळे इस्टेट, ठाणे येथील इंडियन रबर रिजनरेटींग कंपनी गेली २७ वर्षे बंद असून कामगारांना त्यांनी कायदेशीर देणी देण्यात आलेली नाहीत. हे खरे आहे. कामगारांचे देय रक्कमांबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) नाही.

(३) सर्व श्रमिक संघ या कामगार संघटनेतर्फे मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे एकूण ४१७ कामगारांच्या वतीने कायदेशीर देणी मिळण्यासाठी याचिका क्र. ३५११/२००७ दाखल करण्यात आलेली असून याचिका न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ही कंपनी बंद पडली असली तरी त्या कंपनीने देना बँकेकडून फक्त 6 लाख रुपये कर्ज घेतले होते. ज्यावेळी टाळेबंदी घोषित केली त्यावेळी कामगार न्यायालयातील खटला कामगार जिंकले. त्यांना भरपाई मिळाली पाहिजे असा निकाल देण्यात आला. नंतर देना बँकेने कंपनीची जागा काही कोटी रुपयांना एका कन्स्ट्रक्शन कंपनीला विकली. आलेल्या पैशातून कामगारांची देणी दिली पाहिजेत असा नियम असल्यामुळे कामगार पाठपुरावा करीत आहेत की, कन्स्ट्रक्शन कंपनीला विकास करु देऊ नये. यासाठी कामगार विभागाकडून कामगारांची प्रलंबित देणी मिळेपर्यंत सीडीएस कन्स्ट्रक्शन कंपनीला त्या जागेवर विकास करण्यास परवानगी देऊ नये असे नगरविकास विभागाला कळविले जाईल काय?

(नंतर श्री.खर्चे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 47111.............

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, हे खरे आहे की, 400 पेक्षा जास्त कामगारांचे लिगल ड्युज अद्यापही देण्यात आलेले नाहीत. वागळे इस्टेटमधील 20 हजार मीटर एवढ्या क्षेत्रफळाची ही जागा देना बँकेने फक्त दोन कोटीमध्ये विकली. याप्रकरणात विकासकाला स्थगिती देण्यात आली असून सध्या हे प्रकरण न्यायालयात आहे. तसेच संबंधितांवर कारवाई झालेली असल्याचा निष्कर्ष आला आहे. कारण सन 1979 मध्ये तहसीलदाराने ही जागा वसुलीसाठी ताब्यात घ्यावी, असे आदेश पारित केले होते. परंतु त्यानुसार ती जागा ताब्यात घेण्यात आली नाही. त्याच काळात या जागेची किंमत 20 कोटी रुपये एवढी होती तरी देखील फक्त 2 कोटीलाच ही जागा विकली हे खरे आहे. म्हणूनच या प्रकरणात तहसीलदाराने केलेल्या कार्यवाहीबाबत संशय निर्माण होतो. या जागेची विक्री झाल्यानंतर स्टॅम्प ड्युटी फक्त 30 हजार भरण्यात आली. वास्तविक रेडिरेक्नरप्रमाणे 20 कोटीची किंमत गृहित धरुन स्टॅम्प ड्युटी आकारणे आवश्यक होते, तरी देखील केवळ 30 हजार स्टॅम्प ड्युटी भरल्यामुळे हा संशय व्यक्त होतो. त्यामुळे तहसीलदार आणि जिल्हाधिकारी कार्यालय तसेच डीआयटी यांच्याबाबत संशयास जागा आहे. याप्रकरणात विविध ठिकाणी भ्रष्टाचार झाल्याचे सकृतदर्शनी दिसते म्हणून विधि व न्याय विभागाचा सल्ला घेण्यात येईल. तसेच या भागात इस्टेट एजन्सीज, निरनिराळ्या एजन्सींज आहेत त्यांच्याकडून माहिती घेण्यात येईल. कारण 20 कोटीची जागा फक्त 2 कोटीलाच कशी विकली आणि मालकाने त्याला हरकत का घेतली नाही यावरुन या प्रकरणात टेबलाखालचा व्यवहार झालेला असल्याचे सिध्द होते. यासाठी एसआयटीची नेमणूक केली असून त्यांच्यामार्फत डीआयटीची चौकशी करण्यात येईल. त्याचप्रमाणे शासनाच्या कर्मचाऱ्यांकडून जो प्रकार झाला त्यासाठी देखील एक उच्चस्तरीय समिती नेमून संबंधित विभागातील कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येईल. देना बँकेतील ज्या कर्मचारी अथवा अधिकाऱ्यांचा सहभाग या व्यवहारात असेल त्यांच्या संदर्भात कारवाई करण्याच्या अनुषंगाने केंद्रशासनाला पत्र पाठवून त्यातील दोषींवर कारवाई करण्यासंबंधीची शिफारस करण्यात येईल. तसेच हा संपूर्ण व्यवहार रद्द करण्यात येईल आणि ती जागा पुन्हा ऑक्शन करुन विकण्याची कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल आणि कामगारांना पैसे मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

-----------

..........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाच्या कामाबाबतची सद्य:स्थिती**

**(8) * 48205 श्री. संजय पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड : तारांकित प्रश्न क्रमांक 43502 ला दिनांक 24 जुलै, 2008 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **जलसंपदा ( कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा-भीमा स्थिरीकरण प्रकल्पाच्या योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे काय,

(2) असल्यास, त्यानुसार पुढे काणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्न भाग (1) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामराजे नाईक-निबांळकर** : (1) नाही.

(2) प्रश्न उद्भवत नाही.

(3) सध्या चालू असणाऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादाच्या निर्णयानंतर हा प्रकल्प हाती घेण्याचे धोरण आहे.

श्री. जितेंद्र आव्हाड : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या लेखी उत्तराने माझे समाधान झालेले आहे, म्हणून मी या तारांकित प्रश्नावर उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

-----------

.......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ SBT/

**मौखाडा (जि.ठाणे) येथील वैतरणा नदीवर धरण कामासाठीच्या निविदांबाबत**

**(9) * 46622 श्री. जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील , डॉ. एन. पी. हिराणी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. लक्ष्मण जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक 44421 ला दिनांक 17 जुलै, 2008 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबई शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील मोखाडा येथे वैतरणा नदीवर मध्य वैतरणा धरणाच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांची सुरु असलेली छाननी पूर्ण झालेली आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या छाननीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्न भाग (1) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (1) होय.

(2) निविदाकरांनी सादर केलेल्या कागदपत्राच्या छाननीअंती 05 निविदा प्रतीसादत्मक ठरल्या. त्यापैकी मे.सी.डब्ल्यू.ई.-सोमा कन्सॉर्शियम यांची निविदा स्थायी समितीच्या मान्यतेने स्वीकारण्यात आली.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, याप्रकरणी एकूण किती निविदा आल्या ? व त्या केव्हा आल्या होत्या? तसेच यासंबंधीचा निर्णय घेण्यासाठी विलंब होण्याचे कारण काय ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, एकूण पाच निविदा आल्या होत्या. या निविदांमध्ये कमी दराची निविदा मे सी.डब्ल्यू.ई.-सोमा कन्सॉर्शियम यांच्याकडून प्रात झाली होती. तसेच त्यानुसार हे काम या कंपनीला पूर्ण करावयाचे आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, स्थायी समितीमध्ये या कामासंबंधीचा ठराव पास झाला त्याची वर्क ऑर्डर कधी निघाली होती ?

श्री. हसन मुश्रीफ : महोदय, दि. 24.10.2008 रोजी या कामाची वर्क ऑर्डर निघाली.

----------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ SBT/

**कोयना धरणातून वाया जाणाऱ्या पाण्याचा वापर करण्याबाबत**

**(10) * 45872 श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेश नवले , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे , श्री. संजय पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री.केशवराव मानकर : तारांकित प्रश्न क्रमांक 41993 ला दिनांक 17 जुलै, 2008 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोयना धरणातून वाया जाणाऱ्या पाण्याचा वापर करण्याबाबतच्या अहवालातील शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर शिफारशींवर निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(3) अद्याप, कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत?

**श्री.अजित पवार** : (1) होय.

(2) शासनाने अद्याप निर्णय घेतलेला नाही.

(3) कार्यवाही सुरु आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 45872.....**

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, धरणातून वाया जाणा-या पाण्याचा वापर करण्यासंबंधिच्या शिफारसींचे स्वरुप काय आहे? तसेच प्राप्त शिफारसींनुसार निर्णय घेण्यास किती कालावधी निश्चित करण्यात आला होता? शिफारसीनुसार निर्णय घेण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, श्री. पेंडसे, माजी सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पश्चिमेकडे वळवलेल्या कोयना जलाशयाच्या वापरासाठी ज्या शिफारशी केल्या आहेत त्या शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

विपूल जलसंपत्तीचा विकास व वापर यासाठी तातडीने कार्यवाहीची आवश्यकता, जलसंपत्तीच्या विकासासाठी कोयना अवजलाचा वापर करण्यासाठी वेगळया आर्थिक निकषाची आवश्यकता तसेच प्राधान्याने आर्थिक गुंतवणूकीची गरज, खोरे निहाय बहुउद्देशीय प्रकल्पांच्या भावी नियोजनाची दिशा, छोटया, जलद विद्युत केंद्रांद्वारे जलविद्युती निर्मिती व वापर यासंबंधीचा नवा दृष्टिकोन, शाश्वत पाणी पुरवण्यासाठी दीर्घकालीन योजना, जलविकासातून बाधित झालेली शेती व त्यातून शेतक-यांचा व समाजाचा सर्वांगीण विकास यासाठी शेतकरी, ग्राहक केंद्रस्थानी असणे आवश्यक, आदर्श नदी खोरे विकासासाठी वशिष्टी नदी खोरे विकासाचा आराखडा, कोकणातील जलसंपत्तीचा शेतक-यांच्या आर्थिक उन्नती व उत्पन्नासाठी वापर. या शिफारसींचा शासनाकडून विविध बाजूने अभ्यास सुरु आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कोयना धरणाच्या अवजलाच्या संदर्भातील शिफारसी कोणत्या तारखेला केल्या होत्या ? या शिफारसींमध्ये कोकणातील वशिष्टी नदीतून वाया जाणा-या पाण्याच्या संदर्भात कोणत्या उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, कोयना धरणाच्या अवजलाच्या संदर्भातील शिफारसी 14.4.2008 रोजी करण्यात आलेल्या असून या विषयाच्या संदर्भात अनेक शिफारसी असल्यामुळे शासनाकडून अभ्यास सुरु आहे. वशिष्टी नदीच्या खो-याचा देखील यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2....

**ता.प्र.क्र. : 45872.....**

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, या धरणातून नेमके किती पाणी वाहून जाते?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, हे पाणी वाहून जात नसून विद्युत निर्मितीसाठी 67 टीएमसी पाणी वळविण्यात आलेले आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या अहवालात अनेक शिफारसी आहेत परंतु यातील प्रमुख शिफारसी माननीय मंत्रीमहोदय या क्षणाला सांगू शकतील काय? प्रमुख शिफारसी माननीय मंत्रीमहोदय या ठिकाणी सांगणार नसतील तर त्या शिफारसी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतील काय?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, शिफारसी पटलावर ठेवण्यात येतील.

-------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोकणातील मच्छिमारांसाठी जाहीर केलेले सानुग्रह अनुदानाबाबत**

**(11) * 46764 श्री.राजन तेली , श्री. संजय दत्त , श्री. सुरेश नवले , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुभाष चव्हाण, श्री. विनोद तावडे, श्री. मधुकर चव्हाण, श्री. संजय केळकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री. जयप्रकाश छाजेड , श्री. उल्हास पवार , श्री. रामनाथ मोते , श्री.भास्कर जाधव , श्री.विक्रम काळे , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री.रमेश शेंडगे , प्रा. फौजीया खान , श्री.सय्यद जामा , श्रीमती अलका देसाई , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

1) कोकणातील सर्व जिल्हयांमधील पडलेल्या मत्स्य दुष्काळामुळे शासनाने 31 कोटी 56 लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान जाहिर करुन त्यापैकी 20 कोटी रुपयांचे अनुदान मत्स्यव्यवसाय विभागास दिले असून उर्वरित अनुदान न मिळाल्याने रक्कमेचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(2) उक्त 20 कोटी रुपयांच्या अनुदानामधून केवळ 7 कोटी 63 लाख रुपयांचा निधी रायगड जिल्ह्याकरिता वितरीत केला, तसेच कोकण पॅकेज अंतर्गत रायगड जिल्हयातील मच्छीमार सोसायटयांनी दाखल केलेल्या 1809 प्रस्तावापैकी, 892 प्रस्ताव शासनाने फेटाळून लावले हे ही खरे आहे काय, असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(3) उक्त रुपये 31 कोटी 56 लाखांपैकी उर्वरित रक्कम न मिळण्यामागची कारणे काय आहेत, उर्वरित 12 कोटींचा निधी वितरणासाठी त्वरित उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे,

(4) असल्यास, या प्रकरणी निष्काळजीपणे काम करुन गैरव्यवहार केलेल्या अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, व अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(5) त्याचप्रमाणे अनुदान प्राप्त होऊन सुध्दा पॅकेजच्या लाभापासून पात्र मच्छिमार वंचित राहिले असल्याने व मासे हंगामात पुरेसे मासे मिळत नसल्यामुळे पुन्हा मत्स्यदुष्काळ जाहिर करावा, अशी विविध मच्छिमार संघटना व लोकप्रतिनिधींनी माहे, सप्टेंबर, 2008 मध्ये मागणी केली, हे खरे आहे आहे, सदर मागणीबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(6) तसेच मत्स्यबीज योजनेसाठी वेगळा निधी उपलब्ध करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, 2008 च्या सुमारास घेतला आहे काय, असल्यास निर्णयाचे स्वरुप काय आहे व याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**श्री. हसन मुश्रीफ, श्री.रविशेठ पाटील यांच्या करिता**: (1) नाही, हे खरे नाही. शासन निर्णय क्रमांक 05-07-2008 व दिनांक 07-08-2008 अनुसार रुपये 31 कोटी 56 लाख इतके सानुग्रह अनुदान मंजुर करण्यात आलेले आहे.

(2) आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचेकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार पात्र लाभार्थींना अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(3) शासन निर्णय दि. 5.7.2008 व दि. 7.8.2008 अन्वये कोकणातील मच्छिमारांकरीता विशेष पॅकेज अंतर्गत रु. 31.56 कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(5) मत्स्यदुष्काळजन्य परिस्थिती नाही.

(6) असा निर्णय झाला नाही.

....4.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 46764 .....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, प्राप्त अनुदानानुसार मत्स्य दुष्काळातील सर्व लाभार्थ्यांना आर्थिक लाभ देण्यात आलेला आहे काय? अद्याप किती पात्र लाभार्थी अनुदानापासून वंचित राहिलेले आहेत याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देऊ शकतील काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, लोकशाही आघाडी शासनाने या राज्यामध्ये पहिल्यांदा 31.56 कोटी रुपये इतके सानुग्रह अनुदान कोकणातील मच्छिमारांसाठी मंजूर केलेले आहे. आतापर्यंत 28 कोटी रुपयांचे सानुग्रह अनुदान वाटप झालेले आहे. या मध्ये लाभार्थी आणि संस्था आहेत, त्यांची संख्या 49216 असून शासन निर्णयानुसार 31056 आणि 44805 असे आतापर्यंत वाटप केलेले आहे. जे मच्छी सुकवणारे लोक आहेत, बोटीने न जाता पारंपारीक पध्दतीने जे मच्छिमारी करतात अशांना सुध्दा हा लाभ द्यावा, अशा प्रकारच्या मागण्या आहेत. त्यामुळे यासंदर्भात शासन गंभीरपणे विचार करीत आहे.

श्री. परशुराम उपकर : सभापती महोदय, काही मच्छिमार संस्थांना पॅकेज अंतर्गत मिळणारे अनुदान अद्याप पर्यंत मिळालेले नसल्यामुळे काही संस्थातील लोक उपोषणास बसले आहेत हे खरे आहे काय? तसेच काही संस्था मच्छिमारांच्या सानुग्रह अनुदानातून पैसे कट करीत आहेत अशा प्रकारच्या अनेक बातम्या आलेल्या आहेत हे खरे आहे काय? ज्या छोटया मच्छिमारांना या पॅकेजमधून वगळण्यात आलेले आहे अशा छोटया छोटया मच्छिमारांना सानुग्रह अनुदान मिळणार आहे काय?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र46764.....

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, जे मच्छिमार मदतीपासून वंचित राहिलेले आहेत त्यांना मदत करण्याची शासनाची मन:स्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही संस्था मच्छिमारांचे पैसे कापतात. सन्माननीय सदस्यांनी त्या संस्थांची नावे दिल्यास त्याबाबत चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी कोकणासाठी जे पॅकेज जाहीर केले होते ते किती रकमेचे होते ? या रकमेपैकी सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी किती रक्कम होती, त्या रकमेचे वाटप झालेले आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कोकणासाठी एकूण 31 कोटी 56 लाख रुपंयाचे पॅकेज होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 8827 लाभार्थ्यांना एकूण 5 कोटी 36 लाख 88 हजार इतक्या रकमेचे वाटप केलेले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरात सांगितले की, जे मच्छिमार व्यावसायिक आहेत त्यांना सुध्दा मदत केली जाणार आहे. मच्छिमार करणाऱ्यांमध्ये भोई समाज देखील आहे. हा समाज फक्त मच्छिमार करतो. असे असूनही त्यांचा समावेश मच्छिमारांमध्ये केला जात नाही. या संदर्भात मागील अधिवेशनात मी माननीय मंत्रिमहोदयांना भेटून ही बाब सांगितली होती. त्यांनी देखील मला आश्वासन दिले होते. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, भविष्यात मच्छिमारांना जी मदत केली जाईल ती भोई समाजाला देण्यात येईल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या संदर्भात तत्कालीन मंत्री श्री.नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. परंतु आता मत्सव्यवसाय मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा एकदा बैठक धेऊन त्या बैठकीमध्ये कोकणातील आमदारांना बोलाविण्यात येईल. या बैठकीत जे मदतीपासून वंचित राहिलेले आहेत त्यांना मदत देण्याबाबत विचार करण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र46764.....

श्री.अरविंद सांवत : सभापती महोदय, मच्छिमारांना डिझेलचा परतावा दिला जातो. तसेच केरोसीनमध्ये सबसिडी दिली जाते. पंरतु अजूनपर्यंत काही मच्छिमारांना डिझेलचा परतावा वेळेवर मिळत नाही., मत्स्य दुष्काळजन्य परिस्थिती नाही असे उत्तरात नमूद केले असले तरी समुद्रात मासे मिळत नाहीत. तेव्हा शासन मत्स्य दुष्काळ जाहीर करणार काय ? ज्या मच्छिमारांना डिझ ेलचा परतावा मिळालेला नाही तो त्यांना लवकरात लवकर देण्यात येईल काय, तसेच त्यांना केरोसीनमध्ये सबसिडी केव्हा देणार आहात ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मत्स्य दुष्काळ जाहीर करण्यामध्ये अडचणी होत्या म्हणून मच्छिमारांसाठी 31 कोटी 56 लाख रुपंयाचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. मच्छिमारांना डिझेलचा परतावा महिन्याच्या महिन्याला मिळावा अशाप्रकारचे आदेश संबंधितांना दिलेले आहेत. तरी सुध्दा मच्छिमारांना वेळेवर डिझेल परतावा मिळत नसल्यास त्यांची सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफीक नावे द्यावीत त्याबाबत चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नंदुरबार जिल्ह्यातील कापूस शेतकऱ्यांचे माहे सप्टेंबर, 2008 च्या पावसामुळे बोंडे व कोंब सडल्यामुळे झालेल्या नुकसानाबाबत**

**(12) * 49911 श्री. चंद्रकांत रघुवंशी** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नंदुरबार जिल्ह्यातील कापुस शेतकऱ्यांनी माहे मे व जून, 2008 या महिन्यात लागवड केलेल्या शेतीचे माहे सप्टेंबर, 2008 च्या संततधार पावसामुळे कापसाची बोंडे व कोंब सडल्यामुळे सुमारे 15 हजार हेक्टरपेक्षा जास्त उत्पादक शेतकऱ्यांचे पीक धोक्यात येऊन नुकसान झाल्याचे दिनांक 29 सप्टेंबर, 2008 रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे,हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर उत्पादक शेतकऱ्यांच्या नुकसानीचे सर्व्हेक्षण करुन जिल्हा प्रशासनाने शासनामार्फत कोणते सानुग्रह अनुदान देण्यात आले वा येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सुरेश वरपुडकर,श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, जे लेखी उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. नंदूरबार जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा हा प्रश्न आहे. त्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या दालनात बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय राज्यमंत्रिमहोदयांकडून उत्तर आल्यानंतर त्या प्रश्नाच्या संदर्भात बैठक घ्यावी किंवा कसे याबाबत विचार करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या सौजन्याचा दुरुपयोग केला जात आहे.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मधाशी एका प्रश्नाच्या संदर्भात माझ्या दालनात बैठक घेऊन तो सोडविला जाईल असे सांगितले कारण तो महत्वाचा प्रश्न होता म्हणून मी तसे सांगितले.

श्री.सुरेश वरपुडकर : सभापती महोदय,नंदूरबार जिल्ह्यात पावसाचे सरासरी प्रमाण 161 से मी.आहे. परंतु या वर्षी 321 से.मी. इतका पाऊस झाला. नंदूरबार जिल्ह्यात सतत दहा-अकरा दिवस पाऊस झाल्यामुळे जमिनी लगतची कापसाची बोंडे खराब झाली. परंतु वरच्या बाजूची बोंड खराब झाली नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले नाही. केवळ जमिनी लगतची बोंड खराब झालेली आहेत. यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.49911...

श्री.चंद्रकांत रघुवंशी :सभापती महोदय, ही चुकीची माहिती आहे. माझे असे म्हणणे आहे की, नंदूरबार जिल्हयामध्ये अनेक गावे 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असलेली आहेत. बोंडेच लागली नाही तर कापूस कसा निघणार ? एकरी एक क्विंटल किंवा दोन क्विंटल कापूस निघालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. प्रशासनाकडे त्याचा पंचनामासुध्दा आहे. लोक प्रतिनिधींनी मागणी केल्यानंतर प्रशासनाने त्यासबंधीचा अहवाल सुध्दा मागितला होता परंतु कृषी विभागाचे पंचनामे झाले नाहीत व ते अधिकारी गेले नाहीत. त्यामुळे आपल्या पर्यंत सुस्पष्ट अहवाल आला नाही.

श्री.सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, कृषी विभाग आणि महात्मा फुले विद्यापीठाच्या अधिका-यांनी त्या ठिकाणी जाऊन संयुक्त पहाणी केली होती आणि तशा प्रकारचा अहवाल दिला आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी :सभापती महोदय, हा प्रश्न देखील आपल्या दालनातील बैठकीच्या वेळी चर्चेसाठी घेण्यात यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** :उद्या या विषयाच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी जी बैठक घेण्यात येणार आहे. त्यावेळी या प्रश्नासबंधी देखील चर्चा करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे :सभापती महोदय, हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे आपण एक मिनिट जास्त देऊन त्यावर चर्चा केल्याबद्दल मी आपणास मनापासून धन्यवाद देतो. परवा एक महत्वाचा प्रश्न अचानक संपविण्यात आला होता . परंतु आज आपण एक मिनिट जास्त चर्चा केली त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो

**सभापती** : पीठासीन अधिका-यांनी दिलेला निर्णय सर्वांवर बंधनकारक असतो.

श्री.विनोद तावडे : मी आपले आभार मानतो.

**सभापती** : माझे आभार मानू नका.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. लेखी उत्तरे

**मु.शी** : तारांकित प्रश्नां संबधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.सुरेश वरपुडकर (कृषी राज्यमंत्री) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "सन 2005 मध्ये झालेल्या गारपीटीमुळे विदर्भातील नुकसान झालेल्या शेतक-यांना आर्थिक मदत न मिळाल्याबाबत " या विषयावरील सर्वश्री लक्ष्मण जगताप, डॉ.वसंत पवार, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, राजेंद्र जैन, श्रीमती उषाताई् दराडे, श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. आणि श्री. सदाशिवराव पोळ माजी वि.प.स. यांच्या दिनांक 14 डिसेंबर 2006 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 23206 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस :कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती येथे छापावी )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी** : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राणा जगजितसिंह पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त यांनी माननीय राज्यपालांना सादर केलेला बत्तीसावा वार्षिक एकत्रित अहवाल ( दिनांक 1 जानेवारी ,2004 ते 31 डिसेंबर 2004 ) त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांनी माननीय राज्यपालांना सादर केलेले अनुक्रम दिनाक 4 मे 2001, 5 मे 2001, 14मे 2001, 29 जून 2001, 31 जुलै 2001, 25 सप्टेंबर 2001, 2 नोव्हेंबर 2001, 22 एप्रिल 2002, 16 ऑक्टोबर 2002, 26 डिसेंबर 2002, 24 एप्रिल 2003 व 9 जून 2003 चे विशेष अहवाल, त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह तसेच माननीय उप लोक आयुक्तांचा दिनांक 31 डिसेंबर 2002 चा विशेष अहवाल, त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमासेर ठेवतो.

**सभापती** :अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र पेट्रो केमिकल्स महामंडळ मर्यादितचा सन 2006-2007 चा सव्विसावा वार्षिक अहवाल सभागृहा समोर ठेवतो.

**सभापती** :अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ. सतीश पाटील ( महिला व बाल विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादिचा सन 1993-94, 1994-95, 1995-96 चा अनुक्रमे एकोणिसावा, विसावा व एकविसावा वार्षिक अहवाल सभगृहासमोर ठेवतो.तसेच या निमित्ताने विनंती करतो की, हा अहवाल विलंबाने सादर करण्यात आले असून त्याची कारणे देखील मी सादर करीत आहे.

**सभापती** :अहवाल सभगृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धप्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. रामनाथ मोते (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पंचायती राज समितीचा सतरावा व अठरावा अहवाल (सन 2008-09) सभागृहाला सादर करतो.

**सभापती** : पंचायती राज समितीचा अहवाल सभाृहाला सादर झाला आहे.

***

**औचित्याचे मुद्दे**

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास परवानगी दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानतो. सभापती महोदय, काल या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी एक औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता आणि त्यावेळी त्यावर माननीय उपसभापती महादयांनी त्याबाबतचा अहवाल देण्यास शासनाला सांगितले होते त्याप्रमाणे तो अहवाल आता आलेला आहे आणि तो माझ्या हातात आहे. सभापती महोदय, हे अतिशय गंभीर प्रकरण आह. वर्तकनगर पोलीस ठाण्यातील गुन्हा रजि.क्रमांक 3068/2008 या खाली कलम 354, 352, 341, 323, 504, 506, 34 आणि भा.दं.वि.सहकलम 3(10) तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा 1989 याखाली ॲट्रॉसिटी गुन्हा वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी दाखल केला आहे. या बाबत पोलीस महासंचालकांचा जो अहवाल आलेला आहे तो संपूर्ण वाचून दाखवून मी सभागृहाचा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु त्या अहवालत असे नमूद केले आहे की, तेथील पोलीस निरीक्षक श्रीमती दोंदे यांना अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अधिनियमानुसार गुन्हा तपासण्याचा अधिकार नसताना त्यांनी आपल्या पदाचा दुरूपयोग करून अटक करण्यास उपनिरीक्षकांना भाग पाडले. सभापती महोदय, काल या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता आणि सांगितले होते की, संबंधित वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना अधिकार नसतानाही त्यांनी संबंधित लोकांना ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार अटक करून त्यांना मानसिक टॉर्चर केले तसेच त्यांच्या नोकरीवर गदा आणण्याचा, त्यांना जमानत न देण्याचा प्रयत्न केला. त्या पोलीस निरीक्षकांनी अधिकार नसताना त्या लोकांना

..... एन 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

अटक केली आणि कोर्टापुढे हजर करून मानसिक छळ केला असा अहवाल पोलीस महासंचालकांनी दिलेला आहे. सभापती महोदय, अशा प्रकारे पोलीस अधिकारी वागत असतील, ॲट्रॉसिटी कायद्याखाली अटक करीत असतील ... आता तो मुद्दा या सभागृहात सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला म्हणून ही बाब उघड झाली आहे तेव्हा ज्या पोलीस अधिकाऱ्याने त्यांना अधिकार नसताना असा प्रकार केला आहे त्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी मी येथे करतो आणि पोलीस महासंचालकांच्या अहवालाची प्रत मी आपल्याकडे आपल्या अवलोकनार्थ देतो. त्याचे आपण अवलोकन करून आपण योग्य तो निर्णय द्यावा.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, काल ऑचित्त्याच्या मुद्याद्वारे हा विषय मी येथे उपस्थित केला होता. एक तर विधीमंडळाचे अधिवेशन चालू आहे आणि असे असताना मी स्वत: संबंधित वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना फोन करून सांगितले होते की, तुम्ही जे काही करीत आहात ते चुकीचे आहे, तुमच्या अधिकार कक्षेबाहेर जाऊन तुम्ही काम करीत आहात. त्यावर त्या अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, तुम्हाला जे काही करायचे आहे ते तुम्ही करा, मला फाशी लागणार आहे काय ? सभापती महोदय, ज्या लोकांना अटक झाली होती ते मी या सभागृहात हा मुद्दा उपस्थित केल्यामुळे सुटू शकले अन्यथा त्यांना 14 दिवस तुरूंगात काढावे लागले असते आणि त्यामुळे त्यांच्या नोकरीवरदेखील गदा आली असती. सभापती महोदय, एका वरिष्ठ पोलीस निरीक्षकाच्या दादागिरीमुळे अशा प्रकारे गैरकायदेशीर व्यवहार होणार असेल तर पोलिसांवर कोणीच विश्वास ठेवणार नाही. म्हणून माझी मागणी आहे की, एक तर आमदार या नात्याने सदरहू पोलीस अधिकाऱ्याने मला समर्पक उत्तर दिले नाही आणि पूर्णपणे बेकायदेशीर काम केल्याचा पोलीस उपायुक्तांचा अहवाल आलेला आहे. तेव्हा याची दखल घेऊन आपण त्वरित संबंधित वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना निलंबित करणे आवश्यक आहे, तसे आपण करणार का ?

( यानंतर श्री. सरफरे ..... ओ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने त्यांच्याजवळील कागदपत्रांची प्रत माझ्याकडे दिली आहे. तथापि, या प्रकरणातील डेप्युटी कमिशनर यांची प्रत अद्यापि मला प्राप्त झालेली नाही. मी या निमित्ताने एवढेच सांगतो की, सन्माननीय विरोधी पक्षनेते व माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सभागृहामध्ये उपस्थित केलेले प्रकरण गंभीर स्वरुपाचे आहे. या संदर्भातील अहवाल माझ्याकडे आल्यानंतर त्याबाबत गृह विभागाला कठोर कारवाई करण्याबाबत मी जरुर सांगेन.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेली ही सत्यप्रत असून त्यावर आधारीत आपण कारवाई करावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेल्या कागदपत्रावरुन हे प्रकरण गंभीर असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी देखील परवा या संदर्भात आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत....

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जितेद्र आव्हाड यांनी फोन केल्यानंतर सुध्दा जे पोलीस अधिकारी आमदारांशी अपमानास्पद बोलतात. अशा पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केले पाहिजे.

**सभापती** : माननीय सदस्य श्री. रघुवंशीजी मी आपणास सांगू इच्छितो की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेली कागदपत्रे माझ्याकडे आहेत. परंतु या संदर्भातील डेप्युटी कमिशनर यांचा अहवाल अजून माझ्यासमोर आलेला नाही. अशा परिस्थितीत मला निर्णय घेण्यासाठी अवधी मिळाला पाहिजे.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, सभागृहामध्ये माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी मानून कारवाई झाली पाहिजे. माननीय सदस्यांनी त्या अधिकाऱ्यांना फोन केल्यानंतर त्यांनी आमदारांना अपमानास्पद उत्तर दिले...

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेल्या कागदपत्रांची प्रत माझ्याकडे आहे. तथापि, या संदर्भातील अधिकृत प्रत मला मिळणे गरजेचे आहे. ती प्रत अजूनपर्यंत माझ्याकडे आली नाही. अशापरिस्थितीत औपचारिक निर्णय घेत असतांना संबंधित गृह विभागाला याबाबत कठोर कारवाई करावी असे मी सांगतो.परंतु माझ्याकडे त्याबाबतची कोणतीही ऑर्डर नसतांना मी कसे सांगणार?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला जी प्रत मिळू शकते ती आपणास कां मिळू शकत नाही?

**सभापती** : ती प्रत मला मिळण्यास विलंब कां होत आहे? याचे कारण मी लगेच सांगू शकत नाही.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आपण त्या दिवशी संध्याकाळी 4 वाजेपर्यंत अहवाल सादर करण्याचे सरकारला आदेश दिले होते.

**सभापती** : त्या दिवशी तो अहवाल शासनाने सादर करावयाचा होता. यदाकदाचित तो अहवाल गृह विभागाकडे येऊन तेथून तो माझ्या दालनामध्ये येणे महत्वाचे आहे. तो माझ्या दालनामध्ये आला की नाही हे मी तपासून बघतो. याक्षणी तो अहवाल माझ्याकडे आलेला नाही.तो आल्यानंतर मी त्याबाबत जरुर विचार करीन.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, तो अहवाल आपणास प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल काय?

**सभापती** : मी त्याबाबत माननीय गृहमंत्र्यांना निवेदन करण्यास सांगणार आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

**सभापती**.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. शिक्षकांना अशैक्षणिक कामे देण्यात येऊ नयेत अशाप्रकारचा आदेश शासनाने देऊनही महसूल विभागाचेच्या अधिकारी शिक्षकांना अशैक्षणिक कामे देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान करीत आहेत. या कामासाठी शिक्षकांना वेठीस धरले जात आहे. याबाबत दिनांक 1 ऑगस्ट 2008 रोजी शालेय शिक्षण विभागाने सुधारीत जी.आर. काढून शैक्षणिक काम शिक्षकांना देण्याबाबत सूचना दिल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात 6 डिसेंबर 2007 रोजी निर्णय दिला असून केंद्रीय निवडणूक आयोगाने सुध्दा राज्य निवडणूक अधिकाऱ्यांना 28 जानेवारी 2008 रोजी पत्रान्वये सूचना दिल्या आहेत.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

तथापी, मतदार यादी तयार करणे, नवीन नावे समाविष्ट करणे इत्यादी कामे देण्यात आलेली आहेत. घरोघरी जाऊन फोटो पास काढण्याचे काम या शिक्षकांना दिले जात आहे. हजारो शिक्षक या कामासाठी नेमले जात असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शिक्षकांना अशा प्रकारची कामे दिल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असून काम करण्यास नकार दिल्यास संबंधित शिक्षकावर गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली जात आहे. या बाबतीत महसूल विभागाला योग्य त्या सूचना देण्याबाबत मी आपल्या मार्फत विनंती करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. बाळासाहेब थोरात यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे त्या अनुषंगाने शालेय शिक्षण विभागाला आपण जरुर लक्ष वेधण्यास सांगावे.

श्री. बाळासाहे थोरात : ठीक आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने यासंबंधी जी.आर. काढलेला आहे पंरतु अन्य विभागांनी त्याची दखल घेऊन अंमलबजावणी केली पाहिजे. त्यांच्या मार्फत ही कामे दिली जातात. शिक्षण विभागामार्फत ही कामे दिली जात नाहीत.

**सभापती** : ठीक आहे. यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मौजे पाथ्रुड, निथ्रुड, दिंद्रुड ता. माजलगाव, मौजे शिरसाळा ता. परळी, मौजे जहागीर मोहा दर्गा ता. धारुर, बालेपीर दर्गा, बीड, सायगाव दर्गा या सर्व दर्गा तसेच तांबेश्वर तांबवा, जालींदरनाथ देवस्थान, तागडगाव, वंजारवाडी, ता. परळी, दहीफळ वडमाऊली ता. केज या क्षेत्रांचा तीर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांत समावेश झाला असून त्याचे अंदाजपत्रक करुन प्रत्यक्ष काम करण्यास जिल्हा परिषद बीड जाणीवपूर्वक टाळाटाळ करीत आहे. फाईल्स सध्या कुठल्या टेबलवर आहेत हेही समजत

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती उषा दराडे .....

नाही. या क्षेत्रांचा विकास न केल्यामुळे सामान्य माणसात निर्माण झालेला असंतोष व त्याबाबत करावयाची तातडीची उपाययोजना याबाबत मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी आणखी एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. दहीफळ वडमाऊली ता. केज, जि. बीड या गावात वडमाऊली देवीच्या समोरील डोंगरावर गायरान जमीन उपलब्ध आहे. या जमिनीवर एमआयडीसी उभी करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मागणी केली. त्यास उद्योग राज्यमंत्र्यांनी सहमती दर्शविली. संबंधित मंत्र्यांकडे दोन बैठका झाल्या. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळ पहणी केली. प्रस्ताव प्रलंबित आहे असे सांगितले जाते. प्रत्यक्ष सध्या काय स्थिती आहे याकडे लक्ष वेधले असता सद्य:स्थिती समजून येत नाही. याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना याबाबत मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदय श्री. बाळासाहेब थोरात यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्रीमती उषा दराडे यांनी मांडलेल्या दोन्ही औचित्याच्या मुद्यांच्या अनुषंगाने आपण नोंद घ्यावी.

श्री. बाळासाहेब थोरात : ठीक आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. दोन्ही सभागृहातील सदस्यांना महाराष्ट्र राज्यामध्ये आणि राज्याच्या बाहेर सुध्दा जनतेच्या कामासाठी प्रवास करावा लागतो आणि म्हणून एस.टी.प्रवास आणि रेल्वे प्रवासाची सुविधा महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे. रेल्वेने प्रवास करीत असताना वातानुकुलित वर्ग दोन च्या डब्यातून प्रवास करु शकतो पण वातानुकुलित प्रथम वर्गाच्या डब्यातून प्रवास करण्याची सुविधा सन्माननीय सदस्यांना

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

उपलब्ध नाही. म्हणून मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, ज्या रेल्वे गाडीला वातानुकुलित प्रथमवर्गाचा डबा उपलब्ध आहे अशा रेल्वे गाडीतून सन्माननीय सदस्य प्रवास करीत असताना त्यांना वातानुकुलित प्रथमवर्गाने प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध झाली पाहिजे. अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. बाळासाहेब थोरात यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे त्याची आपण नोंद घ्यावी. तसेच मी माझ्या कार्यालयाला सुध्दा याची नोंद घेण्यास सांगत आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : ठीक आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बहुचर्चित धान्य घोटाळ्यातील महसूल विभागाचे एक पुरवठा अधिकारी आणि एक तहसीलदार या दोघांना या घोटाळ्यामध्ये अटक होऊन 48 तास कोठडीमध्ये जाऊन तसेच आपण आदेश देऊनही त्यांना अद्याप निलंबित केलेले नाही. संबंधित तहसीलदार आणि प्रांत या दोन्ही अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये कुडाळ पोलीस स्टेशन येते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

कुडाळ पोलीस स्टेशनचा तपास विशेष दंडाधिका-यांच्या अधिपत्याखाली असल्यामुळे पोलीस स्टेशन योग्य तपास करुन न शकल्यामुळे पोलिसांकडून अद्याप चार्जशीट दाखल झालेले नाही. त्या दोघांनाही अद्याप निलंबित केलेले नाही. या दोन्ही अधिका-यांना अटक झालेली आहे. परंतु त्या दोघांची बदली केलेली नाही. याची शासनाने नोंद घ्यावी.

**सभापती** : मंत्री महोदय श्री.रमेश बंग आपण या औचित्याच्या मुद्याची नोंद घ्यावी.

श्री.रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राचा खंड प्रकाशित करण्यासाठी राज्य शासनाकडून दिरंगाई होत असल्यामुळे मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राचा एकविसावा खंड प्रकाशित झालेला आहे. त्याचे अनुवादन करण्याची मागणी मी प्रत्येक अधिवेशनात करीत आहे. बाविसाव्या खंडामध्ये अतिशय महत्वाच्या कागदपत्रांचा उल्लेख आहे, घटना समितीमध्ये असताना त्यांनी काय म्हटले होते हे सर्वांसमोर यावयाचे आहे. याबाबत होत असलेल्या विलंबाला वेगवेगळी कारणे आहेत. या कामासाठी पैसा कमी असल्यामुळे नियोजन आयोगाने 5 कोटी रुपये देऊ केले आहेत. माननीय श्री.रा.सू.गवई हे बिहारचे राज्यपाल झाल्यावर हा विषय राजशिष्टाचारामध्ये अडकला. या कारणामुळे ग्रंथ प्रकाशनाचा विषय पुढे गेला आहे. ज्याला पिक्टोरियल ऑटोबायोग्राफी म्हणता येईल अशी दुर्मिळ छायाचित्रे लोकांनी आपल्या घरातून काढून दिली आहेत. त्या लोकांना दिल्लीला जाण्यासाठी रेल्वे भाडे दिले जात नाही. हा विषय देखील मी यापूर्वी उपस्थित केला आहे. तत्कालीन शिक्षण मंत्री श्री.वसंत पुरके यांनी 6 डिसेंबरला हा खंड प्रकाशित होईल असे म्हटले होते, त्यानंतर दुसरा 6 डिसेंबर येऊन गेला आहे, तरीही या कामात प्रगती झालेली नाही. हा विषय मी विशेष उल्लेखाद्वारे, औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित केला आहे. परंतु प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राच्या खंडाचे प्रकाशन करण्याच्या कामाला सरकार न्याय

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विनोद तावडे....

देत नाही. सभापती महोदय, आपण मंत्रिमहोदयांना आणि अधिका-यांना आपल्या चेंबरमध्ये बोलवून हा ग्रंथ केव्हा प्रकाशित होईल यादृष्टीने निदेश द्यावेत. कारण अनेक अभ्यासकांना या ग्रंथातून महत्वाची कागदपत्रे वाचावयास मिळणार आहेत, ते या ग्रंथाची वाट पहात आहेत.

**सभापती** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथ प्रकाशच्या कामामध्ये दिरंगाई होत आहे, हा महत्वाचा प्रश्न आहे. सन्माननीय मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम यांनी स्वत: या प्रश्नात लक्ष घातले तर हा प्रश्न मार्गी लागू शकतो.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, या प्रश्नात मी लक्ष घालून हा प्रश्न मार्गी लावतो.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा असे मराठी भाषेवर प्रेम करणा-या प्रत्येकाला वाटत असते, मराठी भाषेची वेल वाढत जावी, वेलीचा वृक्ष व्हावा आणि त्या वृक्षाच्या सावलीखाली सगळयांनी वाढावे अशी सर्वांची इच्छा आहे. मराठी भाषेचे साहित्य आणि बोली भाषेचा प्रचार व प्रसार होण्याचे आणखी एक माध्यम म्हणजे दूरदर्शन आहे. दूरदर्शनच्या अनेक चॅनेलवरुन मालिका प्रसारित केल्या जातात. या मालिकांमधून मराठी साहित्य संपदेची माहिती दिली जाते. परंतु आता असे दिसून येते की, डीटीएच हे एक राष्ट्रीय प्रसारण माध्यम उपलब्ध झ ालेले आहे. डीटीएचचे मुख्यालय मुंबईला आहे. परंतु डीटीएचवरील अनेक वाहिन्या मराठी चॅनेलला ब्लॅक आऊट करीत आहेत. यासाठी सेटलाईट लिंक सिस्टिम आवश्यक असते ती मुंबईला आहे. महाराष्ट्र हे त्यांचे प्रमुख केंद्र असताना मराठी भाषेचा प्रचार व प्रसार या डीटीएचवरील वाहिन्यांकडून होत नाही. त्यामुळे शासनाने डीटीएच प्रसारण सेवा देणा-यांना बोलवून त्यांच्यावर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये उत्तम प्रक्षेपणासह सर्व मराठी चॅनेल दाखविण्याचे कायद्याने बंधनकारक करावे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:25

**सभापती** : मराठी जनतेला मराठी वाहिन्यांवरील कार्यक्रम प्राधान्याने दिसायला पाहिजेत या अनुषंगाने माननीय मंत्री महोदयांनी काळजी घेण्याची गरज आहे.

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, नोंद घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आज मी जो औचित्याचा मुद्दा मांडणार आहे त्याची चर्चा सुरुवातीलाच 289च्या माध्यमातून येथे झालेली होती. आज 26 डिसेंबरला मुंबईवरील हल्ल्याला एक महिना झालेला आहे.

**सभापती** : यासंबंधीच्या 289च्या प्रस्तावाला मी दालनामध्ये अनुमती नाकारलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा विषय मला थोडक्यात औचित्याच्या मुद्याद्वारे मांडण्याची परवानगी द्यावी व त्यानंतर आपण निर्णय द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावक यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबईवर अतिरेक्यांच्या झालेल्या हल्ल्याच्या संदर्भातील चर्चेच्या वेळी देखील ही शंका या ठिकाणी प्रकट केलेली आहे की, 25 लाख रु. त्यांना मिळणार नाहीत आणि गृहखात्याचे काही नोकरशहा त्यांना हे पैसे मिळू नयेत म्हणून कार्यशील आहेत. याबाबतीत शासनाचे नेमके धोरण काय आहे? त्यांना 25 लाख रुपये मिळणार आहेत की 13 लाख रुपये मिळणार आहेत आणि ते कधी मिळणार आहेत हे या सभागृहाला समजावे एवढीच आमची तडफड आहे. जे 26 लोक शहीद झालेले आहेत त्यांना पैसे मिळणे आवश्यक आहे. जे सरकारी नोकरीतील अधिकारी/कर्मचारी शहीद झालेले आहेत त्यांच्या वारसांना सरकारी नोक-या देखील नाकारल्या जात आहेत. केवळ सवंग लोकप्रियतेसाठी शासनाने या घोषणा केलेल्या आहेत काय ? त्याच प्रमाणे माननीय उपसभापतींनी सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांच्या विशेष उल्लेखाच्या वेळी निदेश दिल्याप्रमाणे शौर्य पदके मिळालेल्यांची यादी कालपर्यन्त या सभागहामध्ये मिळणे आवश्यक होती. ती यादी देखील मिळालेली नाही. एवढी अनास्था हे सरकार दाखवित आहे. याचा निषेध करावा तितका थोडा आहे हे मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे.

**सभापती** : विशेषत 26 नोव्हेंबरला ताज हॉटेल, ओबेरॉय हॉटेल, नरीमन हाऊस आणि अन्य ठिकाणी जो हल्ला झाला त्यामध्ये आपले अनेक अधिकारी आणि पोलीस जवान शहीद झालेले आहेत. त्यांना शासनाने 25 लाख रु. देण्याचे जाहीर केले होते, तसेच त्यांच्या वारसांना सेवेमध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:25

(सभापती....

सामावून घेण्याचे आणि त्यांची सेवा असे पर्यन्त पूर्ण पगार त्यांचा कुटुंबियांना देण्याची तजवीज करण्यासंबंधी शासनाने घोषणा केली होती. याबाबतीत माननीय महसूल मंत्री डॉ. पतंगराव कदम यांनी स्वत: लक्ष घालून सन्माननीय गृहमंत्र्यांना याबाबतीत निवेदन करण्यास सांगावे.

डॉ. पंतगराव कदम : सभापती महोदय, याबाबतीत माननीय गृहमंत्र्यांना निवेदन करण्याच्या सूचना करण्यात येतील.

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा

डॉ. नीलम गो-हे : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मांडलेल्या मुद्यापेक्षा थोडासा निराळा परंतु दहशतवादी हल्ल्याच्या संदर्भात मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. या हल्ल्याच्या संदर्भात नवनवीन माहिती समोर येत असल्यामुळे अजूनही अस्वस्थ होऊन काही प्रश्न निर्माण होत आहेत. या अतिरेकी हल्ल्याला आज 1 महिना झालेला आहे. या हल्ल्याच्या वेळी परदेशी नागरिकांवर लैंगिक अत्याचार घडले असावेत अशी माहिती विविध वाहिन्यांवरुन काल प्रसृत झ ालेली आहे. त्यामध्ये ताज हॉटेल, नरिमन हाऊस आणि ओबेरॉय हॉटेल यामध्ये जे मृतदेह मिळाले ते मृतदेह विवस्त्र अवस्थेत होते आणि त्यांच्या खाजगी अवयांवर देखील जखमा दिसून आल्या असे एका पोलीस सूत्राकडून एका बातमीमध्ये सांगण्यात आलेले आहे. या हल्ल्याला 1 महिना झालेला आहे. 26 डिसेंबर ही तारीख यापूर्वीच्या त्सुनामी सारख्या नैसर्गिक संकटाशी देखील संबंधीत आहे. अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रध्दांजली व्यक्त करीत असताना ही जी गंभीर बाब समोर आलेली आहे त्यातील वस्तुस्थिती काय आहे ? या मृतांना आणि खासकरुन स्त्रियांना या भीषण हालाला आणि अवहेलनेला सामोरे जावे लागले आहे त्यांच्या न्यायासाठी पाकिस्तान सरकार समर्थीत या दहशतवाद्यांच्या विरोधात संघटित होणे आणि कुणाचाही अनुनय न करता अतिरेकी कसाबला द्रुतगती न्यायालयात खटला चालवून फाशी देणे आणि अफझल गुरु सारख्या अतिरेक्याला विनाविलंब फाशी देणे याकडे मी या सदनाचे या औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधित आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 12:30

श्री. अरविंद सावंत : दूरदर्शन चित्रवाहिन्यांच्या संदर्भात तीन दिवसापूर्वी केंद्र शासनाने एक आचारसंहिता घोषित केली. देशात अथवा राज्यात अशा प्रसंगी कोणत्या बातम्या प्रसारित कराव्यात, कोणत्या बातम्या प्रसारित करु नये यासंबंधीची ती आचारसंहिता आहे. या आचारसंहितेचा देखील या शासनाने परामर्श घ्यावा. जर असे कुठे घडत असेल तर त्यावर बंधन आणणे गरजेचे आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी केलेली सूचना अत्यंत महत्वाची आहे. माननीय मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत आपण पुढाकार घेणे गरजेचे आहे. अशा पध्दतीच्या बातम्या दूरदर्शन चित्रवाहिन्यांवरुन सातत्याने दाखविल्या जातात, त्यामुळे जनसामान्यांवर त्याचा फार मोठा परिणाम होतो. याबाबतीत अनेक पालकांची तक्रार आहे. अनेक लोकांनी या बाबतीत तक्रारी केलेल्या आहेत. याबाबतीत जे काही करावयाचे आहे, ते कायद्याच्या कक्षेतच करावे. परंतु ज्या गोष्टीची गरज आहे, ती गरज कशी पूर्ण होईल यादृष्टीने आपण लक्ष घालावे.

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी अतिशय महत्वाची सूचना केलेली आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी या औचित्याच्या मुद्दयाच्या अनुषंगाने नवीन मुद्दा उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्य श्री. सावंत तसेच सन्माननीय सदस्यां डॉ.गोऱ्हे यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंबंधी निश्चितपणे दखल घेऊन शासन योग्य तो निर्णय घेईल.

श्री. मधुकर चव्हाण : दिनांक 26 नोव्हेंबर, 2008 रोजी मुंबईत दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या अधिका-यांबद्दल मी बोलणार नाही. परंतु त्याच दिवशी छत्रपती शिवाजी टर्मिनस येथे या अतिरेक्यांच्या गोळीबारात अनेक निरपराध नागरिक मृत्युमुखी पडले आहेत. त्यांची कोणीही दखल घेत नाही. जे अधिकारी आणि कर्मचारी या हल्ल्यात शहीद झाले आहेत, त्याची शासनातर्फे नोंद घेतली जात आहे, त्यांना सर्व प्रकारचे अनुदान दिले जात आहे. त्यांच्या बलिदानाची नोंद घेतली जात आहे. त्यांना प्रत्येक ठिकाणी श्रध्दांजली अर्पण केली जात आहे. छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशनवर अनेक निरपराध व्यक्ती मृत्युमुखी पडल्या आहेत. परंतु त्या लोकांची कोणाकडून दखल घेतली जात नाही. माननीय रेल्वे मंत्री श्री. लालूप्रसाद यांनी श्री. यादव हे या

. . . S 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हल्ल्यात मृत्यूमुखी पडले आहेत, त्या व्यक्तीच्या कुटुंबियांना 10 लाख रुपयांची मदत देण्याचे जाहीर केले आहे. रेल्वेचा नियम असा आहे की, रेल्वेत बॉम्बस्फोट झाला तर त्यात ज्या व्यक्ती मृत्युमुखी पडतात, त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक नुकसान भरपाई दिली जाते. सदर हल्ला हा रेल्वे स्टेशनमध्ये झालेला आहे. त्यामुळे या हल्ल्यात अनेक निरपराध नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत, त्यांना नियमाप्रमाणे नुकसान भरपाई दिली गेली पाहिजे. यासंदर्भात सभागृहात चर्चा झाली त्यावेळी माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, त्या ठिकाणच्या लोकांची देखील दखल घेतली जाईल. माझे म्हणणे आहे की, दखल घेतलीच पाहिजे आणि तसे करणे आवश्यक आहे. परंतु या हल्ल्यात अनेक निरपराध व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आहेत, त्यांचे निवासी पत्ते शोधून काढून त्यांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई दिली गेली पाहिजे अशी माझी शासनास या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी जो औचित्याला मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्या अनुषंगाने मला एक बाब शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशनवर अतिरेक्यांनी हल्ला केला त्यात अनेक लहान मुले अनाथ झाली आहेत. त्या लहान मुलांच्या घरातील सर्व कुटुंब या हल्ल्यात मृत्यूमुखी पडले आहे. या अनाथ झालेल्या मुलांच्या संगोपनाची आणि शिक्षणाची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे. ही जबाबदारी नीटपणे पार पडावी यासाठी विशेष कक्ष निर्माण करण्याची आवश्यकता आहे. तशी व्यवस्था शासनाने करावी अशी माझी शासनास विनंती आहे.

डॉ.पतंगराव कदम : रेल्वे स्टेशनवर अतिरेक्यांनी हल्ला केला, त्यात अनेक निरपराध व्यक्ती मृत्यूमुखी पडल्या आहेत, याबाबतीत रेल्वे मंत्रालयाला लेखी कळविले जाईल. शासनही त्या निरपराध मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई देण्याच्या बाबातीत विचार करील. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांच्या मुद्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, जी मुले अगदी निराधार झाली आहेत, त्या मुलांच्या संगोपनाची आणि शिक्षणाची जबाबदारी शासन घेईल.

. . . S 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, अपना औचित्य का मुद्दा उपस्थित करने से पहले माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण के औचित्य के मुद्दे पर एक वाक्य कहना चाहती हूँ. मुंबई में 26 नवम्बर को जो निरपराध लोग मारे गए हैं, उनको शहीद समझकर जिस प्रकार से श्री. हेमन्त करकरे के लिए हुतात्मा स्मारक बनाया जायेगा तो मैं यह सिफारिश करना चाहती हूँ कि एक सिम्बॉलिक हुतात्मा स्मारक सब के लिए बनाया जाए.

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरा औचित्य का मुद्दा यह है कि नागपुर से मराठवाडा तक आने जाने के लिए बहुत असुविधा होती है. इसलिए महाराष्ट्र शासन केन्द्रीय सरकार से सिफारिश करे कि नागपुर और औरंगाबाद के बीच में हवाई यात्रा शुरू होनी चाहिए. इससे विदर्भ और मराठवाडा के लोगों को सुविधा हो जाएगी.

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी जी सूचना केली आहे, त्याबाबतीत मंत्री महोदय श्री.रमेशचंद्र बंग यांनी दखल घ्यावी.

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, दखल घेण्यात येईल.

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्री.प्रकाश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

"राज्यातील सर्व विभागांचा समतोल विकास व्हावा असे शासनाचे धोरण आहे. पंचवार्षिक योजनांची आखणी करणे, डोंगरी विभागाच्या काही विशेष योजना शासनाने 1988 मध्ये तत्कालिन ग्रामविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीची निर्मिती केली होती.....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 12:35

श्री.प्रकाश शेंडगे.........

परंतु आतापर्यंत या डोंगरी विकासाच्या योजनेमध्ये अनेक गावांचा समावेश नसणे, उदा.सांगली जिल्हयातील कवठे महांकाळ, जत, खानापूर, आटपाडी; सोलापूर जिल्हयातील सांगोला, परभणी जिल्हयातील गंगाखेड आदी अनेक तालुक्यातील गावे डोंगरदऱ्यात असताना या गावांचा या योजनेत समावेश केलेला नाही. राज्यात अशा अनेक तालुक्यातील डोंगरदऱ्यात वसलेल्या या गावात भटक्या विमुक्तांची संख्या जास्त असून अशा वाड्या, तांडे, पाडे आणि वस्त्या डोंगरी विकास कार्यक्रमापासून वंचित राहिलेल्या आहेत. त्यांना अनेक विकासाच्या योजनांपासून वंचित रहावे लागत आहे. डोंगरी विकासाचे असलेले निकष बदलण्याची गरज आहे. जी गावे, वाड्या, तांडे आणि वस्त्या डोंगरदऱ्यात आहेत त्यांचा नव्याने सर्व्हे करण्याची गरज आहे. याबाबत शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाने याबाबत त्वरित कार्यवाही करावी अशी विनंती करतो.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**नियम 260 च्या प्रस्तावासंबंधी**</u>

**सभापती** : नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावाची चर्चा आज घेण्याचे ठरले आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सहकारी मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. शेतकऱ्यांची कर्जमाफी हा विषय या प्रस्तावामध्ये आहे. ही चर्चा व्यापक असल्यामुळे सहकारमंत्री सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. विदर्भातील आत्महत्याग्रस्त 6 जिल्हयातील शेतकऱ्यांचा महत्वाचा प्रश्न यामध्ये अंतर्भूत आहे.

**सभापती** : आपण चर्चेला सुरुवात करावी, तोपर्यंत सहकारमंत्री सभागृहात उपस्थित होतील. याठिकाणी कृषि व महसूल मंत्री उपस्थित आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सहकार मंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. त्या विभागाचे राज्यमंत्री देखील उपस्थित नाहीत.

**सभापती** : कृषि व महसूल मंत्री उपस्थित आहेत. सहकारमंत्र्यांना बोलावले आहे. तोपर्यंत आपण चर्चेला सुरुवात करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, केवळ कॅबिनेट मंत्री सभागृहात नव्हते म्हणून चर्चा पुढे ढकलण्यात आली. दोन वेळा सभागृहाची बैठक तहकूब करावी लागली. तरी देखील संबंधित विभागाचे मंत्री सभागृहात हजर झाले नाहीत. चर्चा पुढे ढकलण्याचा निर्णय झाल्यानंतर मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित झाले. चर्चा पुढे ढकलण्याची सभागृहाची इच्छा नव्हती. विरोधी पक्षाला चर्चा हवी होती म्हणूनच आम्ही आग्रह धरला होता. मंत्रीमहोदयांच्या अनास्थेचा परिणाम म्हणून आम्हाला चर्चा पुढे घेण्याची विनंती करावी लागली. परंतु विरोधी पक्षाला चर्चा करण्यात स्वारस्य नाही अशी टीका केली जाते. हे सभागृह वारंवार कॅबिनेट मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत म्हणून स्थगित केले जाते.

श्री.बाळासाहेब थोरात : त्या दिवशी तशी परिस्थिती नव्हती. मी पूर्ण वेळ सभागृहात बसून होतो. महसूलमंत्री सुध्दा उपस्थित होते. त्या दिवशी चर्चा घेण्याची शासनाची तयारी होती. शासन या विषयावर गंभीर आहे.

डॉ.दीपक सावंत : सहकारमंत्री सभागृहात नव्हते. कालांतराने सहकार राज्यमंत्री सभागृहात उपस्थित झाले.

..2..



SGB/ MMP/ KGS/ 12:35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सहकारमंत्र्यांनी स्टेटमेंट केले की, विरोधी पक्षाला चर्चेमध्ये रस नव्हता म्हणून चर्चा पुढे ढकलण्यात आली. हे आमच्यावर अन्याय करणारे आहे. आमच्या हेतूवर शंका घेतली जात आहे.

**सभापती** : सहकार मंत्री उपस्थित होईपर्यंत लक्षवेधी सूचना घेऊ या.

डॉ.दीपक सावंत : ठीक आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : लक्षवेधी सूचना घेण्यास माझा विरोध नाही. परंतु हा प्रस्ताव नेमका कधी सुरु होईल हे आम्हाला कळले तर त्याप्रमाणे वेळेचे नियोजन करणे शक्य होईल.

**सभापती** : सहकार मंत्री खालच्या सभागृहात व्यस्त आहेत, तोपर्यंत चर्चा सुरु करावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : चर्चा सुरु करण्यास आमची हरकत नाही. परंतु मंत्रीमहोदयांना समज देण्याची गरज आहे. त्यांनी देखील जबाबदारीने वागले पाहिजे. सहकारमंत्र्यांचे आज वृत्तपत्रात स्टेटमेंट छापून आले आहे. त्यांनी म्हटले की, विरोधी पक्षाला चर्चा करण्यात रस नाही.

**सभापती** : माननीय सहकारमंत्री सभागृहात उपस्थित झाले आहेत. आता आपण चर्चेला सुरुवात करावी.

------

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय संसदीय कामकाज मंत्री सभागृहात हजर झालेले आहेत. त्यांना माझी अशी विनंती आहे की, सभागृहात विषय सुरु असतील त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदय उपस्थित राहतील याची जबाबदारी घ्यावी.

प्रा. सुरेश नवले : महोदय, या सभागृहातील कामकाजाशी संबंधित नसणारी कागदपत्रे व फलक सभागृहात दिसत आहेत. त्यासाठी आपण परवानगी दिलेली आहे काय? हे आम्हाला समजले पाहिजे.

**सभापती** : अशा प्रकारे कुठल्याही कामकाजाशी संबंधित नसलेल्या कागदपत्रांसाठी माझी परवानगी घेतलेली नाही. तसेच कामकाजाशी संबंधित नसणारी कुठलीही गोष्ट सभागृहात येऊ नये असा दंडक आहे. सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी हा दंडक पाळावा.

श्री. दिवाकर रावते : महोदय, कामकाजाशी संबंधित नसलेले कुठलेही कागदपत्रं नाहीत.

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी घोषणा लिहिलेला कापडी फलक अंगावर घातला.)

**सभापती** : ठीक आहे, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपला प्रस्ताव सुरु करावा.

-------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/

**पृ.शी.**: विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येत होत असलेली वाढ

**मु.शी.**: विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येत होत असलेली वाढ या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ. दिपक सावंत, सर्वश्री विनोद तावडे, अरविंद सावंत, सय्यद पाशा पटेल, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री केशवराव मानकर, गोपीकिसन बाजोरिया, सुरेश जेथलिया, किसनचंद तनवाणी, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी राज्य शासनाने विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठी डिसेंबर, 2005 मध्ये दिलेले 1075 कोटी रुपयांचे पॅकेज, त्यानंतर जून, 2006 मध्ये देण्यात आलेले 3750 कोटी रुपयांचे पंतप्रधान पॅकेज त्यानंतर केंद्र शासनाने जाहिर केलेली कर्जमाफी योजना, या सर्व उपाययोजनांनंतरही शेतकऱ्यांच्या आत्महत्या सतत वाढत जाणे, याबाबत कॅगने आपल्या अहवालात कडक ताशेरे ओढणे, गेल्या 5 वर्षात 5500 शेतकऱ्यांनी तर गेल्या वर्षभरात 675 शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, संपूर्ण विदर्भात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असतांना एकीकडे 15 ते 16 तासांचे भारनियमन सुरु असणे तर दुसरीकडे कृषी पंपाचा अनुशेष वाढत जाणे, अपूर्ण राहिलेल्या शेकडो सिंचन प्रकल्पांमुळे शेतीला पाणी न मिळणे, गतवर्षी झालेल्या कमी पावसामुळे विदर्भातील धान उत्पादन निम्म्यावर येणे, धान उत्पादनाप्रमाणेच कापूस व सोयाबीन पिकावर लष्करी अळी व लाल्या रोगाचा प्रादुर्भाव होणे, तसेच खते व कीटकनाशके व बियाणे यांच्या वाढत्या किंमतीमुळे व त्यातील भेसळीमुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही वसूल न होणे, शेतकऱ्याच्या कापूस व सोयाबीन या पिकाचा उत्पादन खर्च ज्या प्रमाणात वाढला त्या प्रमाणात त्याला भाव न मिळणे, कापसाची संकलन केंद्रे सुरु न होणे, सोयाबीन मातीमोल भावात विकावे लागणे, उत्पादित केलेला माल संकलन केंद्रे व कृषी उत्पन बाजार समित्यांमध्ये आणल्यानंतर त्याची खरेदी वेळेवर न होणे व त्याचे पैसे वेळेवर न मिळणे, पांढरकवडा, वणी सारख्या कापूस संकलन केंद्रांवर कापसाची तोलाई होण्यासाठी शेतकऱ्यांना 8-8 दिवस

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ KGS/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

□डाक्याच्या थंडीत जनावरांसहीत उपाशीपोटी रहावे ला□□, यासर्व दूर्धर परिस्थितीमुळे आम शेत□री व□ीत □ि□र्मा□ झालेला तीव्र असंतोष, शास□ाचे त्या□डे झालेले दुर्ल□ व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

महोदय, खरे म्हणजे कालच या प्रस्तावावर सभागृहात चर्चा उपस्थित केली होती परंतु संबंधित खात्याचे मंत्री सदनात हजर नसल्यामुळे त्यावेळेस या प्रस्तावावर चर्चा होऊ शकली नाही. या प्रस्तावाचे चार भाग होतात. त्यातील पहिला भाग म्हणजे सन 2005-06 मध्ये माननीय मुख्यमंत्री आणि माननीय पंतप्रधान यांचे विदर्भातील सहा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दिलेले पॅकेज. दुसरा भाग, आता विदर्भात निर्माण झालेली दुष्काळसदृश्य परिस्थिती व त्याबाबत शासनाने करावयाच्या उपाययोजना. तिसरा भाग, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती आणि चौथा भाग शेतकरी अडचणीत आला आहे व त्याची जी अवस्था झाली आहे त्यासंदर्भात, असे हे चार भाग आहेत. हे आघाडीचे सरकार राज्यात आल्यापासून या सरकारचा पायगुणच महाराष्ट्राला चांगला लागलेला नाही, असेच आम्हाला आता वाटायला लागले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

कारण हे सरकार आल्यापासून सातत्याने महाराष्ट्रवर आणि विदर्भावर संकटांचा मारा सुरु झालेला आहे. दुष्काळ, घातपात, आत्महत्या, बॉम्बस्फोट या सारखे अनेक आपत्ती आणि संकटे महाराष्ट्रावर यावयास लागली आहेत. हे सरकार आल्यापासून शेतक-यांच्या आत्महत्येत वाढ झाली आहे. आतापर्यंत महाराष्ट्रातील 5500 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या आत्महत्यांवर उपाय करण्यासाठी राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी डिसेंबर, 2005 मध्ये 1075 कोटीचे पॅकेज दिले होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतक-यांना पॅकेज दिल्यामुळे शेतक-यांच्या आत्महत्याचे प्रमाण कमी होईल असे वाटले होते परंतु हे पॅकेज दिल्यानंतर उलट शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढीस लागले. महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी व्हावे म्हणून माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी विदर्भाला भेट दिली व शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भातील माहिती जाणून घेतली. तीन दिवस माननीय पंतप्रधान विदर्भामध्ये मुक्कामी होते. त्यानंतर माननीय पंतप्रधानांनी महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जून, 2006 मध्ये घोषित केले. 3750 आणि 1075 कोटी रुपयांचे पॅकेज मिळाल्यानंतर शेतक-यांच्या आत्महत्या कमी होतील असे वाटू लागले होते परंतु शेतक-यांच्या आत्महत्या कमी न होता त्यामध्ये वाढच झाली. ग विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे केंद्रसरकारने मार्च मध्ये शेतक-यांचे 70 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले. कर्ज माफी झाल्यानंतर शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात घट होईल असे वाटले होते परंतु तसे झाले नाही. कर्जमाफी झाल्यानंतर आतापर्यंत विदर्भामध्ये जवळपास शेतक-यांच्या 700 आत्महत्या झाल्या. पॅकेज जाहीर झाल्यानंतर यासंदर्भात शासनाने 5-6 गोष्टी करण्याचे ठरवले होते. यामध्ये एक अल्पमुदत उपाययोजना आणि दुसरी दीर्घकालीन उपाययोजना अशा दोन महत्वाच्या उपाययोजना यामध्ये आखण्यात आल्या होत्या. शेतक-यांचा तणाव कमी करण्यासाठी शासनाने मदत करण्याची तरतूद देखील केली होती. यामध्ये शेतक-याला कर्जाच्या बाबतीत मदत व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारच्या सहकार विभागाने काही उपाययोजना केली होती. उभारणी निधीमधून कापूस पिकविणा-या शेतक-यांकडून 1972 पासून शासनाने पैसे घेतले होते ते भाग भांडवल चढ उतार निधीमध्ये 800 कोटी रुपये पडून होते ते पैसे देण्याचा निर्णय या माध्यमातून घेण्यात आला होता. तसेच अवैध सावकारी मुळे ज्या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

आत्महत्या झाल्या ती अवैध सावकारी बंद करण्याचा निर्णय या पॅकेजमध्ये घेण्यात आला होता. विदभातील 6 जिल्हयात मोठया प्रमाणात कापूस उत्पादक शेतकरी आहेत त्यामुळे या सहा जिल्हयातील कापूस उत्पादक शेतक-याला नुकसानभरपाई देण्याचा समावेश या पॅकेजमध्ये करण्यात आला.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. उल्हास पवार )**

माननीय पंतप्रधांनाच्या मदत निधीमधून आरोग्य, शिक्षण, विद्यार्थ्याला अर्थ सहाय्य करण्यास सांगण्यात आले होते तसेच सामहिक विवाह, शेतक-यांच्या मुलीच्या लग्नासाठी मदत देणे, शेतक-यांच्या शेतात शेततळे करणे, शेतक-यांना अवजारे, बी-बियाणे पुरवणे, सेंद्रिय खतांसाठी प्रशिक्षण शिबीर घेणे, घेण्याचे सुध्दा ठरविण्यात आले होते. अशा प्रकारच्या 6-7 गोष्टींचा या पॅकेजमध्ये समावेश करण्यात आला होता. अशा प्रकारच्या गोष्टींचा या पॅकेजमध्ये समावेश झाल्यानंतर या पॅकेजची फलश्रुती काय झाली? सन 2005-2006 नंतर आता सन 2008 मध्ये सुध्दा आपण शेतक-यांच्या पॅकेजच्या संदर्भात विचार करीत आहोत.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

दैनिक "सकाळ" या वृत्तपत्रामध्ये पॅकेज संदर्भात एक चांगली व्याख्या छापून आलेली आहे. ती आपणास वाचून दाखवितो. "मायबाप सरकारने मरणाऱ्या कास्तकारांसाठी दोन पॅकेज दिले. सरकारच्या शिलेदारांनी नेत्यांना पॅकेजची कशी चांगल्याप्रकारे अंमलबजावणी केली याचे पॉवर पॉईन्ट प्रेझेन्टेशन केले. शिलेदारही खूष झाले. नेत्यांनीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झाल्याचे ढोल बजावले. परंतु माननीय मुख्यमंत्री महोदयांनी शिलेदारांना बैठकीत प्रश्न विचारला की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या का थांबल्या नाहीत. सरकारने दिलेले नांगर शेतात गेल्याबरोबर वाकडे झाले,गाई दूध देईनात, बकऱ्या रोगाने मेल्या, फवारणीचा पंपही चालेना, पॅकेजचे साहित्य अस्तित्वात नसलेल्या शेतकऱ्यांची शेती फुलविण्यासाठी स्वर्गातही गेले. पॅकेजच्या पाझराने अधिकाऱ्यांचे खिशे ओले झाले, परंतु मातीत राबणारा शेतकरी तसाच कोरडा राहिला. पॅकेजच्या यशोगाधा नेत्यांची जेथे व्यासपीठ मिळाले तेथे गायल्या. आत्महत्या कमी झाल्याचा ढिंडोरा जेथे माईक मिळेल तेथे पिटला गेला. पण गावकुसात जगाला भाकर खाऊ घालणारा मरत होता. पॅकेजच्या वाटपाने सरण विझली नाहीत. कर्जमाफीनंतर ती अद्याप पेटण्याची थांबली नाहीत हेच पॅकेजचे यश आहे." या व्याख्येमध्ये पॅकेजचा सर्व सार आलेला आहे. या व्यतिरिक्त आणखी काही सांगण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, ज्या पश्चिम विदर्भासाठी पॅकेज आणण्यात आले होते त्या पॅकेजने पश्चिम विदर्भाला काय दिले ? या पॅकेजने सरकारने दावे पोकळ ठरविले. आत्महत्येच्या संख्येत वाढ झाली. पॅकेजचा लाभ 60 टक्केपेक्षा अधिक शेतकऱ्यांना झाला नाही. पॅकेजच्या अंमलबजावणीबाबत मोठा असंतोष झाला. पॅकेजमधील दुधाळ जनावरांचे वाटप वादग्रस्त झाले. पॅकेजमध्ये थेट लाभाची तरतूद नाही. पॅकेजचा पैसा बँका आणि योजनांनी लुटला, शेतकऱ्यांच्या हातात दमडी नाही. शेतीमालाची मातीमोल भावाने विक्री झाली. सुलभ कर्ज उपलब्ध नाही. पुढील वर्षी कर्जफेड करावी लागणार. यंदा उभ्या पिकाने दगा दिला.शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघाला नाही अशी परिस्थिती पश्चिम विदर्भाची आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

सभापती महोदय, पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर या जिल्ह्यांना पॅकेज मिळाले नाही. या भागात शेतक-यांच्या आत्महत्या वाढत आहेत परंतु त्यांना मदत दिली जात नाही. याठिकाणी पॅकेज जाहीर होण्यासाठी आणखी किती शेतकऱ्यांना आहुती द्यावी लागणार आहे ? नागपूर, चंद्रपूर जिल्ह्यात कापूस उत्पादक शेतकरी आहेत, परंतु त्यांना पॅकेज लागू नाही. भंडारा, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यात धान उत्पादक शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. त्यांना देखील मदत करण्यात आलेली नाही. त्यांच्यासाठी नवीन कर्जपुरवठा नाही. त्यांच्या धानाला भाव नाही. धानाच्या भावातून उत्पादन खर्चही निघत नाही अशी आज पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांची स्थिती आहे.

सभापती महोदय, विदर्भात अधिवेशन होत आहे. अधिवेशनाचा पहिला आठवडा झाला. उद्या दुसरा आठवडा संपणार आहे. अधिवेशनावर अनिश्चिततेचे सावट पसरलेले आहे. पुढील आठवड्यापर्यंत अधिवेशन सुरु राहील किंवा कसे हे कोणी सांगू शकत नाही. उद्या अधिवेशन संपल्यानंतर मंत्री निघून जातील, परंतु विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रश्न तसेच राहतील......

हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उद्या अधिवेशन संपणार असा त्यांच्या भाषणात उल्लेख केला. त्याबाबत सांगू इच्छितो की, कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत माननीय विरोधी पक्ष नेते होते. त्यांना देखील माहीत आहे की, अधिवेशन 30 डिसेंबर, 2008 रोजी संपणार आहे. शिवाय कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहात वाचून दाखविण्यात आलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिवेशन उद्या संपणार अशाप्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रात येत आहेत म्हणून मी तसा उल्लेख केला. आजही कामकाज सल्लागार समितीची बैठक होऊ शकते. माननीय मंत्रिमहोदयांनी दिनांक 30 डिसेंबरपर्यंत अधिवेशन चालेल असे सांगितल्यानंतर आम्ही तो विषय पुन्हा मांडणार नाही.

श्री.हर्षवधन पाटील : अधिवेशन उद्या संपवावे किंवा कसे हे माननीय विरोधी पक्ष नेत्यांवर अवलंबून आहे त्यांनी विनंती केल्यास......

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अधिवेशन लवकर संपवावे अशी आम्ही विनंती करणार नाही. महोदय, माझ्याकडे नॅशनल क्राईम ब्युरोचा रिपोर्ट आहे. त्यांच्या रिपोर्टमध्ये नमूद केलेले आहे की, देशात सर्वात जास्त आत्महत्या महाराष्ट्रात झालेल्या आहेत.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

आत्महत्यांचे प्रमाण कमी झालेले आहे असे शासनाने सागितले होते. 2007 सालचा अहवाल माझ्याकडे असून त्यात म्हटलेले आहे की संपूर्ण देशात दररोज 46 शेतक-यांच्या आत्महत्या होतात त्यात महाराष्ट्राचा वाटा मोठा आहे . 2007 साली महाराष्ट्रात 4 हजार 238 शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या होत्या असे नॅशनल क्राईम ब्युरोच्या अहवालात म्हटले होते. त्यांनी वयोगट सुध्दा सांगितला होता . 30 ते 44 या वयोगटात आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 6 हजार 174 आहे, 15 ते 29 वयोगटातील आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 4 हजार असून 45 ते 59 या वयोगटातील आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 4 हजार 480, आहे 60 वयापेक्षा जास्त वय असलेल्या आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 1820 आहे. आत्महत्त्येचा विषय चावून चावून चोथा झाल्या सारखा आहे. सरकारने हळू हळू या विषयाचे महत्व कमी करण्यास सुरुवात केलेली आहे. या शेतक-यासाठी शासनाने पॅकेज जाहीर केले होते. त्यामध्ये 3 हजार 750 कोटी रुपये माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांच्या सरकारचे आहेत. आणि राज्य सरकारचे एक हजार 75 कोटी रुपये होते अशा प्रकारे 4 हजार 825 कोटी रुपयांचे पॅकेज दिले असून त्यापैकी 4 हजार 392 कोटी रुपये खर्च झाल्याचे सरकारने सांगितले आहे. माझ्याकडे कॅगचा अहवाल असून त्यात यासंबंधी ताशेरे ओढले आहेत. विरोधी पक्ष म्हणून आम्ही नेहमी टिका करीत असतो असे सांगण्यात येते परंतु माझ्याकडे महालेखापालांचा अहवाल आहे . पॅकेज देतांना असे सांगण्यात आले होते की, शेतकऱ्यांच्या कर्जावरीज व्याज माफ केले जाईलृ अशा प्रकारे शेतक-यांच्या कर्जावरील व्याज माफ करुन कर्जाचे समान तीन हप्ते पाडले जाईल आणि शेतक-यांना नव्याने कर्ज दिले जाईल. हा मुद्दा आपल्या पॅकेजमध्ये होता.तेव्हा किती शेतक-यांचे व्याज माफ केले आणि किती शेतक-यांना नव्याने कर्ज दिले यासबंधी अहवालात असे म्हटलेले आहे की, एकूंण 9.29 लाख शेतक-यापैकी 4.84 लाख शेतकऱ्यांना नवीन कर्ज दिले गेले आहे आणि बाकीच्या शेतक-याना कर्ज दिले नाही. सन्माननीय मंत्री महसूल व पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की, राज्य शासनाने अशी घोषणा केली होती की,

शेतक-यांच्या कर्जावरील व्याज माफ केले जाईल आणि शेतक-यांच्या कर्जाचे तीन समान हप्ते पाडून त्यांना नव्याने कर्ज दिले जाईल. परंतु 50 टक्के शेतक-यांनासुध्दा नव्याने कर्ज दिले गेले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

नाही. कॅगच्या अहवाल असे म्हटले आहे की, शेतक-यांना नव्याने कर्ज न देता बॅन्कांनी व्याजाचे दावे सरकारकडे दाखल केले आहेत. सहाय्यक जिल्हा उप निबंधक यांच्या भागातील 17.64 लाख शेतक-यापैकी 9.29 लाख शेतक-यांना 1369.85 कोटी रुपये मुद्दलाच्या कर्जावरील व्याजाची माफी दिल्यानंतर त्याचे पुनर्निधारण करण्याचा प्रस्ताव होता. मात्र रुपये 673.88 कोटी रुपयांचे नवीन 49 टक्के कर्ज 4 लाख 84 हजार शेतक-यांना दिले गेले." ही आकडेवारी माझी नसून कॅगने तसे सांगितलेले आहे. 50 टक्के शेतक-यांना फक्त कर्ज पुरवठा करण्यात आला आणि उरलेले 50 टक्के शेतकरी बॅन्केत कर्जासाठी खेटे मारत राहिले. सन्माननीय सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना मी सांगू इच्छितो की, लोकमत या वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे की परवा अमरावती मधील एका शेतक-याने बॅकेत विष घेऊन आत्महत्या करण्याचा पयत्न केला होता खरीप हंगामात् प्रयत्न करुनही बॅकेने कर्ज न दिल्यामुळे रब्बी हंगामात तरी बॅकेकडून पीक कर्ज मिळेल या अपेक्षेने.एका शेतक-याने बॅन्केकडे फे-या मारल्या होत्या मात्र व्यवस्थापकाने मानहानीजनक वागणूक देऊन सतत अपमानित केल्यामुळे हतबल झालेल्या शेतक-याने बॅकेतच कीटक नाशक औषधे घेतले आणि सबंधित शेतक-याला गंभीर अवस्थेत सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलेले आहे. प्रल्हाद उर्फ वसंत तुळशीराम वानखेडे हे या शेतक-याचे नाव आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सहकार मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांना मी सांगू इच्छितो की परवा येथे एक प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. बॅकेचे अधिकारी कोणाचेही मानत नाहीत. .शेतकरी दहा बारा वेळा बॅन्काकडे खेटे मारतात परंतु अधिकारी असे सांगतात की, आम्ही कर्ज देत नाही या बाबतीत तुम्ही कोणालाही फोन करायला सांगा .आमच्या सारख्या व्यक्तीने फोन केला की तर बॅन्केचे अधिकारी फोन घेत नाहीत इतके हे अधिकारी मस्तवाल झालेले आहेत. या शेतक-याला शासनाकडून काय न्याय दिला जाणार आहे ? शेतकरी दहा दहा बॅन्केत कर्ज मागण्यासाठी दहा दहा वेळा जातो त्याला कर्ज दिले नाही नाही त्यामुळे आत्महत्या केल्याशिवाय त्याच्याकडे पर्याय राहिलेला नाही .आता हा शेतकरी बॅन्केत आत्महत्या करावयास लागला आहे अशी या शेतक-याची स्थिती झाली आहे.

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ......

सभापती महोदय, कृषी खात्याचे पॅकेज दिले. विदर्भातील सहा जिल्ह्यांतील गरीब शेतकऱ्यांना अवजारे घेण्यासाठी म्हणून दीडशे कोटी रूपयांचे पॅकेज दिल्याचे येथे नमूद केले आहे. त्या पॅकेजचे काय झाले ? या पैशातून शेतकऱ्यांना, नांगर, तिफण, ताडपत्री, पंप, इत्यादी गोष्टी दिल्या पण त्यांचा दर्जा काय होता ? बैलजोडी दिली, बैलगाडी दिली. पण यासंबंधात देखील अनेक आरोप केले गेले आहेत. सभापती महोदय, आजच्याच प्रश्नोत्तराच्या यादीत क्र.110 वर माझाच प्रश्न आहे. विदर्भ पॅकेजमधून बुलढा I I जिल्ह्यात घेतलेल्या सेंद्रीय शाळांबाबतचा हा प्रश्न आहे. त्यात मी विचारले होते की, विदर्भ पॅकेज सेंद्रीय शेती तंत्रज्ञान अभियान योजनतून बुलढाणा जिल्ह्यात 2006-07 मध्ये सेंद्रीय शाळांवर जो खर्च झाला त्याची चौकशी पूर्ण झाल्यानंतर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व कृषी सहसंचालक यांच्याकडे तो अहवाल किती काळ प्रलंबित होता ? आणि त्या अहवालात कोणते निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत ? त्यावर उत्तर देताना कृषी मंत्र्यांनी सांगितले आहे की, विभागीय कृषी सहसंचालक, औरंगाबाद यांनी केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने कृषी आयुक्तालयाने जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा यांच्याकडून मागविलेला खुलासा ए महिन्यानंतर प्राप्त झाला. त्या अहवालातील निष्कर्ष आपण सांगितले आहेत त्यात आपण म्हटले आहे की, 1) संद्रीय शेती शाळेसाठी संस्थांची निवड खात्याच्या मार्गदर्शक सूचनेनुसार झालेली नाही., 2) शेतीशाळेसाठी रूपये 22680/- चे पॅकेज एकात्मिक कीड व्यवस्थापन धर्तीवर केले असून त्यास मान्यता नाही., 3) सेंद्रीय शेतीशाळा आयोजन करावयाच्या गावामध्ये कालावधी सारखा नाही. दोन शेतीशाळांमधील अंतर वेगवेगळ्या गावांमध्ये भिन्न आहे. एक संस्था व तीन गावे बदलण्यात आलेली आहेत., 4) संस्था निवडीसाठी कोणत्याही प्रकारची प्रसिद्धी दिली नाही., 5) चौकशीकामी सात सेंद्रीय शेतीशाळा गावांपैकी तीन गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन शेतकऱ्यांची चर्चा केली असता शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होऊन रासायनिक खते व कीटकनाशके यांचा वापरात खर्च कमी होऊन फायदा झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. सभापती महोदय, यामध्ये मी आणखी एक प्रश्न विचारला होता की, या चाकशीत कोणकोणते अधिकारी दोषी आढळले व त्यांच्यावर कोणत्या स्वरूपाची कारवाई करण्यात आली तसेच सेंद्रीय शाळांवर किती खर्च झाला आहे व त्याचा लाभ किती शेतकऱ्यांनी घेतला आहे ? या प्रश्नाला उत्तर देताना माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितले आहे की, म.ना.से. शिस्त व अपील नियम 1979 च्या नियम 10 अन्वये

...... वाय 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

तत्कालीन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, बुलढाणा श्री.प्रकाश सांगळे यांच्याविरूद्ध चौकशी सुरू करण्यात आलेली असून 26.9.2008 रोजी त्यांच्यावर दोषारोप बजावले आहे. तसेच एकूण 7 शेतीशाळांसाठी रूपये 1,58,760/- इतका खर्च झाला असून त्याचा लाभ 350 शेतकऱ्यांनी घेतला आहे. तेव्हा सभापती महोदय, मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये या चौकशीत जे अधिकारी मग ते कितीही मोठे असले तरी ते दोषी आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असे सांगणार आहात का ? कारण अशा प्रकारे शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाणारे हे अधिकारी आहेत आणि ते आपल्यालाही जुमानत नाहीत. मग ते जे कोणी सांगळे वा अन्य कोणीही अधिकारी असले तरी त्यांना आपण ताबडतोब निलंबित करणार आहात का ? याचे उत्तर माननीय मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात दिले पाहिजे. सभापती महोदय, हे झाले बुलढाणा जिल्ह्यातील पॅकेजच्या बाबत. पण बाजूच्या यवतमाळ जिल्ह्यामध्ये देखील असाच मोठा घोटाळा उजेडात आला आहे. माहितीच्या अधिकारात काही लोकांनी माहिती घेतली आहे. त्यात कोणी या पॅकेजचा विशेषत्वाने फायदा घेतला आहे ? तर कॉंग्रेसचे माजी आमदार, माजी खासदा तसेच महामंडळाचे माजी अध्यक्ष यांनीच या पॅकेजचा लाभ घेतलेला आहे. मात्र जे इच्छुक लाभधारक या पॅकेजचा लाभ घेण्यासाठी असलेल्या निकषांमध्ये बसतात त्यांना त्याचा लाभ मिळालेला नाही. मात्र यवतमाळ जिल्ह्यात कॉंग्रेसचे माजी आमदार, माजी खासदार यांनीच या पॅकेजचा लाभ घेतला आणि गरीबांच्या तोंडचा घास काढून घेतला आहे. तेव्हा यासाठी सहाय्य करणारे जे कोणी अधिकारी आहेत त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात ? सभापती महोदय, 150 कोटीचा जो घोटाळा या पॅकेजच्या माध्यमातून झालेला आहे त्या संबंधात मी या निमित्ताने मागणी करणार आहे की, या कृषी खात्याच्या पॅकेजच्या घोटाळ्याची चौकशी सरकार सीबीआय कडून करणार का ? पहिल्यांदा माननीय मुख्यमंत्र्यांनी पॅकेज दिले, त्यानंतर माननीय पंतप्रधानांनी पॅकेज दिले आहे ही दोन्ही पॅकेजेस शेतकऱ्यांसाठी असताना, ते शेतकऱ्यांना न देता मधले झारीतील शुक्राचार्यच त्याचा फायदा घेणार असतील तर त्या झारीतील शुक्राचार्यांना शोधून आपण काढले पाहिजे आणि त्यासाठी या संपूर्ण पॅकेजची सीबीआय मार्फत चौकशी होऊन त्यात दोषी असणाऱ्यावर ताबडतोब कारवाई झाली पाहिजे अशा प्रकारची मागणी मी या माध्यमातून सरकारकडे करतो आहे.

( यानंतर श्री.सरफरे .....झेड 1 ..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, प्रत्येक पॅकेजच्या कहाण्या माझ्याजवळ आहेत, त्याची उदाहरणे माझ्याजवळ आहेत. अकोला जिल्हयामध्ये फक्त कागदावरच शेततळे करण्यात आले आहेत. जी कामे झाली ती अर्धवट स्वरुपात झाली असतांना त्याची ठेकेदाराची बिले काढण्यात आली. त्याबाबत चौकशी करुन आपण कुणाला निलंबित केले? आपण खालच्या अधिकाऱ्यांना निलंबित केले. परंतु जे जिल्हा कृषी अधिकारी हे प्रमुख अधिकारी आहेत त्यांच्या माध्यमातून हे शेततळे करण्यात आले, त्यांना मात्र क्लिनचिट देण्यात आली. जे शेततळे कागदावर झाले आहे, शेतकऱ्याच्या शेतात झालेले नाही त्याची आपण चौकशी करणार की नाही? त्या कामावरील खर्च झालेला पैसा हा संबंधित अधिकाऱ्यांच्या खिशामध्ये गेला आहे, याची आपण चौकशी करणार आहात की नाही?

**सभापती महोदय**, जळगाव जिल्हयात शेतकऱ्यांना द्यावयाच्या किटकनाशकाच्या गोडावूनवर छापा टाकण्यात आला. त्याचे काय झाले? जी किटकनाशके बाहेर आली, जी किटकनाशके शेतकऱ्यांना देण्यात येणार होती ती सर्व आऊटडेटेड झालेली होती. शेतकऱ्याच्या पिकावर बोंडअळी, मावा, लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाल्यानंतर व त्यावर औषधांची फवारणी केल्यानंतर या औषधांचा प्रभाव झालेला नाही. शेतकरी म्हणाले की, आऊटडेटेड झालेली औषधे छाप्यामध्ये पकडण्यात आली. त्या संबधित खात्याच्या कृषी अधिकाऱ्यावर आपण काय कारवाई करणार आहात? या पॅकेजचे तीन-तेरा वाजविणाऱ्या अधिकाऱ्यावर आपण काय कारवाई करणार आहात? शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्त्यांची नोंद झाली. त्यानंतर एक समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीने आत्महत्त्यांची चौकशी केल्याशिवाय शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना अनुदान देण्यात येणार नाही असे जाहीर केले. प्रत्येक जिहयात किती शेतकऱ्यांचे अर्ज आले आहेत त्यांचा ब्रेकअप मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये जाहीर केला पाहिजे. आत्महत्त्याग्रस्त सहा जिल्हे कोणते? त्यामध्ये किती शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या? चालू वर्षामध्ये किती शेतकऱ्यांच्या कुटुंबियांकडून मदतीसाठी अर्ज प्राप्त झाले? त्यापैकी किती अर्ज ग्राह्य धरण्यात आले? आणि किती शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत देण्यात आली? आणि किती शेतकऱ्यांना मदत नाकारण्यात आली? याची माहिती आपण सदनाला द्यावी. माननीय डॉ.पतंगरावजी कदम साहेब मला कधी कधी संशय वाटतो की, या सरकारची बदनामी होऊ नये म्हणून शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्त्यांची जास्त संख्या दाखवू नका अशाप्रकारच्या सूचना आपण अधिकाऱ्यांना दिल्या काय? जास्त संख्या दाखविली तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/

श्री. पांडुरंग फुंडकर....

त्यामुळे सरकारची बदनामी होईल. सभापती महोदय, शेतकऱ्याने आत्महत्त्या केल्यानंतर शासनाचे अधिकारी त्याठिकाणी जाऊन मृत शेतकऱ्याचा पंचनामा करतात.आणि त्यांनी लिहिलेला पंचनामा त्या शेतकऱ्याच्या बायको-मुलांना दाखवीत नाहीत. पंचनाम्याची प्रत तयार केल्यानंतर त्यावर शेतकऱ्याच्या बायको - मुलांच्या सहया घेतल्या जातात. पंचनाम्यामध्ये तो शेतकरी दारु पित होता, त्याला व्यसन जडले होते तो रोगाने दुर्धर झाला होता अशाप्रकारची कारणे देऊन त्याला मदत नाकारली जाते.

सभापती महोदय, अमरावती जिहयातील एक तहसिलदार म्हणजे नमुना आहे.माननीय डॉ. पतंगराव कदम साहेब आपल्याकडे हे नवीन खाते आले आहे, त्यामुळे आपल्या खात्याला तपासून पहाण्याची गरज आहे. मागील अधिवेशनाच्या पूर्वीची घटना घाली आहे. त्याबाबत आपल्या तहसिलदारांनी कोणता अहवाल दिला? याबाबत मी अमरावती जिल्हयाचे उदाहरण देईन. त्या जिल्हयात एका शेतकऱ्याने आत्महत्त्या केली. मी त्या शेतकऱ्याच्या घरी जाऊन आलो. त्यावेळी त्या शेतकऱ्याच्या मुलाने मला खोलीमध्ये बोलावून आत घेतले. मी त्याला विचारले की, "तुझ्या वडिलांनी आत्महत्त्या कां केली" ? तो म्हणाला आत्महत्त्या करण्याचे काही कारण नाही. त्या शेतकऱ्याजवळ 40 एकर जमीन आहे. त्याला दोन मुले असून त्यांची लग्ने झाली आहेत, नातवंडे आहेत, चांगला भरलेला संसार होता. त्याने सांगितले की, माझ्या वडिलांनी आयुष्यात कधीही कर्ज घेतले नव्हते. दोन वर्षे नापिकी झाली, त्यामुळे जिल्हा सहकारी बँकेचे कर्ज घेतले. ते थकलेले कर्ज फेडता आले नाही म्हणून जिल्हा सहकारी बँकेने तगादा लावला. बँकेचे रिकव्हरी अधिकारी घरी आले. त्यातील एका मुजोर रिकव्हरी अधिकाऱ्याने माझ्या वडिलांचा अपमान केला.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

पण दुर्दैवाने प्रसंग आल्यामुळे त्यांना कर्ज काढावे लागले आणि त्याचा अपमान झाल्यामुंळे त्याने विष पिऊन आत्महत्या केली. त्याने पत्र लिहून ठेवली की, मी आयुष्यभर कोणाचे कर्ज काढले नाही, कर्ज सहन होत नाही परंतु परमेश्वरी कोपामुळे माझी शेती पिकली नाही तसेच मुलाचे लग्न करावयाचे आहे म्हणून कर्ज काढले आणि ते कर्ज फेडता न आल्यामुळे आत्महत्या करीत आहे. त्याने लिहिलेली चिठ्ठी मला दाखवली. बँकेकडे केलेल्या कर्जाच्या मागणीची कागदपत्रे मला दाखविण्यात आली. मी त्याच्या घरुन निघालो आणि जिल्हाधिकाऱ्यांना फोन केला. मी जिल्हाधिकाऱ्यांना विचारले की, या शेतकऱ्याने आत्महत्या का केली ? त्यांनी सांगितले की, त्याने कर्जामुळे आत्महत्या केलेली नाही. मी जिल्हाधिकाऱ्यांना विश्रामगृहावर रेकॉर्ड घेऊन बोलावले. जिल्हाधिकारी मला रेकॉर्ड दाखवित नव्हते. मी त्यांना सांगितले की, आपल्या तहसीलदाराने चुकीचा पंचनामा केलेला आहे. त्यांनी सांगितले की, त्याने कर्जामुळे आत्महत्या केलेली नाही. आत्महत्येचे कारण ते मला सांगत नव्हते. बँकेकडे केलेल्या कर्ज मागणीच्या संदर्भातील सर्व कागदपत्रांच्या प्रती माझ्याजवळ होत्या. आपले अधिकारी किती नमुनेदार आहेत ते आपण पहावे. ते तीन तीन वेळा सांगत होते की, कर्जामुळे आत्महत्या केलेली नाही. चौथ्यांदा मी विचारले की, त्या शेतकऱ्याने आत्महत्या कशामुळे केली ? त्यांनी जे कारण सांगितले ते आपण पहावे. आत्महत्येचे कारण सांगताना त्यांनी असे सांगितले की, त्या शेतकऱ्याने कर्जामुळे आत्महत्या केलेली नाही तर त्या म्हाताऱ्याच्या शेजारी दोन घरे ओलांडल्यानंतर एक म्हातारी राहते. त्या म्हातारीवर या म्हाताऱ्याचे प्रेम बसले परंतु म्हातारीने नकार दिल्यामुळे म्हाताऱ्याने आत्महत्या केली. अशा प्रकारे शेतकऱ्यांची चेष्टा केली जाते. त्यांची थट्टा केली जाते. आपल्याला पैसे द्यावयाचे नसतील तर देऊ नका. शेतकऱ्याला भीक नको पण आपले कुत्रे आवरण्याची गरज आहे. शेतकरी स्वाभिमानी आहेत. शेतकरी आपल्या दारी पैसे मागण्यासाठी बसलेला नाही. आपली योजना जाहीर झाली म्हणून शेतकरी आपल्याकडे अर्ज करतात. आपले अधिकारी शेतकऱ्यांना अशा पध्दतीची वागणूक देत असतील तर या राज्यामध्ये काय चालले आहे ? आपण दंगलखोरांच्या घरी घरपोच पैसे पोहोचविता. माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगरावजी कदम यांना सांगू इच्छितो की, आपले अधिकारी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

घरपोच पैसे घेऊन जातात परंतु जो शेतकरी मयत होतो त्यांच्या मुलांना अर्ज करावा लागतो. तहसीलदाराकडे खेटे मारावे लागतात. वेगवेगळे सर्टिफिकेट्स दाखल करावे लागतात. कर्जाचे पुरावे द्यावे लागतात. दंगलखोरांना मात्र आपले चेक घरपोच जातात. या ठिकाणी पतिव्रतेला न्याय मिळत नाही. पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा आणि वेश्येला मणीहार असे आपले सरकार चालले आहे. माझी अशी मागणी आहे की, पॅकेजच्या नावाने विदर्भामध्ये जे चालले आहे त्याबाबत या सहा जिल्ह्यातील पॅकेजच्या बाबतीत सीबीआय मार्फत चौकशी झाली पाहिजे. याबाबत सीबीआय चौकशी करुन जे अधिकारी दोषी आढळून येतील, जे अधिकारी शेतकऱ्यांना फसविणारे आढळून येतील त्यांना ताबडतोब जेलमध्ये टाकले पाहिजे.

सभापती महोदय, या प्रस्तावाचा दुसरा भाग हा विदर्भातील दुष्काळाच्या संदर्भात आहे. जुलैच्या अधिवेशनात आम्ही मागणी केली होती. जुलै महिन्यामध्ये पाऊस पडला नाही. त्यामुळे शेतकऱ्याला पेरता आले नाही. दुबार, तिबार पेरणी उलटली. त्यामुळे टंचाई किंवा दुष्काळ जाहीर करा अशी मागणी केली होती. परंतु त्यावेळी दुष्काळ किंवा टंचाई जाहीर केली नाही. विदर्भातील 8-9 जिल्ह्यांमध्ये पेरण्या झालेल्या नव्हत्या. पाऊस उशिरा आल्यामुळे कापूस, ज्वारी, धान, सोयाबीन यांच्या पेरणीला उशीर झाला. पाऊस उशिरा आल्यामुळे खरिपाची जी पेरणी जुलैमध्ये व्हावयास पाहिजे होती ती ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये झाली. त्यामुळे उत्पादनावर परिणाम झाला. पिकांवर रोगराई आली. कापसावर लाल्या नावाचा रोग पडला. सोयाबीनवर लष्करी अळी आली. परंतु दोनच जिल्ह्यांना त्याची मदत दिली. सोयाबीनचे पीक जसे मराठवाड्यामध्ये घेतले जाते तसेच विदर्भामध्येही घेतले जाते. लातूर जिल्ह्यामध्ये सोयाबीन पिकावर लष्करी अळी पडली त्यावेळी त्या ठिकाणी मोर्चे निघाले आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी परदेशातून फोन केला आणि लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना त्यावेळी नुकसानभरपाई वाटण्यात आली.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

या महाराष्ट्रामध्ये विदर्भाला सावत्रपणाची वागणूक का दिली जाते ? विदर्भातील सोयाबीनच्या पिकाला अळी लागली, कापसाच्या पिकावर लाल्या नावाचा रोग आला. त्यामुळे शेतक-यांचे कापूस व सोयाबीनचे पीक गेले. त्यानंतर मावा, तुडतुडी या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे विदर्भातील शेतक-यांची पिके निष्ट झाली आहेत. सभापती महोदय, या राज्यात आणेवारी काढण्याची पध्दत जुनीच आहे. ही पध्दत रद्द करण्याची मागणी मी 1978 पासून करीत आहे. मी 1978 साली विधानसभेचा सदस्य असताना इंग्रजांच्या काळापासून, बाबा आदमच्या काळातील ही पध्दत बदलावी अशी मी मागणी केली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री स्व.वसंतदादांनी श्री.भगवंतराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती. त्या समितीने शासनाला अहवाल सादर केला होता. त्यानंतर शासनाने पुन्हा 3 समित्या गठित केल्या होत्या, त्या समित्यांचेही अहवाल शासनाला सादर झालेले आहेत. सभापती महोदय, डिसेंबर अखेर आणेवारी काढली जाते. आता शेतक-यांचे खरीपाचे पीक गेले आहे, रब्बीचे पीक गेले आहे. शेतक-यांच्या शेतात पीकच नसल्यामुळे शासन आणेवारी कशी काढणार आहे ? शेतक-यांचे सोयाबीनचे, सूर्यफुलाचे, कापसाचे आणि ज्वारीचे पीक गेले आहे. आता जानेवारी महिन्यात आणेवारी कशी काढणार आणि त्याच्या आधारावर टंचाई जाहीर केली जाणार असेल तर शेतक-यांना न्याय कसा मिळणार ? त्याऐवजी शासनाने ज्या गावामध्ये 50 टक्क्यांपेक्षा पीक वाया गेले असेल अशा गावांमध्ये ताबडतोब टंचाई जाहीर करावी. केवळ टंचाई घोषित करुन चालणार नाही. जी टंचाईग्रस्त गावे आहेत, ज्यांची विद्युत पंपाची बिले थकलेली आहेत त्यांचे कनेक्शन तोडू नये. आता वीज कंपन्या शासनाचे ऐकत नाहीत. परंतु शासनाने या गावातील शेतक-यांचे विजेचे कनेक्शन तोडले जाणार नाही याची खबरदारी घ्यावी. या कंपन्यांकडून अव्वाच्या सव्वा बिले घेतली जातात. टंचाईच्या परिस्थितीमुळे त्यांचे कनेक्शन तोडणे थांबविले पाहिजे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेचे 60 : 40 चे निकष बाजूला सारुन आयुक्तांना कामे मंजूर करण्याचे अधिकार आहेत ते अधिकार जिल्हाधिका-यांना देऊन ही कामे सुरु झाली पाहिजेत. सध्या डिसेंबर महिना चालू आहे, पण आतापासूनच अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. अजून 6-7 महिने जायचे आहेत. या अवधीपर्यंत लोकांना पिण्याचे पाणी व जनावरांना चारा उपलब्ध करुन दिला पाहिजे.

2...

NTK/ KTG/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, कर्जमाफीच्या मुद्यावर यापूर्वी अनेकदा मत मांडलेले आहे. केंद्र सरकारने प्रथम 60 हजार कोटी रुपयांची कर्जमाफीची घोषणा केली होती, त्यानंतर 70 हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केली. त्यापैकी विदर्भामध्ये किती पैसा आला ? परवा सभागृहामध्ये विदर्भातील शेतक-यांची 7 हजार कोटी रुपयांची कर्जे माफ केले असल्याचे सांगण्यात आले. परंतु माझ्या माहितीप्रमाणे विदर्भातील शेतक-यांची केवळ 1 हजार कोटींची कर्जे माफ झालेली आहेत. त्यामुळे शासनाने कर्जमाफीबाबत जिल्हानिहाय माहिती द्यावी अशी मी यानिमित्ताने मागणी करतो. विदर्भातील 6 जिल्हयांमधील शेतक-यांच्या मोठया प्रमाणात आत्महत्या झाल्या आहेत त्या शेतक-यांची किती कर्जे माफ केली आहेत ते जाहीर करावे. शासनाने अगदी ढोल वाजवून या कर्जमाफीचे स्वागत केले होते. परंतु 5 एकरच्या आतील शेतक-यांना या कर्जमाफीचा फायदा झ ाला आहे हे मी सांगू इच्छितो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

शेतक-याच्या जमिनीची फोड न झाल्यामुळे विदर्भामध्ये 5 एकरवाल्यांची संख्या जास्त आहे. म्हणून पॅकेजचा लाभ विदर्भातील शेतक-याला मिळालेला नाही. 5 एकराच्या आतील शेतक-याला मदत दिली. 5 एकराच्या वरच्या शेतक-याचे काय ? या राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी "मला याबाबतीत चिंता आहे" असे जाहीर केले होते. 5 एकरवाला शेतकरी आटोपला 5 एकर वरच्या शेतक-याचे काय करणार आहात ? एक वर्ष गेले, दीड वर्ष गेले, आता हे दुसरेही वर्ष चालले आहे. अजून 5 एकरवरच्या शेतक-याचा विचार झालेला नाही. हे हिशेब, पंतप्रधानांचे पॅकेज, मुख्यमंत्र्यांचे पॅकेज, व्याजाचे पुनर्निधारण याबाबतीत शेतक-यांच्या मनामध्ये गोंधळ चालू आहे. शेतक-याची सरसकट कर्जमाफी करुन टाकण्याचा निर्णय एकदा घेऊन टाका. माननीय महसूल मंत्री डॉ. पतंगराव पाटील यांनी यासाठी किती खर्च येणार आहे ते सांगावे. या महाराष्ट्रातील शेतक-यावर शेतीसाठी घेतलेल्या पीक कर्जाचा आकडा किती आहे ? या राज्यातील उद्योगपतीचे उद्योगावरचे कर्ज माफ होऊ शकते तर मग शेतक-याचे त्याच्या शेतीवरचे कर्ज का माफ होऊ शकत नाही? माझी दुसरी मागणी ही आहे की, शेतक-याचा 7/12 एकदा कोरा करा. माननीय मंत्री महोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांच्याकडे नव्याने सहकार खाते आलेले आहे. त्यांनी एकदा शेतक-याचा दुवा घ्यावा. शेतक-यांचा मसिहा म्हणून महाराष्ट्रामध्ये तुमचे नाव गाजू द्या. एदा या शेतक-याचा 7/12 एकदा कोरा करुन त्याला संपूर्ण कर्जातून मुक्ती द्या. सभापती महोदय, जोपर्यन्त या शेतक-याला कर्जातून मुक्ती मिळणार नाही तोपर्यन्त या शेतक-याच्या आत्महत्या थांबणार नाहीत. नुसती कर्जातून मुक्ती देऊन या आत्महत्या थांबणार नाहीत. या शेतक-याच्या आत्महत्येचे एक कारण जसे कर्ज आहे त्याचप्रमाणे आणखीही कारणे त्याच्या आत्महत्येमागे आहेत. त्याच्या उत्पादनाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. मागील वर्षी बाजारामध्ये 3 हजार रु. क्विंटल या भावाने सोयाबीन विकले गेले. आता सोयाबीनचा भाव 1500 रुपयावर आलेला आहे. वाढीव रक्कम मंजूर केल्यामुळे 2800 रुपयास कापूस विकला जात आहे. 2800 रुपयास हा कापूस खरेदी करण्याचे शासनाने ठरविले. आता नाफेडमार्फत कापूस खरेदी करणे सुरु आहे. महाराष्ट्रामध्ये कापूस खरेदी केंद्रे सुरु झालेली नाहीत. शेतक-याला आपल्या कापसाच्या

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

मोजमापासाठी प्रतिक्षेत उभे रहावे लागते.8-8 दिवस मोजमाप होत नाही. थंडीत कुडकुडत रहावे लागते. परवा मोजमापाच्या प्रतिक्षेत असलेल्या यवतमाळमधील शेतक-याचा मृत्यू झाला. तीन दिवस त्याच्या गाडीचे मोजमाप झालेले नव्हते. कृषी उत्पन्न बाजार समित्या टोकन देताना भ्रष्टाचार करीत आहेत. वाटेल तशी मनमानी करीत आहेत. त्यांच्यावर आपण कसे नियंत्रण ठेवणार आहात ? केन्द्र सरकारच्या योजनेच्या माध्यमातून जे कंपोझिट युनिट उभे राहिलेले आहेत त्यांना तुम्ही कापूस देत नाही. जे छोटे छोटे युनिट आहेत, जे कंपाझिट नाहीत पण केवळ जिनिंग प्रेसिंग आहे, जेथे गाडी उभी करायला जागा नाही त्याला मात्र कापूस देणे चालू आहे. कारण तो माल मोजतो आणि तो तुमच्या अधिका-याला देतो. म्हणून त्याला कापूस दिला जातो आणि जे कंपाझिट युनिट आहेत त्यांना कापूस दिला जात नाही. यामुळे शेतक-याची मोजमापे उशिरा होत आहेत. यामध्ये छोट्या छोट्या दुरुस्त्या करण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी पैसे लागणार नाहीत. याबाबतीत अधिका-यांवर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. जे चांगले युनिट आहेत, ज्यांच्या जवळ भरपूर जागा आहे अशा युनिटला पहिल्यांदा कापूस द्या. असे केले तर शेतक-याला कुठे तरी न्याय दिल्यासारखे होईल. मी या ठिकाणी तीन-चार गोष्टींची मागणी केलेली आहे. एक म्हणजे या पॅकेजची सीबीया मार्फत चौकशी झाली पाहिजे, दुष्काळ ताबडतोब जाहीर झाला पाहिजे, शेतक-याचे संपूर्ण कर्ज माफ झाले पाहिजे, शेतक-याचा 7/12 कोरा झाला पाहिजे अशा मागण्या करुन मी माझे वक्तव्य संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे ( विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदय, विदर्भातील शेतक-यांचे प्रश्न, त्यांच्या होणा-या आत्महत्या आणि रोखण्यासाठी करावयाच्या उपाययोजना याशेतक-यांचा जिव्हाळयाच्या अत्यंत महत्वाच्या विषयावर विरोधी पक्षाने जो प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे. विरोधी पक्षाने अतिशय महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित केली त्याबद्दल मी विरोधी पक्षाचे मी स्वागत करते.

सभापती महोदय, विदर्भात शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत ही गोष्ट कोणीही अमान्य करणार नाही. शेतक-यांचा आर्थिक कणा मोडकळीस आल्यामुळे, आर्थिकदृष्टया शेतकरी अडचणीत आल्यामुळे, शेतक-यांचा शेतीवर होणारा खर्च, त्यातून त्यांना मिळणारे उत्पन्न आणि त्यातून त्याच्या घरातील प्रश्न न सुटता त्यांचे प्रश्न वाढत जाण्याची पध्दत, सावकारी कर्ज या अनेक कारणांमुळे शेतक-यांच्या आत्महत्या घडल्या आहेत. यातून शासनाने मार्ग काढण्याचा प्रयत्न केला किंवा नाही याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. एखादी घटना घडली तर केवळ ती घडली आहे आणि शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत असे म्हणून शेतक-यांच्या आत्महत्या कशा झाल्या याचे विश्लेषणे देऊन हा प्रश्न सुटणार नाही. शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्येच्या नोंदी घेऊन, पुन्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत, त्या कमी कशा होतील, शेतकऱ्यांचे प्रश्न कमी कसे होतील, यादृष्टीने मार्ग काढणे, त्यासाठी वेगवेगळया तरतुदी करणे ही ख-या अर्थाने राज्य शासन आणि केंद्र शासनाची जबाबदारी आहे. केंद्र आणि राज्य शासनाची या प्रश्नाच्या बाबतीत मार्ग काढण्याची इच्छा आहे किंवा नाही ही गोष्ट देखील तपासून घ्यावी लागेल. इच्छाशक्ती जेथे असते तेथे मार्ग निश्चितपणे निघतो. माझा या ठिकाणी दावा आहे की, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी कशा होतील, विदर्भातील शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था मजबूत कशी होईल, यादृष्टीने मार्ग काढण्याचा प्रयत्न राज्य आणि केंद्र शासनाने निश्चितपणे केलेला आहे. या ठिकाणी बऱ्याच वेळेला आलेल्या पॅकेजमधून खर्च होतो, त्यातील चुकांकडे बोट दाखविले जाते. त्या चुकांचे कोणीही समर्थन करणार नाही. परंतु झालेल्या चुका दुरुस्त करण्याच्या संदर्भात योग्य पावले टाकण्याचा प्रयत्न सरकारकडून केला जातो आहे किंवा नाही ही गोष्ट आपण बघितली पाहिजे. मुळात हे सरकार लोकांचे आहे, लोकांसाठी आहे, लोकांनी निर्माण केलेले आहे. शेतकरी हा या देशाचा आर्थिक कणा आहे. देशाच्या प्रगतीमध्ये, विकासाच्या मार्गात, उत्पादन प्रक्रियेमध्ये शेतकऱ्यांचा मोठा सहभाग आहे. शेतकऱ्यांचा श्रमावर हा देश उभा आहे. म्हणून शेतकऱ्यांचे प्रश्न

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

सोडविणे ही जबाबदारी समजून पॅकेजमध्ये काही त्रुटी राहिल्या असतील, त्यातून पुढे मार्ग कसा काढावयाचा याचाही सरकारने प्रयत्न केला आहे किंवा नाही ही गोष्ट देखील तपासून घ्यावी लागेल. 5 एकरपेक्षा जास्त शेती असलेल्या शेतकऱ्यांवरील कर्ज माफ झाले पाहिजे अशा प्रकारची मागणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केलेली आहे. माझी देखील या निमित्ताने मागणी आहे की, 5 एकरपेक्षा जास्त शेती असलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीत शासनाने काही तरी निर्णय घेतला पाहिजे. या शेतकऱ्यांना कशा पध्दतीने लाभ देता येईल यादृष्टीने शासनाने लक्ष घातले पाहिजे. या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेता यांनी 5 एकरावरील शेतक-यांकडे असलेले कर्ज माफ झाले पाहिजे अशी जी मागणी केली आहे, त्यांच्या मागणीचे मी स्वागत करते आणि या प्रस्तावाचे अनुषंगाने मी माझे पुढील विचार व्यक्त करणार आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ SBT/ 13:30

ॲड.उषा दराडे.......

विदर्भातील शेतक-यांच्या ज्या आत्महत्या झाल्या आहेत या संदर्भात 2005 मध्ये 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले गेले. जुलै, 2006 मध्ये पंतप्रधानांचा दौरा झाला आणि 3750 कोटी रुपयांचे पॅकेज दिले गेले. या पॅकेजमध्ये काही त्रुटी आहेत अशा प्रकारचा आरोप झाला, अशा प्रकारची चर्चा झाली. वृत्तपत्रात देखील बातम्या छापून आल्या. लोकप्रतिनिधींही मागणी केली. याची दखल घेऊन शेतकरी आत्महत्या प्रतिबंधक एक सदस्यीय मुल्यमापन समिती 13.11.2007 रोजी स्थापन करण्यात आली. डॉ.नरेंद्र जाधवसारख्या वरिष्ठ अर्थतज्ज्ञांवर याची जबाबदारी सोपविली गेली. विदर्भामध्ये जे पॅकेज दिले या संदर्भात अंमलबजावणीत काही उणिवा आहेत का? अंमलबजावणीमध्ये काही सुधारणा सुचवावयाच्या आहेत का? यापेक्षा आणखी काही उपाययोजना सुचवावयाच्या आहेत का? यासाठी एक सदस्यीय समिती स्थापन केली गेली. याचा अर्थ केवळ घोषणा करणे नसून त्याची अंमलबजावणी करण्याची सुध्दा शासनाची इच्छाशक्ती आहे. खरे म्हणजे आपल्यासमोर इंदिरा गांधी इन्स्टिटयूट ऑफ डेव्हलपमेंट अँड रिसर्च यांचा, यशवंतराव चव्हाण ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन यांचा आणि फार्मर्स सुसाईड इन महाराष्ट्र ओव्हर व्ह्यू हा एस.के.गोयल यांनी लिहिलेला असे वेगवेगळे अहवाल आपल्याला पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. या अहवालांमध्ये काही सूचना केलेल्या आहेत. याची खऱ्या अर्थाने महाराष्ट्र शासनाने गंभीर दखल घेण्याची गरज आहे. अंमलबजावणीच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्याची गरज आहे. आज ही बाब खरी आहे की, आपण तरतुदी करतो परंतु अंमलबजावणीमध्ये दोष आहेत हे आपण मान्य केले पाहिजे. प्रामाणिकपणे आणि एकदिलाने दोष मान्य केले तर मार्गक्रमणा करण्यासाठी पुढे जाता येईल. आखणी, अंमलबजावणी आणि उपाययोजना याबाबत यश निश्चितपणे काही प्रमाणात संपादित केले असले तरी पूर्णपणे आत्महत्या रोखावयाच्या असतील तर दुरुस्त्या कराव्या लागतील. या गोष्टी करण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा. 13.2.2008 रोजी अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम आणि बुलढाणा याठिकाणी मुख्यमंत्र्यांनी स्वत: बैठक घेतली आणि विदर्भातील कृषि क्षेत्रातील आव्हाने याचाही अभ्यास करुन उपाययोजना सुचवाव्यात आणि व्याप्ती वाढवावी अशा प्रकारची विनंती अधिकाऱ्यांसमोर करण्यात आली होती आणि निर्णय देण्यात आले होते याची मला याठिकाणी आठवण करुन द्यावयाची आहे. केले नाही असे म्हणत असताना जे केले आहे त्याचीही दखल घेणे, त्यासंबंधी चर्चा करणे क्रमप्राप्त आहे. या सर्व

..2..

SGB/ KTG/ SBT/ 13:30

ॲड.उषा दराडे.......

आत्महत्यांच्या संदर्भात केंद्र शासनाने दिलेले पॅकेज असेल, त्याच्या जोडीला सर्वात मोठा हातभार लागला असेल तर तो या देशामध्ये केंद्र केलेली शेतकऱ्यांची कर्जमाफी. 71,680 कोटी रुपयांचे पॅकेज हे या देशातील सर्व शेतकऱ्यांना मिळाले नसेल परंतु जास्तीत जास्त शेतकऱ्यांना म्हणजे 80 ते 81 टक्के शेतकरी जे 5 एकरखालचे आहेत त्यांना याचा फायदा होईल. गरिबांची कर्जमाफी करा. परंतु याठिकाणी जी मागणी केली गेली तिचे मी स्वागत केले, पाठिंबा दिला आहे. या देशातील सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी करावयाची असेल तर 2 लाख कोटी रुपये लागतील. आदरणीय शरदचंद्रजी पवार हे केंद्रीय कृषिमंत्री आहेत. केंद्रात अनेक पक्षांचे सरकार आहे. पूर्वी कधी झाला नव्हता एवढा खर्च केंद्रातील कृषि क्षेत्रावर केला गेला आहे. देशाच्या इतिहासामध्ये कधी बजेटमध्ये तरतूद नव्हती एवढी बजेटरी तरतूद केंद्र सरकारने कृषि खात्यासाठी करावी म्हणून आदरणीय शरदचंद्रजी पवार यांनी प्रयत्न केला आणि ते यशस्वी झाले. कृषि विकासाचा दर 4 टक्क्यावर नेण्याचा केंद्र शासन कसोशीने प्रयत्न करीत आहे. केंद्र शासनाने केलेल्या प्रयत्नांमधील एका बाबीची दखल घ्यावी लागेल. एकेकाळी आपल्याला गहू आयात करावा लागत होता. या सदनामध्ये जो गहू आयात केला गेला तो निकृष्ट दर्जाचा आहे यावर विरोधी पक्षाने चर्चा घडवून आणली. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या प्रदेशाध्यक्ष पदाच्या निवडीच्या कार्यक्रमामध्ये केंद्रीय कृषिमंत्र्यांनी जे स्टेटमेंट केले ते अत्यंत स्तुत्य आहे. ते म्हणाले की, एकेकाळी आपल्याला गहू आयात करावा लागत होता. या देशातील शेतकऱ्यांनी एवढे अन्नधान्य पिकविले आहे की, मागील वर्षाचा गहू गोडावूनमध्ये शिल्लक आहे. यावर्षी गहू कुठे ठेवायचा हा प्रश्न निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी बैठक घेऊन या गव्हाचा साठा कुठे ठेवायचा याचा विचारविनिमय झाला. इतकेच नव्हे तर कृषि क्षेत्र या देशाची मान ऊंच करेल अशी चर्चा त्याठिकाणी झाली.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ......

की, जगाच्या पाठीवर कुठल्याही देशाला अन्नधान्य कमी असेल आणि जे मागास देश आहेत, ज्यांच्याकडे अन्नधान्य कमी निर्माण होते अशा राष्ट्रांना सुध्दा हा भारत निश्चितपणे गहू निर्यात करील अशी परिस्थिती करण्यात केंद्रशासन यशस्वी झालेले आहे म्हणून मी केंद्रशासनाचे अभिनंदन करते......अडथळा......सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की मी स्पष्ट मराठी भाषेतून माझे विचार मांडत आहे. ते कृपया आपण समजून घ्यावेत.....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांना माझ ी अशी विनंती आहे की, ज्या शेतकऱ्यांनी अन्नधान्य पिकविले त्यांचे अभिनंदन करीत आहात की माननीय कृषी मंत्र्यांचे अभिनंदन करीत आहात, हे समजत नाही.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, मी असे वाक्य उच्चारले की, या देशातील शेतकऱ्यांनी इतके अन्नधान्य पिकविले म्हणून केंद्रशासनाची पर्यायाने देशाची अन्नधान्याच्या बाबतीत परिस्थिती चांगली झालेली आहे. म्हणून बाहेरच्या राष्ट्रांना देखील आपण ते निर्यात करु शकतो.

श्री. मधुकर चव्हाण : माझी अशी हरकत आहे की, बाहेरच्या राष्ट्राला गहू देऊ असे सन्माननीय सदस्या म्हणतात परंतु आलेला गहू काढण्यासाठी आता टेंडर काढत आहेत....

**तालिका सभापती (श्री. उल्हास पवार)** : महोदय, आपण आपल्या भाषणातून जे सांगायचे असेल तर सांगावे, अशी सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे.

ॲड. उषा दराडे : महोदय, मी गहू दिला असे म्हटलेच नाही तर द्यावयाचा आहे असे म्हटले आहे. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, माझ्या भाषणात लांबलचक वाक्ये असतात आणि सन्माननीय सदस्यांनी ती पूर्ण वाक्ये ऐकल्याशिवाय त्यांच्या लक्षात येणार नाही.

महोदय, दि. 31.11.2007 मध्ये राज्यसभेत माननीय कृषी मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे गेल्या 9 वर्षात 90 हजार आत्महत्या झालेल्या आहेत, त्यापैकी 60 टक्के आत्महत्या महाराष्ट्र, कर्नाटक, मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये झालेल्या आहेत. सन 2005 पर्यंत आत्महत्यांचे मोजमाप वर्तमानपत्रातील बातम्यांवरुन केले जात होते परंतु सन 2006 पासून ज्याप्रमाणे गुन्हे रजिस्टर्ड झाले त्या पोलिसांच्या रेकॉर्डवरुन ही आकडेवारी आपण काढायला लागलो. म्हणून असे

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ........

दिसते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढलेल्या आहेत. पूर्वी पोलिसांच्या रेकॉर्डवरुन आत्महत्यांची नोंद होत नव्हती, या सर्व बाबींचा बारकाईने विचार करुनच ही नवीन पध्दती सुरु केलेली आहे. अजून महत्वाची गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या ती व्यक्ती साधारणतः घरातील कर्ता पुरुष असते. आपल्या समाजात एकत्र कुटुंब पध्दती तसेच पुरुष प्रधान संस्कृती असल्याने महिला व मुले त्याच व्यक्तिवर अवलंबून असतात. अशा प्रकारे ज्याच्यावर घर अवलंबून असते त्यानेच आत्महत्या केली तर त्याचे फार दुःख होते. हे प्रमाण सर्वात जास्त आहे. त्यात अल्पभूधारक शेतमजुरांचे आत्महत्येचे प्रमाण हे शेतकऱ्यांच्या तुलनेने कमी आहे. 75 टक्के आत्महत्या या 2 ते 12.50 एकर जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांनी केल्या आहेत आणि त्यात ओबीसीची संख्या जास्तीत जास्त आहे. याचा अर्थ असा की, शेतकऱ्यांना स्वतःचे कुटुंब चालविण्यासाठी शेतीवर विसंबून रहावे लागते, संपूर्ण कुटुंब शेतीवर अवलंबून आहे आणि त्यांना बँकेकडूनही कर्ज मिळविण्यात अडचणी निर्माण झाल्या, मिळालेल्या कर्जाची काहींना परतफेड करणे शक्य झाले नाही..........

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

ॲड. उषा दराडे....

परतफेड करता आली नाही त्यामुळे शेतक-यांनी खाजगी सावकारांकडून जास्त व्याजाची कर्जे घेतली व ती कर्जे फेडता आली नाही म्हणून शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. यातून ख-या अर्थाने आपल्याला मार्ग काढावयाचा असेल तर त्यासाठी शासनाने सिंचनावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे. सिंचनावर शासनाने जास्तीत जास्त भर दिला तरच शेतक-यांच्या आत्महत्या थांबू शकतील. शासनाने सिंचनावर भर देण्याचा प्रयत्न केल्यामुळे मी राज्य शासनाचे तसेच केंद्रसरकारचे अभिनंदन करते. सिंचनावर भर देण्यासाठी मोठे तलाव, छोटे तलावांसाठी शासनाने जास्तीत जास्त खर्च करण्याचा प्रयत्न केलेला आहे. विदर्भामध्ये पंपाचा बॅकलॉग 2.15 लक्ष असून मराठवाडयात पंपाचा बॅकलॉग 1.9 लक्ष इतका आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पंपाच्या बॅकलॉगच्या संदर्भात माहिती नाही त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रात पंपाचा बॅकलॉग नाही असे दिसते. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाडयातील पंपाचा बॅकलॉग दूर करण्यासाठी शासनाने प्रयत्न केलेले आहेत. शेतक-यांनी पिकविलेल्या मालाला त्याच्या उत्पादन खर्चावर भाव मिळाला तर शेतक-यांची आर्थिक स्थिती सुधारु शकेल. त्यामुळे शेतक-यांच्या पिकाला उत्पादन खर्चानुसार भाव मिळण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे. यावर्षी शासनाने कापसाला 2850 रुपये क्विंटल इतका भाव दिलेला आहे. परंतु निसर्गाच्या अवकृपेमुळे, लाल्या रोगामुळे तसेच अधिक पावसामुळे व कमी पावसामुळे कापसाचे पीक कमी प्रमाणात आले ही वस्तुस्थिती आहे. पावसाळयाच्या सुरुवातीला दोन महिने पाऊस न पडल्यामुळे पिकाला पुरक जीवनसत्व मिळाले नाही, त्यानंतर अती पाऊस झाला. या अतीपावसामुळे पिके सडली गेली. त्यामुळे कमी पाऊस असला तर कोणती पीके घ्यावीत व जास्त पाऊस पडला तर कोणती पिके घ्यावीत यासाठी शासनाने शेतक-यांना मार्गदर्शन देण्याची आवश्यकता आहे. ज्यांनी कापसाची वेळेवर पेरणी केली त्यांच्या पिकावर लाल्या रोग आला नाही परंतु ज्यांनी कापसाची ऊशिरा पेरणी केली त्यांच्या कपाशीवर लाल्या रोग मोठया प्रमाणात पडला. त्यामुळे लाल्या रोगामुळे ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे अशा शेतक-यांना शासनाने अनुदान देऊन शेतक-यांना वाचवावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

...2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

सभापती महोदय, केंद्रशासनाने गहू आणि इतर धान्यांना चांगला भाव दिल्यामुळे धान्याच्या उत्पादनात खूप वाढ झाली. कर्जमाफीच्या संदर्भात आपल्याला 2 लक्ष कोटी रुपये लागणार होते परंतु एवढया मोठया प्रमाणात त्वरीत पैसे उपलब्ध करणे शक्य नाही. पैशाची मोठया प्रमाणात उपलब्धता नसल्यामुळे आपण केवळ 5 एकराच्या आतील शेतक-यालाच आपण कर्जमाफी देऊ शकलो आहोत. परंतु पैशाची उपलब्धता झाल्यानंतर शासन 5 एकराच्या वरील शेतक-यांना निश्चितपणे कर्जमाफी देईल असा मला विश्वास आहे. मराठवाडा आणि विदर्भातील शेतक-याकडे मोठया प्रमाणात जमिनी आहेत परंतु पश्चिम महाराष्ट्रातील शेतक-यांच्या बागायती जमिनी असल्यामुळे त्यांच्याकडे जमिनी कमी प्रमाणात आहे. मराठवाडयातील आणि विदर्भातील शेतक-यांकडे जास्त जमिनी आहेत परंतु त्यांना सिंचनाची सोय नसल्यामुळे शेतकरी स्वत:च्या पायावर उभा राहू शकत नाही परंतु पश्चिम महाराष्ट्रील शेतक-याकडे 5 एकर बागयती जमीन जरी असली तरी तो स्वत:च्या पायावर चांगल्या पध्दतीने उभा राहू शकतो. जोपर्यंत विदर्भात आणि मराठवाडा सिंचनाचे प्रमाणे वाढणार नाही तोपर्यंत विदर्भात आणि मराठवाडयातील शेतकरी सुखी होऊ शकणार नाही. त्यामुळे विदर्भात आणि मराठवाडयात सिंचनाच्या प्रकल्पांची अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे. सिंचनाचे प्रकल्प आता प्रगतीपथावर असल्यामुळे विदर्भ आणि मराठवाडयात पाणी येण्यास वेळ लागणार आहे. विदर्भात आणि मराठवाडयाचा बॅकलॉग दूर करावयाचा असेल तर आपल्याला ठिबक सिंचन आणि स्प्रिंकलरवर अधिक भर द्यावा लागेल. तसेच क्रॉपींग पॅटर्नवर सुध्दा आपल्याला भर द्यावा लागणार आहे. आता विदर्भातील आणि मराठवाडयातील शेतकरी बी.टी. कॉटनच्या मागे लागलेले आहेत. परंतु कमी पाऊस असल्यावर कोणती पिके घ्यावीत व जास्त पाऊस झाल्यावर कोणती पिके घ्यावीत यासाठी शासनाने शेतक-यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. ज्या शेतक-यांनी 25 मे रोजी कपाशी लावली त्यावर लाल्या रोग पडला नाही परंतु ज्यांनी उशिरा कपाशिची लागवड केली त्यावर मात्र मोठया प्रमाणात लाल्या रोग पडला त्यामुळे कमी आणि जास्त पावसामध्ये कोणती पिके घ्यावीत यासाठी शासनाने शेतक-यांना मार्गदर्शन करण्याची गरज आहे. त्यामुळे शासनाने क्रॉपींग पॅटर्न तयार करण्याची आवश्यकता आहे. विदर्भ

....3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

आणि मराठवाडयातील शेतकरी आर्थिकदृष्टया मागासलेला आहे त्याची आर्थिक स्थिती मजबूत करावयाची असेल तर क्रॉपींग पॅटर्नमध्ये आपल्याला जास्तीत जास्त लक्ष द्यावे लागणार आहे, सिंचन क्षमता वाढविण्यासाठी लक्ष द्यावे लागणार आहे. या शासनाने मागासवर्गीयांचा बॅकलॉग दूर करण्याचे काम केलेले आहे त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करते. शासनाने शेतक-यांना बॅंकेच्या संदर्भात जास्तीत जास्त पतपुरवठा करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

सावकारी कर्जाची पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. अनियमित वीज पुरवठा हा विकासामध्ये फार मोठा अडसर आहे. ही गोष्ट खरी आहे की, अनियमित वीज पुरवठा होत आहे. परंतु हा प्रश्न फक्त राज्यात नसून तो देशात आहेत. राज्यात अणु ऊर्जा प्रकल्प आल्यानंतर आपला विजेचा प्रश्न सुटेल. सभापती महोदय, आपण बेल वाजविली. मी सभागृहाचा जास्त वेळ घेणार नाही. मी याठिकाणी निर्धाराने सांगू इच्छिते की, जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला, शेतकऱ्याला जगणाचा अधिकार आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी ज्या काही उपाययोजना कराव्या लागतील-मग त्या कृषी विभागाच्या असतील, बँकाच्या संदर्भातील असतील किंवा जलसंधारणाच्या असतील- त्या राज्य सरकार केंद्र सरकारच्या मदतीने करेल. या महाराष्ट्रातील शेतकरी, विदर्भातील शेतकरी ताठ मानाने जगला पाहिजे यासाठी आमचे सरकार निश्चितपर्ण कार्यरत राहील असा विश्वास व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करते.

---------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा सुरु होऊन एक तास झालेला आहे. ही चर्चा आपणास तीन तासात संपवावयाची आहे. या प्रस्तावावर तीन विभागांचे मंत्री उत्तर देणार आहेत. प्रत्येक मंत्र्यांसाठी कमीत कमी दहा मिनिटे धरली तरी त्यांना उत्तर देण्यासाठी किमान अर्धातास लागेल...

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, वारंवार सांगूनही विरोधी पक्ष नेत्यांचा माईक सुरु करण्यात येत नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या प्रश्ना संदर्भात चर्चा सुरु आहे. शेतकऱ्यांसाठी देण्यात आलेले पॅकेज फेल गेलेले आहे. विदर्भात अजूनही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. विदर्भात अधिवेशन सुरु असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात विदर्भातच ऊहापोह होणे आवश्यक आहे. तेव्हा आपण सन्माननीय सदस्यांना भाषण करण्यासाठी वेळ द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : या प्रस्तावावर बोलण्यासाठी माझ्याकडे एकूण 21 नावे आलेली आहेत..... सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचे नाव धरुन 22 नावे झालेली आहेत.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, विधानसभा सभागृहात या विषयावर सहा-तास चर्चा झालेली आहे...

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माझ्याकडे 21 नावे आलेली आहेत. आतापर्यंत फक्त माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांची भाषणे झालेली आहेत. तेव्हा सन्माननीय सदस्यांना फक्त मुद्दे मांडावेत अशी त्यांना विनंती आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी चर्चेत भाग घेण्यासाठी नाव दिले होते. माझ्या अन्य सहकाऱ्यांना वेळ मिळावा यासाठी मी माझे नाव मागे घेत आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे देखील त्यांचे नाव मागे घेत आहेत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी सुध्दा माझे नाव मागे घेत आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत भाषणास सुरुवात करतील.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. वेळ कमी आहे याची मला कल्पना आहे. तेव्हा मी थोडक्यात विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या संदर्भात अतिशय विस्तृतपणे विचार मांडलेले आहेत. शिवसेना पक्षाचे गट नेते माननीय श्री.दिवाकर रावते यांनीशेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यासंदर्भात यापूर्वी प्रदीर्घ भाषणे केलेली आहेत.. "पालथ्या घड्यावर पाणी" अशी मराठीत म्हण आहे. त्याप्रमाणे त्याचा या सरकारवर काहीही परिणाम झालेला नाही. तेव्हा त्यांनी या चर्चेमध्ये भाग न घेता मौन धारण केलेले आहे हे मी प्रथम सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ....

सभापती महोदय, शेतक-यांनी आत्महत्या केल्या असून या आत्महत्या होऊ नयेत म्हणून केन्द्र सरकारने एक पॅकेज जाहीर केले होते. हे पॅकेजसुध्दा फसवे आहे. या पॅकेजमध्ये केन्द्र सरकारचा वाटा 50 टक्के आणि राज्य सरकारचा वाटा 50 टक्के होता महाराष्ट्र सरकारने 1 हजार 79 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते आणि ते पॅकेज तीन वर्षात कार्यान्वित करावयाचे आहे परंतु या शासनाने हे पॅकेज फुगवून सांगितले होते असा माझा दावा आहे. राज्य सरकारने आणि केन्द्र सरकारने 50 :50 टक्के या प्रमाणात हे पॅकेज वाटून घ्यावयाचे होते मात्र त्यामधील 712 कोटी रुपयांची संपूर्ण रक्कम केन्द्र सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजचाच भाग होता केन्द्र सरकारचे पॅकेज 239 कोटी रुपयांनी राज्य सरकारने फुगवून सागितले होते त्यामुळे शेतकऱ्यांच्या पदरात जे पैसे पडणार होते ते पैसे त्यांच्या पदरात पडले नाहीत. विदर्भातील सहा जिल्हयात शासनाने किती खर्च केला आहे ? एक हजार कोटी रुपयापैकी 895.64 कोटी रुपये मार्च 2007 पर्यंत खर्च केलेले आहे त्यानंतरची आकडेवारी या पुढच्या भाषणात मी सांगणार आहे.

सभापती महोदय, देशाची अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असते. परवा एका प्रस्तावाला उत्तर देत असतांना माननीय कामगार मंत्री श्री.नवाब मलिक यांनी सांगितले की मंदीची संधी घेतली पाहिजे. देशाची अर्थव्यवस्था 60 टक्के शेतक-यावर अवलंबून असून 40 टक्के इतर क्षेत्रावर अवलंबून असते. परंतु राज्यातील शेंतकरी आत्महत्या करावयास लागले आहेत ही दुर्देवाची गोष्ट आहे. आत्महत्या करणा-या शेतक-याची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना एक एसएमएस आला असून यवतमाळ जिल्हयातील एका शेतक-याने आत्महत्या केल्याचे त्यात सांगण्यात आलेले आहे. तेव्हा शेतक-यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात शासन गांभीर्यने विचार करणार आहे किंवा नाही ?

सभापती महोदय, माससनीय महसूल मंत्री डॉ.पतंगराव कदम यासंना मी सांगू इच्छितो की माझ्याकडे एक अहवाल असून त्यानुसार 85 टक्क्या पेक्षा जास्त शेतक-यापर्यत पॅकेज पोहोचले नाही . तेव्हा 85 टक्क्या पेक्षा जास्त शेतक-यापर्यन्त पॅकेज पोहोचले आहे हे मला आपण दाखवून द्यावे. सवंग लोकप्रियता मिळविण्यासाठी शासनाने अनेक घोषणा केल्या होत्या. अनधिकृत सावकारी विरुध्द सावकारी प्रतिबंधक कायदा आणण्यात येईल असेही सभागृहात सागण्यात आले होते. ज्यावेळी शेतक-यांना बॅन्का कर्ज नाकारतात त्यावेळी शेतकरी कर्जासाठी गावातील दुस-या

डॉ.दीपक सावंत ....

शेतक-याकडे जातात . अनधिकृत सावकारीला आळा घालण्याच्या दृष्टीने कायदा आणला जाईल असे शासनाने सांगितले होते परतु हा कायदा आणत असतांना इतरही बाबी तपासून पाहण्याची गरज आहे. अनेक लहान लहान गावामध्ये बॅन्का नाहीत . कर्ज घेण्यासाठी कोणत्या ठिकाणी जावयाचे अर्ज कसा करावयाचा याचे ज्ञान शेतक-याला नाही.

सभापती महोदय , कृषीवर आधारित उद्योग सुरु करण्यात येईल असे सांगण्यत आले होते. तेव्हा महाराष्ट्रात अशा प्रकारचे किती उद्योग सुरु करण्यात आले आहेत हे सन्माननीय मंत्री डॉ पंतगराव कदम यांनी मला सांगावे अशी मी त्यांना विनंती करतो. कापसाची संयुक्त शेती करता शेतक-यांना हेल्प लाईन सुरु करण्यात येईल असेही सांगण्यात आले होते परंतु आपल्याकडील शेतकरी शिक्षित आहेत काय ? मुंबई वा ठाण्यातील लोक हेल्प लाईन वापरु शकतील परंतु गावातील शेंतकरी ही हेल्प लाईन वापरणार आहेत काय ? एक टक्कासुध्दा शेतक-यांनी हेल्प लाईन वापरलेली नाही.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ KTG/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 13:55

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, माझे मत असे आहे की, शासन अशा प्रकारची बोगस, फसवी मृगजळ शेतकऱ्यांना दाखवित आहे.

सभापती महोदय, या पॅकेजमधील आणखी एक महत्त्वाचा भाग मी आपल्यासमोर मांडतो. या पॅकेजमध्ये आपण सामूहिक विवाहाची संकल्पना मांडली होती. सरकार यातूनदेखील किती खोटेपणा करते ते मी या ठिकाणी आपल्याला दाखविणार आहे. सभापती महोदय, या सामूहिक विवाहाच्या बाबतीत सरकारने काय सांगितले होते ? शेतकऱ्याच्या मुलीला 10 हजार रूपयांपर्यंतची आर्थिक मदत वस्तूरूपामध्ये द्यावयाची तसेच या सामूहिक विवाहांचे आयोजन करणाऱ्या बिगर शासकीय संस्थेला प्रत्येक जोडप्यामागे 1 हजार रूपये अनुदान द्यायचे. अर्थात यासाठी आपण काही अटी देखील घातलेल्या होत्या. 2006 मध्ये या अटी घालताना सरकारने सांगितले होते की, यातील वधू-वर हे महाराष्ट्रातील निवासी असावेत, त्यांच्याकडे रेशनकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला इत्यादी गोष्टी पुराव्यासाठी असाव्यात. तसेच वधू ही शेतकऱ्याची मुलगी असली पाहिजे अशीही एक महत्त्वाची अट होती. अशा योजनांमध्ये सरकार ज्या अटी घालते त्या इतक्या जाचक असतात की त्या पूर्ण करता करता लाभ घेणाऱ्याच्या नाकीनऊ येतात. भीक नको पण कुत्रे आवर अशी त्याची अवस्था होऊन जाते. या योजनेसाठी देखील 16 तालुके निवडले गेले. आणि त्यामध्ये 2005 ते 2007 च्या दरम्यान 4027 विवाहांवर 4.43 कोटी रूपयांचा खर्च केला आहे. व्वा, काय हा सामाजिक न्याय सरकारने दिलेला आहे ? सभापती महोदय, मी विदर्भातील सहा जिल्ह्यांतील सामूहिक विवाहांची आकडेवारी आपल्याला सांगतो. विदर्भातील सहा जिल्ह्यांत 2005 ते 2007 या कालावधीत 14786 सामूहिक विवाहांपैकी 8329 प्रकरणांमध्ये महिला व बाल कल्याण विभागाने संबंधित अधिकाऱ्यांनी त्या विवाहांची प्रमाणपत्रेच दिली नाहीत. त्यामुळे त्या जोडप्यांना या योजनेचा लाभ मिळू शकलेला नाही. त्याबद्दल सरकार, संबंधित विभागाचे मंत्री त्या संबंधित आकािऱ्यांवर काय कारवाई करणार आहे ? 3028 प्रकरणांमध्ये शासकीय नियमांचे उल्लंघन करून विवाहाची प्रमाणपत्रे दिली गेली आहेत. म्हणजे हे आपले पॅकेजही किती फसवे आहे हे आपण लक्षात घ्या, त्यासाठीच मी ही गोष्ट या ठिकाणी मांडलेली आहे. सभापती महोदय, याबाबतचे सर्वेक्षण टीआरए या संस्थेने केलेले आहे. सभापती महोदय, अशा प्रकारच्या विविध गोष्टी करीत असताना सामूहिक विवाह आणि पॅकेजमधील जो भाग हाता त्यांचा कसा बोजवारा उडाला हे मी आपल्यासमोर

..... जेजे 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सावंत ....

मांडलेले आहे. हे मांडतानाच आणखी एक सांगू इच्छितो की, या पैकी 30 टक्के विवाह हे शेतकऱ्यांचे होते, बाकी सगळे विवाह आप्तष्ट, मित्रांचे होते. केवळ एक टक्क शेतकऱ्यांना या सामूहिक विवाह योजनेची माहिती होती आणि त्यातील 30 टक्के विवाह शेतकऱ्यांच्या मुलींचे होते. यानंतर शासनाने काय केले ? पंतप्रधान पॅकेज अंतर्गत 37499 लाख रूपयांचे बियाणे, तुषार सिंचनसंच, दुधाळ गाई वाटप, जलसिंचन, खाद्यवैरण इत्यादीवर खर्च केले. सभापती महोदय, यातील दुधाळ गाई किती दिल्या याची आकडेवारी किमान आपण, मंत्र्यांनी येथे सांगावी अशी आम्ही अपेक्षा केली तर ती वावगी ठरू नये. पण त्याचबरोबर त्यातील किती गाई दुधाळ होत्या आणि किती भाकड होत्या हेही सरकारने सांगावे. किंबहुना मी तर आरोप करतो की, दुधाळ गाई वाटप योजनेतून वाटण्यात आलेल्या दुधाळ गाई या सत्तारूढ पक्षाच्या लोकांनाच वाटल्या गेल्या आणि बाकीच्यांना भाकड गाई वाटण्यात आल्या आहेत.

सभापती महोदय, या पॅकेज नंतर विदर्भातील या सहा जिल्ह्यांमध्ये 2007 पासून नोव्हेंबर 2008 पर्यंत 106 पात्र आत्महत्या झालेल्या आहेत. आता यामध्ये 'पात्र आत्महत्या' आणि 'अपात्र आत्म्हत्या' असाही शब्दप्रयोग सरकारने केलेला आहे. तर जानेवारी 2008 ते नोव्हेंबर 2008 पर्यंत एकंदर 72 आत्महत्यांची नोंद झाली आहे आणि या वर्षामध्ये आत्महत्या कमी झाल्या आहेत असे सरकारचे म्हणणे आहे. पण या आत्महत्या होत आहेत त्याची एक शासन म्हणूनही आपली सामूहिक जबाबदारी आहे त्यामुळे आपणास त्याबाबत ऐकून घ्यावे लागणार आहे.

( यानंतर श्री. सरफरे ..... केके 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, अधिकाऱ्यांनी काय केले? अधिकाऱ्यांनी तीन वर्षीचा आढावा घेऊन निष्कर्ष् काढले. तीन वर्षात कोणकोणत्या कारणांमुळे आत्महत्त्या झाल्या? तीन वर्षामध्ये नापिकी झालेली शेती,कर्जाच्या वसूलीची दिलेली नोटीस या निकषावर पात्र आणि अपात्रता ठरविली गेली. आपले अधिकारी किती क्रूर, जीवघेण्या गोष्टी करतात? "शेळी जाते जीवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड" अशाप्रकारे या शेतकऱ्याची अवस्था झाली आहे. सभापती महोदय, आपल्या शासकीय अधिकाऱ्यांनी संगनमताने काही पॅकेज वाटले आहेत. त्यामुळे आत्महत्त्याग्रस्त झालेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मदत दिली गेली नाही. शेतकऱ्याची आत्महत्त्या झाल्यानंतर त्याला किती दिवसात मदत दिली पाहिजे. त्याच्या कुटुंबियांना ताबडतोब एक लाख रुपये दिले पाहिजेत. परंतु पात्र आणि अपात्रता ठरविण्यात कालावधी गेल्यामुळे एकाही कुटुंबियांना एक महिन्यानंतर सुध्दा एक लाख रुपये दिले गेले नाही. यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, अकोला या जिल्हयातील प्रकरणांची माहिती माझ्याजवळ आहे. या जिल्हयांमध्ये 199 आत्महत्त्याग्रस्त कुटुंबियांची पात्रता संख्या असतांना 72 लोकांना विलंबित अर्थसहाय्य दिले गेले. हे अर्थसहाय्य देत असतांना किती महिन्यांचा विलंब झ ाला? या लोकांना 10 ते 323 दिवसापर्यंत मदत मिळाली नाही. पात्रतेची खात्री करुन त्यांचा शवविच्छेदन अहवाल मागविला होता. त्या अहवालामध्ये विष पिऊन आत्महत्त्या केल्याचे सांगण्यात आले. त्याचा व्हिसेरा रासायनिक तपासणीसाठी पाठविल्यानंतर त्याचा अहवाल तीन-चार वर्षे प्रलंबित रहातो. त्यामुळे शासनाच्या मदतीविना हे आत्महत्त्या झालेल्या शेतकऱ्याचे कुटुंब वंचित रहाते. तेव्हा ही शासकीय यंत्रणा आपण सुधारणार आहात की नाही? आपण फॉरेन्सिक लॅबोरेटरीकडे व्हिसेरा पाठविल्यानंतर त्याचा अहवाल आठ दिवसात येणे अपेक्षित आहे. तरीसुध्दा त्यासाठी तीन-तीन वर्षे लागत आहेत. 177 मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्यासाठी 1023 दिवस लागले. तोपर्यंत या लोकांनी काय करावयाचे?

सभापती महोदय, 43 टक्के शेतकऱ्यांना शेतीविषयक अवजारे पुरविण्यात आली नाहीत. त्यासाठी शासनाकडे मागणी करुन देखील पुरविण्यात आली नाहीत. 18 तालुक्यांमध्ये 29200 शेतकऱ्यांनी अवजारांची व साधनसामुग्रीची मागणी केली होती. त्यापैकी आपण फक्त 16577 शेतकऱ्यांना अवजारे पुरविली. उर्वरित शेतकऱ्यांना आपण अवजारे कां पुरविली नाहीत? याची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

कारणे सांगावीत. ज्या शेतकऱ्यांनी अवजारांची मागणी केली, त्यापैकी 57 टक्के शेतकऱ्यांना शेतीची अवजारे पुरविण्यात आली. उर्वरित 16623 शेतकऱ्यांना आपणाकडे निधी उपलब्ध असतांना आपण अवजारे कां दिली नाहीत? सभापती महोदय, मी आपणास सेलू तालुक्याचे उदाहरण देतो. त्या तालुक्यात 869 शेतकऱ्यांना अवजारे देण्याचे उद्दिष्ट होते. त्यापैकी 586 शेतकऱ्यांनी आपल्याकडे अर्ज केले. त्यामधील फक्त 129 लोकांना अवजाराचे वाटप करण्यात आले. त्याचप्रमाणे न वठलेल्या धनादेशाबाबत आणखी एक महत्वाचे उदाहरण आपणास देतो. 349 लाभार्थ्यांना 15 हजार रुपयांचे धनादेश बैलगाडी विकत घेण्यासाठी दिले. त्यापैकी 9 धनादेश 14 ऑगस्ट 2007 रोजी न वठता परत करण्यात आले त्याचे कारण काय? याबाबत माहिती पुरविणारी आपली यंत्रणा दुबळी ठरली आहे. त्या यंत्रणेमध्ये राम नव्हता. तेव्हा आपण ही यंत्रणा सक्षम करणार आहात की नाही? या प्रश्नाचे उत्तर आपण आपल्या भाषणामध्ये द्यावे अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, शासनाला सादर करण्यात आलेल्या स्वामिनाथन समितीच्या अहवालाकडे शासनाने लक्ष दिले नाही. इंदिरा गांधी इंस्टिटयूटने दिलेल्या अहवालाकडे लक्ष दिले नाही. आपल्याजवळ सहा ते सात अहवाल असतांना त्याकडे आपण कां दुर्लक्ष केले?

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. "Prevention is better than cure" असे म्हटले जाते. ज्यावेळी अशा प्रकारचे एखादे पॅकेज जाहीर करतो त्यावेळी त्याची परिणामता येण्यासठी आपण काय प्रिव्हेंशन केले ? आपल्याकडे कोणती यंत्रणा आहे की, ज्यामुळे आपण या शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून परावृत्त करु शकतो ? आपण एखाद्या तरी शेतकऱ्याचे काऊन्सिलिंग केले काय ? अमूक शेतकरी आत्महत्या करण्याच्या बेतात आहे हे आपल्याला माहीत आहे. अशी यंत्रणा उभी करण्यासाठी आपल्याकडे नेटवर्क आहे. आपल्याकडे ग्रामसेवक आहेत, अंगणवाडी सेविका आहेत. कोणाची आर्थिक स्थिती कशी आहे हे त्यांना माहीत आहे. त्यावर आपण काही लक्ष केंद्रित केले का ? खरोखर आपल्याला हे काम करावयाचे असते तर आपण याकडे लक्ष दिले असते. जो शेतकऱ्यांपर्यंत जाऊन पोहोचेल, शेतकऱ्यांच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचेल, शेतकऱ्याच्या घरात काय परिस्थिती आहे, त्याची मानसिक अवस्था काय आहे हे सांगेल असा शेतकरी मित्र निवडण्याची आपल्याला गरज होती. त्याचे काऊन्सिलिंग करुन योग्य वेळी त्या माणसाला मदत देता आली असती. आपण आत्महत्या करु नका असे त्याला योग्य वेळी सांगितले असते तर त्याला आत्महत्या करण्यापासून परावृत्त करता आले असते. आत्महत्या करणे किंवा न करणे याबाबतीत त्यावेळी तो अशा एका काठावर असतो की, त्यावेळी त्याची आत्महत्या झाली नाही तर तो मागे येतो. त्याला परावृत्त करावयास पाहिजे. ते आपण का केले नाही ? आपण पॅकेजेस जाहीर केले त्यामध्ये आपला स्वत:चा फायदा होता. ते पॅकेज अंतिम घटकापर्यंत पोहोचले नाही. हे पॅकेज देत असताना आपण एकच सांगतो की, आम्ही एवढे दिले. सवंग लोकप्रियतेसाठी घोषणा केल्या. या घटकातील जो समाज आहे, ग्रामसेवक आहेत, अंगणवाडी सेविका आहेत त्यांच्याकडून रिपोर्ट घ्या. तहसीलदारापर्यंत, जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत रिपोर्ट घ्या. एक अशी यंत्रणा राबवा की, ज्या यंत्रणेमार्फत आपल्याला त्या गावातील नेमके किती शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर आहेत आणि त्यांना कसे परावृत्त करावयाचे हे कळेल.

सभापती महोदय, विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडे शासनाने लक्ष दिलेले नाही. विदर्भामध्ये संत्र्याचेही तितकेच नुकसान झाले आहे. शासनाने या पिकाला काहीही नुकसानभरपाई

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

देण्याचा प्रयत्न केलेला नाही. मग संत्रा बागायतदारांनी आत्महत्या केली तर काय चुकीचे आहे ? ते आत्महत्या करणार आहेत. ते आत्महत्येच्या उंबरठ्यावर आहेत. त्याचे सगळे पाप आपल्या डोक्यावर येणार आहे. मी माझ्या भाषणाच्या शेवटी एवढेच सांगू इच्छितो की, खरोखरच आपल्याकडे राजकीय इच्छाशक्ती आहे काय ? या आत्महत्या थांबवावयाच्या असतील तसेच आपल्याला शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावयाचे असेल तर लालफित काढून टाका. नोकरशाहीवर अवलंबून राहू नका. आपण सर्व राजकारणी लोक आहोत. शेवटी राजकारणी लोकांनाच दोषी ठरविले जाते. नोकरशाही बाजूला राहते. ज्या अधिकाऱ्यांनी अपहार केला असेल, ज्या अधिकाऱ्यांनी गोंधळ घातला असेल, ज्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केला असेल त्यांना ताबडतोब घरी पाठविण्याचे धाडस दाखविले तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न सुटेल. त्यादृष्टीने आपण प्रिव्हेंटिव मेजर घ्यावेत अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, विदर्भाच्या पॅकेजच्या बाबतीत या ठिकाणी विस्तृत चर्चा होत आहे. आपण विदर्भाला 3800 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. या पॅकेजचे वाटप करीत असताना त्यावर कोणतेही नियंत्रण नाही. हे वाटप केल्यानंतर त्याबाबतीत कोणीही काही पाहिलेले नाही. योग्य माणसाला वाटप झाले का हे कोणीही पाहिलेले नाही. हे वाटप करीत असताना एकरेज पाहिलेले नाही. या ठिकाणी 3800 कोटी आणि इतर बाकीचे पैसे वाटले. विदर्भातील जे सर्व जिल्हे आहेत त्यामध्ये पूर्व विदर्भ आहे तसेच पश्चिम विदर्भ आहे. मी यवतमाळ जिल्ह्याचे उदाहरण देतो. यवतमाळ जिल्ह्यामध्ये तीन-चार वर्षापूर्वी कधीही 40 कोटी रुपयांच्या वर कर्ज वाटप झालेले नाही. शेतकऱ्यांना कर्ज वाटप करु नये या मताचा मी नाही. परंतु मागच्या दहा वर्षाची सरासरी काढली तर त्या ठिकाणी 40 कोटी रुपयांच्या वर कधी कर्ज वाटप झालेले नाही. परंतु पॅकेज आल्यानंतर यवतमाळ जिल्ह्यामध्ये 180 कोटी रुपयांचे कर्ज वाटप झालेले आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

माननीय विरोधी पक्ष नेत्यांना माझी विनंती आहे की, आपण या मुद्यासंबंधी प्रामुख्याने चर्चा करावी. सभागृहात माननीय पणन मंत्री उपस्थित आहेत. मी परवाच यासंदर्भात राज्य सहकारी बँकेत आवाज उठवून ही पध्दत बरोबर नसल्याचे सांगितले होते, हे त्यांनाही माहीत आहे. शासनाने 180 कोटी रुपयांचे वाटप केले होते, हा पैसा सत्तारुढ पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्येच वाटला आहे. त्या पैशातून काही जणांनी मोटर घेतली, काहींनी गाडी घेतली, काहींनी आपल्या मुलांची लग्ने लावली आहेत. या लोकांचा कर्जमाफीशी काहीही संबंध नाही...

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी 180 कोटी रुपये कर्जाचे वाटप करण्यात आले असे म्हटले आहे. परंतु ही रक्कम कशातून वाटली गेली ते मला समजले नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, देशाचे पंतप्रधान विदर्भाच्या दौ-यावर आले होते. त्यानंतर त्यांनी पॅकेज जाहीर केले होते. त्या पॅकेजमधून काही शेतक-यांचे व्याज माफ झाले, काहींचे कर्ज माफ झाले होते. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी राज्य सहकारी बँकेत काम केले आहे आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेतही काम करीत आहेत. समजा एखाद्या शेतक-याची एक एकर ऊसाची शेती असेल तर त्यासाठी 30 हजार रुपयांचे कर्ज वाटप केले जाते आणि 10 एकर शेती असेल तर 3 लाख रुपये कर्ज दिले जाते. परंतु काही लोकांना 30 लाख रुपयांचे कर्ज दिले आहे. या कर्जाची वसुली केली जात नाही. आली गंगा हात धुवून घ्या अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. हा मुद्दा सर्वांनी विचारात घेतला पाहिजे. त्यामुळे अशी अनेक पॅकेजेस दिली तरी शेतक-यांचा फायदा होणार नाही, ही शुध्द फसवणूक आहे. त्यामुळे शेतक-यांना वेगळे वळण लावले जात आहे. जोपर्यंत त्यांना सक्षमपणे उभे करीत नाही तोपर्यंत कितीही पॅकेजेस दिली तरी उपयोग होणार नाही. शासनाने योग्य माणसाला कर्ज द्यावे, योग्य माणसाला मदत करावी. पण चेहरा पाहून, कपडे पाहून, डोके पाहून कर्ज दिले जात असेल तर त्याचा उपयोग होणार नाही असे माझे मत आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, परवाच राज्यात आणि देशात आलेल्या आर्थिक मंदीबाबत चर्चा झालेली आहे. त्यावेळी मी असे म्हटले होते की, शेतक-यांची प्रोसेसिंग युनिट समक्ष होत नाहीत तोपर्यंत शेतकरी उन्नती करु शकत नाही. सभापती महोदय, विदर्भात एकूण 14 सहकारी कारखाने आहेत. त्यापैकी 2 कारखाने विकले आहेत, उर्वरित 12 पैकी 3 चालू स्थितीत आहेत. त्यापैकी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांचा स्फूर्ती सहकारी कारखाना सुरु आहे. पुसद येथे वसंत सहकारी कारखाना आहे. हा कारखाना एक माजी आमदार चालवितात. वर्धा येथील श्री.सुरेश देशमुख यांचा जय जवान कारखाना बंद आहे परंतु चालू होण्याच्या स्थितीत आहे. यवतमाळ जिल्हयातील कारखाना माननीय श्री.कोरे यांनी चालविण्यास घेतला आहे. उर्वरित सर्व कारखाने बंद आहेत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या प्रश्नावर घेतलेली भूमिका योग्य आहे. त्यांनी 3-3 तास चर्चा केली आहे. पण बोलून काही उपयोग होत नाही. उपडया घडा वर पाणी अशी स्थिती आहे. त्यामुळे या चर्चेद्वारे आम्हाला शासनाकडून ठोस उत्तर मिळाले पाहिजे. सभापती महोदय, विदर्भात 8 सहकारी सूत गिरण्या आहेत, त्यापैकी 5 बंद आहेत. पुसद येथील बाबासाहेब नाईक ही सूत गिरणी सगळयात चांगली आहे. वर्धा येथील सूत गिरणी जेमतेम सुरु आहे. बापूजी सूत गिरणी जेमतेम सुरु आहे. इंदिरा सूत गिरणी ही खाजगी सूत गिरणी आहे, बाकीच्या ठिकाणी ठणठणाट आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील पुढे सुरु...)

सन्माननीय सदस्य श्री. गणपतराव देशमुख हे दुष्काळ असलेल्या सांगोल्यातील आहेत. ते विदर्भातील कापूस सांगोल्यामध्ये नेतात आणि सांगोल्यात सूत गिरणी चालवून 10 कोटीचा नफा कमावतात. विदर्भामध्ये कापूस होतो, परंतु चांगले प्रयत्न होताना दिसत नाहीत. विदर्भावर शासनाचे योग्य नियंत्रण नाही किंवा शासनाची तशी मानसिकता दिसत नाही. सभापती महोदय, 12 सहकारी साखर कारखान्यांना ऊस तोडणीसाठी प्रत्येक वेळी तीन-तीन चार-चार कोटी रुपये देण्यात आले. परंतु कारखाने सुरु झाले नाहीत. माननीय पणन मंत्र्यांनी तीन-तीन वेळा तीन-तीन चार-चार कोटी रुपये दिले. परंतु कारखाने सुरु झाले नाहीत हे मी पुन्हा पुन्हा सांगत आहे. इतक्या कोटींची मदत देऊन या कारखान्यांची चिमणी कधीच पेटली नाही. तेव्हा हे पैसे घेऊन ज्यांनी कारखाने चालू केले नाहीत त्यांच्यांवर कारवाई करुन त्यांना जेलमध्ये टाकण्यात येणार आहे की नाही हा माझा शासनाला सवाल आहे. ऊस तोडणीच्या नावाखाली शासनाचे तीन-तीन चार-चार कोटी रुपये घेऊन खादीचा झब्बा आणि पांढरी टोपी घालून हे जे लोक समाजामध्ये मिरवत आहेत त्यांच्यावर शासन कारवाई का करीत नाही ? माझे असे स्पष्ट सांगणे आहे की, जोपर्यन्त या लोकांवर कारवाई होत नाही तोपर्यन्त या पॅकेजच्या संदर्भात या ठिकाणी कितीही चर्चा केली तरी ती निरर्थक आणि बोथट होईल. तेव्हा या संदर्भात शासनाने या सभागृहामध्ये निसंदिग्ध उत्तर दिले पाहिजे अशी माझी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे. माननीय ऊर्जामंत्री श्री. सुनील तटकरे हे सूटबूट घालून सभागृहामध्ये आले होते. मला वाटले होते की ते या चर्चेसाठी थांबतील. परंतु ते निघून गेले.

सभापती महोदय, विदर्भातील ग्रामीण भागामध्ये 18-18 तास वीज नाही. त्यामुळे शेतीला पंपाने पाणी देता येत नाही. काल सभागृहाला नाताळची सुट्टी असल्यामुळे मी बुट्टीबोरी आणि त्याच्या आसपासच्या परिसरामध्ये जाऊन आलो. त्या भागामध्ये 18-18 तास वीज नाही. शेतकरी डिझेलवर पंप लावायला तयार आहेत. परंतु डिझेलचे पंप लावण्यास परवानगी दिली जात नाही. कारण अपुरा पाऊस पडल्यामुळे पिण्यासाठी पाणी पुरणार नाही म्हणून डिझेलवर पंप वापरण्यास शेतक-यांना बंदी घालण्यात आलेली आहे. या शेतक-यांना दिलासा दिला पाहिजे. या ठिकाणी केवळ चर्चा करुन विदर्भाचे प्रश्न सुटणार नाहीत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये ज्या प्रमाणे शेतीचा पाया

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

आणि नेतृत्व आहे त्याप्रमाणे ते विदर्भामध्ये नाही.  येथील नेतृत्व बदलले पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी कॉंग्रेस पक्षाचेच पदाधिकारी आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील कोरेसाहेब तुमच्या वर्धा जिल्हयामध्ये येऊन सूत गिरणी चालवितात आणि ती फायदेशीर करुन दाखवितात. आज परिस्थिती अशी आहे की, येथील जे नेतृत्व आहे, जे सावकार आहेत तेच या सूत गिरण्या चालवायला घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. येथील सूत गिरण्या आणि कारखाने दोन-दोन तीन-तीन कोटी रुयास विकत घेण्याचे काम होत आहे. या बाबतीत वशिला लावून या सूत गिरण्या अमुकाला द्या, तमुकाला द्या असे फोन देखील येतात. या पध्दतीने विदर्भाचा विकास होणार नाही, शेतक-याची उन्नती होणार नाही.  असे कितीही पॅकेज दिले तरी शेतक-याची उन्नती होणार नाही मात्र काही लोकांजवळ मोटार सायकली येतील, गाड्या येतील, लग्ने लावली जातील, घरे बांधली जातील . शेतकरी ख-या अर्थाने स्वावलंबी होण्यासाठी शासनाने नियोजनबध्द अशी योजना राबविली पाहिजे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री. शिगम 14:20

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा उपस्थित करुन माझे भाषण संपविणार आहे. मी जे करुन दाखविले आहे म्हणून मी बोलणार आहे. सन्माननीय माजी सहकार मंत्री या सभागृहात उपस्थित आहेत. मी एक गोष्ट माझ्या जिल्हयात करुन दाखविली आहे. ती गोष्ट करण्याची मानसिकता या शासनाने दाखविली पाहिजे. मी माझ्या बँकेतून 1 कोटी रुपयांचे शेती कर्ज शेतकऱ्यांना होते, नंतर मी माझ्या बँकेतून 14 कोटी रुपयांपर्यंत शेतकर्ज नेले आणि ते शेतकर्ज शंभर टक्के वसूल करुन दाखविले. मला पॅकेजचे फक्त 1 कोटी रुपये मिळाले होते. 1965 पासून 1991 सालापर्यंत माझ्या बँकेतून शेतकर्जाचे वाटप झालेले नव्हते. आज मी माझ्या बँकेतून 14 कोटी रुपयांचे शेतकर्जाचे वाटप केले आहे आणि ते कर्ज वसूल करुन दाखविले आहे. मी योग्य माणसाला पैसे दिले. गरजवंताला पैसे दिले. आमच्या जिल्हयातील शेतक-यांची कर्ज फेडण्याची मानसिकता आहे ही गोष्ट मी सर्वांच्या निदर्शनास आणून दाखविली आहे. शासन अशा प्रकारचे वातावरण विदर्भात जोपर्यंत करु शकत नाही, तोपर्यंत विदर्भात कितीही पॅकेज दिले तरी विदर्भाची उन्नती होऊ शकत नाही. वेळ अपुरा मिळाला आहे. माझ्याकडे बोलण्यासारखे बरेच मुद्दे आहेत. या विषयावर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जास्त बोलावे अशी माझी अपेक्षा आहे. माझ्याकडे सिंचनाच्या अनुशेषाचे मुद्दे आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख या सिंचनाच्या मुद्यावर प्रभावीपणे बोलू शकतील. मुद्यांचे रिपिटेशन होऊ नये म्हणून मी माझे काही मुद्दे उपस्थित करीत नाही. विदर्भात सिंचन योग्य प्रकारे झाले असते तर विदर्भाचे चित्र आज आपल्याला वेगळे पहावयास मिळाले असते. विदर्भातील मातीला गोडवा आहे. विदर्भातील पिकाला वेगळा गोडवा आहे. मी रोज माझ्या पत्नीसमवेत बाजारात भाजी खरेदीसाठी जातो. विदर्भातील गाजर, घेवडा, वाल या भाज्यांना वेगळीच चव आहे. या भाज्यांना वेगळाच वास आहे. विदर्भातील भाज्यांमध्ये देखील चांगला गोडवा आहे. विदर्भातील हा गोडवा हे एक मोठे सोने आहे. विदर्भात आल्यानंतर आम्ही भारावून जातो. या ठिकाणची खूप भाजी खावीशी वाटते. विदर्भातील पूर्व भागातील धानाला कोकणातील धानापेक्षा वेगळी चव आहे. या चर्चेच्या निमित्ताने शासनाने एक ठोस कार्यक्रम, ठोस आश्वासन विदर्भातील जनतेला द्यावे अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शेतक-यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात जो प्रस्ताव मांडला आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, साधारणत: प्रस्ताव मांडत असताना काय उपाययोजना कराव्यात, काय कृती करावी अशी अपेक्षा असते. अशा अपेक्षा या प्रस्तावामध्ये सुध्दा आहेत. दुर्देवाने मी या प्रस्तावावरील चर्चेत सहभागी होत असताना जे मुद्दे मांडणार आहे, त्यात विदर्भासाठी तुम्ही काय करु नका एवढयापूरते मी बोलणार आहे. विदर्भासाठी काही करा अशी बोलण्याची वेळ माझ्या जीवनातून संपून गेली आहे की काय असे मला वाटावयास लागले आहे. विदर्भासाठी शासनाने काय करु नये हे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. शेतक-यांच्या आत्महत्या होतात हे आकडेवारीने आणि शास्त्राने सिध्द झालेले आहे. त्याची कारणे अनेक आहेत. "Prime reason is non-availability of irrigation." हे भारत देशाच्या माननीय पंतप्रधानांचे वाक्य मी जसेच्या तसे या ठिकाणी सांगितले आहे. "I would like to quote" म्हणजे शेतक-यांच्या आत्महत्येची कारणे अनेक आहेत. परंतु विदर्भात सिंचनाचा अभाव हे यामागचे मुख्य कारण आहे. हे देशाच्या माननीय पंतप्रधानांनी म्हटले आहे. हे वाक्य अधिकृत पत्रकात नमूद करण्यात आले आहे. वेळ कमी असल्यामुळे मी अधिकृत पत्रक वाचून सभागृहाचा वेळ मी घेऊ इच्छित नाही. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले की, विदर्भामध्ये सिंचनाचा अभाव आहे त्यामुळे येथे आत्महत्या जास्त होतात. विदर्भातील सहा जिल्हयाला पॅकेज देण्याची निवड ही देशाच्या पातळीवर झालेली आहे. देशातील 31 जिल्हे निवडले आहेत, त्यात महाराष्ट्रातील विदर्भातील सहा जिल्हयांचा समावेश आहे. माननीय पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरुन भाषण करताना फक्त विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येचा उल्लेख केला. शेतक-यांच्या आत्महत्या दुस-या ठिकाणी देखील होतात. परंतु या सहा जिल्हयात शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण महत्तम आहे. 90 टक्क्याच्या वर सिंचन क्षमता ज्या जिल्हयाने प्राप्त केलेली आहे, त्या सहा, सात जिल्हयामध्ये अभावाने सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्येची घटना घडत नाही. घडली तर एखादी दुसरी घटना घडते...

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:25

प्रा.बी.टी.देशमुख.......

सिंचनाच्या सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात हे मुख्य सूत्र या आत्महत्यांच्या मागचे समजले पाहिजे. म्हणून मग देशाच्या पंतप्रधानांनी 2177 कोटी रुपयांचे पॅकेज विदर्भातील 6 जिल्हयांसाठी दिले. दुर्दैव असे की, हा पैसा आपल्याला खर्च करता आला नाही. मुद्दाम ही गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो की, गेल्या दोन-चार महिन्यात शासनाने याबाबत अतिशय नकारात्मक, क्रूरपणाचे आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या इतिहासामध्ये काळेकुट्ट असे वर्णन करता येईल अशा नव्या इतिहासाला सुरुवात केली आहे. तो इतिहास थांबवा हे माझ्या भाषणाचे मुख्य सूत्र आहे. अनेकदा मी सभागृहात हे बोललो की, हे 5-6 जिल्हे सिंचनाच्या बाबतीत महत्तम अनुशेष असलेले आहेत. 90 टक्क्याच्या वर सिंचन क्षमता महाराष्ट्रात इतर जिल्हयांना मिळणार असेल तर याठिकाणी ती 23 टक्के आहे. या सर्वांच्यात शिरोमणी जिल्हा कोणता असेल तर तो अमरावती जिल्हा आहे. सांगताना मला लाज वाटत असली तरी वस्तुस्थिती म्हणून सांगावे लागत आहे. लपवायचे असले तरी किती लपवावे? केव्हा तरी बोलावे लागते. दांडेकर समितीचा अहवाल आला त्यावेळेला एका जिल्हयामध्ये 62 टक्के सिंचन क्षमता असताना या जिल्हयात ती 3.5 टक्के आहे. ओलिताखालील जमीन ही 3.5 टक्के आहे. राज्याची सरासरी वर गेली. 1984, 1994 आणि 2006 मध्ये ती वाढली. या तीनही स्तरावरील अधिकृत आकडेवारी उपलब्ध आहे. या जिल्हयामध्ये 134 हजार हेक्टरचा सिंचन क्षमतेचा मागासलेपणा होता तो 1994 मध्ये 209 हजार हेक्टरने राज्याच्या सरासरीखाली आला. 2006 मध्ये 223 हजार हेक्टरने खाली आहे. म्हणजे अनुशेष वाढत आहे. त्यामध्ये अत्यंत घाणेरडे, काळेकुट्ट, इतिहासाला लाज वाटावी असे कृत्य मागील दोन-चार महिन्यात झाले आहे. ते म्हणजे 50 वर्षाच्या धडपडीनंतर ज्या विदर्भातील एका जिल्हयाला 50 हजार हेक्टरची सिंचन क्षमता मिळेल असे वाटले होते त्यातील 30 ते 40 हजार हेक्टरची सिंचन क्षमता तोडून काढण्यात आली आणि खाजगी भांडवलदारांना ती देण्यात आली. काहींची काढली. काहींची काढत आहेत. खाजगी कंपन्या आहेत. त्यांच्याकडे पैसा आहे, भांडवल आहे, शेअर कॅपिटल उभे करतात, बँकांकडून कर्ज घेतात, भरपूर नफा कमावतात, त्यांनी ते करावे. हे करीत असताना त्यांना कायद्याप्रमाणे परवानगीची गरज नाही. मात्र त्यांना पाणी पाहिजे, जमीन पाहिजे, कोळशाची उपलब्धता पाहिजे. या राज्यात सोफीया पॉवर कंपनी 2640 मे.वॅ, डीएसआर थर्मल

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.......

पॉवर कंपनी, अमरावती 1320 मे.वॅट, वर्धा पॉवर कंपनी 440 मे.वॅट आणि आय.एस.इंडिया 4300 मे.वॅट एवढया क्षमतेचे प्रकल्प रांगेत उभे आहेत. सोफी पॉवर कंपनी ही इंडिया बुल्स कंपनीची सबसिडीयरी आहे.

सभापती महोदय, एवढी मोठी 30 ते 40 हजार हेक्टर सिंचन क्षमता ओढून काढून देण्याचा प्रयत्न चालू आहे. बरे झाले देशाच्या घटनेमध्ये ती तरतूद आहे. ती तरतूद नसती तर यांनी विदर्भाला लुबाडून, रक्त शोषण करुन टाकले असते. महम्मद गजनीने 18 वेळा स्वारी केली. परंतु या देशातील धन लुटून नेले नाही तेवढे तुम्ही एका वर्षात लुटून नेत आहात असे दादाभाई नौरोजींनी ब्रिटिश राज्यकर्त्यांना सांगितले होते. लुटमारीशिवाय याला दुसरे नाव नाही. शासनाने टाकलेला हा अधिकृत दरोडा आहे. गरिबांच्या घरावर टाकलेला दरोडा आहे. सिंचनाच्या बाबतीत सर्वात गरीब असणारा हा प्रदेश, ज्याने मार खाल्लेला आहे त्या जिल्हयाला दरोडेखोराचा बळी बनविले आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .......

मी एक गोष्ट या निमित्ताने निदर्शनास आणून देत आहे की, हे सभागृह लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी आहे. आम्ही याच विषयाच्या बाबतीत सभागृहात एक लक्षवेधी सूचना दिली होती. त्यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले होते. या विषयाशी संबंधित दोन्ही मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, या विषयाची लक्षवेधी सूचना सभागृहात आली होती परंतु त्यात जे सात-आठ मुद्दे दिलेले होते त्याला एका ओळीचेही उत्तर दिलेले नव्हते, इतकी लाजिरवाणी गोष्ट आहे. परंतु मला त्याच मुद्यांच्या संदर्भात उत्तर मिळाले पाहिजे असा माझाही आग्रह राहील. कारण याच बाबतीत त्या भागात सर्वपक्षीय लोकांनी जबरदस्त आंदोलन सुरु केलेले आहे. या अनुषंगाने जिल्हापरिषदेने एकमताने ठराव केला की शासनाने जे पाऊल टाकले आहे ते मागे घ्यावे. जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीत सुध्दा याच विषयाचा एकमताचा ठराव पारित करण्यात आला, त्यातही त्यांनी सांगितले की, शासनाने टाकलेले चुकीचे पाऊल मागे घ्यावे. अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहारी बँकेने, महानगरपालिकेने देखील अशाच प्रकारे एकमताने ठराव करुन शासनाला चुकीचे पाऊल मागे घेण्याचा इशारा दिलेला आहे. एवढी मोठी धार, एवढा मोठा शासकीय दरोडा आम्हा गरिबांच्या घरावर टाकू नका हे मी लक्षवेधी सूचनेच्या नोटीसमध्ये दिलेले होते, परंतु एका शब्दानेही त्याला उत्तर दिलेले नाही. त्या नोटीशीवर पाच-सात सन्माननीय सदस्यांची नावे आहेत. आम्ही आमच्या नोटीशीमध्ये असे म्हटले होते की, हा जिल्हा सर्वात जास्त अनुशेष असलेला जिल्हा आहे. कारण सन 1982 मध्ये 134 हजार हेक्टरचा अनुशेष असणाऱ्या जिल्ह्यात सन 1994 मध्ये 209 हजार हेक्टर आणि सन 2006 मध्ये 223 हजार हेक्टरचा अनुशेष आहे, त्याला कुठल्याही प्रकारे उत्तर दिले नाही. भारताच्या राष्ट्रपतींनी घटनेतील कलम 371 (2) मधील तरतुदीनुसार "प्रादेशिक असमतोल दूर करण्याची विशेष जबाबदारी राज्यपालांलावर सोपविण्यात येत आहे" अशा प्रकारच्या ऑर्डर्स सन 2001 मध्ये काढल्या, त्यांचे पालन करीत नव्हते. त्यामुळे आम्ही उच्च न्यायालयात गेलो, उच्च न्यायालयाने देखील निदेश दिले की माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश पाळणे राज्यशासनावर बंधनकारक आहे. हे निदेश शासनाने पाळले नाही. पाळत नाही असेही म्हटले नाही परंतु पाळले मात्र नाही हे निश्चित. मग आता उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, "You as a Government have no right to



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख..........

frustrate the directions of the Governor." माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशावर विफल होईल अशा प्रकारची कुठलीही कृती शासनाला करता येत नाही. माननीय राज्यपालांनी सन 2010 पर्यंत जलसिंचनाचा अनुशेष भरुन काढला पाहिजे असे सांगितले. तो शासनाला भरुन काढता आला नाही, हे मी समजू शकतो कारण त्यात पॉझिटिव्ह ॲक्शन तरी असते. परंतु आता तर 3ञ-40 हजार हेक्टर सिंचनाच्या अनुशेषावर दरोडा टाकणे आणि तो अनुशेष वाढविणे ही निदेशाच्या विरोधातलीच कृती आहे. कायद्याने वास्तविक ते घेण्याचा अधिकार शासनालाही नाही. जे जे विषय आम्ही लक्षवेधी सूचनेत अंतर्भूत केले होते त्याला उत्तर देणे म्हणजे लाजेने मान खाली घालण्यासारखे असल्यामुळे उत्तर दिले नाही. कदाचित शासनाने ठरविले असेल की, माननीय राज्यपाल काहीही करतील, आम्ही राज्य करतो. आम्ही राज्य करु आणि तुमची पिळवणूक करु पण तसे म्हटले नाही, कारण ते म्हणण्याची या शासनाची लायकी नाही. सन 1965 सालात या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, परंतु आजपर्यंतही तो पूर्ण झालेला नाही. आणि 50-60 वर्षानंतर आम्हाला 50 हजार हेक्टरची सिंचन क्षमता मिळाली ती देखील हिसकावून घेण्याचा प्रकार शासन करीत आहे. या ठिकाणी दोन महत्वाच्या बाबींचा उल्लेख मुद्दाम करु इच्छितो की, आपल्या गावाजवळ वीज मिळेल अशा प्रकारचा भ्रम शासनाच्या काही लोकांनी पसरविला. परंतु कालच विधानसभेचे प्रोसिडींग मी वाचले त्यावरुन समजले की, खाजगी कंपनी अशा प्रकारे दान-धर्म करायला बसलेली नाही. कारण यातून जी वीज निर्माण होईल त्याचा भाव ती कंपनी ठरविणार आणि राज्याला सुध्दा वीज दिली पाहिजे असे तिच्यावर बंधन नाही. ट्रान्समिशन लॉसेसमध्ये ते काही तरी शासनाला देतील हा भाग वेगळा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात काल लक्षवेधी सूचना होती परंतु त्या लक्षवेधी सूचनेचे उत्तर शासनाकडून देण्यात न आल्यामुळे ही लक्ष वेधी सूचना राखून ठेवावी लागली. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात आपण जेव्हा केव्हा उत्तर द्याल तेव्हा ते गोलमालच द्याल. या ठिकाणी या विषयावर चर्चा होत असतांना इतिहासामध्ये आपले नाव काळया अक्षराने लिहिले जाईल याची आपण कृपया व्यवस्था करु नका. इतिहासामध्ये आपले नाव काळया अक्षराने लिहिले जाणार नाही यासाठी काही तरी व्यवस्था करा.

सभापती महोदय, अनुशेष दूर करणे म्हणजे नेमके काय? ज्यांनी 92 टक्के सिंचन क्षमता मिळवली त्यांच्याजवळ जाणे असा अर्थ होत नाही तर राज्याच्या सिंचनक्षमतेच्या सरासरीवर जाणे, जे भाग सिंचन क्षमतेच्या सरासरीपेक्षा खाली आहेत त्यांना सिंचनाच्या सरासरीवर आणणे असा अनुशेषाचा अर्थ आहे. आपल्याला विदर्भाला 15-20 वर्षात सिंचनाच्या संदर्भात सरासरीवर आणता आले नाही. विदर्भातील लोकांना सर्वात दु:ख देणारा असा कोणता प्रकार असेल तर तो वाढलेला अनुशेष आहे. राज्यकर्त्यांनी याची नोंद घेतली पाहिजे. विदर्भाच्या बाबतीत तुमच्या मनात अतिशय आकस असेल तर तुम्ही विदर्भातील लोकांना गॅस चेंबरमध्ये टाकून मारा परंतु त्यांचे पाणी काढून घेऊ नका एवढेच मला या निमित्ताने म्हणावयाचे आहे. अमरावती जिल्हा सिंचनाच्या संदर्भात अतिशय टोकावर आलेला आहे. अमरावती जिल्हापरिषदेमधील सर्वपक्षीय सदस्यांनी एकमताने सिंचनाच्या संदर्भात ठराव केलेला आहे. त्यामुळे विदर्भाच्या सिंचनाच्या संदर्भात आपण जे पाऊल पुढे टाकले आहे ते पाऊल मागे घ्या. या ठिकाणी ज्या चार कंपन्या आहेत त्यांना सांगा की, माननीय राज्यपाल महोदयांच्या विरोधात आम्ही काम करणार नाही, घटनेच्या विरोधात आम्ही काम करणार नाही, 371(2) च्या विरोधात आम्ही काम करणार नाही. या चार प्रकल्पांना भारतात पुष्कळ ठिकाणी जागा आहे. त्यांना हे सांगा की, या ठिकाणच्या लाजिरवाण्या कामामध्ये तुम्ही सहभागी होऊ नका, या ठिकाणच्या कामामध्ये येथील जनता सहभागी होऊ देणार नाही. याचे कारण त्या लोकांना आता पाणी मिळालेले आहे. माननीय बाळासाहेब तुमच्या पक्षाच्या तेथील आमदारांने सांगितले आहे की, जो कोणी येथे येईल "त्याच्या नरडीचा घोट घेऊ, त्याला जमिनीत दाबून टाकू." त्या सन्माननीय सदस्यांनी जे वाक्य उच्चारले आहे ते वाक्य मी येथे जसेच्या तसे बोलून

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...

दाखवले आहे. यासंदर्भात शब्दांचे फरक असतील परंतु आमची सुध्दा तीच भावना आहे. चूकीच्या पावलापासून माघार घ्या आणि इश्वराला प्रार्थना करा की, महाराष्ट्र एक राहण्याच्या कामामध्ये जे कृत्य केलेले आहे ते काही क्षणाच्या आत आम्ही मागे घेऊ. आपण काय करु नये हे सांगण्याची पाळी माझ्यावर यावी याबद्दल मी मनापासून खेद व्यक्त करतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये माननीय विरोधीपक्ष नेत्यांनी शेतक-यांच्या संदर्भात जो प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. सगळयानी एक होऊन अंतरमुख होऊन एका गंभीर गोष्टी बद्दल विचार करण्याची आता वेळ आलेली आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्या बंद करण्यासाठी केंद्राचे तसेच महाराष्ट्राचे पॅकेज जाहीर झाले परंतु पॅकेज जाहीर होऊन सुध्दा विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या काही बंद झाल्या नाहीत. पॅकेज दिल्यानंतरही आत्महत्या थांबल्या नाहीत त्यामुळे याची आपल्या सर्वांना लाज वाटली पाहिजे. शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी, आत्महत्या बंद करण्यासाठी जे पॅकेज आले परंतु तरीही आत्महत्या बंद होत नाही यामागे नेमके काय कारण आहे? मला या ठिकाणी खेदाने म्हणावेसे वाटते की, "रोग रेडयाला आणि इंजक्शन पखालीला." यामुळे रेडयाची परिस्थिती सुधारण्याची सुतराम शक्यता नाही. त्याच पध्दतीने ज्या कारणासाठी शेतकरी आत्महत्या करीत आहेत तीच गोष्ट तुम्ही करणार नसाल तर कितीही पॅकेज आणले तरी या भागातील आत्हत्या थांबण्याची सुतराम शक्यता नाही. विदर्भ आणि मराठवाडयात कोणकोणती पिके घेतली जातात? विदर्भ आणि मराठवाडयात कापूस, सोयाबीन, धान, संत्रा अशी पीके मोठया प्रमाणात घेतली जातात. विदर्भामध्ये जे धान उत्पादक शेतकरी आहेत त्यांच्याकडून धानाची लेव्ही घेतली जाते. लंगोटीवाल्या माणसाकडून मुंबईतील फाईव्ह स्टार हॉटेलमधील माणसाला कमी पैशामध्ये तांदूळ दे म्हणण्याची वेळ या शासनाने आणलेली आहे. आतापर्यंत धानाची 30 टक्के लेव्ही घेतली जात होती परंतु आता या लेव्हीमध्ये वाढ करुन ती 50 टक्के करण्यात आलेली आहे. धानावर लेव्ही लावणे म्हणजे लंगोटीवाल्याकडून मुंबईतील आम्बानीला जेऊ घालण्यासाठी काही तरी भीक वाढ म्हणण्यासारखे आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

धान उत्पादक शेतकऱ्यांवर सरकारने लेव्ही लावली आहे. शासन शेतकऱ्यांना लेव्ही म्हणून गाडी देणार आहे काय ? शेतकऱ्यांकडे औषधोपचार करण्यासाठी पैसे नसतात. जर त्याच्या मुलाला साप चावला तर तो औषधाअभावी तडफडून मरतो. त्याच्या मुलाला कॅन्सर झाला तर मुंबईत औषधोपचारासाठी आणल्यानंतर त्यास हॉस्पीटलच्या पायऱ्यांवर झोपावे लागते. अशी परिस्थिती असताना धान उत्पादक शेतकऱ्यांना औषध म्हणून लेव्ही दिली जाते. एका बाजूला फाटक्या धान उत्पादक शेतकऱ्यांवर लेव्ही लावली जात आहे तर दुसऱ्या बाजूला आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत असे सरकार सांगत आहे. या सरकारने शेतकऱ्यांच्या नरडेला सुरा लावलेला आहे.

सभापती महोदय, आपणास शंभर वर्षापूर्वीची गोष्ट सांगतो. पूर्वी तीन पोती धान्य आले म्हणजे चांगले पीक आले असे समजले जात होते. ती पध्दत आजही सुरु आहे. अजूनही जुन्या पध्दतीने आणेवारी काढणे सुरु आहे. या पध्दतीमध्ये सरकार केव्हा बदल करणार आहे ?

सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी तालुक्यात दिनांक 24 ऑक्टोबर, 2008 रोजी धान उत्पादक शेतकऱ्यांनी मोर्चा काढला होता. या मोर्चामध्ये जवळपास पाच हजार शेतकरी होते. या सर्व शेतकऱ्यांनी डोक्यावर धानाचे भारे घेतले होते. जे धानाचे भारे घेतले होते त्याच्या आतमध्ये धान नव्हते. जे काही धान होते त्यास भाव नव्हता. हे कमी म्हणून की काय सरकारने त्यावर लेव्ही लावली होती. मागील 60 वर्षापासून कॉंग्रेस सरकार आहे. आता केंद्रातील कृषी मंत्री महाराष्ट्राचे आहेत. परंतु अजूनही शेतकऱ्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत.

सभापती महोदय, मी आपणास एक महत्वाची गोष्ट सांगतो. मी काही दिवसांपूर्वी पश्चिम महाराष्ट्रात गेलो होतो. त्याठिकाणी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीची तीन-चार मजली काचेची इमारत पाहिली. आमच्या भागात सुध्दा विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे कार्यालय आहे. परंतु त्या कार्यालयासाठी जागा नाही, तेव्हा इमारत असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याठिकाणी काचेची इमारत असण्याचे कारण म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात ऊस पिकविला जातो आणि ऊसाचे टर्न ओव्हर चांगले आहे. आमचा धान उत्पादक शेतकरी कर्ज घ्यायला कुठे जात नाही आणि त्याने कर्ज घेतले तर तो फेडण्यासाठी राहत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

सभापती महोदय, वर्षातून एकदा विदर्भात अधिवेशन होते. विदर्भातील शेतकऱ्यांचा प्रश्न गंभीर झालेला आहे. मी 30 वर्षे शेती केलेला कार्यकर्ता आहे. मला शेतकऱ्यांच्या प्रश्नाची चांगली जाणीव आहे. असे असताना शेतकऱ्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आपण मला फक्त पाच मिनिटे दिलेली आहेत. आपणास विदर्भातील शेतकऱ्यांच्या प्रश्नासंदर्भात चर्चा करावयाची नसेल तर विदर्भात अधिवेशन घेऊ नका. मुंबईत अधिवेशन घ्यावे. मी आपल्यामार्फत सरकारला सांगू इच्छितो की, अजून शेतकऱ्यांचा अंत पाहू नका. अन्यथा तो नरडीचा घोट घेतल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, आज संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची काय परिस्थिती आहे ते सांगतो. मी चांदूर रेल्वे तालुक्यातील माझ्या मित्राकडे गेलो होतो. धरातील मालकीचे सोने विकून तो आपली संत्र्यांची बाग वाचविण्याचा प्रयत्न करीत होता. या वर्षी पाण्याचा दुष्काळ असल्यामुळे तेथील शेतकरी संत्रा बाग वाचविण्यासाठी तीन-चार कि.मी. अंतरावरुन पाणी आणत आहेत.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.शिगम 14.45

श्री.पाशा पटेल....

चार एकराची संत्र्याची बाग जर जगवावयाची असेल तर तीन लाख रुपयांची पाईप लाईन माझ्या सहक-याने टाकली होती. त्याने मला असे सांगितले की , आंब्या मोहर आला परंतु तो गळून गेला आता दुसरा मोहर येणार आहे. परंतु हा मोहरसुध्दा फार खतरनाक असतो. ज्याप्रमाणे बाळांतिणीच्या पोटात मूल अडकले तर ते मूल आईला मारुन टाकते त्याप्रमाणे संत्र्याला जो नवीन बहार येणार आहे त्याला जर पाणी मिळाले नाहीतर तो बहार वाळत नाही तर संपूर्ण झाडालाच वाळवत असतो अशा प्रकारची परिस्थिती आता निर्माण झाली आहे. पाणी नसल्यामुळे ही झाडे वाळून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. माझ्या सहका-याने मला सांगितले की, पाच ते सात वर्षे कष्ट करुन ही बाग उभी केली होती परतु संत्र्याच्या झाडाला फळ येण्या अगोदरच डिंक्या रोग आला होता तो रोग इतका खतरनाक आहे की त्यांमुळे संपूर्ण झाडच वाळू लागले आहे. 30 ते 40 वर्षे टिकणारी बाग पंधरा वर्षाच्या आतच आताच जळू लागली आहे. राज्य सरकारचे प्रयत्न काय चालू आहेत ? राज्य सरकारकडून अत्यंत तुटपूंजे प्रयत्न चालू आहेत. मी आपल्या माध्यमातून राज्य सरकारला सांगू इच्छितो की , एका दिवसात संत्र्यांची झाडे वाढत नाहीत तर 30 ते 40 वर्षाची ही झाडे असतात. तेव्हा राज्य सरकार तुटपुंजे प्रयत्न का करीत आहे ? काही ठिकाणी तर मोठया प्रमाणावर मदत दिली जाते .तेव्हा या रोगावर नियंत्रण आणण्यासाठी अमर्याद जे काही करावे लागेल ते शासनाने केले पाहिजे. असे मला शासनाला सागावयाचे आहे. संत्र्याची बाग वाचविण्यासाठी पाईप लाईन टाकण्याची गरज शेतक-यांना आहे. पाईप लाईन टाकण्यासाठी 50 टक्के सबसिडी दिली जाते परंतु बाजारातील पाईपचे भाव आणि सबसिडी मिळण्याकरता शासनाने ठरवून दिलले भाव याचा मेळ घातला तर प्रत्यक्षात 25 टक्के सबसिडी मिळत आहे. त्यामुळे शतकरी असे म्हणत आहेत की सूक्ष्म ठिबक सिंचना शिवाय दुसरा पर्यायच आमच्या समोर राहिलेला नाही. विदर्भातील सर्व संत्रा बागायतदाराची सरकारकडून अशी अपेक्षा आहे की, किमान 90 टक्के सबसिडी या संत्राच्या बागांना देण्यात यावी त्यामुळे ठिबक सिंचन करता येईल. त्यामुळे आमच्या बागा वाचतील. त्याची ही अपेक्षा काहीही चुकीची नाही.

( वेळ संपल्याची बेल वाजविण्यात येते )

सभापती महोदय, सबसिडी देत असताना वेगवेगळया प्रकारच्या नियमांचे अडथळे आणून त्यांचा जीव घेण्याचे पाप शासनाकडून व्हावयास लागले आहे . म्हणून या चर्चेच्या निमित्ताने मी

2..

श्री.पाशा पटेल....

शासनाला सांगू इच्छितो की, संत्र्याच्या बागा वाचवावयाच्या असतील, संत्र्याच्या शेतक-यांना वाचवावयाचे असेल तर पाईप लाईन खरेदीसाठी त्यांना 90 टक्के सबसिडी देण्यात यावी. एवढेच नाही तर दहा ते बारा किलोमिटर्स अंतरावरुन पाईप टाकून त्यांना पाणी आणावे लागत असल्यामुळे एक वर्षासाठी हे नियम शिथिल करण्यात आले पाहिजेत. पाईप लाईन टाकण्यासाठी बॅन्केकडून कर्ज देण्यात आले पाहिजे. शे्तक-यांनी केलेले प्रयत्न यशस्वी होतील वा होणारही नाहीत परंतु जर त्यांना प्रयत्न करुन दिले नाही तर ते आत्महत्या केल्याशिवाय राहणार नाहीत अशी या संत्रा उत्पादक शें्तक-यांची स्थिती आहे

सभापती महोदय , यानतर मला कापसाच्या संदर्भात बोलावयाचे आहे. गेल्या अधिवेशनात कापसाच्या बाबबीत येथे चर्चा झाली होती. अमरावती जिल्हयात कापसाच्या खरेदीच्या संदर्भात आंदोलन झाले होते, त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता व त्यात काही शेतकरी मरण पावले होते. कापूस संकलन केन्द्रावर मोठया प्रमाणावर कापूस आला होता परंतु कापूस मोजण्यासाठी वजन काटे कमी असल्याने कापसाचे वजन वेळेवर होत नव्हते.त्यामुळे शेतक-यांनी आदोलन केले होते. त्यांनी आंदोलन केले म्हणून त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला होता त्यामुळे काही शेतकरी मरण पावले.यासंबंधी सभागृहात चर्चा झाली असतांना माननीय पणन मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी असे उत्तर दिले की, पुढच्या वर्षी जास्त वजन काटे देण्यात येतील त्याप्रमाणे यावर्षी वजन काटे वाढवून देण्यात आलेले नाहीच उलट कापूस खरेदी करण्यासाठी केन्द्रच सुरु करण्यात आलेली नाहीत. अशा प्रकारे या सरकारचे वागणे आहे लोकांना या गोष्टी कळत नाहीत. असे शासनाला वाटते काय ? लोक गरीब असल्यामुळे त्यांना या गोष्टी कळण्यास थ्रोडा उशीर लागेल परतु एकदा या गोष्टी लोकांना कळल्या तर पुन्हा 100 वर्ष ते तुम्हाला खूर्चीच्या जवळ येऊ देणार नाहीत. कापसाच्या पेरण्या तीन तीन वेळा झाल्या तरीही या शेतक-यांच्या हातात फक्त एकरी एक ते दोन क्विंटल कापूस लागला. कापसाचा भाव 3000 रुपये प्रतिक्विंटल असा जाहीर करण्यात आला होता. बाजारात 2500 रुपये भावाने कापसाची खरेदी सुरु आहे. कापसाच्या खरेदीच्या बाबतीत स्पर्धा करण्यात आली नाही.वास्तविक शासनाने खरेदीत उतरावयास पाहिजे होते, त्याचबरोबर व्यापा-यांनाही उतरावयास सांगावयास पाहिजे होते

3..



VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.शिगम 14.45

श्री.पाशा पटेल....

तसे झाले असते तर स्पर्धा होऊन कापसाचे दर वाढले असते. परंतु तसे न करता लांडग्याच्या तोंडात शेतक-यांना द्यावयाचे पाप या शासनाने केलेले आहे. सगळयांना मोकळे सोडून सरकार मात्र घरात बसलेले आहे..

( वेळ संपल्याची बेल वाजविण्यात येते )

सभापती महोदय , मला बोलण्यास पुरेसा वेळ देण्यात यावा. गेल्या दोन दिवसापासून विदर्भातील प्रत्येक पीक घेणा-या शेतक-यांच्या घरात जाऊन आलो आहे. बेल वाजवून मला अडविण्यात येऊ नये. मला बोलू द्यावे. मला जर बोलू दिले नाही तर ज्याप्रमाणे शेतकरी आत्महत्या करावयास लागले आहेत त्याप्रमाणे या ठिकाणच्या टेबलावर डोके फोडून माझा जर मृत्यू झाला तर त्याची जबाबदारी सर्व सभागृहावर राहील.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ श्री. गायकवाड नंतर --- 14:50

श्री.पाशा पटेल ...

तेव्हा कृपा करून माझी आपल्याला विनंती आहे की, मला ज्या पिकांबाबत बोलायचे आहे ते बोलू द्यावे. माझ्या भावनांचा अंत पाहू नका. मी त्या शेतकऱ्यांची परिस्थिती आज काय आहे ते स्वत: पाहिलेले आहे, तेव्हा आपण मला बोलू द्यावे.

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : मी सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना सांगू इच्छितो की, त्यांना भाषणासाठी जेवढा वेळ दिलेला आहे त्या वेळेच्या मर्यादेतच त्यांना बोलावे लागेल. श्री.पाशा पटेल यांना भाषणासाठी 13 मिनिटे दिलेली आहत. तेव्हा त्यांना त्या वेळेत जे काही मांडावयाचे असेल, जे काही बोलावयाचे असेल ते त्यांनी मांडावे. मात्र त्यांनी अशा प्रकारचे बोलणे बरोबर होणार नाही.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी आपली माफी मागतो. पण ज्याचे जळते आहे त्यालाच त्याच्या वेदना कळतात म्हणून मी असे बोलू लागलो आहे. ...

श्री. नवाब मलिक : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये भाषण करताना सन्माननीय सदस्यांना काही नियम पाळावे लागतात. त्या नियमानुसारच त्यांना वेळेच्या मर्यादेत बोलावे लागत असते. असे असतानाही सदस्यांनी मला बोलू दिले नाही तर मी येथे आत्महत्या करीन, डोके आपटून घेईन असे म्हणणे योग्य होणार नाही. ते सारे सभागृहाच्या रेकॉर्डवर येते आहे. तेव्हा नियमानुसार हे सभागृह चालत असते त्यामुळे सन्माननीय सदस्यांनाही त्यानुसार चालावे लागणार आहे, याचे भान त्यांनी ठेवले पाहिजे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी एवढेच सांगेन की, त्यांने लवकरात लवकर आपले मुद्दे त्यांना दिलेल्या वेळेच्या मर्यादेत मांडावेत.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी विषय सोडून एक शब्द बोललो तरी आपण मला वाटेल ती शिक्षा द्या. मी आता जे काही बोललो ते भावनावेगामध्ये बोललो आहे. आपण माझ्या भावना समजून घ्याव्यात. सभापती महोदय, कापसाचे काय झाले आहे ? कापसामध्ये ज्याचे सारे आयुष्य केले आहे अशा एका कार्यकर्त्याच्या घरी, वर्ध्यामध्ये मी परवा गेलो होतो. पण तेथील एकूण परिस्थिती पाहून मी रात्रभर झोपू शकलो नाही. त्यानंतर सकाळी सकाळी माननीय कृषी मंत्र्यांची भेट झाली. त्यांनी सांगितले की, कापूस गेला, सोयाबिन देखील गेले. ज्या जिल्ह्यात मोठे मोठे नेते आहेत त्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदत मिळते. पण आमच्या जिल्ह्यात एकही मोठा नेता नाही

..... यूयू 2 ...

26-12-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) UU 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल ...

त्यामुळे आमच्याकडील शेतकऱ्यांना मदत मिळत नाही. असे तेथील शेतकरी आपले गाऱ्हाणे माझ्याकडे मांडत होते. लातूर, उस्मानाबाद मध्ये सोयाबिनला भाव मिळाला. त्यांनी काय मागितले? आम्हाला सरसकट 3 हजार रूपये भाव द्यावा. कारण कापूस आणि सोयाबीनचे पीक देखील गेले आहे. आज कापसाच्या बाबतीत परिस्थिती काय आहे ? चार-चार, पाच-पाच दिवस शेतकऱ्यांना कापूस देण्यासाठी रांगा लावाव्या लागत आहेत. दोन-दोन, तीन-तीन वेळा त्यांच्या पेरण्या झाल्या आहेत. त्यावर रोग पडला. त्यातच पाणी नाही. म्हणून कापसाच्या शेतकऱ्यासाठी सरकारला आपला हात थोडा ढिला ठेवून मदत करावी लागणार आहे. सभापती महोदय, बऱ्याच भागामध्ये हरभऱ्याचे पीक घेतल जाते. पण तुम्ही या सर्व डाळ वर्गीय पिकांची माती केली आहे. देशातील कोठल्याही डाळीची निर्यात करायची नाही असे फर्मान आपण काढले आहे. आता शेतकऱ्याच्या हातून सोयाबीन गेले, कापूस गेला. म्हणून शेतकऱ्यांनी हरभरा पेरला आहे. ज्यावेळेस शेतकऱ्यांनी हरभरा पेरला त्यावेळेस हरभऱ्याचा भाव होता 2900 रूपये आणि आता त्याचा भाव फक्त 1900 रूपयांवर आलेला आहे. म्हणज हरभरा देखील शेतकऱ्यांच्या हातून जातो आहे. हरभरा, तूर या डाळींच्या बाबतीत हेच झालेले आहे. मग शेतकऱ्यांनी जावे कोठे ? शेतकऱ्यांची नरडी दाबण्याचे पाप कशासाठी तुम्ही करीत आहात ? सभापती महोदय, काही भागामध्ये सूर्यफूलाचे पिक घेण्यात येते. त्याची काय अवस्था आहे ? सूर्यफुलाला हमीभाव 2250 रूपये इतका हाता. पण आता त्याचे 800 रूपये मिळू लागले आहेत. सभापती महोदय, सगळ्यात मेजर पीक शेतकऱ्यांच्या दृष्टीने सोयाबीनचे आहे. पण जेव्हा शेतकऱ्यांच्या घरामध्ये सोयाबीन नव्हते, बाजारात सोयाबीन आलेले नव्हते तेव्हा सोयाबीनला2800 ते 3000 रूपये भाव होता परंतु आता तो भाव 1300 रूपयांपर्यंत खाली आला आहे. आता ही किमया कशी काय झाली ? या बाबतीत माझ्याकडील आकडेवाडी मी आपल्याला देतो. नोव्हेंबर 2007 मध्ये सोयाबीन 5 लाख 60 हजार, डिसेंबरमध्ये 6 लाख 33 हजार, जानेवारीमध्ये 9 हजार, फेब्रुवारीमध्ये 4 लाख, मार्च मध्ये 7 लाख, एप्रिलमध्ये 5 लाख, मे मध्ये 2 लाख आणि जून मध्य 10 लाख. म्हणजे जसजशी सोयाबीन पेरायची वेळ जवळजवळ आली तशी या देशात परदेशातून तेल मागविण्याची स्पर्धा लागली. जूनमध्ये 10.14 लाख, जुलै 10.66 लाख, ऑगस्ट मध्ये 10.61 लाख, सप्टेंबर मध्ये 10.57 लाख असे तेल मागविले गेले. तेल नव्हते म्हणून बाहेरून तेल आणण्यात आले आणि येथील तेलबियांच्या पिकांची माती केली. .. (....व्हीव्ही 1 ....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

आपण सोयाबीनच्या तेलावर 20 टक्के टॅक्स लावण्याचे कारण काय? याचे कारण म्हणजे मध्यप्रदेश राज्यामध्ये विधानसभेच्या निवडणुका होणार होत्या, आणि आपल्या सरकारला निवडणूक जिंकायची होती. या देशामध्ये तयार होणाऱ्या सोयाबीनच्या तेलावर आपण 20 टक्के कर लावला. परदेशातून येणाऱ्या पामतेलावर आपण कर लावला नाही. या देशामध्ये सोयाबीनचे तेल पाडले जाते, पामतेल पाडले जात नाही. यामध्ये कच्चे आणि रिफाईंड असे दोन प्रकारचे तेल आहे. कच्च्या तेलावर कर लावला जात नाही, रिफाईड तेलावर कर लावला जातो. परंतु आपण पामतेलावर आयात कर लावला नाही. सभापती महोदय, या देशामध्ये अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार होते. त्यावेळी देशात 75 टक्के आयात कर होता. आपल्या पक्षाचे सरकार केंद्रामध्ये व राज्यामध्ये आल्यानंतर त्यांनी 45 टक्के आयात कर केला आणि आता मात्र शून्य टक्के आयात कर आहे. याचे कारण असे सांगितले जाते की, तेलाचा महागाई निर्देशांक काढला जातो त्यानंतर तेल निर्यात करावयाचे की नाही हे ठरविले जाते. या देशामध्ये तेलाचा निर्देशांक जास्त काढण्यासाठी काय पाप केले जाते? करडईचे तेल हे सोयाबीनच्या तेलामध्ये मिसळले जाते. करडईच्या तेलाचे पिक थोडे येते, परंतु त्याचा भाव तिप्पट असतो. ते तेल खायला चांगले असते. परंतु त्या तेलाची माती करुन टाकण्याचे काम या राज्यामध्ये केले जाते. म्हणून माझी विनंती आहे की,

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी आपले भाषण एक मिनिटात संपवावे...

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, माझे भाषण एक मिनिटामध्ये पूर्ण होणार नाही. मला आणखी 5 मिनिटांचा वेळ देण्यात यावा.

**तालिका सभापती** : आपण जर भाषण संपविले नाही तर मी माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना भाषण करण्यास परवानगी देईन.

श्री. पाशा पटेल :सभापती महोदय, मी फक्त महत्वाचे ठळक मुद्दे वाचून दाखवितो आणि माझे भाषण संपवितो. सभापती महोदय, गव्हाची परिस्थिती काय आहे? गेल्या वर्षी ज्याच्या शेतामध्ये 100 पोती गहू तयार झाला त्याच्या शेतात यावर्षी 2 पोती सुध्दा गहू तयार झालेला नाही. तसेच, मिरचीबाबत विचारले असता, नरखेडची मिरची तिकडे डुबली. गेल्या वर्षी मिरचीचा भाव 700 क्विंटल होता यावर्षी हजार ते अकराशे रुपये भाव असतांना मिरची हाताला लागली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पाशा पटेल.....

सभापती महोदय, त्याचप्रमाणे वीजेच्या भारनियमनाचा प्रश्न महत्वाचा आहे. विदर्भामध्ये वीज निर्माण होते. विदर्भामध्ये चांगल्या चांगल्या गोष्टी आहेत. महाराष्ट्रात सर्वात जास्त व चांगले जंगल विदर्भात आहे, जंगली जनावरे आहेत. या जंगली जनावरांचा शेतकऱ्यांना त्रास होत आहे. जर चुकून माकून शेतकऱ्याच्या हातामध्ये पीक आले तर ही जंगली जनावरे पीक खाऊन टाकतात. विदर्भामधील शेतकऱ्यांना फक्त सात तास वीज मिळते. या शेतकऱ्याची अपेक्षा आहे की, त्याच्या गावामध्ये आपण सिंगल फेजिंग केले आहे, त्याप्रमाणे त्याच्या शेतामध्ये करावे. किमान त्याला पाणी देण्याचे राहू द्या, या जंगली जनावरांना हाकलण्यासाठी तरी रात्री अंधारामध्ये आपले शेत राखण्यासाठी त्याला उजेड द्या अशी त्यांची मागणी आहे.

सभापती महोदय, स्वामिनाथन समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. त्या अहवालामध्ये काय सांगितले आहे? आत्महत्त्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा सखोल अभ्यास करुन केंद्र सरकारला ज्यांनी अहवाल सादर केला. त्या स्वामिनाथन समितीने आपल्या अहवालात सांगितले आहे की, "देशामध्ये अन्नधान्य विपुल प्रमाणात हवे असेल, उत्पादनवाढ हवी असेल किंवा देशाची अन्नधान्य सुरक्षा भक्कम करावयाची असेल तर देशातील शेतकऱ्याच्या शेतमालाला योग्य किंमत दिल्याशिवाय दुसरा पर्याय नाही." ही मुख्य गोष्ट सोडून बाकीच्या गोष्टींवर भर दिला जात आहे. सभापती महोदय, मी आपणास एकच महत्वाची गोष्ट सांगतो. आपणास आता सर्वात महत्वाचे काय करावे लागणार आहे? कापूस पिकविणाऱ्या, सोयाबीन पिकविणाऱ्या आणि इतर तेलबियांचे उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना वाचवावयाचे असेल तर एक गोष्ट केली पाहिजे की, परदेशातून येणाऱ्या तेलावर आयात कर लावला पाहिजे. जगातील सर्व तेलबियांची परिस्थिती मी आपणासमोर सांगणार आहे. ब्राझिल, अर्जेंटीनामध्ये 10 कोटी टन तेलबियाचे पीक घेतले जाते. त्याची फेब्रुवारीमध्ये रास होणार आहे. त्याचप्रमाणे दुसऱ्या क्रमांकाने अमेरिकामध्ये 8 कोटी टन तेलबियाचे उत्पादन होते. आपल्या भारतामध्ये 80 ते 85 लाख टन पिकविले जाते. त्यापैकी महाराष्ट्रामध्ये फक्त 28 लाख टन तेलबियांचे उत्पादन पिकविले जाते.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

परदेशातून माल आणला तर भाव पडतील आणि पिकाचे दर स्थिर राहणार नाहीत.

**तालिका सभापती** ( श्री. रामनाथ मोते ) : सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी कृपया खाली बसावे. यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे बोलतील.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी फक्त शासनाकडे मागण्या करणार आहे. विदर्भातील शेतकऱ्यांना असे मरु द्यावयाचे नसेल तर शेतकऱ्यांना एकरी तीन हजार रुपये मदत द्यावी. 50 हजार रुपये कर्जमाफी करतो असे सांगण्यात आले होते. किमान विदर्भातील शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांपर्यंत कर्जमाफी द्यावी. ठिबक सिंचनासाठी 90 टक्के सबसिडी द्यावी. शेतातील मजुरांची मजुरी उत्पादन खर्चात वाढवावी. आणेवारीची पध्दत बदलावी. केंद्र सरकारवर दबाव आणून आयात शुल्क वाढवावे. धानाला 1200 रुपये भाव द्यावा. लेव्ही पूर्णपणे रद्द करावी. खरेदी केंद्रे वाढवावीत. डाळीवरची निर्यात बंदी उठवावी. सगळ्यात महत्वाचा मुद्दा असा की, प्रत्येकाच्या हाताला काम आणि पंधरा दिवसात दाम अशी व्यवस्था करावी. आता कामही नाही आणि दामही नाही. येथील शेतकऱ्यांना आणि मजुरांना वाचवावयाचे असेल तर रोजगार हमी योजनेची कामे सुरु करावीत. एवढ्या गोष्टी जर केल्या तर विदर्भातील शेतकरी वाचण्याची शक्यता आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, या भागातील शेतकऱ्यांना वाचवावे. या वेळी अस्मानी आणि सुलतानी अशी दोन्ही संकटे आलेली आहेत. त्या संकटातून शेतकऱ्यांना वाचवावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांचे भाषण पूर्ण झाल्यामुळे ते आत्महत्या करणार नाहीत. आपण एका सन्माननीय सदस्याची आत्महत्या वाचवली याचे मला समाधान आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि शेती मालाला भाव मिळण्यासंबंधीच्या गंभीर प्रस्तावावर या सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या प्रस्तावावर आपले विचार मांडलेले आहेत. दुर्दैवाने हे नागपूर अधिवेशन सुरु झाल्यापासून 16 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्याची संपूर्ण यादी मी पटलावर ठेवते. दैनिक देशोन्नतीमध्ये बातमी आली आहे की, या अधिवेशन काळामध्ये न्यायाची वाट बघत असताना अजून 16 शेतकऱ्याची कुटुंबे निराधार झालेली आहेत. त्यांना कोणताही दिलासा आपण देऊ शकलो नाही याबद्दल आमदार या नात्याने आपली जेवढी शरमेने मान जाईल तेवढी कमीच आहे. अशा पध्दतीची सुध्दा ही एक सामुहिक जबाबदारी आहे. याकडे मला आपले प्रथम लक्ष वेधावेसे वाटते. कर्जमाफीच्या घोषणेनंतर देखील 1 हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत आणि धक्कादायक गोष्ट अशी की, त्यापैकी 624 शेतकरी मदतीस अपात्र ठरलेले आहेत. त्यांना खाजगी सावकारांनी सुध्दा कर्ज दिलेले नाही. मार्चच्या अधिवेशनामध्ये जादूगार जसा त्याच्या पोतडीतून एक वस्तू दिल्यानंतर दुसरी वस्तू बाहेर काढतो त्याप्रमाणे शासनाकडे आपण मागण्या केल्यानंतर प्रत्येक अधिवेशनात शासन आपल्या पोतडीतून एक अहवाल बाहेर काढते. तसे गेल्या अधिवेशनामध्ये अगदी अधिवेशन संपता संपता डॉ. नरेंद्र जाधव समितीचा अहवाल बाहेर येणार अशी घोषणा झाली. परंतु प्रत्यक्षात आत्महत्येची संख्या किती याच्या वादामध्येच डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अनेक मुलाखती खर्ची पडल्या. आत्महत्या आहेत तेथेच राहिलेल्या आपल्याला दिसल्या.शेतीमालाला योग्य भाव मिळत नाही. अवजारे निकृष्ट दर्जाची आहेत आणि त्यातून या वर्षी 65 टक्के कमी पाऊस पडलेला आहे. अशा वेळी कर्ज माफीची योजना केली खरी परंतु त्या कर्जमाफीचे निकष योग्य नव्हते हे आता उदाहरणांनी स्पष्ट होत आहे. विधिमंडळामध्ये अनेक सूचना देऊन देखील कर्ज माफीचे जे निकष लावले गेले त्यामध्ये विभागनिहाय कर्जमाफी पाहिली तर पश्चिम महाराष्ट्राला जास्त फायदा मिळाला. विदर्भ, मराठवाडा या विभागांना त्यामानाने कमी फायदा मिळाला. मराठवाड्याचा आकडा जास्त दिसत असला तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे ....

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र अशा अनेक ठिकाणी शेतकरी आज आत्महत्या करीत आहेत हे चित्र आपल्याला सातत्याने दिसते. मला एका गंभीर बाबीकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे. काही नवीन घोषणा होत असताना भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी दिलेला अहवाल 26 एप्रिलला आपल्या सदनासमोर मांडण्यात आला. त्यामध्ये असे म्हटले आहे की, 40 टक्के शेतकऱ्यांपर्यंत पंतप्रधान पॅकेज आणि राज्य सरकारच्या मदतीची माहिती देखील पोहोचली नव्हती. सन 2006-2007 च्या दरम्यान जलसिंचन पाणलोट मीशन यासाठी असणारे जे बजेट होते त्यातील 16 टक्केच बजेट खर्च झाले होते. त्याचबरोबर केंद्राचे घोषित पॅकेज 239 कोटी रुपयांची फुगवून सांगण्यात आले होते.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

महसूल विभागाला जे तणावग्रस्त मुद्दे दिसत होते ते पॅकेज ठरविताना लाभार्थ्यांसाठी वापरले गेले नव्हते. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, या सरकारची संपूर्णपणे विश्वासार्हता धोक्यात आलेली आहे. गेल्या निवडणुकीपूर्वी सरकारने आम्ही विजेची बिले माफ करु असे घोषित केले होते. नंतर मात्र निर्णय बदलण्यात आला. या सदनामध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी असे उत्तर दिले होते की, मरता क्या नहीं करता. आज ते त्या खुर्चीवर नाहीत. परंतु विद्यमान माननीय उपमुख्यमंत्री हे बसून आम्हाला विनंती करीत आहेत. त्यांनी बसून विनंती केली असली तरी प्रबोधनकार ठाकरे यांचे ते विचार मानतात. त्यामुळे काही प्रमाणात तरी ते सत्य बोलतील अशी मला अपेक्षा आहे. या सरकारची विश्वासार्हता संपली असल्यामुळे वीज बिलामध्ये माफी ही घोषणा मागे घेतली होती. याची मला यानिमित्ताने आठवण होते.

सभापती महोदय, यानंतर सगळयात दुर्लक्षित झालेल्या घटकावर मला बोलावयाचे आहे. कारण दोन्ही सभागृहांमध्ये या घटकावर चर्चा झालेली नाही. हा घटक म्हणजे आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विधवा हा आहे. या विधवा महिला मुंबईला 29 नोव्हेंबर, 2008 रोजी धरणे धरण्यासाठी आल्या होत्या. त्यामधील श्रीमती कलावती चांदूरकर यांनी श्री.राहुल गांधी यांची भेट घेतली होती. त्यावेळी श्री.राहुल गांधी यांनी श्रीमती चांदूरकर यांची विचारपूस केली होती. अशा ब-याच मुलाखती दाखविल्या गेल्या होत्या. यातील अनेक महिलांनी असे मत व्यक्त केले होते की, त्यांना मदत मिळाली नाहीच, परंतु शासकीय अधिका-यांनी साधी विचारपूस देखील केली नाही. विदर्भात दुष्काळ जाहीर करुन प्रती हेक्टर 10 हजार रुपये आर्थिक मदत द्यावी. त्याचबरोबर आत्महत्याग्रस्त कुटुंबे आहेत त्यांना महिना 3 हजार रुपये मदत मिळावी अशी त्यांची अपेक्षा आहे. सभापती महोदय, दैनिक महाराष्ट्र टाईम्समध्ये श्री.प्रताब आसबे हे सातत्याने शेतक-यांच्या आत्महत्याबाबत लिहितात. त्यांच्याशी आमचे राजकीय मतभेद आहेत. पण त्यांनी सरकारला घरचा अहेर दिला आहे, त्याचा मला मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. त्यात त्यांनी अनेक उदाहरणे दिलेली आहेत. त्या उदाहरणांबाबत चर्चा व मतभेद होऊ शकतात. त्यातील एक उदाहरण असे आहे की, बुलढाणा जिल्हयात नवऱ्याने आत्महत्या केल्यावर त्या बाईने आपल्या मुलीची लग्ने लावून दिली. 30 हजारात घर गहाण ठेवून आणि 4.5 एकर जमीन गहाण ठेवून 50

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

हजाराचे कर्ज काढले, 2 वर्षात कर्ज फेडले, परंतु सरपंच असलेला सावकार जमीन बळकावण्यासाठी जमिनीचे पैसेच घेईना, त्यानंतर त्या बाईने भांडण्यास सुरुवात केल्यावर तिची कर्ज परत देण्याची तयारी असताना देखील तिला विवस्त्र करुन तिची धिंड काढण्यात आली. दै.महाराष्ट्र टाईम्स असो, विदर्भातील दै.सकाळ असो, दै.देशोन्नती असो या वर्तमानपत्रातून अशा शेकडो कहाण्या छापून येत आहेत. लातूरच्या भूकंपामध्ये जेवढे मृत्यू झाले त्यापेक्षा जास्त मृत्यू शेतक-यांच्या आत्महत्यांमुळे झालेले आहेत. या कुटुंबातील मुलींचे शिक्षण पूर्ण न करताच त्यांची लग्ने घाईने उरकली जात आहेत. अनेक कुटुंबे उघडल्यावर आलेली आहेत, शेतक-यांच्या आत्महत्या झाल्यावर निकषात बसत असताना देखील अनेक कुटुंबातील लोकांना मदत मिळालेली नाही. आता 5 वर्षे संपत आलेली आहेत. मराठीत म्हण आहे की, भाकरी का करपली, घोडा का अडला ? त्याचे महत्वाचे कारण म्हणजे फिरवली नाही हे आहे. अनेक ठिकाणी अवजारे खराब असल्याचे चित्र दिसून आले आहे. ही जबाबदारी जशी कृषी विभागाची आहे तशी संपूर्ण राज्याची ही जबाबदारी आहे. आत्महत्याग्रस्त कुटुंबांना दिलासा देण्याबाबत काहीही घडलेले नाही. त्यामुळे शासन या चर्चेला काय उत्तर देणार आहे यासंबंधी जनतेला काडीमात्र रस राहिलेला नाही. या शासनाचे नागपूरचे शेवटचे अधिवेशन आहे. पुढील अधिवेशनामध्ये तुम्हाला प्रश्न सुध्दा विचारता येणार नाही. ही वस्तुस्थिती आहे. माननीय महसूल मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सहकार मंत्री या नात्याने सभागृहात ठणकावून उत्तर दिले होते. परंतु पश्चिम महाराष्ट्र असो की, मराठवाडा असो की विदर्भ असो त्याची अंमलबजावणी किती झाली ते त्यांनी सांगावे. खात्याचे मंत्री बदलून काही होणार नाही. मी तर असे म्हणेन की, बदली कामगाराप्रमाणे भूमिका घेऊन नवीन मंत्र्यांना तोफेच्या तोंडाला सोडावयचे आणि बाकीच्या मंत्र्यांनी मोकळ फिरायचे असे पळपुटे धोरण असलेले हे सरकार आहे. त्यामुळे शेतक-यांची आत्महत्या वाढत चाललेली आहे. याच दैनिकात असे म्हटले आहे की, सरकारने घोषित केलेल्या पॅकेजची 75 टक्के अंमलबजावणी केली असेल तर, जमीन ओलिताखाली आली, असेल तर, सूक्ष्म सिंचन झाले असेल तर, जनावरे वाटली गेली असतील तर आता काय राहिले आहे ? आता फक्त शेतक-यांच्या आत्महत्या राहिल्या आहेत, कारण कशाचीही अंमलबजावणी झालेली नाही. डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल सरकाने फेटाळला आहे काय ?

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

(डॉ. नीलम गो-हे...)

तो फेटाळला असेल तर तसे स्पष्ट करा. आधीच्या समितीच्या कोणकोणत्या शिफारशींची अंमलबजावणी झालेली आहे, पॅकेजच्या संदर्भात काय झाले याची या सदनाला माहिती द्यावी. केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी असे जाहीर केलेले आहे की, कर्ज माफी झाल्या शिवाय मुंबईला येऊ नका. आता हे मुंबईला येणार नाहीत तर मग कोठे जाणार आहेत ? अरबी समुद्राच्या दिशेने जाणार आहेत काय असा प्रश्न मला विचारावासा वाटतो. धन्यवाद.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभपती** : 3.00 वाजता आपण चर्चा थांबविणार होतो. आता ही चर्चा येथे थांबवून पुढचे कामकाज घेण्यासंबंधी सभागृहाचे मत काय आहे ? सभागृहापुढे 93ची निवेदने, लक्षवेधी सूचना, विशेष उल्लेख, अशासकीय कामकाज असे भरपूर कामकाज आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : ही चर्चा सुरु झालेली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतलेला आहे. त्यामुळे चर्चा सुरु ठेवून ती उत्तरासहीत संपवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री नितीन गडकरी : सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांना या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे. त्यामुळे या चर्चेसाठी अर्धा तासाच्या उत्तरासह दीडतास वेळ वाढवून द्यावा. एक तासाचा वेळ आम्ही वाटून घेऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : 5.00 वाजता 93ची निवेदने आणि लक्षवेधी सूचना हे कामकाज घ्यावे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, विदर्भावरील चर्चा आहे. विदर्भातील सन्माननीय सदस्यांना देखील या चर्चेमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली पाहिजे....

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी जोरजोराने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, इस तरफ से विदर्भ के किसी भी सदस्य को अभी तक चर्चा में भाग लेने का मौका नहीं मिला है. सिर्फ सम्माननीय सदस्य श्री बी.टी. देशमुख जी ने भाषण किया है. विदर्भ की क्या समस्या है, व्यवहारिक दिक्कतें क्या हैं, ये हम विदर्भ के सम्माननीय सदस्यों को मालूम है. ये एक एक घंटा बोलते हैं. हँसी-मजाक हो रही है. मुंबई के अधिवेशन में हम पर अन्याय होता है. नागपुर के अधिवेशन में भी हम पर अन्याय होता है. हमारे प्रश्न धरे के धरे रह जाते हैं. विभिन्न जिलों की अलग अलग परिस्थिति है. इसलिए हमारा यह अनुरोध है कि कम से कम हमें यहां पर इस विषय पर बोलने का मौका दिया जाए.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दिन जव्हेरी यांचे आम्ही अजिबात ऐकून घेणार नाही. त्यांनी या सभागृहाच्या बाहेर जावे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जैनुद्दीन जव्हेरी : सभापति महोदय, मैंने क्या गलत कहां है ? मैंने कोई गलत बात नहीं कही है. मैंने यह कहा है कि इस प्रस्ताव पर हमें भी बोलने दिया जाए. मैंने कोई अपशब्द इस्तेमाल नहीं किए हैं. मैंने किसी का अपमान नहीं किया है. केवल अपनी भावना व्यक्त की है. पश्चिम महाराष्ट्र के सम्माननीय सदस्यों ने अपने विचार व्यक्त किए हैं. अब हम विदर्भ के सम्माननीय सदस्यों को भी अपने विचार व्यक्त करने के लिए मौका दें, यही मैंने कहा है. मैंने कोई गलत बात नहीं कही है.

श्री अरविंद सावंत : सभापति महोदय, सम्माननीय सदस्य कह रहे हैं उन पर मुंबई के अधिवेशन में अन्याय किया जाता है, नागपुर के अधिवेशन में अन्याय किया जाता है. यह उनका कहना गलत है. हम किसी पर अन्याय नहीं कर रहे हैं. हम यहां पर विदर्भ की समस्या ही रख रहे हैं. सम्माननीय सदस्य श्री जव्हेरी जी, आप हमारी बात सुनिए. हमने किसी पर अन्याय नहीं किया है इसलिए आप अपने शब्द वापस लीजिए.

श्री जैनुद्दीन जव्हेरी : मैंने कोई अपशब्द नहीं कहे हैं.

( व्यवधान )

श्री अरविंद सावंत : क्या हम आप पर अन्याय कर रहे है ?

श्री जैनुद्दीन जव्हेरी : मैंने कोई अपशब्द नहीं कहे हैं. मैंने सिर्फ इतना ही कहा है कि हम विदर्भ के सदस्य है इसलिए हमें बोलने का मौका दिया जाए.

( दोनों तरफ के कुछ सम्माननीय सदस्य एक ही समय पर जोर जोर से बोलते हैं )

**उप सभापति**: इस शोरगुल में सदन की कार्यवाही चलाना संभव नहीं है इसलिए मैं सदन की बैठक 3.30 बजे तक स्थगित करता हूं.

(सभागृहाची बैठक 3.17 ते 3.30 पर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर )

**<u>सभापतीस्थानी माननीय उप सभापती</u>**

**उप सभापती** : या विषयावर सन्माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह 5.00 वाजे पर्यंत चर्चा होईल. सन्माननीय सदस्य श्री. राजेन्द्र जैन आपण आपले भाषण सुरु करावे.

श्री राजेन्द्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था ) : आज इस सदन में माननीय विरोधी पक्ष के नेता श्री फुंडकर जी ने नियम 260 के अन्तर्गत विदर्भ के किसानों की आत्महत्या तथा प्रधानमंत्री पॅकेज के संदर्भ में जो चर्चा उपस्थित की है, उसके लिए मैं उनको धन्यवाद देता हूं. यहां पर सभी सम्माननीय सदस्यों ने विदर्भ की समस्याओं को रखा है, उसके लिए मैं खास तौर से उन का आभारी हूं. इन सब के अलावा मैं कुछ हटकर यह बताना चाहता हू कि धान उत्पादक जिले जैंसे गोंदिया, भंडारा, चंद्रपुर और गडचिरोली जिलों की परिस्थिति बहुत खराब है. आज हमारी परिस्थिति ऐसी हो गई है कि विदर्भ के लिए सरकार की ओर से न तो कोई पॅकेज है और न ही किसानों की तरफ ध्यान दिया जा रहा है. विदर्भ नक्सलग्रस्त की समस्या से भी प्रभावित है. विदर्भ की समस्याओं को उठाने के लिए सदन में बोलने के लिए समय भी नहीं दिया जाता. इसलिए हमारा यह अनुरोध है कि हमें समयग्रस्त भी समझा जाए.

सभापति महोदय, आज विदर्भ के धान उत्पादक किसानों की बहुत खराब परिस्थिति है, वे बहुत दयनीय स्थिति में जीवन जी रहे हैं. गोंदिया जिले की आणेवारी का आंकड़ा 47 प्रतिशत है और भंडारा जिले की आणेवारी का आंकड़ा 50 प्रतिशत से कम है. इसके बावजूद भी न जाने इन जिलों को पूर्ण दुष्कालग्रस्त जिला घोषित करने के लिए किस बात की राह देखी जा रही है ? इसलिए मेरा यह अनुरोध है कि भंडारा और गोंदिया जिलों को पूर्ण दुष्कालग्रस्त जिला घोषित करने के लिए अतिशीघ्र कदम उठाए जाए. दूसरी बात यह है कि धान का उत्पादन कम हुआ है. केन्द्र की यूपीए सरकार द्वारा घोषित धान के लिए समर्थन मूल्य 980 रुपये पहुंच तो गए हैं लेकिन उत्पादकता के आधार पर 1200 रुपये समर्थन मूल्य मिलना चाहिए. तीसरी समस्या यह है कि मार्केटिंग फेडरेशन के द्वारा जो खरीदी केन्द्र खोले गए हैं, वहां पर बारदाने उपलब्ध नहीं है. गोंदिया और भंडारा जिलों के खरीदी केन्द्रों पर बारदाने नहीं है. इस समस्या के कारण किसानों को मजबूरन अपना माल समर्थन मूल्य से कम दाम पर बेचना पड़ रहा है. बारदाना जैसी मामूली चीज़ भी खरीदी केन्द्रों पर उपलब्ध नहीं होती है. इसलिए इस ओर सरकार को ध्यान देना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....2

श्री राजेन्द्र जैन...........

चाहिए और खरीदी केन्द्रों पर समर्थन मूल्य से कम दाम पर माल न बिके, इस बात की ओर भी ध्यान देना चाहिए. चौथी बात यह है कि भंडारा और गोंदिया जिलों में एमआरईजीएस के काम शुरु करने में भी दिक्कत आ रही है. इन जिलों में एमआरईजीएस के काम के बारे में परिस्थिति बहुत खराब है. तकनीकी एवं प्रशासकीय मान्यता के लिए जो तकनीकी विभाग की आवश्यकता है, वहां उस विभाग में एक भी अधिकारी नहीं है. जिस भी अधिकारी की पोस्टिंग की जाती है वे अधिकारी कार्यालय ज्वाइन नहीं करते हैं. कार्यकारी अभियंता, उप अभियंता पोस्टिंग के बाद अपने कार्य पर ज्वाइन नहीं होते हैं. तकनीकी विभाग में कोई अधिकारी न होने के कारण विकास के कार्य नहीं हो सकते हैं. विभाग में अधिकारी ही न होने के कारण किसी भी कार्य के लिए तकनीकी और प्रशासकीय मान्यता नहीं मिलेगी परिणामस्वरुप विकास कार्य ठंडे बस्ते में पड़ा रहेगा. इसलिए मेरा यह अनुरोध है कि जो अधिकारी कार्यालय ज्वाइन नहीं कर रहे हैं उनके खिलाफ कार्रवाई की जाए ताकि गोंदिया और भंडारा जिलों में एमआरईजीएस के अन्तर्गत लोगों को काम देने में किसी भी प्रकार की अड़चन न हो. दूसरी बात यह है कि केन्द्रीय सरकार ने किसानों का कर्ज माफ जरुर किया लेकिन उसमें भी 5 एकड़ की शर्त रख दी, जिसकी वजह से 5 एकड़ से अधिक की कृषि भूमिवालें किसानों को कर्ज माफी का फायदा नहीं मिला. इसलिए 5 एकड़ से अधिक की कृषि भूमिवाले किसानों को भी कर्ज माफी के संबंध में विचार किया जाना चाहिए. उसी प्रकार से 7x12 का उतारा कोरा किया जाना चाहिए. क्योंकि जब भारी बरसात होती है तो वह यह नहीं देखती कि किसान की जमीन 5 एकड़ से कम है या ज्यादा. नुकसान सभी किसानों का होता है. गोंदिया और भंडारा जिलों में भारी बरसात होने की वजह से फसलों को बहुत नुकसान पहुंचा. इन जिलों की परिस्थिति बहुत खराब है. उसी प्रकार से मेरी यह मांग है कि फसल बीमा योजना अनिवार्य की जानी चाहिए. कृषि विभाग द्वारा फसल बीमा योजना का जोरदार प्रचार-प्रसार होना चाहिए और कृषि विभाग के द्वारा रेगूलर किश्त भरी जानी चाहिए ताकि किसानों को उसका फायदा मिल सके.

...3



श्री राजेन्द्र जैन...........

सभापति महोदय, गोंदिया और भंडारा जिलों के सिंचाई प्रकल्पों के संबंध में भी सरकार को गंभीरता से विचार करना चाहिए. किसानों में असंतोष और आत्महत्या का सबसे बड़ा कारण सिंचाई का अनुशेष ही है. गोंदिया जिले के गोरेगांव तालुका में बावनथडी प्रकल्प है. भंडारा और गोंदिया जिले में हर साल दुष्काल पड़ता है. वहां पर कलपात्री प्रकल्प का 95 प्रतिशत काम पूरा हो गया है. केवल एक गांव को सुधारित दर से पैसा देना है और वह सरकार नहीं दे रही है इसलिए वह प्रकल्प 4-5 साल से वैसा ही पड़ा है. इसलिए सरकार इस संबंध में अतिशीघ्र निर्णय लें. उसी प्रकार से गार्ज फीलिंग के काम के संबंध में ध्यान दिया जाना चाहिए
इस प्रकल्प के द्वारा हजारों एकड़ जमीन को सिंचाई सुविधा प्राप्त हो सकती है.सभापति महोदय, कभी वन विभाग के नियमों के कारण तो कभी सुप्रीम कोर्ट के फैसलों के कारण कार्य प्रभावित होते हैं. मैं पुन: यह निवेदन करता हूं कि एमआरईजीएस के कार्य तत्काल शुरु किए जाए, समर्थन मूल्य में वृध्दि की जाए, खरीदी केन्द्रों पर बारदाना उपलब्ध किया जाए ताकि किसानों को राहत मिल सके. इन शब्दों के साथ मैं अपना भाषण समाप्त करता हूं. धन्यवाद.

........

यानंतर श्री गडकरी यांचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात जो प्रस्ताव चर्चेसाठी आलेला आहे त्याबाबतीत मी फक्त मुद्देच मांडणार आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय केवळ विदर्भ, राज्य किंवा देशापुरताच मर्यादित राहिलेला नाही तर जगात चर्चेचा विषय बनला आहे. या आत्महत्यांच्या बाबतीत आश्चर्याचा एक प्रकार असा आहे की, जेवढे पॅकेज जाहीर होतात त्यानंतरही आत्महत्या करणाऱ्यांची संख्या कमी होण्याऐवजी वाढतच आहे. याचे कारण त्या पॅकेजचा फायदा या शेतकऱ्यांना मिळत नाही. विदर्भातील शेतकऱ्यांचे महत्वाचे तीन भाग आहेत. त्यात भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूरचा अर्धा भाग हा धान पिकासाठी आहे. तर पश्चिम विदर्भात सोयाबीन आणि कापूस ही पिके होतात. कापसाच्या बाबतीत सांगायचे तर कॉटन मोनोपोली स्कीम सुरु झाल्यानंतर या कापूस उत्पादक शेतकऱ्यांचा विकास होण्याऐवजी आत्महत्यांमध्येच वाढ होऊ लागली, जास्तीत जास्त शेतकरी आत्महत्या करु लागले. बाजूच्या गुजरात मधील राजकोट वगैरे भागात कापूस उत्पादित होतो. तेथे एकरी आठ ते दहा क्विंटलपेक्षा जास्त कापसाचे उत्पादन होते पण विदर्भात मात्र एकरी फक्त दोन ते अडीच क्विंटल कापूस पिकतो, ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

संकरीत कापसाचे उत्पादन वाढावे यासाठी रासायनिक खताचा केलेला उपयोग तसेच फवारणीसाठी लागलेला खर्च हिशोबात धरला तर आज कापसाला प्रती क्विंटल जो भाव मिळतो तो भाव त्याला लागणा-या खर्चाइतका सुध्दा होत नाही. काही दिवसापूर्वी सोयाबिनला 2800 रुपये प्रती क्विंटल भाव मिळत होता परंतु आता 1400-1500 रुपये भाव सोयाबिनला मिळतो आहे. एका एकरात मागे 8-10 क्विंटल सोयाबिन होत होते परंतु आता 2, 2.5 क्विंटलवरवर आलेले आहे. बंग साहेब आपण नागपूरचे आहात सोयाबिनची सध्या काय परिस्थिती आहे हे तुम्हाला चांगले माहिती आहे.

सभापती महोदय, विदर्भातील 6 जिल्हयाकरिता शासनाने पॅकेज जाहीर केले होते या पॅकेजमध्ये शेतक-यांना सहकारी बॅंकेतून 6 टक्के अल्प दराने कर्ज देऊ असा निर्णय घेण्यात आला होता. माननीय बंग साहेब आपण नागपूरचे आहात आपल्याकडे एका शेतक-याला तरी 6 टक्के दराने कर्ज मिळाले आहे काय? माननीय जैनुद्दीन जव्हेरी साहेब आपण चंद्रपूर जिल्हयाचे आहात. आपल्या जिल्हयामध्ये एका तरी शेतक-याला 6 टक्के दराने कर्ज मिळाले आहे काय? या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन साहेब आपण गोंदियांचे आहात आपल्या जिल्हयात एका तरी शेतक-याला 6 टक्के दराने कर्ज मिळाले आहे काय ? सभापती महोदय, विदर्भासाठी सहकारी चळवळ वरदान ठरण्याऐवजी शाप ठरलेली आहे. माननीय पंतगरावजी आपण सांगितले होते की, शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देऊ परंतु आपण एका तरी शेतक-याला 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन दिलेले आहे काय? अनेक ठिकाणी कर्ज पुरवठा बंद झालेला आहे ज्या ठिकाणी कर्ज पुरवठा सुरु आहे त्या ठिकाणी शेतक-याला 12-12,14-14 टक्के दराने कर्ज घ्यावे लागत आहे व ज्या शेतक-यांना कर्ज मिळत नाही त्यांना खाजगी सावकारांकडून 24-24,30-30 टक्क्याचे कर्ज घ्यावे लागत आहे. आता बॅंकाचे दिवाळे पिटले आहे. अनेक बॅंकानी पैसे घेतले परंतु या बॅंकेचे पैसे कोठे गेले हा तर अजून एक वेगळा विषय आहे. उलट अशा बॅंकाना सरंक्षण देण्याचे काम शासनाकडून सुरु आहे. विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्हयातील शेतक-यांना मदत मिळावी, या ठिकाणच्या आत्महत्या थांबाव्यात म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते त्या पॅकेजचे काय झाले? आपण जे पॅकेज जाहीर केले त्यातून ज्या

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

पैशांचे वाटप झाले त्या पैशातील एक एक रुपयाचा हिशोब शासन देणार आहे काय? माजी माननीय अर्थमंत्री श्री. जयंत पाटील साहेबांनी मागे जशी श्वेतपत्रिका काढली होती तशा प्रकारची श्वेतपत्रिका पॅकेजच्या संदर्भात काढण्याची तुमची हिंमत आहे काय? माननीय पंतप्रधांनी महाराष्ट्रसाठी सन 2006 मध्ये 3750 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते व माननीय मुख्यमंत्र्यांनी सन 2005 मध्ये 1075 कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते. माझे शासनाला आव्हान आहे की, या दोन पॅकेजमध्ये जे पैसे खर्च झालेले आहे त्यासंदर्भात शासनाने श्वेतपत्रिका काढावी व महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला यातील वस्तुस्थिती काय आहे ती सांगावी. होऊन जाऊद्या "दुध का दुध, पानी का पानी ".विदर्भातील 6 आत्महत्याग्रस्त जिल्हयांना 50 लाख रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते, व्याज माफीसाठी 712 कोटी रुपये देण्यात आले होते. सभापती महोदय, व्याज माफीचा फायदा शेतक-यांना न होता तो सहकारी बँकानाच झालेला आहे. ज्या बँकाची परिस्थिती चांगली नव्हती त्यांची मात्र या पॅकेजमुळे परिस्थिती सुधारली. माननीय गुजराथी साहेब राष्ट्रवादी पक्षाला कसे काम करावे हे चांगले माहिती आहे. त्यांनी शेतक-यांचे भले न करता सहकारी बँकाचे भले केलेले आहे. गुजराथी साहेब आपण गांधी विचार सरणीचे आहात, आपले मन संवेदनशील आहे. मी आपल्याला बोलत नाही. परंतु तुमच्या पक्षाचे कसब मी मान्य करतो. नाव पॅकेजचे आणि भले मात्र बँकाचे असे झालेले आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

ओव्हर डयुज रिस्ट्रक्चरींग 1300 कोटी रुपये बँकेना मिळाले. म्हणजे 2012 कोटी रुपये बँकेना मिळाले. मला एक प्रश्न पडतो की, तो मी सभागृहात वारंवार मांडून थकलो आहे. राष्ट्रीयकृत बँका मोठमोठ्या उद्योगपतींची कर्जे व्याज सोडून द्या, परंतु मुद्दलच्या 40 टक्के रक्कम माफ करतात. तर आमच्या शेतकऱ्यांच्या एक लाख रुपये कर्जावर दहा लाख रुपये वसूल केले जाते, याचे काहीच वाटत नाही काय ? माझा बेल्या भागात साखर कारखाना आहे. आपण सिंचनाच्या सोसायट्या करता. माझ्या भागातील गरीब शेतकऱ्यांची घरे जप्तीची वॉरन्ट काढलेली आहेत. मी आपणास किती पुरावे देऊ.

सभापती महोदय, सहकारामध्ये पीक कर्जासंबंधी एक नियम आहे. जर एखाद्या शेतकऱ्याने दहा हजार रुपये कर्ज घेतले असेल आणि त्या शेतकऱ्याने मुद्दलचे दहा हजार रुपये भरले असतील तर आणखी वसुली करता येत नाही. मी अशाप्रकारच्या कितीतरी केसेस सांगेन. सहकारी बँका सावकारापेक्षा जास्त वसूल करीत आहेत. एक लाखाच्या कर्जावर पाच लाख रुपये वसूल करुनही नोटीसा पाठविल्या जात आहेत. भूविकास बँकेचा प्रकार सरकारने थांबविला नाही. जिल्हा सहकारी बँक सेवा सोसायटीचा प्रकार थांबविला नाहीत. आपण सावकराला कशाला दोष देत आहात, खरे सावकार तर सहकारी बँका आहेत. सत्ताधारी पक्षातील मंत्र्यांच्या सहकारी संस्था आहेत. राज्य सहकारी बँक सत्तारुढ पक्षातील लोकांची आहे.नांदेड जिल्हा बँकेत 280 कोटींचा, उस्मानाबाद जिल्हा बँकेत 285 कोटींचा, नागपूर जिल्हा बँकेत 150 कोटींचा, वर्धा जिल्हा बँकेत 60 कोटींचा धोटाळा झालेला आहे. हे पैस वसूल करण्यासाठी पाच टक्के व्याजाने मिळणारे कर्ज, त्यामध्ये अजून तीन टक्के राज्य सहकारी बँकचे कमिशन, तीन टक्के जिल्हा बँकेचे कमिशन आणि तीन टक्के सेवा सहकारी सोसायटीचे कमिशन असे एकूण चौदा टक्के दराने शेतकऱ्यांना कर्ज देण्यात येते. बाजूच्या मध्य प्रदेशातील शेतकऱ्यांला सहा टक्के दराने कर्ज मिळते, परंतु आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना ते मिळू शकत नाही. सहकार बँकांच्या संचालकांना पोसण्यासाठी शेतकऱ्यांचे शोषण चालू आहे. याठिकाणी नागपूर जिल्ह्यातील मंत्री उपस्थित आहेत, त्यांना आपण विचारावे किती बँकामध्ये शेतक-यांना सहा टक्के दराने कर्ज देण्यात आले. तेव्हा सहकाराच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

नावावर शेतकऱ्यांचे जे शोषण सुरु आहे ते थांबविले पाहिजे. मर्सिडीज गाडीकरिता 9-10 टक्के दराने कर्ज उपलब्ध होते. परंतु आपल्या शेतकऱ्यांना शेतीसाठी ट्रॅक्टर घ्यावयाचा असेल तर त्याला 15 टक्के दराने कर्ज मिळते. हा कुठला न्याय आहे.

सभापती महोदय, मी पॅकेजच्या खोलात जात नाही. परंतु मला काही गोष्टी सभागृहाच्या पटलावर आणल्या पाहिजेत. विधानसभेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.रामदास कदम आणि विधानपरिषदेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या बंगल्याच्यामध्ये दिग्रसचे आमदार श्री.राठोड यांनी शेतकऱ्यांना पुरविण्यात आलेली अवजारे आणली होती. त्यातील एक नांगर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माझ्यासमोर हाताने वाकविला. सरकारने इतका मजबूत नांगर दिला होता की, तो नांगर हाताने वाकविला जात होता. माननीय पंतप्रधान पॅकेजमध्ये वाटप झालेल्या गायी मोठमोठया नेत्यांना वाटण्यात आल्या. हे गो-सेवकांनी श्री.माणिकराव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली यवतमाळ जिल्ह्यात धुमाकूळ माजविला. मी त्यांना गो-सेवक म्हणतो. शेतकऱ्यांना जोडधंदा म्हणून गाई-म्हशी, पशु खाद्य, मादी-वासरं खाद्य देण्यात आले. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे ज्येष्ठ मंत्री आहेत. ते अतिशय सूज्ञ आहेत. भविष्यात राज्याचे नेतृत्व करण्याची त्यांची इच्छा आहे. राज्यात भ्रष्टाचार करण्यासाठी एक आचारसंहिता केली पाहिजे की पैसा कोणाकडून खायचा. गरीब माणसाच्या खिशात हात घालायचा नाही. उद्योगपतींच्या खिशात हात घालायचा. काळा बाजार करणाऱ्यांच्या खिशात हात घालायचा.

सभापती महोदय, पंतप्रधान पॅकेजमध्ये कोणकोणाला वाटप करण्यात आले या संबंधीची माहिती मी माहितीच्या अधिकाराखाली आणलेली आहे. ती याठिकाणी देतो. माझ्यावर बदनामीचा खटला भरला तरी हरकत नाही. कारण माझ्याजवळ पुरावे आहेत. कामधेनू दूध उत्पादक सहकारी संस्था मर्यादित लोणी, रजिस्टर्ड नं. 201 श्री.उत्तमराव देवराव पाटील, माजी खासदार - दोन जनावरे, श्रीमती सुशिलाबाई उत्तमराव पाटील ( पत्नी ),दोन जनावरे, राजेंद्र उत्तमराव पाटील, ( मुलग ), मनीष उत्तमराव पाटील, ( मुलगा ) दोन जनावरे, श्री.लक्ष्मण हणमंतराव पवार, त्यांच्याच संस्थेतील कर्मचारी यांना दोन जनावरे. म्हणजे दहा गायी त्यांनी घेतल्या.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

अशा प्रकारे श्री.उत्तमराव पाटील यांच्या घरातील व्यक्तींनी 10 गाई धेतल्या आहेत. आदरणीय उत्तमराव पाटील, गोसेवक हे लोणीच्या सरपंचपदापासून खासदार झाले होते आणि एकूण सहा वेळा ते यवतमाळ जिल्हयाचे खासदार झाले होते. अशा माजी खासदारांनी पॅकेजमधून दहा गाई आपल्या घरासाठी लुटल्या आहेत. या बाबतीत माझ्याकडे सर्व पुरावे आहेत. माहितीच्या आधाराखाली मी ही सगळी माहिती मिळवली आहे. सन्माननीय महसूल मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना मी सांगतो की , हे सर्व पुरावे मी आपल्याला देण्यास तयार आहे. मी एकही गोष्ट असत्य बोलणार नाही. श्री.उत्तमराव पाटील हे गोसेवक आहेत तेव्हा त्यांचा आपल्या पक्षात सत्कार करण्यात यावा. पाहिजे तर श्री.माणिकराव ठाकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात यावा.

सभापती महोदय,यानंतर मी दुसरे उदाहरण देतो. पैनगंगा स्वयंसहाय्यता बचत गट, पाटण ,तहसील,झरी जामनी, जिल्हा. यवतमाळ याचे अध्यक्ष श्री. वामनराव कासावार आता विदर्भाच्या सिंचन महामंडळाचे अध्यक्ष झाले आहेत. ते माजी आमदार असून श्री. प्रकाश देवराव कासावार दोन गाई, 2) श्री.चंद्रशेखर देवराव कासावार, 2 गाई 3) श्री. आकाश देवराव कासावार, 2 गाई, 4) श्री.देवराव बापूराव कासावार 2 गाई अशा प्रकारे आठ गाई यांनी लाटल्या होत्या. श्री.वामनराव कासावार हे वणी विधानसभा मतदारसंघातील कॉंग्रेसचे माजी आमदार आहेत. त्यांचे भाऊ, पुतणे इत्यादींना गाईचे वाटप करण्यात आले होते. अशा प्रकारे गोसेवकांची संख्या काही कमी नाही. कोण प्रथम खाईल याबाबतीत कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस यांच्यामध्ये स्पर्धा सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांना मी सांगू इच्छितो की, या गाई घेण्यामध्ये जर भाजप आणि सेनेचे लोक असतील तर त्यांचीही नावे आपण जाहीर करावीत. आमच्यातीलसुध्दा काही लोकांनी गाई घेतल्या असे मला काही जण म्हणाले होते. तेव्हा अशा लोकांनासुध्दा आपण सोडू नका. माझ्याकडे जी नावाची यादी आहे त्यामध्ये आमच्याकडील लोकांची नावे नाहीत. परंतु जर कोणी असतील तर त्याच्या विरुध्दसुध्दा कारवाई करण्यात यावी. यानंतर मी तिसरे उदाहरण देतो. आनंद शेतकरी बचत गट, शिरोली, तहसील धाटंजी, जिल्हा यवतमाळ यांनीसुध्दा गाई घेतल्या आहेत. श्री.आशिष सुरेश लोणकर, श्री.अनिल नरसिंगराव

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

लोणकर, श्री.रमेश नरसिंगराव लोणकर यांनी गाई घेतल्या आहेत. श्री.सुरेश लोणकर हे राज्य साक्षरता परिषदेचे माजी अध्यक्ष असून त्यांना राज्यमंत्र्यांचा दर्जा होता. लाल दिव्याची गाडी घेऊन ते फिरत होते आणि ही लाल दिव्याची गाडी असताना त्यांनी गाई लाटल्या होत्या.
अशा प्रकारे आपण गरीब लोकांची सेवा करीत आहात. अल्प भूधारक आणि दारिद्रय रेषेखालील ही सगळी गोसेवक मंडळी आहेत. अशा प्रकारे श्री.लोणकर यांनी सहा गाई लाटल्या होत्या.
हे सर्व गोसेवक श्री.माणिकराव ठाकरे यांचे गुराखी आहेत.

सभापती महोदय, यानंतर मी आणखी उदाहरण देतो. गाई घेण्यामध्ये राष्ट्रवादी पक्षाचे कार्यकर्तेसुध्दा मागे नाहीत. वाघाडी दूध उत्पादक सहकारी संस्था यांनीसुध्दा गाई घेतल्या आहेत. श्री.सूर्यकांत रामराव गाडे हे जिल्हा बॅन्केचे उपाध्यक्ष आहेत.

( वेळ संपल्याची बेल वाजविण्यात येते )

सभापती महोदय, मला 25 मुद्दे मांडावयाचे होते परंतु ते सर्व मुद्दे न मांडता मी एकच मुद्दा मांडणार आहे. श्री. श्रीकांत गाडे हे त्यांचे भाऊ असून यवतमाळ जिल्हयातील राष्ट्रवादी पक्षाचे मोठे नेते आहेत. श्री. चंद्रकांत गाडे हे भाऊ असून कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती आहे. माझ्याकडे माहितीच्या अधिकारान्वये माहिती आलेली आहे. सन्माननीय राज्यमंत्री श्री.जयप्रकाश दांडेगावकर यांना मी विचारु इच्छितो की आपल्याला माझ्याकडील अधिकृत माहिती हवी आहे काय ?. जिल्हाधिका-याच्या सहीनिशी माझ्याकडे सगळी अधिकृत माहिती आहे. श्री. गाडे यांनी सहा गाई घेतल्या होत्या. श्री.शिवाजीराव मोघे हे श्री.माणिकराव ठाकरे यांच्या अगोदर महाराष्ट्र कॉंग्रसचे अध्यक्ष होणार होते. श्री.शिवाजीराव मोघे हे माजी मंत्री आणि नागपूरचे माजी पालक मंत्री होते. ते माझ्यावर खूप नाराज झाले होते. मी त्यांच्यावर आरोप केल्यानंतर त्यांनी असे सांगितले की श्री.गडकरी यांची चौकशी करावी. माझी सर्व चौकशीला तयारी आहे. मी तुमच्या सरकारला तर खलनायका सारखाच वाटतो. तुम्हाला जे काही सुचवावयाचे असेल ते सुचवावे. तुमच्या सर्व चौकशा शिंगावर घ्यावयाच्या असे मी ठरवले आहे. माझे जे काही व्हावयाचे असेल ते होईल तुम्हाला सीबीआय, सीआयडी चौकशी करावयाची असेल तर ती करावी मला काहीही

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी ....

फरक पडणार नाही. श्री.शिवाजीराव मोघे हे माजी मंत्री होते . त्यांचे संख्खे भाऊ श्री.आनंद शिवराम मोघे 2 गाई, विजय आनंद मोघे, पुतण्या 2 गाई, हे सर्व अल्पभूधारक आणि दारिद्रय रेषेखालील आहेत. वास्तविक त्यांच्या आश्रमशाळा व शिक्षण संस्था सुरु आहेत शासनाकडून अनुदान घेऊन त्यांच्या शैक्षणिक सस्थांचा धंदा जोरात सुरु आहे. लक्ष्मीदशर्नाचा कार्यक्रम व्यवस्थित सुरु आहे. ते दारिद्रय रेषेखालील , अल्प भू धारक, गोसेवक श्री.शिवाजीराव मोघे साहेब यांच्या परिवाराने गाई घेतल्या आहेत. विजय आनंद मोघे, पुतण्या, 2 गाई, भारत आनंद मोघे, पुतण्या 2 गाई, सुनिता संजय मोघे , पुतण सून, 2 गाई, या प्रमाणे त्यांनी गाई घेतल्या आहेत.

सभापती महोदय, त्याचबरोबर यामध्ये आमदार श्री.संजय देशमुख सुध्दा आहेत. सम्माननीय सदस्य श्री जैनुद्दीन जी देखो, आपके दल में कैसे कैसे लीडर है.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : निकष में बैठे होंगे इसलिए उन्हें फायदा मिला होगा.

श्री नितीन गडकरी : क्या ये आमदार और खासदार अल्प भूधारक है ?

श्री.नंतर सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KTG/MMP/KGS/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 15:55

श्री गडकरी ....

श्री. शिवाजीराव मोघे यांचा परिवार. गोसेवक, ईश्वरपुरूष महिला बचतगट चिंचोली, तहसिल दिग्रस, जिल्हा यवतमाळ. आमदार श्री.संजय देशमुख. आई श्रीमती सविता उत्तम देशमुख - 1 जनावर, पत्नी श्रीमती वैशाली संजय देशमुख - 1 जनावर. हे दिग्रसचे लोकप्रिय आमदार आणि तुमच्या सरकारचे समर्थक. सभापती महोदय, हे काय चालले आहे ? मला याचे आश्चर्य वाटते की, पुसदचा जो ठेकेदार आहे की ज्याने या गाईंचा पुरवठा केला आहे त्याचे नाव श्री.अमोल हनुमान क्षीरसागर. या माणसाने सरकारला या योजनेतून वितरित करण्यासाठी गाई पुरविल्या त्याचेही नाव लाभधारकांमध्ये सहाव्या क्रमांकावर आहे आणि हा माणूसही अल्पभूधारक, दरिद्री, गोसेवक असून त्यानेही या योजनेतून दोन जनावरे घेतली आहेत. सभापती महोदय, आता मी अवजारे या योजनेतून जी वाटण्यात आली त्याबाबत आपल्याला माहिती देऊ इच्छितो. नॅक्स सॅक्स पेअर, सर्व करांसहित मूळ नग 308 रूपयाला पडतो. सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.थोरात साहेब आता येथे उपस्थित असल्याचे दिसत नाहीत. महत्त्वाची माहिती मी देत असतानाच नेमके त्यावेळी ते येथून बाहेर गेले आहेत. त्यांच्या विभागाने याबाबत चमत्कारिक काम केलेले आहे. सरकारमधील त्यांचे सहकारी, राज्यमंत्री मी येथे सांगत असलेले सारे टिपून घेत आहेत अशी मी अपेक्षा करतो, कारण मला याबाबत मंत्री महोदयांकडून खुलासा हवा आहे. सभापती महोदय, शासनाच्या दरपत्रकात नॅक्स पेअरची किंमत 1500 ते 2700 रूपये ठरविली. 500 पंपांची खरेदी केली आणि 108 पंप शेतकऱ्यांना वाटण्यात आले. ते निकृष्ट दर्जाचे असल्याने अधिक मागणी केली नाही. उपकरणे परत केली. सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री श्री.थोरात साहेब आता येथे उपस्थित होत आहेत. त्यांनी मी जे सांगतो आहे ते कृपा करून ऐकावे. माझा आवाज त्यांच्या कानापर्यंत पोहोचला पाहिजे. त्यांच्या पश्चिम महाराष्ट्रातील नेते कसेही असू द्यात, पण विदर्भातील अल्पभूधारक, दारिद्र्य रेषेखालील हे जे गोसेवक आहेत यांनी पंतप्रधान पॅकेज मधून लाभ मिळविण्याचे जे काम केले आहे त्याची त्यांनी नोंद घ्यावी. विदर्भात अशी नररत्नांची खाण आहे म्हणूनच आमच्या विदर्भातील प्रतिष्ठा आणि मानसन्मान हा केवळ विदर्भातच नाही, पश्चिम महाराष्ट्रातच नाही तर जगात पोहोचला आहे. सभापती महोदय, आपण वेळ संपल्याची घंटी वाजवाल म्हणून मी माझ्याकडील सर्व माहिती देण्याचे आवरते घेतो आहे. माझ्याकडे याबाबत खूप माहिती आहे आणि ती सारी अधिकृत आहे. पंप, बॅटरीचे पंप, बॅटरी ऑपरेटेड पंप हे सारे चीन

..... 3एफ 2 ...

मधून आणले. 20 डॉलरचा पंप, त्याची किंमत 1025 रूपये होती. 4187 बॅटरी ऑपरेटेड पंप नग खरेदी केले आणि त्यावर एकंदर 42.59 लाख रूपये किंमत होती. उद्योग विकास महामंडळाने 1 कोटी 72 लाख रूपये दिले आहेत. त्यात 1 कोटी 29 लक्ष रूपये अधिक लागले आहेत. म्हणजे यामध्ये कोणीच मागे नाहीत. ज्याला मिळेल तो हात मारून राहिला आहे. ब्रिकेट नावाची मशीन आहे, 426 नग खरेदी करण्याचे आदेश काढले आहेत. प्रति नगाची किंमत 1 लाख 40 हजार रूपये ठरविण्यात आली. 426 नगांसाठी 5 कोटी 96 लाख 74 हजार 80 रूपये होते. यामध्ये देखील महाराष्ट्र शासनाच्या 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णय, उद्योग व ऊर्जा विभाग यांच्या जीआर नुसार ही अवजारे भारतीय लघुउद्योगांकडून खरेदी करण्यासाठी राखीव असतानाही भारतीय पुरवठादार उद्योग असल्यास चीन आणि स्पेन देशातील अवजारे देखील या लोकांनी खरेदी केली आहेत. म्हणजे आपले अधिकारी देखील किती डायनॅमिक आहेत हे लक्षात येते. प्रत्येक अवजारामागे प्रति नग उद्योजकांकडून कमिशन देखील वसूल करण्यात आले. सभापती महोदय, मी माननीय कृषी मंत्री श्री.थोरात यांना सांगू इच्छितो की, विदर्भ पॅकेज मधून अवजारे देण्याच्या योजनेचा आढावा घेण्यासाठी आपण जी बैठक घेतली होती तेव्हा शेतकऱ्यांकडून तुम्हाला मारूती मोटर नावाचे निकृष्ट दर्जाचे अवजार असल्याच्या तक्रारीसह बऱ्याच तक्रारी शेतकऱ्यांकडून प्राप्त झाल्या होत्या. त्यावेळी आपण स्वत: त्या बैठकीत उपस्थित होता. त्यावेळेस तुम्हाला याचे उत्तर देणे देखील कठीण झाले होते याची मी आपल्याला आठवण करून देऊ इच्छितो.

( वेळ संपल्याची घंटी वाजविली जाते. .. )

सभापती महोदय, वेळ संपत आल्याची मला जाणीव आहे आणि म्हणूनच मी अनेक माझे मुद्दे गाळून काही विशिष्ट मुद्देच येथे उपस्थित करीत आहे. मी शासनाला, विशेषत: माननीय मंत्री महोदय डॉ.पतंगराव कदम आणि श्री.बाळासाहेब थोरात यांना सांगू इच्छितो की, मी हे जे काही सांगतो आहे ती आपल्याच सहकाऱ्यांची महनीय अशी गाथा आहे. आपल्या दारिद्र्यरेषेखालील अल्पभूधारक गोसेवकांचा इतिहास आपल्याला माहिती असावा म्हणूनच मी हे सांगत आहे. असो. मी शेवटचा मुद्दा येथे मांडतो.

सभापती महोदय, भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांचा अहवाल आपल्या सरकारबद्दल काय म्हणतो आहे ते मी आपल्याला दाखवून देऊ इच्छितो. सभापती महोदय, आपण आम्हाला

...... 3एफ 3 ...



KBS/KTG/MMP/KGS/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 15:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संरक्षण द्यावे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मी आपल्या विधानमंडळाच्या सचिवांवर नाराज आहे. जे महत्त्वाचे अहवाल आहेत, ज्यात सरकारवर टीका आहे ते अहवाल हे सभागृहासमोर आणतच नाहीत. त्यावर खरे तर समिती बसविली पाहिजे. माननीय श्री.नारायण राणे यांनी एक अहवाल मध्यंतरी दाखविला. आता 25 एप्रिल 2008 ला एक अहवाल सादर करण्यात आला. त्यावर चर्चा येथे होऊ शकली नाही. ..

( यानंतर श्री. सरफरे ..... 3जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

हे अहवाल अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी देतात. आपण येथून निघण्याच्या वेळी देतात. आम्ही ते अहवाल वाचू नयेत म्हणून देतात. या अहवालाच्या बाबतीत मला आपण्यास एवढीच विनंती करावयाची आहे की, आपण हे अहवाल प्रकाशित करा. हे जे पॅकेज उचलण्यात आले आहे त्याबाबत कॅगने आपल्या अहवालात टिका केली आहे. अे.जी. नी त्यामध्ये "हे भयंकर आहे" असे म्हटले आहे. मला असे वाटते की, या सर्वांची चौकशी झाली आहे. दुसरा डॉ. नरेंद्र जाधव समितीचा अहवाल आहे, त्याचप्रमाणे इंदिरा गांधी हयुमन रिसोर्सेस संस्थेचा अहवाल आहे, स्वामिनाथन समितीचा अहवाल आहे. माननीय डॉ.पतंगराव कदम साहेब आपण या सर्व अहवालांसाठी थोडा वेळ द्यावा. महसूल मंत्री म्हणून आपण हे सर्व अहवालांचे वाचन करा. त्यामध्ये जे काही सुचविण्यात आले आहे, त्याची आपण दखल घेतली नाही. पहिली गोष्ट अशी की, ते बिच्चारे गेले, ते मोठे नेते होते, त्यांनी लोकसत्तेत लेख लिहिला आणि सांगितले की, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या दारुच्या अति सेवनाने व मानसिक संतुलन बिघडल्याने होतात. ते आता पदावर नाहीत. माननीय मंत्रिमहोदय, आमची सर्व शेती घाटयामध्ये आहे.

सभापती महोदय, सिंचन विषय हा स्टेट लिस्टमध्ये आहे. या देशामध्ये तीन लिस्ट आहेत. एक स्टेट लिस्ट, दुसरी सेंट्रल लिस्ट आणि तिसरी कंकरंट लिस्ट. मी परवा देशाच्या आर्थिक स्थितीविषयी या सभागृहात बोललो होतो. त्यावेळी मी एक मागणी केली होती ती आज पुन्हा करतो. जोपर्यंत गावाचा विकास होणार नाही, शेतकऱ्याचा विकास होणार नाही, पर कॅपिटा इन्कम वाढणार नाही तोपर्यंत या देशाचा विकास होणार नाही. शेतीचा विकास करण्यासाठी तीन गोष्टींची आवश्यकता आहे. एक म्हणजे आवश्यकतेनुसार शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळाले पाहिजे, शेतीला स्वस्तात 24 तास वीजपुरवठा झाला पाहिजे, आणि चांगले बि-बियाणे व खते स्वस्तात मिळाले पाहिजेत. शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग , स्पेशल इकॉनॉमिक झोन हे तालुका पातळीवर झाले पाहिजेत. आज आपण मोठमोठया उद्योगपतींच्या सेझची चिंता करता. परंतु कापसाकरिता यवतमाळला सेझ निर्माण करुन वर्धा व यवतमाळ या जिल्हयात टेक्स्टाईल इंडस्ट्री आणण्यासाठी विचार करीत नाही. परवाच्या दिवशी माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांनी आणि त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांनी एक करार केला. तो करार करुन त्यांनी कोल्हापूर आणि लातूरला सूतगिरण्या उभारल्या. कापसाचे उत्पादन विदर्भात होते आणि सूतगिरण्या मात्र तिकडे जॉईंट व्हेंचरमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

उभारल्या. त्याठिकाणी सूतगिरण्या सुरु करण्यासाठी सवलती दिल्या गेल्या. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, ज्या भागामध्ये कापूस पिकतो त्याच भागामध्ये सूतगिरण्या दिल्या पाहिजेत. तेव्हा हा सिंचनाचा विषय सेंट्रल लिस्टमध्ये नाही. त्याचप्रमाणे आतापर्यंत गावाला रस्ता करणे हा विषय नव्हता. त्यावेळी माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी माझ्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीवर नाबार्डचे अध्यक्ष होते, रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर होते. मी त्यांच्यासमोर पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे प्रेझेंटेशन केले. त्यावेळी सर्व नोकरशहा उभे राहून म्हणाले की, प्रत्येक गावाला रस्ता करण्याची जबाबदारी केंद्र सरकारची नाही ती राज्य सरकारची जबाबदारी आहे. त्यामुळे केंद्र सरकार आपले पैसे रस्त्यावर खर्च करु शकत नाही. त्यावेळी माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांना विचारले की, नियमाच्या चौकटीत अडकण्यापेक्षा या देशातील हजारो लोक मरत आहेत. त्यांचा माल शहरात जात नाही. लाखो करोडो मुले शाळेत जात नाहीत, जर कुणी आजारी पडले तर मृत्युमुखी होतात. परंतु कुणी दवाखान्यात जात नाही. 55 वर्षे झाली तरी साडे सहा लाख गावांपैकी फक्त 2 लाख 20 हजार गावांना रस्ते आहेत. त्यामुळे हा राज्य शासनाचा विषय आहे म्हणून तुम्ही टाळता. तुम्हाला जनतेने निवडून दिले आहे, तुम्ही कायदा तोडा.तुम्ही कायद्यात बदल करा आणि तो स्वीकारा. माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी ती सूचना स्वीकारली आणि दहा दिवसात लाल किल्ल्यावर पंतप्रधान ग्रामसडक योजनेची घोषणा झाली. आणि आज 60 हजार कोटींची पंतप्रधान ग्राम सडक योजना या देशात तयार झाली. माझी आपणास विनंती आहे की, एवढा सिंचनाचा विषय सेंट्रल लिस्टमध्ये आला नाही तरी आपल्या देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेब ज्यांना आपण "जाणता राजा" म्हणतो, "शेतकऱ्यांचा मसिहा" म्हणतो त्यांनी जो गहू, डुकरे खातात तो सडका, कुजका गहू 18 रुपये किलोने शेतकऱ्यांसाठी आणला आणि येथील शेतकऱ्यांना साडे आठ रुपये किलो या भावाने दिला.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

ही सत्य स्थिती आहे. सगळी डुकरे श्री. पवार साहेबांना म्हणत होते की, आमच्या हिश्याचा गहू माणसांसाठी का नेता ? त्यांनी नाराजी व्यक्त केली.

सभापती महोदय, या ठिकाणी माझी विनंती राहील की, केंद्रामध्ये 40-50 हजार कोटी रुपयांची तरतूद करावी आणि महाराष्ट्रातील सिंचनासाठी केंद्र शासनाने 50 टक्के निधी द्यावा आणि राज्य शासनाने 50 टक्के निधी घालावा. राज्य शासनाचे 7 हजार कोटी रुपये आणि केंद्र शासनाचे 7 हजार कोटी रुपये अशी 14 हजार कोटी रुपयांची तरतूद झाली तर पाच वर्षामध्ये महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होईल. कृष्णा खोऱ्याची कामे, विदर्भातील सिंचनाची कामे पूर्ण होतील. अगदी टेंभू योजनेपासून सर्व योजना पूर्ण होतील आणि पाच वर्षामध्ये महाराष्ट्रात पाणी साठले तर सिंचन क्षमता एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढेल की, कोणताही प्रश्न उरणार नाही. केंद्र सरकारने ही योजना मंजूर करावी. आपण याबाबतीत कॅबिनेटमध्ये प्रस्ताव करुन जसे इतर ठिकाणी 50 टक्के राज्य शासन आणि 50 टक्के केंद्र शासन निधी देते त्याप्रमाणे सिंचनाकरिता 50 टक्के केंद्र शासन आणि 50 टक्के राज्य शासन हा रेश्यो मान्य करावा. माननीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगरावजी कदम यांना सांगू इच्छितो की, आपण हे एक काम केले तर पाच वर्षात आपल्या राज्यातील चित्र बदलेल. मी माझ्या भाषणातील दोन टक्के मुद्दे देखील आज मांडू शकलो नाही. परंतु महत्वाच्या मुद्याच्या बाबतीत आज या ठिकाणी घोषणा करावी. ज्या गोसेवकांनी पंतप्रधान पॅकेज लुटले, ज्यांनी गाई लुटल्या त्यांनी माननीय पंतप्रधानांना फसविले आहे. म्हणून या पंतप्रधान पॅकेजची चौकशी सीबीआय कडून झाली पाहिजे. गरीब शेतकऱ्यांच्या, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या परिवारावर ज्या अल्पभूधारक गोसेवकांनी डल्ला मारला, ज्यांनी दारिद्र्य रेषेखालचे खोटे सर्टिफिकेट दिले आणि गरीब शेतकऱ्यांना लुबाडले त्यांच्या हातात हातकड्या घालून त्यांना जेलमध्ये पाठविण्याची हिंमत दाखवावी. याबाबत सीबीआय चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

----

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापति महोदय, विदर्भ के 6 जिलों में काश्तकारों की आत्महत्या के बारे में नियम 260 के तहत यहां पर चर्चा उपस्थित की गई है. विदर्भ के इन 6 जिलों के साथ साथ जो 5 जिले और हैं, वहाँ पर भी काश्तकार की परिस्थिति बहुत खराब है. यहां पर अनेक प्रश्न सम्माननीय सदस्यों ने उपस्थित किए हैं, उन्होंने काश्तकारों के बारे में अनेक बातों का जिक्र किया है. हमारे माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख ने इरीगेशन के बारे में प्रश्न उपस्थित किए हैं और यह बहुत ही महत्वपूर्ण सवाल है. विदर्भ का व्यक्ति और एक सामान्य कार्यकर्ता होने के नाते मुझे इस बात का बहुत दुख है कि 1960 से पहले विदर्भ की राजधानी नागपुर थी और 1960 में हम यह सोचकर महाराष्ट्र में शामिल हुए थे कि जो काश्तकार है, जो ग्रामीण हैं, जो मजदूर हैं, जो पिछड़े हैं, वे तरक्की करेंगे. 1960 के बाद आज 47 साल हो रहे हैं, लेकिन आज हमारी परिस्थिति क्या है, हम पीछे हैं और बहुत पीछे जा रहे हैं. विरोधी पक्ष के माननीय सदस्यों ने अपनी बात अच्छी तरह से रखी है. किसी भी क्षेत्र का विकास करने के लिए पैसे की आवश्यकता होती है. महाराष्ट्र में प्राइमिनिस्टर स्कीम आई , इसके अतिरिक्त सरकार के द्वारा अन्य स्कीम भी लाई गई, लेकिन मुख्य प्रश्न यह है कि जो पैसा सरकार के पास से जाता है, क्या वह पैसा सही रूप में काश्तकारों तक पहुंचता है ? विधान परिषद या विधान सभा कम समय चलती है, इसलिए अनेक प्रश्न अनुत्तरित रह जाते हैं और हर बात यहां पर क्लीयर नहीं होती है. मैं आपको वर्धा की डी.पी.डी.सी. का उदाहरण देना चाहता हूँ. प्रधानमंत्री पॅकेज के अन्तर्गत 1300 रूपए में एक किट खरीदी गई थी. इस बारे में आमदार राजू तिमांडे ने प्रश्न उठाया था. इस किट में एक मच्छरदानी और कुछ छोटा-मोटा सामान था और इसकी कीमत 300-400 रूपए से ज्यादा नहीं थी. डी.पी.डी.सी. में इस बारे में चर्चा हुई , लेकिन इसका कोई उत्तर या समाधान हमारे सामने नहीं आया. इसलिए मेरा कहना यह है कि काश्तकारों के प्रश्न जब स्थानीय कार्यकर्ताओं के द्वारा पंचायत समिति, जिला परिषद या अन्य किसी जगह पर उठाए जाते हैं, जब इन प्रश्नों के बारे में बहस होती है, जब जिलाधिकारी या सी.ई.ओ. के सामने बात आती है, तब अगर उसी समय कार्रवाई हो जाए तो आज इस चर्चा की नौबत विधान परिषद में नहीं आती. जब कार्यकर्ता शिकायत करते हैं तो होता यह है कि हँसी मजाक में बात चली जाती है. पालक मंत्री के सामने भी जब भी इस प्रकार की चर्चा होती है तो कोई कार्रवाई नहीं होती है.

.... 3 I - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, हर जिले के प्रश्न अलग अलग हैं और उन प्रश्नों को सरकार को हल करना चाहिए. साहूकारों की तकलीफ काश्तकारों को है. सरकार और बँक स्कीम तो जाहिर करती है, लेकिन उस पर अमल नहीं होता है. काश्तकारों को किसी भी बँक से 6 प्रतिशत की ब्याज दर से पैसा नहीं मिल रहा है. मैं आपको अपना खुद का एक उदाहरण बताता हूँ. 10-15 साल पहले मेरे पास 19 एकड़ जमीन थी और मैंने भू विकास बँक से 10 हजार रूपए लोन लिया था. इसकी किश्त 700 रूपए की थी, लेकिन जब बँक का आदमी जीप लेकर पैसे वसूल करने के लिए आता था तो 200-250 रुपए लेकर चला जाता था. 5 साल के बाद जब हमने हिसाब देखा तो मुझ पर 21 हजार रूपए निकले. जब हमने कहा कि हमने 7500 रूपए तो भर दिए तो उन्होंने कहा कि ये रूपए तो हमारे खर्चे में चले गए. हमने 21 हजार रूपए भू विकास बँक, चंद्रपुर में भरकर एन.ओ.सी. लिया.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भास्करराव जाधव)**

सभापति महोदय, इसके पहले सरकार की तरफ से जो पॅकेज आया था, वह तो ब्याज में चला गया. अगर किसी व्यक्ति ने धंधे के लिए, पंप के लिए या ट्रॅक्टर खरीदने के लिए पैसा लिया और अगर उसका काम नहीं चलता है तो फिर उसके लिए बँक की तरफ से "वन टाइम सेटलमेंट" होता है. ऐसा करते समय ब्याज में रियायत दी जाती है. मान लीजिए कि किसी व्यक्ति ने 50 हजार रूपए कर्जा लिया और उसके ऊपर 60 हजार रूपए ब्याज हो गया तो वन टाइम सेटलमेंट करते समय 50 हजार रूपए के ऊपर 10 हजार रूपए या 20 हजार रूपए ब्याज के लेकर शेष ब्याज छोड़ देते हैं. इस प्रकार का सेटलमेंट किसानों के साथ करना चाहिए था.

सभापति महोदय, हमारे बुजुर्गों ने महाराष्ट्र में शामिल होने का निर्णय यह सोचकर लिया था कि छोटे भाई के साथ अन्याय नहीं होगा. हिन्दी भाषी राज्य छोड़कर हम महाराष्ट्र में शामिल हुए हैं. अगर आज हम मध्य प्रदेश में रहते तो उसकी राजधानी भोपाल में नहीं रहती थी, उसकी राजधानी नागपुर में रहती थी. आज छत्तीसगढ़ छोटा सा राज्य है और यह राज्य बहुत तरक्की कर रहा है. आज विदर्भ में खनिज सम्पत्ति है, वन सम्पत्ति है, बिजली का उत्पादन विदर्भ में होता है, फिर भी हमारा काश्तकार तकलीफ में है. चंद्रपुर जिले में बाढ़ आती है, लेकिन वह

...... 3 I - 3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नैसर्गिक आपत्ति नहीं है. वहां पर उद्योगपति ने जो काम किया है, उसकी वजह से नाले से लगी हुई 50-60 एकड़ जमीन में जो शेती थी, वह बह गई. सरकार का कहना है कि उसकी नुकसान भरपाई नहीं दे सकते.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ पूर्वी श्री. शर्मा..... 16:15

श्री. जैनुद्दिन जव्हेरी ....

जिनकी खेत जमीन 5 एकड़ से ज्यादा है और नाले को लग कर थी, वे जब सहायता की मांग करते थे तो उनसे कहा जाता था कि वह बाढ़ नहीं थी इसलिए नुकसान भरपाई नहीं मिल सकती. इस प्रकार से किसानों के अलग अलग प्रश्न है. विदर्भ के किसान भी अनेक प्रकार की फसल लेते हैं. कपास, धान, संतरा, मिरची इत्यादि फसलें विदर्भ में होती है. कपास का हाल यह है कि प्रदूषण से सफेद कपास काला पड़ जाता है और जब यह कपास बेचने के लिए किसान बाजार में जाता है तो उचित कीमत नहीं मिलती है. मैंने यह बात पणन मंत्री जी को बताई है कि राजूरा, घुग्गुस इत्यादि जगहों पर खरीदी केन्द्र नहीं खोले गए हैं. तो उन्होंने कहा कि वहां पर जीनिंग-प्रेसिंग नहीं है इसलिए खरीदी केन्द्र नहीं खोले गए हैं. यह नियम है कि जहां पर जीनिंग-प्रेसिंग होंगे वहीं खरीदी केन्द्र होंगे. विदर्भ में उद्योग कैसे चल रहे हैं, यह बताने की जरुरत नहीं है. कृषि पर आधारित उद्योगों को भगवान ही बचाएं. आज विदर्भ में 14 में से सिर्फ तीन शक्कर के कारखाने चालू हैं. जीनिंग-प्रेसिंग सोसायटी की स्थापना हुई है लेकिन वित्त की कमी के कारण वे भी बंद है. दूध उत्पादन बढ़ाने की कोशिश कर रहे हैं लेकिन दुधारु जानवर नहीं मिलते हैं. गडचिरोली, वर्धा में दुधारु जानवर मिलने में कठिनाई आ रही है. कोई सहयोग नहीं दे रहा है. यहां नियम पढ़ कर बताया जाता है. मैं यह पूछना चाहता हूं कि क्या नेता काश्तकार नहीं है, क्या नेता उद्योगपति नहीं है ? अगर किसी नेता के भाई-बहन, पत्नी अगर निकष के अनुसार मदद पाने के लिए पात्र है तो क्या उनको सरकारी योजना लागू नहीं होगी ? अगर कोई आमदार या खासदार का भाई है, साला है, बेटा है, तो क्या यह कसूर है ? अगर कहीं नियम का उल्लंघन हुआ है तो उसकी शिकायत संबंधित विभाग को दी जा सकती है, पुलिस स्टेशन में शिकायत की जा सकती है, कलेक्टर के कार्यालय में शिकायत दर्ज की जा सकती है. लेकिन वहां शिकायत न करके यहां पर जोर-जोर से बोलकर, प्रेस रिपोर्टर की तरफ देखकर बोलना क्या उचित है ? सत्ताधारी पक्ष के नेता क्या चोर है, क्या वे सरकारी योजनाओं का गलत फायदा उठा रहे हैं ? अगर मैं सरकारी योजनाओं का फायदा लेने के लिए पात्र हूं तो कोई गलत नहीं है. यहां पर हमारे प्रांत अध्यक्ष का नाम लिया गया, माजी आमदार, खासदार का नाम लिया गया और यह बताया गया कि उनके रिश्तेदारों ने सरकारी योजनाओं का लाभ लिया. अगर वे सरकार के नियमों के अनुसार योजनाओं का फायदा लेने के लिए पात्र है तो कोई गुनाह नहीं है. अगर वे

........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दिन जव्हेरी ....

पात्र है तो गाय-भैंस लेना कोई गुनाह नहीं है. अगर वे पात्र है तो रिश्तो का संबंध नहीं आता है. दूसरी बात यह भी मैं कहना चाहता हूं कि अगर वे पात्र नहीं थे तो क्यों कार्रवाई नहीं हो रही है ? अगर हमारे सगे भाई ने गैरकानूनी रुप से किसी योजना का फायदा उठाया है तो उसके खिलाफ कार्रवाई होनी चाहिए. यह मेरी विनती है. इन शब्दों के साथ मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

.........

यानंतर श्री. केशवराव मानकर
यांचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भातील 6 जिल्हयाना पॅकेज दिलेले आहे. पूर्व विदर्भातील 4 जिल्ह्यांना मात्र पॅकेजमधून वगळलेले आहे. बडनेरा जिल्ह्यामध्ये 2005मध्ये 48, 2006मध्ये 42, 2007मध्ये 44 आणि 2008मध्ये 52 अशा एकूण 186 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे चंद्रपूर जिल्हयामध्ये 74, गडचिरोली जिल्ह्यामध्ये 17, गोंदिया जिल्ह्यामध्ये 17 या प्रमाणे शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. याचा अर्थ असा आहे की, विदर्भातील या राहिलेल्या जिल्ह्यांना देखील पॅकेज देणे अत्यंत आवश्यक आहे. अ आणि ब श्रेणी धानाला 750 रुपये आधारभूत भाव दिलेला आहे. तसेच अ श्रेणीला 150 रु. आणि ब श्रेणीला 100 रुपये बोनस देऊन अ श्रेणी धानाला 900 रु. आणि ब श्रेणी धानाला 850 रुपये भाव दिलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

सभापती महोदय, माझी या ठिकाणी अशी मागणी आहे की, आधारभूत मूल्यच आता ठरविले पाहिजे. शेतकऱ्यांना बोनस देऊन काही उपयोग नाही. बोनस हा काही शेतकऱ्यांचा कायमचा आर्थिक सोर्स नाही. बोनस शेतकऱ्यांचे तात्पुरती गरज भागविण्याचे एक साधन आहे. म्हणून धानाला 1200 रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात यावा अशी आमची मागणी होती. परंतु प्राप्त परिस्थिती पाहता शेतकऱ्यांच्या धानाला 1500 रुपये प्रति क्विंटल भाव देण्यात यावा अशी माझी शासनाकडे मागणी आहे. माननीय कृषी मंत्री श्री. शरदराव पवार यांनी मागील वर्षी त्यांनी एनडीएससी कंपनीला धान खरेदी करण्याचे अधिकार दिले होते. विदर्भातील चारही धान पिकविणाऱ्या जिल्हयातील धान खरेदी या कंपनीकडून होत होती. त्यामुळे शेतकऱ्याला फार मोठा दिलासा मिळाला होता. मागील वर्षी धानाच्या बाबतीत शेतकरी कधी नागावला नाही. शेतकऱ्याला आपल्या धानाला चांगला भाव या कंपनीकडून मिळाला होता. या वर्षी धान खरेदीचे अधिकार या कंपनीला का देण्यात आले नाही ? याबाबतचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. गोंदिया जिल्हयातील राईस इंडस्ट्रीज बुडण्याच्या स्थितीत होती. राईस मिल इंडस्ट्रीज असोसिएशने आग्रह केला होता की, आम्ही फक्त 100 रुपये जास्त दराने धान देतो, परंतु ही खरेदी एनडीएससीच्या माध्यमातून झाली पाहिजे. एनडीएससीला धान खरेदी करण्यासबंधी अधिकार दिले होते, त्यात काही अटी व शर्ती टाकून दिल्या होत्या. त्याचे वाचन करुन मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. आमच्याकडून लेव्हीचा तांदूळ घ्यावा अशी राईस मिल असोसिएशनची मागणी होती. यासंदर्भात अन्न व नागरी पुरवठा विभागास पत्र दिले होते. या विषयाच्या संदर्भात अधिवेशन काळात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत जो निर्णय घेतला गेला होता. त्याची अंमलबजावणी मात्र झाली नाही. यासंदर्भातील निर्णय देखील सरकारने जाहीर करावा अशी माझी शासनाला विनंती आहे. आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत माझा एक प्रश्न होता, त्या प्रश्नाचा क्रमांक 46095 असा आहे. त्या प्रश्नास माननीय जलसंपदा मंत्र्यांनी लेखी उत्तर दिलेले आहे ते अत्यंत दुर्देवी आहे. गोंदिया तालुक्यात फक्त 19 लाख 12 हजार 880 रुपये एवढे रब्बी धानाचे नुकसान झ ाले आहे, गोंदिया तालुक्यात जेवढया धान उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे. वास्तविक धानाचे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. आमगांव तालुक्यात नुकसान निरंक दाखविले आहे. सालेकसा

2...

श्री.केशवराव मानकर...

तालुक्याला 7200 रुपयांचे फक्त धानाचे नुकसान झाले आहे असे दाखविले आहे. धानाची नुकसान भरपाई देण्यामध्ये शासनाने मोठया प्रमाणात भेदभाव केला आहे. धान उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात तालुका-तालुक्यात भेदभाव केलेला आहे. तो बरोबर नाही. यापुढे अशा प्रकारचा भेदभाव शासनाने करु नये अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, आमच्या जिल्हयात शेतक-यांना रासायनिक खते दिली गेली, ती शेतक-यांना व्यवस्थितपणे मिळाली काय ? असा प्रश्न मी माननीय कृषी मंत्र्यांना विचारु इच्छितो. शेतक-यांना देण्यात आलेली रासायनिक खते योग्य नाहीत, तसेच ती संपूर्ण शेतक-यांना वितरित झाली नाहीत याबाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना दूरध्वनीव्दारे माहिती दिली आहे.सुपरफॉस्पेट खत आमच्या जिल्हयात आलेच नाही. युरिया खत 100 रुपये जास्तीच्या दराने विकले गेले. विदर्भातील पूर्व विभागातील लोकशनप्रमाणे खत आले नाही. जास्त दराने या विभागातील लोकांनी खत विकत घेतले आहे. त्यामुळे खताच्या बाबतीत देखील शेतक-यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, पशुधन ही शेतक-यांची संपत्ती आहे. गाईची आपण दिवाळीच्या दिवशी पुजा करतो. गाई,म्हशी, शेळया, मेंढया ही शेतक-यांची मोठी आर्थिक संपत्ती आहे. आपल्याकडे पशुधन असल्यामुळे 20 हजार मे.वॅ.वीजचे बचत होते आहे. जर आपल्याकडे पशुधन नसते तर 20 हजार मे.वॅ.वीज निर्मिती शासनाला जास्तीची करावी लागली असती. पशुधनाचे वर्गीकरण केलेले आहे. गाईचे वर्गीकरण 2.50 कोटी, म्हशीचे वर्गीकरण 1.50 कोटी असे आहे. भारतात गाईच्या 25 जाती आहेत. म्हशीच्या 9 जाती आहेत. शेळयांच्या 22 आणि मेंढी या प्राण्याच्या 40 जाती आहेत. आज म्हशीपासून 94 दशलक्ष टन दूध प्राप्त होते, 70 दशलक्ष टन शेणखत निर्मिती होते. शेणखातामुळे शेतजमीन सुपीक होते. पशुधनात मोठया प्रमाणात घट होत आहे. संपूर्ण देशात गाईंची मोठया प्रमाणात कत्तल केली जात आहे. म्हणून माझे सरकारला निवेदन आहे की, या राज्यात गोहत्त्या बंदीचा कायदा अस्तित्वात आणावा. राज्यात अवैध कत्तलखाने आहेत, ते तातडीने बंद करावेत. औरंगाबाद आणि कामठी येथे परवानगी दिलेले कत्तलखाने कार्यरत आहेत. ते कत्तलखाने तातडीने बंद करण्यात यावेत. या कत्तलखान्यांचे परवाने तातडीने रद्द करावेत. या राज्यात मोठया प्रमाणात महिलांचे अल्पबचत गट आहेत. त्यांच्याकडे ही भाकडी जनावरे द्यावीत.

3...



ABG/ KGS/ MMP/ प्रथम श्री. शिगम 16:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

या अल्पबचत गटांना गांडूळ खत निर्मिती करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. अल्पबचत गटाकडून गांडूळ खताची निर्मिती केली तर शेतक-यांना दोन रुपये, तीन रुपये किलो खत उपलब्ध होऊ शकते.

यानंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर........

पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा आणि चंद्रपूर जिल्हयामध्ये 6700 मामा तलाव आहेत. त्यापैकी 1405 मामा तलावांची दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव असून त्यापैकी 595 तलावांची दुरुस्ती करण्यासाठी 20 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. परंतु प्रत्यक्षात 595 पैकी फक्त 32 तलावांची दुरुस्ती झालेली आहे. या 32 तलावांची कामे पूर्ण झाली असून 150 कामांना तांत्रिक मान्यता देण्यात आली आहे. 102 कामांचे अंदाजपत्रक तयार केले आहेत. दुष्काळ असल्यामुळे ही कामे पूर्ण झाली पाहिजेत. पाण्याची उपलब्धता कमी आहे. शिरपूर टोल्यामध्ये 60.66 दशलक्ष, मुजारी टोल्यामध्ये 84.55 दशलक्ष पाणीसाठा असल्यामुळे रब्बी पिकांना पाणी मिळणार नाही अशी स्थिती असल्यामुळे कालव्याची कामे पूर्ण केली पाहिजेत. जे पाणी वाया जाते ते थांबविण्यासाठी शासनाने 100 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा एवढे बोलून वेळेअभावी मी माझे पूर्ण करतो.

---

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, विशेषत: तुम्ही आम्ही सर्व भूमीपुत्र आहोत. तुम्हाला आम्हाला महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला या शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या, त्यांची परिस्थिती ही शरमेने मान खाली घालावी अशी स्थिती आहे. तुमची माझी राजकीय विचारसरणी बाजूला ठेवून तुम्हा आम्हाला एकत्रित येऊन गांभीर्याने विचार करण्याचा क्षण आलेला आहे. या क्षणाला गंभीर विचार केला नाही तर भविष्यामध्ये तुम्हा आम्हाला कोणीही माफ करणार नाही. म्हणून मी एकच सूचना करणार आहे. आज या महाराष्ट्राच्या कन्या आणि या देशाच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील, या देशाचे केंद्रीय कृषिमंत्री श्री.शरद पवार यांच्यापासून सर्व मंत्री, सर्व खासदार, विधानसभा आणि विधानपरिषदेचे सर्व विद्यमान सदस्य आणि माजी सदस्य, या महाराष्ट्रामध्ये असलेल्या चार कृषि विद्यापीठातील कृषि तज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ या सगळयांना सिटिंग अलाऊन्स म्हणून न एकही पैसा देता दोन-चार दिवस एकत्र बसून चर्चा केली पाहिजेत. यात कोणते दोष आहेत, कोणत्या उणिवा आहेत याचा बारकाईने शोध घेतला पाहिजे आणि त्याबाबत कृति आराखडा तयार करुन तो महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी काटेकोरपणे राबविला पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (कृषिमंत्री) : सभापती महोदय, आज विधानपरिषदेमध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.भाऊसाहेब फुंडकर त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, नितीन गडकरी, डॉ.दीपक सावंत व अन्य सदस्यांनी नियम 260 अन्वये विदर्भातील शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांसह अनेक सन्माननीय सदस्यांनी काही महत्वाच्या सूचना केल्या आहेत,त्याबद्दल मी प्रथम सर्वांचे आभार मानतो.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत चर्चा करीत असताना एकूणच शेतीचा विचार केला तर आपल्या लक्षात येईल की, या राज्यातील शेती ही प्रामुख्याने पावसावर आधारित अशा प्रकारची शेती आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सातत्याने हा प्रश्न सभागृहात मांडला की, सिंचनाशिवाय शेतीला ऊर्जितावस्था येऊ शकणार नाही. मी याठिकाणी मागील आठ वर्षे शेतीच्या दृष्टीने कशी गेली हे सांगू इच्छितो. महाराष्ट्रातील शेती पाहता मागील 100 वर्षाचा विचार करुन महात्मा फुले जे विचार मांडत होते तेच आज आपण मांडतो आहोत ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मागील आठ वर्षात पावसाची विविध रुपे आपल्याला पहावयास मिळाली. 2001 हे वर्ष सर्वसाधारण होते. 2002, 2003 व 2004 ही वर्षे दुष्काळाची होती.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ......

एक शाश्वत पावसाचा भाग म्हणून विदर्भ समजला जातो. तसेच पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीचा पट्टा हा अवर्षण प्रवण भाग समजला जातो. पण या तीन वर्षात विदर्भाने सुध्दा दुष्काळ अनुभवला आहे. मुंबईमध्ये चेरापुंजीपेक्षा जास्त पाऊस पडल्याचे दिवस आपल्याला आठवतात, कोल्हापूर पाण्याखाली गेल्याची घटना झाली आणि गोंदियापर्यंत पाणीच पाणी अशी विचित्र परिस्थिती सुध्दा सन 2007 मध्ये होती. एका बाजूला धरणच भरले नाही तर दुसऱ्या बाजूला मात्र 40 टीएमसी क्षमतेचे धरण असेल तर ते संपूर्ण भरुनही 40 मीटर पाणी वाहून गेले, अशी विचित्र परिस्थिती देखील आपल्याला अनुभवायला मिळाली. सन 2007 ते नॉर्मल वर्ष म्हणून वाटले. आपल्याला वाटले होते की, यावर्षी खरिपाची पेरणी वेळेवर सुरु होईल परंतु मान्सुनला दीड महिन्यापर्यंत सुरुवातच झाली नाही आणि त्यानंतर ॲबनॉर्मल स्वरुपात पाऊस पडल्याचे पहायला मिळाले. अशी मागील आठ वर्षात या राज्यातील शेतीची अवस्था झालेली आहे. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून असल्यामुळे ही परिस्थिती पहायला लागते. सन 2002-03 ते 2004-05 या तीन वर्षातील राज्याची सरासरी सिंचन क्षमता जी 16-17 टक्के होती ती देखील निसर्गाच्या लहरीपणामुळे आपण टिकवू शकलो नाही, कारण मान्सुनचाच पाऊस पडला नाही म्हणून धरणे भरली नाहीत. या वर्षात देखील विदर्भातील विशेषत: अकोला येथील काटेपूर्णा प्रकल्पाची अवस्था काय आहे, पेंच प्रकल्पाची अवस्था काय आहे, हे आपल्याला माहितच आहे. याचे कारण एकच निसर्गाचाच पाऊस पडत नसल्यामुळे आपल्याला शाश्वत सिंचन क्षमता टिकविणे शक्य नाही. सन 2005-06 मध्ये राज्यात महापूर येतील एवढा पाऊस पडला, सन 2007 वर्ष नॉर्मल राहिले आणि त्याचा एकत्रित परिणाम असा दिसतो की, सन 2007-08 मध्ये उच्चांक असे उत्पन्न आपण घेतले. मला वाटते संयुक्त महाराष्ट्रानंतरचे सर्वात चांगले हेच वर्ष असावे. शेतकऱ्याने कितीही कष्ट केले, विद्यापीठांची बियाण्याच्या बाबतीत मदत केली पण मान्सुनच झाला नाही तर आपण अपयशी ठरतो, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. राज्यातील शेती ही जास्तीत जास्त मान्सुनवर आधारित असल्यामुळेच या सर्व समस्या निर्माण होत आहेत. गेल्या चार वर्षातील परिस्थिती पाहता असे दिसते की, ज्या ज्या वेळी शेतकऱ्यांना अडचण आली त्या त्या वेळी शासनाने मदत केलेली आहे. सन 2005-06 मध्ये आपण हेक्टरी 1 हजार रुपये आणि दोन हेक्टरच्या

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात .....

मर्यादेपर्यंत मदत केली. फळ पिकांना 2 हेक्टरच्या मर्यादेपर्यंत 4 हजार रुपये मदत करण्यासंबंधीचे स्थायी आदेश आहेत. परंतु यामध्ये बदल करुन आपण फळ पिकांसाठी 10 हजार रुपये, धान व कापूस यासाठी 5 हजार रुपये त्याचबरोबर गारपिटीसारख्या नैसर्गिक आपत्तीत जर शेतकऱ्याच्या पिकाचे नुसान झाले तर त्यांनाही मदत केली आहे. थोडक्यात ज्या ज्या वेळेस राज्यातील शेतकरी अडचणीत सापडला त्या त्या वेळेस त्याला मदत केली. मी मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणू देऊ इच्छितो की, सन 2004 नंतन सन 2008 पर्यंत विविध पध्दतीने नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होऊन अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना 1557 कोटी रुपये मदत केली आहे. त्यानंतर कापूस पीक प्रथम लाल्या रोगाच्या प्रादुर्भावाखाली आले, लष्करी अळीमुळे नुकसान झाले त्यावेळेसही आपण कापूस उत्पादकांना मदत करतो, यात दुमत असण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे संत्रा, लोकरी मावा अशा प्रकारे 3 हजार कोटीपर्यंत मदत दिलेली आहे, ही वस्तुस्थिती सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, लष्करी अळीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आपण मदत करण्यात येते पण लातूर आणि उस्मानाबाद या दोनच जिल्ह्यात ती करण्यात आली. परंतु यासंदर्भात मी सभागृहात सांगू इच्छितो की, चंद्रपूरला ज्यावेळेस लष्करी अळी आढळून आली त्यावेळेस मी याच भागात स्वत: फिरलो आणि सन्माननीय सदस्यांसोबत बैठक घेतली होती. त्यावेळेस असा निर्णय घेतला होता की, हेक्टरी 5 हजार आणि 2 हेक्टरच्या मर्यादेपर्यंत अशी मदत आपण केली आहे. तसेच राज्यात 13 जिल्हे असे आहेत की, ज्या भागात 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेले आहे अशा भागासाठी आज 528 कोटी रुपयाची मदत करावी लागते. यात कुठलेही राजकारण नाही तर जसजसे पंचनामे होत जातील तसतशी मदत करण्यात येईल व येत्या 3 महिन्यात पूर्ण रक्कम देण्याबाबतचा निर्णय आम्ही घेतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

शेतक-याला खरे म्हणजे पीक विम्याचे संरक्षण मिळाले पाहिजे. सोयाबीन पिकाला विम्याचे संरक्षण आहे परंतु सोयाबीनसाठी शेतकरी विमा उतरवतील असे समजण्याचे काही कारण नाही. सोयाबीनच्या विम्याच्या संदर्भात आम्ही दोनदा मुदत वाढवली होती परंतु पाहिजे तसा प्रतिसाद आम्हाला शेतक-यांकडून मिळाला नाही. येथून पुढील काळात शेतकरी विम्याचा फायदा जास्तीत जास्त कसा घेतील यासंदर्भात आपल्याला निश्चितपणे विचार करावा लागणार आहे. सभापती महोदय, कृषी मंत्री म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर मी फिरत असतो. शेतक-यांच्या शेतापर्यंत मी जातो, त्यांच्या अडचणी समजून घेतो. काल सुध्दा मी शेतावर गेलो होतो त्या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल साहेब सुध्दा होते. मी गेल्या चार वर्षात महिन्यातील दोन दिवस शेतावर प्रत्यक्ष जातो, शेतक-यांच्या समस्या समजून घेतो व त्यावर मार्ग काढत असतो. कोणत्याही प्रकारचे राजकारण न करता मी शेतक-यांच्या शेताला भेट देत असतो. खारपाण पट्टयामध्ये मी आतापर्यंत पाच वेळा भेटी दिलेल्या आहेत. त्या ठिकाणचे प्रश्न समजून त्या प्रश्नांची उपाययोजना देखील मी केलेली आहे. मी ज्या भेटी दिलेल्या आहे त्यामधून मला एक सूत्र सापडले आहे त्याचा मी मुद्दाम उल्लेख करणार आहे. विदर्भातील सहा जिल्हयातील शेतक-यांना ऊर्जितावस्था प्राप्त करुन द्यावयाची असेल तर येथील जो कापूस पिकवणारा शेतकरी असेल, धान पिकवणारा किंवा सोयाबीन पिकवणारा शेतकरी असेल त्याने पेरणी केल्यानंतर पावसाचा महिना दीड महिन्याचा जो खंड पडतो त्या खंडामुळे पिकाची उत्पादकता घटते, शेतक-याची कितीही इच्छा झाली तरी तो आपल्या पिकाला पाणी देऊ शकत नाही. पावसाचा खंड पडल्यामुळे शेतक-याला शेती परवडत नाही. शेतक-याला शेती परवडण्यासारखी करुन द्यावयाची असेल तर प्रथम एक तरी पाणी देण्याची व्यवस्था केली पाहिजे व जमले तर अजून पिके घेण्यासाठी पाण्याची व्यवस्था करुन दिली पाहिजे. माननीय श्री.बी.टी.देशमुख यांच्यामुळे विदर्भातील धरणाची बरीच कामे मार्गी लागली आहेत. विदर्भामध्ये मोठया प्रमाणात जलसंधारणाची कामे झाली पाहिजे यासाठी मी आग्रह सुध्दा धरला होता त्यावेळेस माननीय श्री. बी.टी.देशमुख यांनी जलसंधारणासाठी निधी मिळावा म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना सुध्दा त्यांनी सांगितले होते. शेतीसाठी जलसंधारण हा सगळयात महत्वाचा पाया आहे असे मला वाटते. आम्ही मराठवाडा पाणलोट मिशन आणि विदर्भ पाणलोट मिशन असा

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात....

कार्यक्रम घेतला. यासंदर्भात अधिका-यांचे म्हणणे होते की, मजुरांकडून काम करुन घेतले पाहिजे, मजूर उपलब्ध असेल तरच काम करावयाचे नाही तर जलसंधारणाचे काम करण्यासाठी खास परवानगी घ्यावयाची. सभापती महोदय, ज्यावेळेस पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ पडतो त्यावेळेस जलसंधारणाच्या कामावर मजूर येतो व जलसंधारणाची कामे होतात. उस्मानाबाद, लातूर या ठिकाणी मी स्वत: अनुभव घेतला आहे की, सन 2003-2004 साली दुष्काळ पडला तेव्हा हजारो मजूर जलसंधारणाच्या कामावर आले व जलसंधारणाची बरीच कामे झाली. ऊस्मानाबाद, लातूर या ठिकाणी जलसंधारणाची कामे झाल्यामुळे विहिरींना पाणी आले,तलावांना पाणी आले त्यामुळे आता त्या ठिकाणी मोठया प्रमाणात ऊसाची शेती पिकवली जाते. परंतु विदर्भातील सहा जिल्हयामध्ये दुष्काळ पडला तरी मजूर जलसंधारणाच्या कामावर येत नसल्यामुळे या ठिकाणी जलसंधारणाची कामे होत नाहीत ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारता येत नाही. त्यामुळे जलसंधारणाची कामे, पाणलोट क्षेत्राची कामे मशीनने पूर्ण करण्याचा आपण निर्णय घेतलेला आहे. मजुरांकडून जे काम 100 रुपयांमध्ये होते तेच काम मशिनने 70 रुपयांमध्ये होते असे आमच्या लक्षात आले. मशीनच्या सहाय्याने काम केल्यामुळे कामाची गती वाढणार आहे, काम आखीव रेखीव होणार आहे. जलसंधारणाची कामे पूर्ण होण्यासाठी आम्ही जलसंवर्धनाची सगळे नॉर्म्स बदलले व शेताची बांध-बंदिस्ती करावयाची व शेतातील पाणी शेतातच मुरेल याची काळजी घेत आम्ही घेत आहोत. विदर्भात 1000 मि.मि. पाऊस पडत जरी असला तरी उन्हाळयात त्यातील काहीच पाणी शिल्लक राहत नाही अशी परिस्थिती आहे. शेतीला चांगले दिवस आणण्यासाठी आम्ही पाणलाटे मिशनचा उपयोग करुन घेत आहोत व त्यासाठी अजून निधीची मागणी करीत आहोत. जलसिंचनाचे काम लवकरात लवकर झाले पाहिजे. मोठी धरणे झाली तरी त्यांची कामे पूर्ण होण्यास काही मर्यादा येतात त्यामुळे आपल्याला जलसंधारणाशिवाय पर्याय नाही. 70-80 टक्के क्षेत्र हे आपल्याला जलसंधारणाखालीच आणावे लागणार आहे. त्यामुळे आम्ही जलसंधारणाचे काम हाती घेतले व या कामाला आता चांगली गती आलेली आहे. शासनाने गतिमान कार्यक्रम म्हणून एक कार्यक्रम राबविला आहे. ज्या पाणलोट क्षेत्राचे काम अपूर्ण आहे ते काम पूर्ण करण्याकरिता आपल्याकडे जो निधी उपलब्ध आहे तो चांगल्या प्रकारे खर्च करुन मागील वर्षी आम्ही 310 पाणलोट क्षेत्राचे काम केले असून प्रत्येक तालुक्यात एक पाणलोट क्षेत्राचे काम पूर्ण केलेले आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

या वर्षी एक हजार पाणलोट चांगल्या पध्दतीने पूर्ण करणार आहोत. आपल्याला शेतकऱ्यांची परिस्थिती बदलावयाची असेल तर प्रथम त्यांच्यासाठी पाण्याची व्यवस्था केली पाहिजे. माननीय पंतप्रधांनानी विकास दर चार टक्के करण्याकरिता राष्ट्रीय विकास परिषदेमध्ये कृषी संदर्भात निर्णय घेतला. त्यास ठराव क्रमांक 53 म्हणतात. राष्ट्रीय विकास परिषदेने आपणास 25 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले आहे. या पॅकेजच्या माध्यमातून कोणती कामे घेणार आहात असे विचारण्यात आल्यानंतर कापूस पट्टयातील भागात शेततळे घेण्याची परवानगी द्यावी असे सांगण्यात आले. एका बाजूला संपूर्णपणे बांध बंदिस्त करुन शेतीचे पाणी अडवायचे आणि ते शेतात उतरावयाचे अशा प्रकारचा कार्यक्रम आपण घेत आहोत. जवळपास तीन लाख शेततळ्याचा कार्यक्रम आपण घेत आहोत. मागील वर्षी 1000 शेततळ्यांचा तर जेथे खारपाण पट्टा आहे तेथे 1500 शेततळ्यांचा कार्यक्रम हाती घेतला. अशी एकूण 2500 शेततळी मे पर्यंत पूर्ण करीत आहोत. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, सर्व कार्यक्रम कागदपत्रांवर राहतात. वस्तुस्थिती अशी आहे की, पाऊस झ ाल्यानंतर खरीप पिके निघेपर्यंत शेतात मशीन लावू शकत नाही. तेव्हा आम्ही असा निर्णय घेतला की, शेततळ्यांची कामे मशीनने करुन घ्यावीत. कशा पध्दतीने शेततळे घ्यायचे ते शेतकऱ्याने पहावे. शेततळ्याचे काम पूर्ण झाल्यावर त्याच्या नावाने चेक द्यायचा. या आदेशाची तालुक्याच्या ठिकाणी व गावोगावी जाऊन माहिती देण्यात येत आहे. अशारितीने क्लस्टर्स तयार होतील आणि मशीनवाल्यांना देखील काम परवडेल. अगोदर सांगितल्याप्रमाणे आम्ही तीन लाख शेततळ्यांचा कार्यक्रम हाती घेतला आहे. फेब्रुवारीपर्यंत शेतात पिके असल्यामुळे शेततळ्याचे कामे पूर्ण होणार नाही. परंतु मे महिन्यापर्यंत कापूस पट्टयात 40 हजार शेततळे पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची अडचण येईल त्यावेळी या शेततळ्यातील पाणी पिकाला देता आले पाहिजे असा उद्देश आहे. अशाप्रकारे शेतीला पाणी मिळेल शिवाय पाणी जमिनीत झिरपल्यास विहिरीस लागेल. अशाप्रकारचा कार्यक्रम आम्ही जलसंधारणाच्या माध्यमातून घेत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.....

सभापती महोदय, याठिकाणी मालगुजारी तलावाबाबत चर्चा झाली. राष्ट्रीय विकास योजनेमध्ये मालगुजारी तलाव घेण्याचे काम सुरु करीत आहोत. त्यासाठी 20 कोटी रुपये मिळाले आहेत. रोजगार हमी योजना मंत्री यांनी राष्ट्रीय विकास परिषदेचा काही निधी आणि रोजगार हमी योजनेचा काही निधी एकत्र करुन त्यातून मालगुजारी तलावाचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने पाणलोट करीता एक चांगली योजना आणली आहे. "वसुंधरा" असे त्या योजनेचे नाव आहे. वसुंधरा म्हणजे समृध्द पृथ्वी. एकूण 44 हजार गावे आहेत. त्या सर्व गावातील पाणलोट ऑन लाईन करणार आहोत. मला याठिकाणी अभिमानाने सांगावेसे वाटते की, अशाप्रकारचे पाणलोट क्षेत्र ऑन लाईन करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे. 22 हजार गावांतील पाणलोटाची माहिती वेबसाईटवर टाकलेली आहे. पाणलोटाचे कोणकोणती कामे कशी झाली आणि पुढे कशी करायची याची माहिती दिलेली आहे. या सर्व पाणलोटचे कंट्रोल रुममध्ये बसून मॉनेटरींग करता येईल, रिव्हाल्यूशन करता येईल अशी व्यवस्था आपण करीत आहोत.

सभापती महोदय, याठिकाणी पॅकेजवर चर्चा झाली. मी या निमित्ताने एक गोष्ट सांगू इच्छितो की, पंतप्रधान पॅकेज आणि राज्याचे पॅकेज असे एकूण पाच हजार कोटी रुपयांचे पॅकेज आहे. यातील बरीचशी रक्कम चेकद्वारे बँकेला आणि सहकारी संस्थेला दिलेली आहे. तसेच शेतकऱ्यांना जी मदत करण्यात आलेली आहे ती सुध्दा चेकच्या माध्यमातून दिलेली आहे. या पॅकेजच्या माध्यमातून इरिगेशनकरिता मोठी मदत होत आहे. याठिकाणी 150 कोटी रुपयांच्या पॅकेजची चर्चा होत आहे.

यानंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ....

या संदर्भात जर बारकाईने पाहिले तर त्यामध्ये चुका झालेल्या नाहीत असे नाही. त्यात काही गोष्टीमध्ये निश्चित चुका झालेल्या शासनाला आढळून आल्या आहेत. परंतु ज्या ठिकाणी चुकीचे आढळून आले होते त्याबाबतीत शासनाने कोणालाही क्षमा केली नाही. वर्धा येथे गांडूळ शेडच्या बाबतीत काही प्रश्न निर्माण झालेले आहेत असे शासनाला आढळून आले होते. त्यामुळे तेथील जिल्हाधिकारी आणि जिल्हा कृषी अधिकारी यांची विभागीय चौकशी .सुरु केलेली आहे. त्यामुळे कोणालाही पाठीशी घालण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार नाही. अकोट जिल्ह्यामध्ये सुध्दा काही चुकीच्या गोष्टी झाल्याचे शासनाला आढळून आले होते. माननीय विराधी पक्ष नेतेसुध्दा एक गोष्ट मान्य करतील की कधीही या अधिका-याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले नव्हते परंतु कृषी अधिकारी तसेच जे संबंधित अधिकारी होते ते दोन महिने जेलमध्ये होते. ज्या ठिकाणी चुकीचे आढळून आले आहे त्या बाबतीत कोणालाही माफ केले जाणार नाही. विरोधी पक्ष नेत्यांनी काही अधिका-याच्या संदर्भात मुद्दा मांडला होता त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो
की , श्री.सांगळे यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. लवकरात लवकर त्या संदर्भात निर्णय होईल अशी मी या निमित्ताने ग्वाही देतो.

सभापती महोदय, बैलगाडयांच्या संदर्भात येथे बरीच चर्चा झालेली आहे. आपण मार्केटींग फेडरेशन ,एम.एस.एस.आय.डी.सी. , एम.ए.आय.डी.सी. यांच्या मार्फत वस्तू खरेदी करीत असतो आपण वस्तूची मागणी त्यांच्याकडे नोंदवतो व त्यांनी वस्तुंचा पुरवठा करावयाचा असतो. एम.एस.एस.आय.डी.सी.ही लघू उद्योग चालविणारी एक संस्था आहे. ते टेंडर प्रसिध्द करतात आणि ज्यांचे टेन्डर सर्वात कमी असते त्यांना हे काम दिले जाते. जालना येथील "जगदंबा" ही बैलगाडी बनविणारी कंपनी असून त्याच्या कामामध्ये शासनाला काही त्रुटी आढळून आल्या होत्या, यवतमाळ मध्ये वाटप करण्यात आलेल्या बैलगाडयांमध्ये जे दोष आढळून आले होते त्याबाबतीत दुरुस्ती करण्यासाठी एम.एस.एस.आय.डी.सी.वर जबाबदारी टाकली आहे. त्याचबरोबर ज्या अधिका-यांनी गुणवत्ता तपासून घ्यावयास पाहिजे होती त्यांनी गुणवत्ता तपासली नाही त्यांनासुध्दा शिक्षा देण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी वस्तूच्या खरेदीसबंधी दोन मुद्दे मांडले होते. वस्तुच्या किंमती जास्त लावण्यात आल्या होत्या असे त्यांनी सागितले होते. त्याबाबतीत मी

( वेळ संपल्याची बेल वाजविण्यात येते )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ....

थोडक्यात खुलासा करतो. या ठिकाणी त्यांनी आरोप केलेले आहेत त्याबाबतीत जर खुलासा झाला नाही तर गैरसमज राहू शकतात. बॅटरी ऑपरेटेड पंप खरेदीच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, पूर्वीची जिल्हा परिषदेची जी यादी होती त्यातून या पंपाची खरेदी करण्यात आला होती . बॅटरी ऑपरेटेड पंप 1500 रुपयांचा होता परंतु तो 4500 रुपयास विकला गेला. परदेशातून हा पंप आणला होता व त्याची किंमत 1 हजार 890 होती, कस्टम डयुटी, चीन मधून आणण्याची भाडे, इन्सपेक्शन चार्जस, पॅकीग चार्जेस,त्याचबरोबर आपण केलेली वाहतूक विचारात घेता ही किंमत 3 हजार 172 रुपये होते. त्याचबराबर येथील काही खर्च विचारात घेता 3 हजार 622 रुपये खर्च झाला असून तो पंप 4100 रुपयास विकण्यात आला होता.ही वस्तुस्थिती मी या सभागृहात अत्यंत जबाबदारीने सांगत आहे.

सभापती महोदय, आणखी एका पंपाच्या बाबातीत उल्लेख करण्यात आला होता की 350 रुपयांचा पंप जास्त किंमतीस विकण्यात आला होता. ज्यावेळी टेन्डर भरण्यात येते त्यावेळी त्याला ही वस्तू किती किंमतीला पडली आहे हे पहाण्याची व्यवस्था नसते. परंतु त्या बाबतीत सुध्दा सगळे बदल केलेले आहेत आणि त्या वस्तुची उत्पादनाची किंमत काय होती हे सुध्दा पाहिले जावे अशी काळजी आपण आता घेत आहोत. त्या पंपाच्या बाबतीतसुध्दा निरनिराळे खर्च एकत्रित करुन 1500 रुपयाला तो विकण्यात आला आहे. त्या पंपाची वास्तव किंमत एक हजार रुपये होती आणि 1500 रुपयास विकण्यात आला असून एका पंपामागे 500 रुपये जास्त देण्यात आले होते हे मी मान्य करतो परंतु आता या सगळया गोष्टीची दुरुस्ती शासन करीत आहे. पॅकेज जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे राबविले जावे या दृष्टीने शासनाचा प्रयत्न राहणार आहे. कृषी मंत्री या नात्याने मी सांगू इच्छितो की ,ख-या अर्थाने शेतक-यांना पाण्याचे पॅकेज हेच खरे पॅकेज राहणार आहे त्याला एका पाण्याची शाश्वती दिली तर त्याला समृध्दी येईल असे माझे् मत आहे असे सर्व सन्माननीय सदस्यांना सांगून माझे भाषण मी येथेच संपवितो.

----

नतर श्री. सुबरे

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुंरग फुंडकर यांनी नियम 260 अन्वये एक महत्त्वाचा प्रस्ताव येथे मांडला आणि त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. याबाबतीत ज्या 8-10 सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मंडले आहेत त्यात साधारणत: चार विभागांमध्ये या प्रस्तावाच्या अनुषंगाने त्यांच्या मनातील शंका किंवा मागण्या पुढ आणल्या आहेत. केंद्र सरकारने जे कर्जमाफीचे धोरण जाहीर केले त्या संदर्भातील राज्यातील नेमके चित्र काय आहे याचाही खुलासा या निमित्ताने होणे आवश्यक आहे हा एक मुद्दा त्यात आहे. त्यानंतर या राज्यातील सावकारीच्या बाबतीत नव्याने होणाऱ्या कायद्याच्या बाबतीत देखील खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच तिसरा मुद्दा म्हणजे ज्या शेतकऱ्यांचे कर्ज माफ झाले किंवा ज्या शेतकऱ्यांचे कर्ज आपण योजनतून भरलेले आहे त्या शेतकऱ्यांना खरीप आणि रब्बी हंगामासाठी नव्याने कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही वा त्यात अडचणी येत आहेत हाही विषय येथे उपस्थित करण्यात आला आहे आणि चौथा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, कर्जमाफीतून राहिलेल्या शेतकऱ्यांच्या बाबतीतील कर्जमाफीच्या संदर्भात हे सरकार काय निर्णय घेणार आहे असे हे चार मुद्दे प्रामुख्याने या चर्चेतून पुढे आलेले आहेत की ज्यावर येथे खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने 71 हजार कोटी रूपयांची योजना जाहीर केली आणि त्या योजनेंतर्गत आपल्या राज्यात जवळपास 37 लाख 61 हजार शेतकऱ्यांना 7 हजार 769 कोटी एवढी रक्कम ही आपल्या राज्याला मंजूर झालेली आहे आणि मला असे वाटते की, 7,769 कोटी रूपये इतकी रक्कम मिळणारे हे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. त्याचे कारण असे आहे की, शेवटी आपल्याकडे कर्ज घेण्याची, कर्ज देण्याची आणि कर्ज फेडण्याची वेळ तशी प्रत्येकावर येत असते पण कर्ज कोणाला मिळते ? तर ज्याची ते फेडण्याची पात्रता आहे त्यालाच कर्ज मिळू शकते. म्हणून हे एवढे मोठे कर्ज माफ करण्यासाठी म्हणून आपल्या राज्याला ही एवढी मोठी रक्कम देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आणि त्याचा फायदा आपल्या राज्याला मोठ्या प्रमाणात झाला आहे. मध्यंतरीच्या काळात या संदर्भात एक मागणी पुढे आली. विशेषत: ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, भंडारा आणि गोंदिया या सात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या योजनेपासून फायदा होत नव्हता. म्हणून महाराष्ट्र सरकारने खास बाब म्हणून 141 कोटी रूपये यामध्ये देण्याच्या बाबतीतील निर्णय घेतला. तत्कालीन सहकार

...... 3क्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ....

मंत्री यावेळी येथे आपल्यात उपस्थित आहेत. त्यांनी देखील या कामामध्ये पुढाकार घेतला होता आणि आज मोठ्या प्रमाणात कर्जमाफी करण्याचा निर्णय आपण केलेला आहे. सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, या कर्ज माफीचा निर्णय झाल्यानंतर, मग ते पाच एकराखालील शेतकरी असतील, ती संख्या जवळपास साडेसव्वीस लाख आहे, त्यांचे पाच एकराखालील कर्ज माफ झाले. माफ झाले म्हणजे केंद्र सरकारने ते कर्ज भरले आहे. पण साधारणत: साडेसहा ते सात लाख शेतकरी असे आहेत की, जे 25 टक्के, वन टाईम सेटलमेंटच्या केंद्र सरकारच्या योजनेत बसले आहेत. त्यामुळे या व्यतिरिक्त राहिलेला असा जो शेतकरी आहे त्या शेतकरीवर्गामध्ये एक मोठी नाराजी निर्माण झाली आणि ती वेळोवेळी व्यक्तही होत आहे की, आम्ही नियमित कर्जफेड करतो, त्याने आम्हीही थकलो आहोत, आम्ही पाच एकरावरील शेतकरी जरूर आहोत आणि म्हणून आम्हाला या कर्जमाफी योजनेचा काडीमात्र फायदा होत नाही. अशी नाराजी असणारा मोठा वर्ग आहे. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, आम्हाला या कर्जमाफीचे ब्रेकअप पाहिजे आहे. म्हणजे विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र आणि कोकण यामध्ये किती कर्जमाफी झाली आणि किती खातेदारांना त्याचा लाभ झाला आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, केंद्र सरकारने या कर्जमाफीच्या संदर्भात एक टास्कफोर्स निर्माण केलेला होता. केंद्र सरकारच्या वित्त विभागातील प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती निर्माण केली होती आणि या योजनेत काही त्रुटी असतील तर त्या या राज्याने पुन्हा एकदा केंद्र सरकारला सादर कराव्यात. त्याप्रमाणे माझ्या विभागाच्या सचिवांनी, आयुक्तांनी वारंवार केंद्राकडे आम्ही मागणी केली. 71 हजार कोटी रूपयांचे पॅकेज आपल्याला केंद्र सरकारने मंजूर केले. प्रत्यक्षपणे 60 हजार कोटी रूपयांपर्यंतची माफीची रक्कम देण्याचे केंद्राने तत्त्वत: निर्णयही केला. आता त्या 71 हजार मधील 11 हजार कोटी रूपये शिल्लक आहेत तेव्हा आमचा हा पहिला प्रयत्न राहणार आहे की, त्या राहिलेल्या 11 हजार कोटीमध्ये देखील राहिलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जाच्या फेडीसाठीचा आपला वाटा उचलावा. त्यादृष्टीने आमच्या सहकार विभागामार्फत एक जाणीव पूर्वक प्रयत्न आम्ही केलेला आहे.

( यानंतर श्री. सरफरे ..... 3आर 1 ..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील...

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेबांनी विभागनिहाय कर्जमाफीची माहिती देण्यात यावी असे सांगितले. त्यानिमित्ताने मी सांगू इच्छितो की, यामध्ये एकूण 37 लाख 82 हजार शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात आली आहे. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्रामध्ये 15 लाख 62 हजार शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले, कोकणामध्ये 1 लाख 68 हजार शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले, मराठवाडयामध्ये 7 लाख 72 हजार शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले, विदर्भामध्ये 12 लाख 80 हजार शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले. अशाप्रकारे 37 लाख 82 हजार शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले. सभापती महोदय, ही आकडेवारी टक्केवारीमध्ये सांगावयाची झाल्यास पश्चिम महाराष्ट्रामध्ये 60 टक्के रक्कम कर्जमाफीमध्ये माफ झाली, कोकणामध्ये 2 टक्के रक्कम कर्जमाफीमध्ये माफ झाली, मराठवाडयामध्ये 20 टक्के रक्कम कर्जमाफीमध्ये माफ झाली, विदर्भामध्ये 18 टक्के रक्कम कर्जमाफीमध्ये माफ झाली. अशाप्रकारे एकूण 7 हजार 871 कोटी इतकी रक्कम कर्जमाफीमध्ये माफ झाली. आणि म्हणून याबाबतीत जी रक्कम प्राप्त झाली त्यामध्ये 50 टक्के रक्कम केंद्र सरकारने आपल्याला उपलब्ध करुन दिली. या योजनेमध्ये जवळपास 3 हजार 52 कोटी एवढी रक्कम 50 टक्केच्या हप्त्यात केंद्र सरकारने राज्य सरकारला उपलब्ध करुन दिली. उर्वरित 50 टक्के रकमेचा हप्ता लवकरच प्राप्त होईल असे आश्वासन आपल्याला देण्यात आले आहे. सभापती महोदय, ही रक्कम येऊन सुध्दा एक गोष्ट सांगितली पाहिजे की, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी खरीप आणि रब्बी हंगामामधील शेतकऱ्यांना नवीन कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत दोन वेळा मुद्दा उपस्थित केला आहे. ती शेती सुध्दा समाधानकारक आहे असे मी मानत नाही. याचे कारण असे की, 2007-08 मध्ये राज्यामध्ये 9 हजार 200 कोटींचे कर्ज वाटप झाले. राष्ट्रीयीकृत बँकाच्या माध्यमातून 4 हजार 400 कोटींचे कर्ज वाटप झाले. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून 4 हजार 800 कोटींचे कर्जवाटप झाले. त्याच्या अगेंन्स्ट यावर्षी सन 2008-09 मधील आकडेवारी पाहिलीतर या राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून 2 हजार 200 कोटींचे कर्ज वाटप झाले, राष्ट्रीयीकृत बँकांच्या माध्यमातून सुमारे 2100 ते 2200 कोटींचे कर्ज वाटप झाले. म्हणजे यावर्षी खरीप आणि रब्बी हंगामासाठी 50 टक्के कमी कर्ज पुरवठा झाला ही वस्तुस्थिती रेकॉर्डवर आपणास पहावयास मिळते. हे कर्जवाटप कमी कां झाले? याच्या खोलात आपण गेलात तर त्याची दोन महत्वाची

DGS/ KGS/ KTG/ MMP/ SBT/

श्री. हर्षवर्धन पाटील...

कारणे आहेत. यामध्ये एक म्हणजे स्केल ऑफ फायनान्स आहे, त्यासाठी जिल्हा पातळीवर समिती आहे. त्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन हे त्या समितीचे चेअरमन आहेत, तसेच दोन शेतकरी सभासद आहेत. त्या समितीने केलेल्या शिफारशीप्रमाणे स्केल ऑफ फायनान्स तयार केले जाते. त्यामध्ये मोठया प्रमाणावर व्हेरिएशन आढळले. दुसरे महत्वाचे कारण असे की, यावर्षी फक्त 10 ते 12 टक्के शेतकऱ्यांची अशी भावना झाली आहे की, सरकार आपल्याला कर्जमाफी देत नाही तर मग वेळेवर कर्ज फेडून फायदा काय? अशाप्रकारची शेतकऱ्यांची भावना होणे स्वाभाविक आहे. ज्यांचे कर्ज थकलेले आहे त्याला मात्र कर्जमाफी आणि जे प्रामाणिकपणे कर्ज फेडतात त्यांना मात्र माफीचा फायदा मिळत नाही. त्यामुळे पुढील कर्ज माफ होणार आहे या भावनेने वसूली झालेली नसेल. ही वसूली न झाल्यामुळे रब्बी आणि खरीप हंगामामध्ये वाटप कमी झाले. याबाबत कालच आयुक्तांना आणि सचिवांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. तसेच, एम.एस.सी. बँकेचे चेअरमन, एम.डी. आणि संबंधित त्या त्या जिल्हाधिकाऱ्यांना आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या चेअरमनना सांगितले आहे की, आपापल्या भागात रब्बी हंगामासाठी जे जे शेतकरी कर्जाची मागणी करण्यासाठी पुढे येतील त्यांना तातडीने कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावे अशा सूचना दिल्या आहेत.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील ......

सन्माननीय सदस्यांचे भाषण चालू असताना त्यांनी वर्तमानपत्रातील जी बातमी वाचून दाखवली ती बातमी सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांच्याकडून मी उपलब्ध करुन घेतली आणि त्या बातमीच्या कागदावरच मी सचिवांना आदेश दिले की, त्यासंदर्भात आपण दोन दिवसात कारवाई करावी. याचे कारण असे की, जर कोणताही कर्ज घेण्यास पात्र असलेला शेतकरी बँकेकडे गेला आणि बँक त्याला कर्ज देण्यामध्ये कमी पडत असेल तर निश्चितपणे कारवाई करण्यामध्ये आम्ही कमी पडणार नाही, हा विश्वास मी सभागृहाला देऊ इच्छितो.

सभापती महोदय, दुसरा एक मुद्दा सातत्याने सभागृहामध्ये चर्चेला येतो की, जे राहिलेले शेतकरी आहेत त्या शेतकऱ्यांच्या बाबतीत सरकार काय करणार ? त्याचबरोबर सावकारकीच्या बाबतीत सन्माननीय सदस्य बोलले. त्यासंबंधी सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे. मुंबई सावकारी कायदा, 1946 या कायद्याच्या आधारे आपण आतापर्यंत राज्यामध्ये कारवाई करीत होतो परंतु साधारणत: त्या कायद्याचे कलम 13(ब) वादग्रस्त ठरले आणि असिस्टंट रजिस्ट्रारच्या काही आदेशांना बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्या लोकांनी कोर्टामध्ये आव्हान दिले. दुर्दैवाने कलम 13(ब) चा आधार काही लोकांना मिळाला आणि त्याची अंमलबजावणी करण्यामध्ये आमच्या विभागाला थोडा त्रास होतो, ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. सन्माननीय मंत्रिमहोदय डॉ. कदम साहेबांनी महाराष्ट्र सावकारी अधिनियम, 2008 हा नवीन कायदा राज्याकरिता तयार केलेला आहे. त्या कायद्याचा मसुदा जवळपास तयार झालेला आहे. त्यामध्ये जी महत्वाची सुधारणा करीत आहोत ती म्हणजे इमुव्हेबल प्रॉपर्टीच्या संदर्भामध्ये जो लॅक्युना होता, ज्या प्रॉपर्टीच्या संदर्भामध्ये केंद्र सरकारची मान्यता घेणे आवश्यक आहे, तो प्रस्ताव विधी व न्याय विभागाने शिफारस करुन आमच्याकडे दिलेला आहे. त्याला आम्ही तातडीने केंद्र सरकारची मान्यता घेऊ. मागे मी सभागृहाला आश्वासित केले आहे की, हा कायदा मार्चच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेऊ. केंद्राची मान्यता लवकर मिळाली तर आम्ही अध्यादेश काढण्याच्या बाबतीत सुध्दा कमी पडणार नाही. ज्या क्षणी आम्हाला केंद्राची मान्यता मिळेल त्या क्षणी सर्वसमावेशक महाराष्ट्र सावकारी कायदा, 2008 या राज्याला लागू करण्याच्या बाबतीत कोणतीही

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KTG/ KGS/ SBT

श्री. हर्षवर्धन पाटील ......

अडचण राहणार नाही, हे मला या सदनाला सांगावेसे वाटते. या सावकारकीच्या बाबतीत साधारणपणे आज सकृतदर्शनी 5800 प्रकरणे आलेली आहेत. आजच्या वर्तमानपत्रामध्ये नागपूरची एक बातमी आलेली आहे. याबाबतीत आपण पाहिले तर मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना बेकायदेशीरपणे सावकारकीच्या माध्यमातून अडविण्याचा प्रयत्न होत आहे. त्याबाबतीत मी आता भाष्य करु इच्छित नाही कारण बऱ्याच वेळा याची चर्चा झालेली आहे. मान्यता मिळाली तर यासंदर्भात या राज्यामध्ये लवकरात लवकर अध्यादेश काढण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण राहणार नाही. सगळ्यात महत्वाचा मुद्दा असा की, राज्य सरकार याबाबतीत काय धोरण स्वीकारणार आहे ? केंद्र सरकारच्या कर्ज माफी योजनेमध्ये कोणते शेतकरी वंचित राहिले याचा या सदनामध्ये विचार होणे आवश्यक आहे. यामध्ये साधारणत: 6 ते 7 कॅटेगरीजमधील शेतकरी केंद्र सरकारच्या कर्ज माफीपासून वंचित राहिले आहेत. पहिली कॅटेगरी अशी की, ज्या शेतकऱ्याची जमीन धारणा 5 एकराच्या वर आहेत ते या कर्ज माफीमध्ये बसलेले नाहीत. त्याची माहिती काढण्याचा आम्ही प्रयत्न केला. 31 मार्च, 1997 पूर्वी ज्यांनी कर्ज घेतले असेल ते या कर्ज माफीला पात्र नाहीत असे केंद्र सरकारचे धोरण होते. केंद्र सरकारची योजना 1.4.1997 पासून 31 मार्च, 2007 पर्यंत थकलेल्या पाच एकराच्या आतील कर्जाच्या बाबतीत आहे. आम्ही याबाबत माहिती काढली. 1997 पूर्वीचे खातेदार शेतकरी 3 लाख 55 हजार आहेत आणि त्याची रक्कम साधारणत: 1030 कोटी रुपये आहे. दुसरी कॅटेगरी कृषी पूरक संलग्न अशा ज्या संस्था आहेत त्यांची आहे. त्या संस्थांमध्ये घेतलेले कर्ज सुध्दा या कर्जमाफीमध्ये पात्र नव्हते. त्याचीही माहिती काढण्याचा प्रयत्न केला. यामध्ये साधारणत: 2 लाख 29 हजार शेतकरी असून त्याची रक्कम सुमारे 529 कोटी रुपये आहे. त्याबद्दलची माहिती तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.....

त्यानंतर ज्या ग्रामीण बिगर शेती पतसंस्था आहेत त्याबाबतचा मुद्दा स्पष्ट होणे आवश्यक आहे. ॲग्रिकल्चर आणि को-ऑपरेटिव्हकरिता कोणतेही कर्ज असेल त्याबाबत केंद्र सरकारचा पहिला निर्णय आला. त्यामुळे शासनाने अंदाज काढला होता. सहकारी पतसंस्था या कर्जमाफीला पात्र ठरणार आहेत असे त्यांना वाटल्यामुळे ते सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर बोलले होते. पण केंद्र सरकारच्या निकषानुसार ग्रामीण बिगर पतसंस्था आहेत त्या मात्र या कर्जमाफीला पात्र ठरणार नाहीत असे स्पष्ट झाल्यावर याबाबत मोठा प्रश्न निर्माण झाला. कारण ग्रामीण बिगर शेती पतसंस्था असेच त्यांचे रजिस्ट्रेशन झालेले आहे. त्यामुळे शेतीच्या कर्जाशी त्याचा संबंध येत नाही. बायलॉजमध्ये ते येत नाही असा केंद्र सरकारने मुद्दा निर्माण केल्यामुळे या संस्था पात्रतेमध्ये बसल्या नाहीत. त्यामुळे 2006 मध्ये बायलॉजमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आहे. काही संस्थांनी बायलॉजमध्ये सुधारणा केली आणि शेतक-यांना शेतीसाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यासंबंधी निर्णय घेतला. त्या संस्थांचे म्हणणे असे आहे की, आम्ही बायलॉजमध्ये दुरुस्ती केलेली आहे, आम्ही शेतक-यांना कर्ज दिलेले आहे. त्यामुळे त्याही या माफीमध्ये बसल्या पाहिजेत. ती माहिती सुध्दा काढण्याचा प्रयत्न सहकार विभागाने केलेला आहे. शासनाने आपले धोरण जाहीर करीत असताना प्रत्येक कॅटेगरीची माहिती काढण्याचे काम केलेले आहे. त्यातून 86 हजार शेतक-यांबाबतची माहिती पुढे आली....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सहकार विभागामार्फत मल्टि स्टेट अर्बन बँकांची यादी मागविली होती. त्या बँकांचा यात समावेश आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या पतसंस्थांची माहिती उपलब्ध आहे. त्यांची बेरीज करावी लागेल. त्याची किंमत होते ते पाहून विचार करावा लागेल. त्यानंतर मंत्रिमंडळासमोर जावे लागेल. त्यानंतर शासनावर किती आर्थिक भार येणार आहे ते स्पष्ट होईल. यासंबंधी शासनाला निश्चित घोषणा करावी लागेल. सभापती महोदय, उपसा सिंचना योजना, कुक्कुट पालन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय या व्यवसायासाठी सुध्दा काही शेतक-यांनी कर्ज

2...

श्री.हर्षवर्धन पाटील......

घेतलेले आहे. त्याची माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. या राज्यात नियमित कर्ज फेडणारे 26 लाख शेतकरी आहेत. जे बँकांचे, सरकारचे नियम पाळतात. त्यांच्या कर्जाची रक्कम 6239 कोटी रुपये इतकी आहे. हे मी सभागृहाला मुद्दाम सांगू इच्छितो. सभापती महोदय, याबाबत निर्णय घेण्यामध्ये सहा महिने गेले, वर्ष गेले पण यानंतर तरी निर्णय घ्यावा लागणार आहे. याबाबत निर्णय घेणे सोपे नाही. निर्णय घ्यावयाचा असेल तर निश्चित धोरण स्वीकारावे लागेल. शेतक-यांचा 7/12 कोरा करावा असे बोलणे सोप असते. हे वाटते तेवढे सोपे नाही, कारण तेवढी रक्कम भरावी लागेल. तलाठयासारखे हे काम नाही. तसेच थकित अल्प मुदतीचे कर्ज हा विषय देखील यामध्ये आहे. ही सगळी माहिती एकत्रित करुन शासनाने एक प्रस्ताव तयार केलेला आहे. या राज्यातील शेतक-यांच्या कर्जमाफीबाबत हे अधिवेशन संपण्यापूर्वी सरकारकडून सकारात्मक निर्णय घेतला जाईल असे मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामाबाबत देखील याठिकाणी विचार मांडले गेले. यासंबंधी सन्माननीय महसूल मंत्री बोलतील. महसूल विभागाने त्याबाबत जी.आर.काढला आहे. एक कि.मी. किंवा दीड कि.मी. अंतरावर मजुरांना रोजगार हमी योजनेचे काम उपलब्ध करुन देणे, कुशल व अकुशल कामांना परवानगी देणे.......

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 17:10

(श्री. हर्षवर्धन पाटील...)

त्याचप्रमाणे सर्व परिसरामध्ये जिल्हाधिका-यांना रोजगार हमी योजनेची 50 लाखापर्यन्तची कामे मंजूर करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. हे सर्व निर्णय स्थायी आदेशाप्रमाणे निश्चितपणे घेतले जातील हे मला येथे सांगावयाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत रोजगार हमी योजनेच्या कामाच्या बाबतीत काही अडचण येणार नाही असे मी सदनाला आश्वासित करु इच्छितो. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी पणनच्या संदर्भात काही मुद्दे उपस्थित केले. माननीय पणन मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यानी यासंदर्भात बैठका घेतलेल्या आहेत. जेथे जेथे केन्द्रे सुरु करण्याची मागणी केलेली आहे तेथे तेथे ती सुरु करण्याच्या संदर्भातील निर्णय त्या विभागामार्फत घेतला जाईल. कर्ज माफीच्या महत्वाच्या विषयाच्या संदर्भातील निर्णय हे अधिवेशन संपण्यापूर्वी करण्यामध्ये कोणीही मागे राहाणार नाही याची मी ग्वाही देऊ इच्छितो आणि सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेऊन महत्वाच्या सूचना केल्या बद्दल मी त्यांचे आभार मानतो.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ही चर्चा विदर्भापुरती होती. विदर्भासाठी हे शासन काय देणार आहे ? विदर्भातील शेतकरी वेगळया अपेक्षेने शासनाकडे पहात आहे. शासनाने संपूर्ण राज्याच्या संदर्भातील धोरण येथे सांगितले. मी विदर्भाच्या संदर्भात दोन-तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित केलेले आहेत. विदर्भातील प्रोसेसिंग युनिटस, कारखाने, सूत गिरण्या बंद आहेत त्या संदर्भात शासन कोणता निर्णय घेणार आहे हे याठिकाणी सांगितलेले नाही.

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम (महसूल, मदत व पुनर्वसन मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यानी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावातील सर्व बाजू मांडण्याचा सकारात्मक प्रयत्न येथे केलेला आहे. या प्रस्तावावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख, अत्यंत भावनाप्रधान आणि भावूक भाषण करणारे सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गो-हे, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि अन्य काही सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपले विचार याठिकाणी मांडलेले आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते आपले विचार मांडत असताना जे म्हणाले ते खरे आहे की, विदर्भातील आत्महत्येच्या प्रश्नामुळे या देशाचे पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग हे विदर्भामध्ये येऊन दोन दिवस थांबले, येथील परिस्थितीचा त्यांनी आढावा घेतला आणि दिल्लीला गेल्यानंतर संपूर्ण देशासाठी एक ऐतिहासिक अशी कर्ज माफीची योजना केन्द्र सरकारने जाहीर केली. यामध्ये युपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी, पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग, कृषीमंत्री श्री. शरद पवार आणि अर्थमंत्री श्री. पी. चिदंबरम यांनी हा धाडसी निर्णय घेतला. पार्लमेंटमध्ये केन्द्रीय अर्थमंत्री असे म्हणाले होती की, "all co-operative organisations"ची कर्जे माफ होतील. त्यानंतर त्यासंदर्भात पत्रे येऊ लागली. सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी देखील फार चांगली सूचना केली. परंतु प्रत्यक्षात जेव्हा ऑर्डर्स् आल्या त्यावेळी ब-याच संस्था त्यांनी वगळल्या आणि त्याचा उल्लेख माननीय सहकार मंत्र्यांनी आपल्या भाषणात केलेला आहे. पत संस्थांना कर्जाच्या 20 टक्के सूट देण्यासंबंधी लेखी ऑर्डर्स देण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांचाही समावेश यामध्ये झाला पाहिजे असा आग्रह धरण्यात आला. कर्ज माफीचा निर्णय लवकर घेतला पाहिजे हे खरे आहे. गेल्या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना महाराष्ट्र शासन यासंबंधात ठोस निर्णय घेईल असे सांगितले होते.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

मधल्या काळात पाच जिल्हा परिषदांच्या निवडणुका लागल्या, त्यामुळे आचारसंहिता लागू झाली. शिवाय काही दिवसानंतर हिवाळी अधिवेशन येणार होते. हा सर्वात मोठा व महत्वाचा निर्णय आपण अधिवेशनात घेऊ असे ठरले. त्यानंतर माननीय सहकार मंत्री श्री. हर्षवर्धन पाटील आले. ते या प्रक्रियेमध्ये सुरुवातीपासून आहेत. त्यांनी या प्रक्रियेमध्ये आणखी सुधारणा केलेली आहे. आणि त्यांनी आता सांगितल्याप्रमाणे अधिवेशन संपण्यापूर्वी हा प्रस्ताव येईल. या पॅकेजचे काय झाले ? या पॅकेजचा काही उपयोग झाला नाही अशा प्रकारची चर्चा करण्यात काही अर्थ नाही असे मला वाटते. माननीय पंतप्रधानांनी विदर्भातील सहा जिल्हयासाठी पॅकेज दिले होते, ते 92 टक्के एक्झिक्यूट झालेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे पॅकेज 114 टक्के एक्झिक्यूट झाले आहे. या पॅकेजमध्ये काही गडबडी झाल्या आहेत. त्यासंबंधी वसंतराव नाईक इन्स्टीटयूटचे मॅनेजींग डायरेक्टर, शासनाचे सिनियर आय.ए.एस. ऑफिसर यांची कमिटी नेमली आहे. या कमिटीचा अहवाल अजून आलेला नाही. मी आपल्याला अभिवचन देतो की, या कमिटीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर यात कोणी गडबड केली असेल मग तो कोणत्याही पक्षाचा असो, कितीही मोठा नेता असो, " Peoples calamity is somebodys opportunity "असे म्हटले जाते. असे जर कोणी काही केले असेल तर निश्चितपणे त्यांचेविरुध्द कारवाई करण्यात येईल. या ठिकाणी चर्चा झाली की, शेतक-यांच्या आत्महत्या वाढता आहेत. मी यासंबंधीची सर्व आकडेवारी सांगणार नाही. परंतु 2006 साली एकूण 1448 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी शेती आणि शेतीशी निगडीत 165 आत्महत्या होत्या. 2007 साली 1246 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. त्यात शेतीशी निगडीत 303 आत्महत्या होत्या. त्यावर्षी आत्महत्येचे प्रमाण 24 टक्के होते. 2007 पूर्वी आत्महत्येचे प्रमाण 39 टक्के आणि तद्नंतर 27 टक्के होते. आता आत्महत्येचे प्रमाण 23 टक्क्यांपर्यंत आलेले आहे. आत्महत्येचे प्रमाणात काहीच फरक पडला नाही, पॅकेजचा काहीच फायदा झाला नाही अशी कोणीही निगेटिव्ह चर्चा या सभागृहात करु नये. या राज्यात शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण 23 टक्के एवढे आहे ही भुषणावह गोष्ट आहे असे मी म्हणणार नाही. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य आहे. महाराष्ट्रात अनेक पुरोगामी चळवळी झाल्या. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. शेतीसंबंधी, शेतक्र्यांसंबंधी त्यांनी जे फतवे काढले, त्यांचा आदर्श आपण घेतला आहे. महात्मा फुले, राजश्री शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

मागासलेल्या समाजासाठी मोठया चळवळी केल्या आहेत. महाराष्ट्रासारख्या ऐतिहासिक राज्याला शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही लांच्छनास्पद गोष्ट आहे. ही लांच्छनास्पद गोष्ट आपण पूर्णपणे बाजूला सारली पाहिजे अशा प्रकारची भूमिका आपल्याला घ्यावी लागेल.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आणेवारीच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला. या राज्यात आणेवारीच्या संदर्भात प्रथम श्री.भगवंतराव गायकवाड समिती नेमली गेली. युतीच्या काळात श्री.नारायण राणे समिती नेमली गेली. आमच्या काळात आम्ही तत्कालिन महसूल राज्यमंत्री डॉ.राजेंद्र शिंगणे यांची समिती नेमली होती. अशा विविध समित्या नेमल्या गेल्या. विदर्भामध्ये 15 जानेवारीला आणेवारी जाहीर केली जाते आणि पश्चिम महाराष्ट्रात 15 डिसेंबरला आणेवारी जाहीर केली जाते. मी असे जाहीर करतो की, ज्या ठिकाणी 50 टक्क्यांपेक्षा कमी आणेवारी आहे, तेथे टंचाई सदृश्य परिस्थिती जाहीर केली जाईल. त्यासाठी लागणा-या सवलती दिल्या जातील. त्यातील काही सवलती रोजगार हमी योजना मंत्र्यांनी जाहीर केल्या. वसुली बंद होईल, मुलांच्या शिक्षणाची फी त्यांना दिली जाईल, त्या गावातील पिण्याच्या पाण्यासंबंधीचे निर्णय घेतले जातील, रोजगार हमी योजनेचे नॉमर्स् नव्याने केले जातील. तेथील शेतक-यांचे विद्युत कनेक्शन तोडले जाणार नाही, त्यासंबंधीची वसुली थांबविली जाईल, या सर्व गोष्टींसबंधीचे आदेश मदत व पुर्नवसन विभागाच्या वतीने सर्व जिल्हाधिकारी यांना पाठविले आहेत.

सभापती महोदय, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.धनजंय जाधव त्यांचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे. त्या अहवालात अनेक शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्या शिफारशी आम्ही मंत्रिमंडळासमोर ठेवलेल्या आहेत. सोशल कमिटमेंटच्या दृष्टीने दोन शिफारशी फार महत्वाच्या आहेत. राज्यात साधारणतः 4 लाख शेतकरी असे आहेत की, त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय खालावलेली आहे. दारिद्र्यरेषेखाली कुटुंबांना ज्या दराने स्वस्त धान्य देतो त्याप्रमाणे या शेतकरी कुटुंबाला स्वस्त दराने किंवा मोफत 25 किलो धान्य देण्यात यावे. त्या शेतक-यांच्या मुलांना इयत्ता 12 वी पर्यंतचे शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी शासनाने उचलावी अन्यथा त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी 500 रुपये दरमहा खर्च करावा अशा दोन शिफारशी सोशल कमिटमेंटच्या दृष्टीने फार महत्वाच्या आहेत. शेतकऱ्यांनी कर्ज किती घेतले, किती कर्ज माफ केले यासंबंधीचे सगळे आकडे आपल्याकडे उपलब्ध आहेत, त्यामुळे त्याची मी पुनरावृत्ती करणार नाही.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 17:20

डॉ.पतंगराव कदम.......

आणि म्हणून या पॅकेजचा फायदा निश्चितपणे झालेला आहे. त्यामध्ये जे काही गैरप्रकार झाल्याची चर्चा झाली त्याचा विचार करीत आहोत. मी 14 तारखेला मराठवाडा आणि विदर्भातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि सूचना दिल्या आहेत. विशेषत: विदर्भातील 6 जिल्हयांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत की, अधिकृत अहवाल महसूल व पुनर्वसन मंत्री म्हणून मला मिळाला पाहिजे. या संदर्भात चौकशी होईल. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल म्हणाले की, शेतीसाठी पाणी नाही, पाणी आहे तेथे वीज नाही अशी परिस्थिती आहे. जो शेतमाल उत्पादित होतो त्याला भाव मिळत नाही. नाईलाजाने शेतकरी शेती करतो, इतकी कठीण परिस्थिती निर्माण झालेली आहे.......

प्रा.बी.टी.देशमुख : जे पाणी आहे ते तुम्ही दुसरीकडे वळवित आहात.

डॉ.पतंगराव कदम : त्यासाठी 6000 कोटी रुपये पाटबंधाऱ्यासाठी दिले असून त्यापैकी 3200 कोटी रुपये विदर्भासाठी दिलेले आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, महत्तम सिंचनाचा अनुशेष असलेल्या जिल्हयातील 30 ते 40 हजार हेक्टरचे पाणी भांडवलदारांना दिले जात आहे. हे निगेटिव्ह पॅकेज आहे. ही विषाची कुपी आहे. चारही प्रकल्प लंबे केल्याचे जाहीर करा. नाही तर आम्ही निषेध करुन सभात्याग करु.

डॉ.पतंगराव कदम : पाण्याचा माझा संबंध नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : ज्यांचा संबंध आहे त्यांना सभागृहात बोलवा. विदर्भातील हा सर्वात महत्वाचा प्रश्न आहे.

डॉ.पतंगराव कदम : तो विषय माझा नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सरकार जिवंत आहे ना?

डॉ.पतंगराव कदम : मी आपल्या भावनांशी सहमत आहे. पाणी का दिले? कोणी दिले? कशासाठी दिले? ते योग्य आहे की नाही याची निश्चितपणे चर्चा करु.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री म्हणाले की, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी मुद्दा मांडला की, पाणी आहे परंतु वीज नाही, वीज आहे तेथे पाणी नाही. पिकविलेल्या शेती मालाला भाव मिळत नाही. पिकलेच नाही तर भाव देण्याचा प्रश्न येतोच कुठे?

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : अशा सर्व प्रश्नातून आपल्याला पुढे जावे लागणार आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी उपलब्ध पाणी शेतीऐवजी दुसरीकडे वापरण्याचा निर्णय कोणी व का घेतला याची माहिती त्यांनी मुद्दा मांडल्यानंतर आम्हाला कळली. उद्या किंवा परवा कॅबिनेटची बैठक असेल त्या बैठकीमध्ये मी हा विषय उपस्थित करेन. संबंधित मंत्र्यांकडे विचारणा केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, प्रस्तावामध्ये सिंचनाचा उल्लेख आहे. अपूर्ण राहिलेल्या शेकडो सिंचन प्रकल्पामुळे शेतीला पाणी न मिळणे असा प्रस्तावामध्ये उल्लेख केलेला आहे. या मुद्याला धरुनच प्रा.बी.टी.देशमुख यांनी विषय मांडला होता. विदर्भातील सर्व शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा प्रसताव महत्वाचा आहे. विदर्भातील शेतकऱ्यांवर आलेल्या संकटाचा मुद्दा प्रस्तावामध्ये अंतर्भूत केलेला आहे. परंतु मंत्रीमहोदय उत्तर देत असताना राज्याचे धोरण म्हणून उत्तर देत आहेत. विदर्भाच्या मूळ प्रश्नाला बगल दिली जात आहे, हे बरोबर नाही. जलसंपदा मंत्र्यांना सभागृहात बोलावले पाहिजे, त्यांनी उत्तर दिले पाहिजे.

प्रा.बी.टी.देशमुख : ठामपणाने सांगा, आम्ही निगेटिव्ह पॅकेज दिले आहे. पण टाळू नका. कोणाला विचारावयाचे असेल त्यांना विचारा.

डॉ.पतंगराव कदम : या विषयाची मला काही माहिती नाही....(अडथळा)...

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

प्रा.बी.टी.देशमुख : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**तालिका सभापती** (श्री.भास्कर जाधव) : आपल्या सर्वांच्या वतीने माननीय विरोधी पक्षनेते बोलण्यासाठी उभे आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ज्या मुद्याची नोटीस माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रस्तावाद्वारे दिलेली आहे त्या मुद्याबाबत आम्हाला आता माहिती झाली असे म्हणण्याचा मंत्रीमहोदयांना अधिकार नाही.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ..............

महोदय, सिंचनाचा विषय हा शेतीशी संबंधित आणि महत्वाचा असल्यामुळे आजच्या प्रस्तावात त्याची नोटीस दिलेली आहे, परंतु त्याचे उत्तर आले नाही. शासनाने त्यासंबंधीचे उत्तर काहीही द्यावे, तो त्यांचा अधिकार आहे. परंतु एकाच जिल्ह्यात प्रयोग म्हणून चार भांडवलदारांना विषाची कुपी देण्याचे शासनाने ठरविले आहे हे देखील सांगू शकता. परंतु या प्रश्नाचे उत्तरच शासनाला नको आहे. म्हणून सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करावी.

डॉ. पतंगराव कदम : महोदय, मी सांगितले की पाणी कुणी दिले याची माहिती माननीय मंत्री महोदय सांगू शकतील. मी माझ्या मदत व पुनर्वसन विभागाशी संबंधित असलेले उत्तर दिलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कलेक्टिव्ह रिस्पॉन्सिबिलिटी म्हणून एरवी सांगितले जाते, परंतु आता मात्र मंत्री महोदय जे सांगत आहेत ते योग्य नाही. मूळ प्रस्तावात सिंचनाचा विषय आहे. तसेच विजेचा देखील विषय यामध्ये असल्यामुळे त्या विषयाशी संबंधित मंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे. सिंचनाच्या विषयाबाबत माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी परवा सभागृहात लक्षवेधी सूचनाही उपस्थित केली होती परंतु त्यावेळेस सुध्दा संबंधित विषयाचे मंत्री महोदय उपस्थित नसल्याने ती तशीच राहिली. अमरावती जिल्हा हा विदर्भातील सर्वात जास्त सिंचनाचा अनुशेष असलेला जिल्हा असून त्या जिल्ह्यातीलच तो विषय आहे. म्हणून त्या प्रश्नाचे उत्तर संबंधित मंत्र्यांकडूनच आम्हाला अपेक्षित आहे, दुसऱ्या खात्याच्या मंत्र्यांकडून अपेक्षित नाही. तसेच जलसंपदा मंत्री सभागृहात नाहीत तर त्यांना बोलावण्याची व्यवस्था करावी.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, विषयाला फाटा देऊन माननीय मंत्री महोदय बोलत आहेत. या विषयाच्या लक्षवेधीवर परवा सभागृहाचे कामकाज अर्धा तास बंद पडले होते यासंबंधीची माहिती माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांना माहीत नाही काय ? ........अडथळा.....That is not fare. माननीय मंत्री महोदयांचे अशा प्रकारे बोलणे उचित नाही........अडथळा.....Dont take it personally. विदर्भात आपण आला आहात, मुंबईत असला तरी आपल्याला नोटीस दिल्यावर त्याचे उत्तर मिळालेच पाहिजे, अशा प्रकारे बेजबाबदारीने वागता येणार नाही.

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना माझी विनंती आहे की, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी हरकत घेतलेली आहे, त्यासंबंधीचे रुलिंग मी देत आहे. आता आपल्याला हरकतीवर हरकत घेता येणार नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावर परवा सभागृहात चर्चा सुरु होत असताना मी हरकत घेतली होती की, संबंधित विषयांचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. त्यावेळी इतर मंत्र्यांनी सांगितले होते की, आपण चर्चा सुरु करावी, सामूहिक जबाबदारी म्हणून आम्ही उत्तर देऊ. त्याचप्रमाणे आजही सभागृहात चर्चा सुरु झाली त्यावेळेसही हाच मुद्दा पुन्हा उपस्थित झाला होता त्यावेळी सांगण्यात आले होते की, संबंधित मंत्र्यांची सामूहिक जबाबदारी म्हणून उत्तर देतील. म्हणून आता यासंबंधीचे उत्तर संबंधित मंत्र्यांनीच दिले पाहिजे.

**तालिका सभापती** : विदर्भाची चर्चा सुरु झाली त्यावेळेस सर्व ज्येष्ठ मंत्री महोदय सभागृहात बसलेले होते.

श्री. दिवाकर रावते : महोदय, काल या सभागृहात चर्चा सुरु झाली तेव्हा मंत्री महोदय उपस्थित नव्हते म्हणून ती आज घेण्यात आली. माननीय संसदीय कामकाज मंत्री मात्र कॅमेऱ्यासमोर सांगतात की, विरोधी पक्षाला चर्चेत इंटरेस्ट नाही. मग आता ही जबाबदारी संसदीय कार्य मंत्र्यांनी स्वीकारावी आणि त्यांनीच या विषयावरील उत्तर द्यावे, अशी माझी सूचना आहे.

**तालिका सभापती** : सभागृहात चर्चेला सुरुवात झाली त्यावेळेस मंत्रिमंडळातील सर्वात ज्येष्ठ मंत्री जातीने हजर होते आणि आताही आहेत. मंत्री महोदय उत्तर देत असताना राज्याच्या सर्वसमावेशक धोरणाबद्दल बोलले असतील, कारण विदर्भ सुध्दा राज्यात समाविष्ट आहे. त्यांनी नाकारले नाही. आणखी एक घोषणा केली की ज्यांना पॅकेजचा फायदा झाला नाही त्यांचा विचार झाल्याशिवाय हे अधिवेशन संपविणार नाही. माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी सांगितले की, जोपर्यंत विदर्भात पाणी पॅकेज दिले जात नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने असे प्रश्न सुटणार नाही. रोजगार हमी मंत्र्यांनी कोणते बदल करणार याची माहिती सांगितली. एमआरईजीएस.............

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

माझे म्हणणे माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांना पटते, कृपया आपण हरकतीवर हरकत घेऊ नये, अशी माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना मी विनंती करतो. नियमानुसार आपल्याला तशी हरकत घेता येणार नाही. मी आपल्याला नियम देखील समजावून सांगू शकतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुध्दीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

(एकाचवेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती** ....

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील मी आपल्याला सांगू इच्छितो की, हरकतीच्या मुद्यावर हरकतीचा मुद्दा नियमानुसार उपस्थित करता येत नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, ज्यावेळेस सिंचनाच्या विषयावर चर्चा झाली त्यावेळेस आपण सिंचन मंत्री उपस्थित का नाही असा आग्रह धरला असता तर ती व्यवस्था देखील आपल्याला करता आली असती. परंतु त्यावेळेस आपण सर्वांनी चर्चा ऐकून घेतली. सरकारची उत्तर देण्याची सामुदायिक जबाबदारी असते. संसदीय कार्यमंत्री सुध्दा या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांना विनंती आहे की, या विषयाच्या संदर्भात आपण मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारावेत व मंत्रीमहोदयांच्या उत्तरातून समाधान करुन घ्यावे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नाला माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिले तरी चालेल. माझी माननीय मंत्रीमहोदयांना एकच विनंती आहे की, आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नाला माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर द्यावे. नवे पॅकेज देण्यामध्ये काही सुध्दा वाद नाही. महत्तम अनुशेष असलेल्या जिल्हयामध्ये, विदर्भातील महत्तम अनुशेष असलेल्या 6 जिल्हयातील एका जिल्हयात आपण भांडवलदारांसाठी निगेटीव्ह पॅकेज दिले आहे. आपण अमरावती जिल्हयातील 40 हजार हेक्टर सिंचन क्षमता लंबी करण्याचा जो निर्णय घेतला आहे तो निर्णय त्वरित रद्द करण्यात यावा. आम्हाला आपला निर्णय मान्य राहील. आपल्याला निर्णय रद्द करण्यामध्ये अडचण येत असेल तर ती अडचण कोणती आहे ते सांगण्यात यावे. माझ्या प्रश्नाला कोणतेही मंत्री महोदय उत्तर देऊ शकतात. विदर्भातील जनतेसाठी हा ज्वलंत असा प्रश्न आहे. मोघम बोलून सारी पृथ्वी प्रदक्षिणा करण्यापेक्षा मी विचारलेल्या एका प्रश्नाचे उत्तर द्या. मी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देण्याचे आपण टाळू नका. तालिका सभापती महोदय, आपण जो निर्णय दिलेला आहे तो मला मान्य आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख साहेब मी नवीन असल्यामुळे कदाचित माझा निर्णय चुकला असेल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात विदर्भातील जनतेमध्ये रोष आहे. माझी सन्माननीय सदस्य श्री. देशमुख साहेबांनी पुन्हा एकदा प्रश्न समजावून सांगावा अशी विनंती आहे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, इतक्या महत्वाच्या प्रश्नासंदर्भात अनेक वेळा सांगावे लागणे हे काही बरोबर नाही परंतु तरी सुध्दा सांगणे माझे काम असल्यामुळे मी पुन्हा एकदा प्रश्न सांगतो की, या देशाच्या माननीय पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरून तसेच नागपूरमध्ये येऊन सांगितले की, विदर्भामध्ये ज्या काही आत्महत्या होत आहेत त्याची अनेक कारणे आहेत परंतु मेन रिझन इज नॉन अॅव्हेबिलीटी ऑफ इरिगेशन फॅसेलिटी हे आहे. विदर्भातील सिंचन क्षमता वाढली पाहिजे याची आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. परंतु दुर्दैवाने ज्या जिल्हयात सतत अनुशेष वाढत राहिला त्या जिल्हयामध्ये आपण निगेटीव्ह पॅकेज दिलेले आहे. आत्महत्येची कुपी माझ्या जिल्हयात सोडलेली आहे. आपल्या एका निर्णयामुळे अमरावती जिल्हयाची 40 हजार हेक्टर सिंचन क्षमता उध्वस्त होणार आहे. 50 वर्षामध्ये आम्हाला 50 हजार हेक्टरची सिंचन क्षमता मिळाली परंतु त्यातील 30 ते 40 हेक्टर सिंचन क्षमता आपण 50 तासात भांडवलदारांसाठी लंबी केली. अमरावतीमध्ये यासंदर्भात तीव्र असे आंदोलन सुरु आहे. आपल्या निर्णयाच्या विरोधात जिल्हा परिषदेचा एकमताचा ठराव आहे,डीपीडीसीचा एकमताचा ठराव आहे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा एकमताचा ठराव आहे,महापालिकेचा एकमताचा ठराव आहे आणि या सा-या प्रश्नाची नोटीस देखील दिलेली आहे. त्यामुळे हा विषय माहिती नाही असे आपल्याला म्हणता येणार नाही. आजच्या प्रस्तावामध्ये यासंदर्भात नोटीस आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी एक मिनिट उभे राहून सांगावे की, निगेटीव्ह पॅकेज रद्द करण्यात येत आहे, सर्व परवानग्या रद्द करण्यात येत आहे. सभापती महोदय, या उत्तराशिवाय आपल्याला विदर्भातून बाहेर जाता येणार नाही.

श्री. विजय वडेट्टीवार : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. देशमुख साहेबांनी तसेच सन्माननीय सदस्य श्री. गडकरी साहेबांनी या विषयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात काही वस्तुस्थिती खरी आहे तर काही वस्तुस्थिती नाही. सन्माननीय सदस्य श्री. देशमुख साहेबांनी 40-50 हजार हेक्टर सिंचनाचे नुकसान होणार आहे असा उल्लेख केला आहे परंतु त्या भागात जे सिंचन प्रकल्प झाले, खरीप आणि रब्बीचा हंगाम गृहीत धरुन जे सिंचन अपेक्षित ठरवले आहे ....

यानंतर श्री. अजित.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार.........

त्या भागातील लोकांच्या भावना तीव्र झालेल्या आहेत याची आम्हाला जाणीव आहे. तेव्हा जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार आणि सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि इतर सन्माननीय सदस्य यांची एक बैठक घेण्यात येईल आणि त्यानंतर या संदर्भात निर्णय घेण्यात येईल.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय,मी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांकडून उत्तर मिळालेले नाही.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात )

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव ):** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला विश्वासात घेऊन निर्णय घेण्यात येईल असे मंत्रिमहोदयांनी सभागृहाला आश्वासित केलेले आहे. ...

( विरोधी पक्षातील काही सदस्य वेलमध्ये येतात.)

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांना काही प्रश्न विचारावयाचे नसतील तर ती पुढील कामकाज घेतो....

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

**तालिका सभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 39 मिनिटांनी 10 मिनिटांकरिता स्थगित झाली. )

यानंतर श्री.गायकवाड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव )**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटासाठी स्थगित करण्यात येत आहे.

( 5.50 ते 6.00 बैठक स्थगित झाली )

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर .... )

**<u>सभापतीस्थानी - माननीय तालिका सभापती श्री.भास्कर जाधव</u>**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी 6.15 पर्यंत स्थगित करीत आहे...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, हे नेमके काय होत आहे ते आम्हालाही समजले पाहिजे. आपण 10-10 मिनिटांसाठी सभागृहाची बैठक कशासाठी स्थगित करीत आहात ? सभागृहापुढे आज भरपूर कामकाज आहे तेव्हा आपण पुढील कामकाज घेऊ शकता. पण सगळेच काम अशा प्रकारे दालनातच चालवावयाचे आहे काय ? ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे. आपण सभागृहात पुढचे कामकाज घेऊ शकतो. आता आपण जाहीर केल्याप्रमाणे सभागृहाची बैठक स्थगित जरूर करावी. त्यात आम्ही आपला अवमान करू इच्छित नाही. परंतु अशा प्रकारे सारखी बैठक स्थगित करणे योग्य नाही. आपल्याला पुढचे कामकाज घेता घेऊ शकते.

**तालिका सभापती** : ठीक आहे, मी याबाबत माननीय सभापतींचा सल्ला घेतो. मात्र आता सभागृहाची बैठक मी अगोदर जाहीर केल्याप्रमाणे 6.15 पर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक 6.01 वाजता 615 वाजेपर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

**सभापती** : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना मी सांगू इच्छितो की, बऱ्याच वेळेला आपल्याला सभागृहाचे कामकाज अशापध्दतीने थांबवावे लागते. मी सभागृहामध्ये लवकर यावे याकरिता आज आपण जी काळजी घेतली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मघाशी मी जे बोललो त्यामागे माझा कोणताही उद्देश नव्हता. आपण सभागृहामध्ये नाहीत असे मला वाटले म्हणून सभागृहाचे कामकाज किती वेळा स्थगित करावयाचे? या गोष्टीला कुठेतरी मर्यादा असली पाहिजे. सभागृहाची वेळ 11 वाजताची जरी असली तरी मी सकाळी 9 वाजता विधान भवनमध्ये येतो, मी लायब्ररीमध्ये अभ्यास करतो. म्हणून मी बोललो होतो.

**सभापती** : यामध्ये दोन्हीही गोष्टी अंतर्भूत आहेत. कामकाज पत्रिकेवरील विषय संपले पाहिजेत. त्यामुळे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सभागृहामध्ये अशाप्रकारचे प्रसंग पुन्हा येऊ नयेत. माननीय सभापती विरोध पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यामध्ये समन्वय आणण्याचा प्रयत्न करीत होते. त्या कारणाने सभागृहाचे कामकाज दोन वेळा थांबवावे लागले. विषय ज्वलंत असल्यामुळे आमची देखील त्या संदर्भात मागणी होती. म्हणून माझी माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना विनंती आहे की, त्यांनी माननीय सभापतींविषयी काढलेले उद्‌गार मागे घ्यावेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी माझे शब्द मागे घेतो.

**सभापती** : माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी आता आपले म्हणणे मांडावे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, आजच्या चर्चेच्या निमित्ताने महत्वाचा प्रश्न उपस्थित झाला. या सभागृहामध्ये विदर्भाच्या प्रश्नावर चर्चा होती. त्यामध्ये सर्वात मोठा आणि महत्वाचा प्रश्न सिंचनाच्या अनुशेषाचा होता. विदर्भामध्ये सिंचनाचा महत्तम अनुशेष आहे. मी काल परवा लक्षवेधी सूचना दिली होती, तसेच, आज सुध्दा तारांकित प्रश्नाच्या रुपाने हा प्रश्न सभागृहात मांडला होता. महत्तम अनुशेष असलेल्या जिल्हयामध्ये 1984 मध्ये 134 हजार हेक्टरचा अनुशेष होता. 1994 मध्ये तो 2209 हजार हेक्टर इतका झाला आणि 2007 मध्ये 223 हजार

...2/-

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

प्रा. बी. टी. देशमुख....

हेक्टर इतक अनुशेष आहे. हा अनुशेष दूर करण्याबाबत माननीय राष्ट्रपतींनी 371(2) कलमान्वये आदेश काढले. माननीय राज्यपालांनी सुध्दा हा अनुशेष 2010 पर्यंत भरुन काढण्याबाबत राज्य सरकारला निदेश दिले. सभापती महोदय, हा अनुशेष दूर होण्याबाबत पुष्कळ गोष्टी या पुस्तकात आल्या आहेत. परंतु हा अनुशेष सन 2010 पर्यंत पूर्ण होऊ शकत नाही.

(यानंतर श्री.बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख.....

सभापती महोदय, त्या जिल्ह्यामध्ये असे झालेले आहे की, त्या ठिकाणी जवळपास 20 ते 25 वर्षे दर अधिवेशनामध्ये भांडून आम्ही अप्पर वर्धा प्रकल्पाची 50 हजार हेक्टरची जी सिंचन क्षमता त्या जिल्ह्याच्या पदरामध्ये पडली त्यातील 30 ते 40 हजार हेक्टरची सिंचन क्षमता विथ्ड्रॉ करणारे चार भांडवलदारांचे प्रकल्प त्या ठिकाणी आलेले आहेत. लोकांमध्ये अतिशय तीव्र असंतोष आहे. डीपीडीसीने एकमताने विरोधात ठराव केला. महानगरपालिकेने एकमताने विरोधात ठराव केला. जिल्हा परिषदेने आणि डिस्ट्रीक्ट सेंट्रल बोर्डाने तसेच सर्व पक्षांनी विरोधात ठरावे केले. एक दिवस पूर्ण जिल्हा बंद होता. एक दिवस लाक्षणिक उपोषण झाले. परवाच्या आंदोलनाविषयी मी या ठिकाणी बोलत नाही. या प्रातिनिधीक संस्था आहेत. माननीय राज्यपालांचे जे डायरेक्शन्स आहेत, पाच वर्षे आम्ही कोर्टात गेलो आणि पाच वर्षानंतर 6 मे, 2008 ला निर्णय निघाला. कोर्टाचा तो निर्णय असा आहे की, "Governor is fully empowered to make necessary allocation of funds to improve the backward areas like "Marathwada and Vidharbha". The directives of the Governor are binding on the State."ही एक बाब. कोर्टाच्या निर्णयातील एक अतिशय महत्वाचे वाक्य मी जसेच्या तसे वाचून दाखवतो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Under Article 371, there is a "special responsibility" imposed on the Governor to ensure that there is no backwardness in Vidharbha and Marathwada regions and the same was a constitutional obligation imposed on the Governor, which cannot be frustrated." डायरेक्टीव्हज विफल होतील अशी कोणतीही कृती आपल्याला करता येत नाही असे त्याचे स्पष्ट इंटरप्रिटेशन हायकोर्टाने केलेले आहे. आमचे स्पष्ट असे म्हणणे आहे की, हे जे प्रकल्प आहेत त्यातील एक सुध्दा प्रकल्प ही निगेटिव्ह ॲक्टीव्हीटी आहे. मी मघाशी सभागृहामध्ये सांगितले की, 'It is a negative package'. आपण इतके पॅकज देतो त्यामध्ये 30- 40 हजार हेक्टर सिंचन क्षमता कमी करणे हे एक निगेटिव्ह पॅकेज आहे. आमचे असे म्हणणे होते की, या प्रश्नाला उत्तर आले पाहिजे. डायरेक्टीव्हजच्या विरोधात कोणतीही कृती होता कामा नये. हे प्रकल्प ताबडतोबीने त्या ठिकाणी रद्द केले गेले पाहिजेत अशा प्रकारची आमची त्याबाबतीत सभागृहामध्ये स्पष्ट मागणी आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KGS/ MMP/

श्री. अशोक चव्हाण (मुख्यंत्री): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी अनुशेषाच्या बाबतीत उल्लेख केला. याबाबतीत माझी मते काय आहेत याची सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांना पूर्ण जाणीव आहे. कारण मराठवाडा आणि विदर्भ या दोन्ही विभागातील अनुशेष दूर झाला पाहिजे हा शासनाने घेतलेला क्वांशस निर्णय आहे. माननीय राज्यपालांच्या माध्यमातून हा अनुशेष दूर करण्याच्या बाबतीमध्ये कायदेशीर तरतूदही आज अस्तित्वात आहे याची शासनाला जाणीव आहे. या ठिकाणी दुसरा प्रश्न आपल्यासमोर जो अडचणीचा झालेला आहे तो म्हणजे राज्यामध्ये असलेली विजेची टंचाई. आज राज्यामध्ये पाच ते साडेपाच हजार मेगावॅट विजेची कमतरता आहे आणि मागणी वाढत चाललेली आहे. उद्योगांची गरज वाढत चाललेली आहे तसेच कृषीचीही गरज वाढत चाललेली आहे. घरगुती ग्राहकांची जी मागणी आहे ती सुध्दा वाढत चाललेली आहे. त्यामध्ये निर्णय घेत असताना राज्यामध्ये वीज प्रकल्प आणावयाचे की नाही हा एक क्वांशस निर्णय सभागृहाला घ्यावा लागेल. हा विषय कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा कोणाचा प्रतिष्ठेचा प्रश्न अशी भूमिका नाही. पण राज्याच्या हिताच्या दृष्टीने काही निर्णय राज्याला घ्यावे लागतील हे मला मुद्दाम आग्रहपूर्वक सभागृहाला सांगावयाचे आहे. आपले जे शासकीय वीज निर्मिती प्रकल्प आहेत त्यांचे जास्तीत जास्त ऑप्टीमम युटिलायझेशन झाले पाहिजे, त्या ठिकाणी कोळसा मिळाला पाहिजे, गॅस मिळाला पाहिजे आणि ते प्रकल्प ऑप्टीमम जनरेशनला आले पाहिजेत ही एक भूमिका आहे. दुसरी बाब अशी की विजेचा जो तुटवडा आहे तो पाहता राज्य विजेच्या बाबतीत सरप्लस राज्य राहिले पाहिजे म्हणून खाजगीकरणाचे धोरण आपण क्वांशसली विचारपूर्वक स्वीकारलेले आहे. राज्यामध्ये आपल्याकडे जे जे प्रकल्प आलेले आहेत ते लवकर पूर्णत्वास नेले पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. मी अमरावतीच्या बाबतीत सांगत नसून जनरल धोरण म्हणून सांगत आहे. अमरावतीच्या बाबतीत मी शेवटी बोलणार आहे. पण जे जे प्रकल्प आपल्याकडे आलेले आहेत ते अतिशय गतीने पुढे नेता आले पाहिजेत. मग त्यामध्ये ज्या काही अडचणी असतील, भूसंपादनाचे प्रश्न असतील, एव्हायर्नमेंट क्लिअरंसचे काही प्रश्न आहेत, जनरेशनच्या बाबतीत काही अडचणी निर्माण झाल्या असतील, केंद्र शासनाच्या परवानगीचे प्रश्न आहेत, कोल ब्लॉक मिळण्याच्या संदर्भातील प्रश्न आहेत, एक ना दहा गोष्टी अशा आहेत की, विविध कारणास्तव हे सगळे प्रकल्प कोठे ना कोठे अडकले आहेत. म्हणून लोकांमध्ये संभ्रम आहे

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KGS/ MMP/

श्री. अशोक चव्हाण .....

की, विजेच्या टंचाईबाबत आपण बोलतो पण ते प्रकल्प पूर्ण होणार की नाही ? हा संभ्रम लोकांच्या मनामध्ये निर्माण होणे स्वाभाविक आहे. म्हणून आपण एक क्वांशस निर्णय घेतला की, हे सगळे प्रकल्प मार्गी लागले पाहिजेत. राज्यात जी विजेची टंचाई आहे ती तातडीने दूर झाली पाहिजे असे एकंदरीत धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. अमरावतीच्या बाबतीत सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी उल्लेख केलेला आहे. अमरावतीमध्ये आता फक्त एकच प्रकल्प मार्गी लागण्याच्या बाबतीत पुढे गेलेला आहे. बाकी कोठल्याही प्रकल्पाच्या बाबतीत आम्ही निर्णय घेतलेला नाही आणि घेणारही नाही. आपण या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला तो माझ्या डोळ्यासमोर आहे. ते लक्षात घेता बाकी कोठल्याही अन्य प्रकल्पाचा आम्ही विचार करणार नाही हे मी ठामपणे सभागृहाला सांगू इच्छितो. अमरावती विभाग अडचणीमध्ये आणून अनुशेष आणखी वाढविण्याची भूमिका अजिबात नाही, हे मला मुद्दाम सांगितले पाहिजे. या ठिकाणी जो विषय व्यक्त केलेला आहे की, हा इंडिया बुलचा वीज निर्मितीचा हजार ते बाराशे मेगावॅटचा प्रकल्प त्या ठिकाणी होऊ घातलेला आहे. याबाबतीत आपण दोन गोष्टींचा उल्लेख केला.

यानंतर श्री. खंदारे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

जे काही नाव असेल परंतु प्रमोटर्स तेच आहेत. जे कोणी प्रकल्प सुरु करीत असतील त्यांना जमीन देण्यात आलेली आहे. पाणी देण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने विचारपूर्वक घेतलेला आहे. त्यासाठी माननीय सिंचन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती नेमलेली आहे. त्या उपसमितीमध्ये सदस्य आहेत. त्याबाबतही कॉंशसपणे निर्णय घेतला जाईल. माननीय राज्यपालांच्या निर्देशांचे उल्लंधन होते काय असा महत्वाचा मुद्दा आज उपस्थित करण्यात आला आहे. यामध्ये कायद्याचे उल्लंघन करावे अशाप्रकारची भूमिका घेण्याचे काही कारण आहे असे मला वाटत नाही. अप्पर वर्धा प्रकल्पात किती पाणी उपलब्ध आहे, किती पाणी वापरात आहे, या प्रकल्पासाठी पाणी उपलब्ध करुन देता येईल की नाही हा त्याचा दुसरा भाग आहे. हे सर्व क्लिष्ट मुद्दे आहेत. सभागृहात या या प्रकल्पाला स्थगिती देण्याचा, हा प्रकल्प रद्द करण्याचा निर्णय घेऊ लागलो तर ही प्रथा चुकीची होईल. पुणे जिल्हयामध्ये डाऊ प्रकल्पाला विरोध सुरु आहे. त्या प्रकल्पालाही स्थगिती देण्याचा विषय सुरु आहे. येथे वीज निर्मितीचा प्रकल्प थांबवा अशी मागणी केली जात आहे. राज्यातील सर्वच प्रकल्पांना स्थगिती देण्याची भूमिका घेतली तर महाराष्ट्रात कोणतेच प्रकल्प येणार नाहीत. महाराष्ट्र राज्य हे उद्योगाबाबत अग्रेसर राहिलेले आहे. त्याचप्रमाणे वीज प्रकल्पांबाबत पावले उचललेली आहेत या सर्वच गोष्टीला फार मोठी खिळ बसेल. राज्यकर्ते या नात्याने आपणा सर्वांचे हे उत्तरदायित्व आहे, त्यामुळे सभागृहाच्या दोन्ही बाजूने गांभीर्याने विचार केला पाहिजे. परंतु दोन्ही बाजूने अशी भूमिका घेतली तर राज्य मागे जाईल कारण नसताना हे प्रकल्प अन्य राज्यामध्ये जातील आणि आपल्याकडे कोणीही येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी व्यक्त केलेल्या विचारांची मी कदर करतो. त्यांची जी भूमिका आहे ती मी समजू शकतो. विदर्भातील अनुशेष दूर करण्याबाबत आपण नेहमी स्पष्टपणे भूमिका मांडलेली आहे. मी देखील अनेकवेळा आपल्यासोबत राज्यपालांना निवेदन देण्यासाठी आलो होतो. त्यामुळे माझ्या भूमिकेबद्दल आपण शंका घेण्याचे कारण नाही. हा प्रकल्प ज्या टप्प्यावर आलेला आहे ते पाहता मी या लोकांना एकत्र बोलवितो. त्या प्रकल्पात किती पाणी उपलब्ध आहे, उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर किती होतो, त्यापैकी किती पाणी देता येईल हा विषय मला समजून घ्यावा लागेल. त्या प्रमोटर्सना असे सांगण्याची वेळ आली की, हा प्रकल्प होणे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

शक्य होणार नाही, पण आपल्यासमोर दुसरा काय पर्याय आहे ते पहावे लागेल. हा प्रकल्प अन्य ठिकाणी न्यावयाचा असेल तर आपल्यासमोर दुसरा पर्याय उपलब्ध आहे काय ते पहावे लागेल, पण हा प्रकल्प राज्यामध्ये झाला पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. तो करीत असताना पाणी कोठे उपलब्ध होऊ शकेल हे पाहिले जाईल. त्याचप्रमाणे प्रकल्पासाठी जागेचे प्रश्न तीव्र झाले आहेत. अनेक ठिकाणी जागा संपादित करण्याची प्रक्रिया सुध्दा अडचणीत आलेली आहे. जागा संपादित करणे अडचणीचे झालेले आहे. म्हणून या सर्व प्रश्नांमुळे आपण राज्यातील एकेक प्रकल्प थांबवित गेलो तर सर्व प्रकल्प मागे पडतील. एकिकडे आपण वीज मिळत नाही अशी तक्रार करावयाची आणि येणारे प्रकल्प थांबवावयाचे अशी दुहेरी भूमिका घेता येणार नाही. या सर्व पार्श्वभूमिवर मला एवढेच सांगावयाचे आहे की, शासनाला थोडासा अवधी द्यावा. मी संबंधित लोकांना बोलवितो. सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेले विचार लक्षात घेऊन कोणत्याही प्रकारचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेतली जाईल आणि त्यातून कोणता सोयीचा मार्ग काढणे शक्य आहे हे लक्षात घेऊन पावले टाकण्यात येतील.

प्रा.बी.टी.देशमुख : आम्ही नकारात्मक भूमिका घेतली असा सभागृहाच्या माध्यमातून संदेश जाऊ नये. आमचे ठाम मत आहे, की जेथे अनुशेष आहे तो वाढू शकतो. कारण या कंपनीबरोबर करार झालेला नाही. दुसरे असे की, या निर्णयामुळे राज्यपालांच्या निर्देशांचे उल्लंघन होत आहे. हे नवीन काम हाती घेतले आहे. याबाबत एकच म्हणणे आहे की, शासनाने त्यांच्याशी चर्चा करावी आणि आमचेही मुद्दे ऐकून घ्यावेत. राज्यपालांच्या निर्देशांच्या उल्लंघनाचा विषयही तपासून घ्यावा. याबाबत एक किंवा दोन महिन्यामध्ये निर्णय घेतला पाहिजे. या कालावधीत निर्णय घेतला जाईल असे माननीय मुख्यमंत्री महोदय सांगतील काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, याबाबत तातडीने निर्णय घेण्याची माझी मानसिकता आहे. त्यासाठी सर्व लोकांना विश्वासात घेऊनच हा विषय नेमका कशाप्रकारे सोडविता येईल हे पाहिले जाईल. ही गोष्ट माझ्यावर सोपवावी. त्याचबरोबर राज्यपालांच्या निर्देशांचे उल्लंघन होणार नाही हे निश्चित पाहिले जाईल.

**सभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

--------



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "रायगड जिल्हयातील अलिबाग, पेण, उरण, खालापूर, महाड, पोलादपूर तालुक्यात दि.22.10.2008 व दि.20.11.2008 रोजी अचानक व अवकाळी आलेल्या वादळी पावसामुळे या ठिकाणच्या घरांचे, शासकीय इमारतींचे, अन्नधान्यांचे, मुलांच्या पुस्तकांचे व विजेचे खांब पडून विद्युत कंपनीचे नुकसान होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी "नवी मुंबईतील पाम बिच मार्गावर पीर अली शाह बाबा हा दर्गा बेकायदेशीर बांधला असून सदर दर्गा हाय सिक्युरिटी झोनमध्ये असल्यामुळे तेथे काय चालते याबाबत शासनाला काहीही माहिती नसणे, नौदलाच्या उच्च अधिका-यांनी या दर्ग्याची, परिसराची नुकतीच पाहणी करुन व्यक्त केलेली चिंता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 18:35

श्री. नितीन गडकरी : माननीय सभापती महोदय, मी आपणास नम्र विनंती करीत आहे. आजच्या 93च्या निवेदनातील निवेदन क्रमांक 4 हे मिहान प्रकल्पासंबंधी आहे. माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मिहान प्रकल्प बंद पडलेला आहे. तो सुरु होणे अत्यंत आवश्यक आहे. दररोज 1कोटी रु.चे नुकसान होत आहे. म्हणून हे निवेदन प्रथम घ्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : नागपूर येथील कार्गोहब मिहान प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित जमीन देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे

**मु. शी**. : नागपूर येथील कार्गोहब मिहान प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित जमीन देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे याबाबत सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण आणि केशवराव मानकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राणा जगजितसिंह पाटील (उद्योग व संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण आणि केशवराव मानकर, वि.प.स. यांनी "नागपूर येथील कार्गोहब मिहान प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के विकसित जमीन देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : या प्रश्नामध्ये माझी एवढीच विनंती आहे की, परवा माननीय मुख्यमंत्र्यांनी मिहान प्रकल्पाच्या संदर्भात विधानसभेत उत्तर दिले. त्यामध्ये त्यांनी 6 गोष्टी मान्य केल्या. मिहान प्रकल्पाला साडेबारा टक्के जमीन किंवा टीडीआर किंवा 12 टक्क्याऐवजी शासनाचे सानुग्रह अनुदान, यापैकी काही तरी एक, बरेच शेतकरी सेक्शन 18 अंतर्गत वाढीव अनुदानाबाबत न्यायालयात गेलेले आहेत त्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करणे, प्रकल्पग्रस्तांचा पुनर्वसन कायदा 1999 मिहान प्रकल्पाला लागू करणे, सदर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्या संदर्भातील सेक्शन 4ची अधिसूचना काढून त्यांचे पुनर्वसन करणे असे 6 निर्णय विधानसभेमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले आहेत. मिहान कंपनीला त्याबाबतीत पत्र देणे आवश्यक आहे. रोजचे 1 कोटी रु.चे नुकसान होत आहे. विदर्भातील हा फ्लॅगशिप प्रोजेक्ट आहे. माझी एकच विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी विधानसभेमध्ये जे सांगितले त्यासंबंधी 93च्या निवेदनामध्ये काहीच सांगितलेले नाही. मागचा अनुभव असा आहे की, सभागृहामध्ये झालेल्या धोरणाची अंमलबजावणीच झाली नाही. मी कोणाबद्दल काही बोलत नाही. आपला मी सन्मान ठेवतो. आपण विदर्भाला न्याय द्यावा. या प्रकल्पाचे काम उद्या सकाळी सुरु झाले पाहिजे. आपण केलेल्या 6 सूचना तेथील लोकांना मान्य आहेत. यासंबंधी आपण मला एक पत्र द्यावे किंवा त्यांना तसे पत्र पाठवावे. रोजचे एक कोटी रुपयाचे नुकसान होत आहे. त्यामुळे प्रकल्पाचे काम उद्या सकाळी सुरु झाले पाहिजे. विकास कामे थांबू नयेत म्हणून सहा सूचनांचा अंतर्भाव करुन आजच्या आज कंपनीला पत्र द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : उद्या सकाळपर्यन्त पत्र त्या ठिकाणी पोहोचविले जाईल.

श्री. नितीन गडकरी : 6 सूचनासहीत पत्र पाठवावे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : माननीय मुख्यमंत्र्यांनी जे काही जाहीर केलेले आहे त्यानुषंगाने पत्र दिले जाईल.

----

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना (पुढे सुरु...)

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, चंद्रकांत पाटील व प्रतापराव सोनवणे, यांनी "ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील मौजे पूर्णा, गुंदवली, काल्हेर, कोपर, कशेळी इत्यादी गावातील सुमारे 127 कुळांना त्यांच्या अधिकारातील 200 ते 215 एकर शेतजमिनीचा ताबा काढून घेण्याचे प्रयत्न सुरु असून सदर जमिनीच्या 7/12 उता-यावर कूळ शेतक-यांची नावे असूनही जमिनीची परस्पर विक्री होत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व विनोद तावडे यांनी "मुंबईतील वडाळा(पूर्व) येथील सुमननगर भागातील आझाद मोहल्ला येथील एस.आर.ए.गृहनिर्माण संस्थेच्या 24 सदस्यांनी पात्रता यादीत नाव येण्यासाठी बनावट वीज बिले सादर केल्याचे उघडकीस येऊनही त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "यवतमाळ जिल्ह्यातील वणी वरोरा येथील कापसाच्या जिनिंग फॅक्टरीमध्ये दिनांक 25.12.2008 रोजी लागलेल्या भीषण आगीत सुमारे 7 कोटी किंमतीचा कापूस जळून खाक होणे, सदर कापूस पणन महासंघाने खरेदी केलेला असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी "गेल्या 5 वर्षापासून आदिवासी विकास व सामाजिक न्याय विभागाचा तसेच विदर्भ, मराठवाडा व कोकणातील सिंचन प्रकल्पासाठीचा निधी कृष्णा खोरे प्रकल्पासाठी वापरला जाणे, जोड प्रस्तावाच्या नावाखाली कामे देताना कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...नंतर श्री. गिते...

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे,चंद्रकांत पाटील,विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "सांगली जिल्हयामध्ये कोटयावधी रुपये खर्चून सरकारने आरफळ योजना कार्यरत करणे,सदर योजनेत अधिका-यांनी आर्थिक गैरव्यवहार केला असणे,न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश देऊनही त्यावर कार्यवाही न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुमुख जागवानी, विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ माते यांनी "नवी मुंबईतील विक्रांत ट्रान्सपोर्ट व मनिष ट्रान्सपोर्ट या कंपन्या महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात या राज्यांदरम्यान बोगस सी-फॉर्म व ऑक्ट्राय पावत्या सादर करुन वाहनांना बोगस नंबर प्लेट लावून माल वाहतूक करीत असून शासनाचा लाखो रुपयांचा जकात विक्रीकर बुडवीत असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, प्रकाश शेंडगे, सय्यद पाशा पटेल, चंद्रकांत पाटील यांनी "राज्यात अनुसूचित जाती संवर्गात लोकसंख्येने दुस-या स्थानावर असलेल्या मातंग समाजाचा मागासलेपणा दूर करण्यासाठी वेळोवेळी उपाययोजना करण्यात येणे, या समाजाचा मागासलेपणा सखोल अभ्यास करुन तो दूर करण्यासाठी क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने शासनाकडे दिनांक 30.8.2008 रोजी अहवाल सादर करुनही त्यावर कार्यवाही न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, सुरेश जेथलिया,गोपिकिशन बाजोरिया, डॉ.नीलम गोऱ्हे,ॲड. दीपक सावंत, श्री. अरविंद सावंत यांनी "दिनांक 24.12.2008 रोजी नांदेड येथे शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोघा आरोपींना सोडण्यासाठी माजी महापौरांच्या मुलाने पोलिसांवर दबाव आणून त्यांना शिवगाळ करण्यात येणे,माजी महापौर श्री.ओमप्रकाश पोकर्णा यांनी

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

कार्यकर्त्यांना घेऊन पोलीस स्टेशनमध्ये जाणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्यांच्या नियम 93 च्या इतर सूचनांना मी माझ्या दालनात अनुमती नाकारली आहे.

---------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : नव्याने नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी अंशदायी पेन्शन योजना

लागू करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय

**मु. शी.** : नव्याने नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी अंशदायी पेन्शन योजना लागू करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93अन्वये सूचना.

डॉ.पतंगराव कदम ( शालेय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते,संजय केळकर यांनी "नव्याने नियुक्त होणा-या कर्मचा-यांसाठी अंशदायी पेन्शन योजना लागू करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

... ...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्य शासनाने दिनांक 31 ऑक्टोबर, 2005 रोजी शासनाने एक धोरणात्मक निर्णय घेतला की, राज्य शासनाच्या सेवेमध्ये येणा-या कर्मचा-यांना अंशदायी पेन्शन योजना लागू केली आहे. तीच योजना अनुदानित शाळांमध्ये काम करणा-या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी लागू केली आहे. या ठिकाणी प्रश्न असा आहे की, इन्ट्रीन सर्व्हीस सेवेत लागण्याचा दिनांक मग तो सुरुवातीला प्रोबेशन पिरियेडवर असेल, नंतर दोन वर्षानंतर कायम होईल. विषय असा आहे की, दिनांक 18 जुलै, 2007 रोजी चर्चा झाली होती, व त्या अनुषंगाने शासनाने परिपत्रक काढलेले आहे. ते परिपत्रक सगळयांना कळविले आहे की, 2005 पूर्वी सेवेत आलेल्यांना पूर्वीचीच पेन्शन योजना लागू आहे. यासंदर्भात वित्त विभागाचा जी.आर.निघालेला आहे. त्यानंतर या योजनेत पुन्हा अडचण निर्माण झाली. या ठिकाणी शासनाने उत्तर दिले आहे की, 2008 चा वित्त विभागाचा निर्णय आहे, तो दुरुस्त करण्याच्या संदर्भात आम्ही प्रयत्न करतो आहोत. अनेक शिक्षकांचे अंशदान पेन्शन योजने संबंधी त्यांचे खाते काढले नाही, त्यासंबंधी अंशदान भरले नाही. म्हणून त्यांचे वेतन सुध्दा रोखून ठेवले आहेत. यासंदर्भात तातडीने पाठपुरावा करुन, मंत्री महोदयांचा कामाचा उरक लक्षात घेता लवकर काम होण्याची शक्यता आहे. दिनांक 26.2.2008 चे परिपत्रक लवकरात लवकर म्हणजे पंधरा दिवसांच्या आत सुधारणा करुन पूर्वीप्रमाणेच त्यांना पेन्शन योजना लागू करण्याच्या संदर्भात शासन निर्णय घेईल काय?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, दिनांक 26.2.2008 ला जो आदेश काढला आहे, त्यात सुधारणा करुन वित्त विभागाकडे आमचा सातत्याने प्रयत्न चालला आहे की या लोकांना देखील सेवानिवृत्तीचा फायदा मिळावा.

---------

**सभापती** : नियम 93 चे निवेदन क्रमांक 2 व 3 मी तहकूब केले असून ती निवेदने नंतर घेण्यात येतील.

----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : ऊसाला जाहीर केलेल्या भावाप्रमाणे पहिला हप्ता मिळणे

**मु. शी.** : ऊसाला जाहीर केलेल्या भावाप्रमाणे पहिला हप्ता मिळणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.हर्षवर्धन पाटील (सहकारमंत्री ) : सभापती महोदय, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "ऊसाला जाहीर केलेल्या भावाप्रमाणे पहिला हप्ता मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, फार मोठया प्रमाणात शेतकऱ्यांची दुरावस्था झालेली आहे. तेथे काय वातावरण आहे याची आपल्याला आणि मंत्रीमहोदयांना चांगली जाणीव आहे. वारंवार सभागृहात उत्तरे दिली जातात. परंतु शेवटचा हप्ता देखील वेळेवर मिळाला नाही. जो भाव जाहीर केला जातो तो शेतकऱ्यांना मिळत नाही याची आपल्याला जाणीव आहे. शेतकरी संघटनेने ज्या भावाची मागणी केली त्या मागणीचा विचार करुन लवकरात लवकर रक्कम दिली जाईल काय? याठिकाणी नकारात्मक उत्तर दिले आहे त्याऐवजी शासन सकारात्मक भूमिका घेईल काय?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छितो की, ऊसाचा पहिला ॲडव्हान्स किती असावा या संदर्भात शेतकरी संघटनेने अनेक भागात आंदोलने केली होती. केंद्र शासनाने एस.एम.पी.ठरवून दिला आहे. एस.एम.पी.च्या कायद्याप्रमाणे ॲडव्हान्सची रक्कम एस.एम.पी.खाली कारखान्यांना देता येणार नाही अशी तरतूद आहे. या राज्यामध्ये जे सहकारी साखर कारखाने ऊसाचे गाळप करतात त्यांनी शेतकऱ्यांनी घातलेल्या ऊसाला एस.एम.पी.प्रमाणे पहिला ॲडव्हान्स द्यावा अशा सूचना दिल्या आहेत, त्या संदर्भातील कार्यवाही चालू आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : निविदा प्रक्रिया अपूर्ण असतानाही कुणकेश्वर पर्यटन संकुलाच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली जाणे

**मु. शी.** : निविदा प्रक्रिया अपूर्ण असतानाही कुणकेश्वर पर्यटन संकुलाच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली जाणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सुरेश शेट्टी (पर्यटन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री.परशुराम उपरकर यांनी "निविदा प्रक्रिया अपूर्ण असतानाही कुणकेश्वर पर्यटन संकुलाच्या कामाची मुहूर्तमेढ रोवली जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नसताना मंत्रीमहोदयांनी प्रकल्पाचे भूमीपूजन करण्याची कारणे काय आहेत? निविदा पक्रिया केव्हा पूर्ण होईल? या कामासाठी यावर्षी किती तरतूद केली जाईल?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, कुणकेश्वर याठिकाणी 5.5 कोटी रुपयांच्या कामाचे भूमीपुजन दिनांक 6.11.2008 रोजी झाले. या कामासाठी 8.10.2008 रोजी निविदा काढल्या होत्या. दोनच निविदा आल्या होत्या. एक निविदा अंदाजित रक्कमेपेक्षा 25 टक्के जास्त होती व दुसरी डिस्क्वॉलिफाय झाली म्हणून दोन्ही निविदा स्वीकारता आल्या नाहीत. 30 तारखेला पुन्हा निविदा काढीत आहोत.

श्री.अरविंद सावंत : कामाचे भूमीपूजन करण्याची कारणे काय होती?

श्री.सुरेश शेट्टी : निविदा मागविल्या होत्या म्हणून भूमीपूजन करण्यात आले.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ज्यावेळी निविदा मागविल्या त्यावेळी दोनच निविदा प्राप्त झाल्या. त्या किती अधिक किंवा कमी किंमतीच्या आहेत हा भाग वेगळा आहे. परंतु जेव्हा स्पर्धा नसते त्यावेळी निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागविण्याची पध्दत आहे. दोनच निविदा आल्यामुळे पुन्हा निविदा मागवाव्या लागणार हे स्पष्ट झालेले असताना भूमीपूजनाची घाई का करण्यात आली?

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव)**

श्री.सुरेश शेट्टी : निविदा प्रक्रिया 8.10.2008 ला सुरु केली. भूमीपूजनाचा कार्यक्रम 6.11.2008 ला झाला. निविदा 1.11.2008 रोजी ओपन केली. 15 लोकांनी फॉर्म नेले होते. परंतु फक्त दोनच लोकांनी निविदा भरल्या होत्या. त्या स्वीकारार्ह नसल्यामुळे पुन्हा निविदा मागवाव्या लागतील.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटनाचा जिल्हा म्हणून शासन एका बाजूला घोषित करते आणि दुसऱ्या बाजूला मात्र तशा सोई देत नाहीत ही एक प्रकारे चेष्टाच आहे. कारण निविदा मंजूर नसतांना, कुठलीही प्रक्रिया पूर्ण नसताना फक्त उद्‌घाटन करण्यात येते आणि क्रेडिट घेण्याचा प्रयत्न करण्यात येतो. म्हणून जोपर्यंत निविदा प्रक्रिया पूर्ण होत नाही, वर्क ऑर्डर दिली जात नाही तोपर्यंत उद्‌घाटन होता कामा नये यासंबंधीचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय, असा धोरणात्मक निर्णय घेतला जाईल.

श्री. विनोद तावडे : महोदय, माननीय मंत्री महोदयांना कुठलीच प्रक्रिया पूर्ण नसताना केवळ भूमीपूजनाची घाई का असते हे समजत नाही. कारण विमानतळांचे सुध्दा असे तीन चार प्रकल्प आहेत, ज्यांचे फक्त भूमीपूजनच झालेले आहे, पुढील कोणतीच प्रक्रिया नाही त्यामुळे जनतेच्या मनात एक प्रकारचा खेद आहे.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी ज्या ज्या प्रकल्पांचे भूमीपूजन केले त्यासंबधीची माहिती घेऊन पटलावर ठेवण्यात येईल.

-----------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माणगाव-म्हसळा राज्य मार्गावर होणारे सततचे अपघात

**मु. शी.** : माणगाव-म्हसळा राज्य मार्गावर होणारे सततचे अपघात याबाबत सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. सुनील देशमुख (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील, वि.प.स. यांनी "माणगाव-म्हसळा राज्य मार्गावर होणारे सततचे अपघात" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती(श्री. भास्कर जाधव)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माणगांव म्हसळा रस्ता राज्य मार्ग क्र. 97 वरील घोणसे घाटाच्या संदर्भात मी ही सूचना दिलेली आहे. तसेच यापूर्वी अर्धा-तास चर्चा, लक्षवेधी सूचना अशा वेगवेगळ्या आयुधांच्या माध्यमातून मी हा प्रश्न वेळोवेळी उपस्थित केलेला आहे. या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या घाटातील वळणावर सन 1990 मध्ये झालेल्या अपघातात 47 जण जखमी झाले होते, सन 1992 मध्ये 22 लोक जखमी, सन 1993 मध्ये 3 ठार तर 8 जखमी, सन 1995 मध्ये 19 जण जखमी, सन 1996 मध्ये झालेल्या अपघातात 7 ठार, 21 जखमी, सन 1997 मध्ये एक जखमी, 1998 मध्ये 1 ठार 7 जखमी, सन 2000 मध्ये 3 ठार 7 जखमी, सन 2002 मध्ये 7 जखमी, सन 2004 मध्ये 2 अपघात 23 ठार 52 जखमी अशा प्रकारे अपघातांची मालिकाच सांगता येईल. या वळणासाठी 9 फेब्रुवारी, 2003 मध्ये 2.34 कोटीची तरतूद केली होती. पण सन 2003 पासून अजूनपर्यंत या घाटाचे काम पूर्ण झाले नाही. म्हणून माननीय मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे या घाटाचे काम कोणत्या कालावधीत व केव्हा पूर्ण होईल आणि ही अपघाताची मालिका थांबविणार काय ?

डॉ. सुनील देशमुख : महोदय, 28 फेब्रुवारी, 2009 पर्यंत हे काम पूर्ण करण्यात येईल.

-----------

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ SBT/

**पृ. शी.** : राज्यात सोयाबीन पिकाचे बाजारभाव अचानक कमी होणे

**मु. शी.** : राज्यात सोयाबीन पिकाचे बाजारभाव अचानक कमी होणे याबाबत सर्वश्री पाशा पटेल, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

-------------

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी**. : राज्यात पर्सेंटाईल पध्दती सुरु करणे

**मु. शी**. : राज्यात पर्सेंटाईल पध्दती सुरु करणे यासंबंधी सर्वश्री कपिल पाटील, जयंत पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, जितेंद्र आव्हाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, भास्कर जाधव,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पर्सेंटाईल निर्णयाला मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने, राज्यातील एस.एस.सी बोर्डाच्या 16 लाख विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा निर्माण झालेला प्रश्न, मार्चच्या परीक्षा तोंडावर असणे त्यामुळे प्रवेशाचे निर्माण होणारे संभाव्य संकट, दिल्ली बोर्डाच्या तुलनेत एस.एस.सी बोर्ड दर्जा आणि गुणवत्तेत खूप मागे असणे, विद्यार्थी गुणवंत असूनही देशातील अन्य बोर्डांच्या तुलनेत ते मागे पडणे, यामुळे मराठी व इंग्रजी शाळांच्या पटसंख्येवर परिणाम होणे, याबाबत शासनाने अद्याप कोणताही निर्णय न घेणे, दिल्ली बोर्डाप्रमाणे समान दर्जा व गुणवत्ता वाढवण्याची आवश्यकता असणे, गणित आणि विज्ञान या विषयांचा अभ्यासक्रम दिल्ली बोर्डासारखा करणे आवश्यक असणे, एस.एस.सी बोर्डाच्या मूल्यमापन गुणदान पध्दतीत लवचिकता आणण्याची आवश्यकता असणे, तुकडीतील किमान पटसंख्या 25 करण्याची आवश्यकता असणे, पटसंख्या 25 असेपर्यंत तुकडी बंद होऊ न देणे, इयत्ता पहिली पासून निम इंग्लिशची आवश्यकता असणे, एस.एस.सी बोर्डाचा दर्जा सुधारण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासकीय पातळीवर असलेली निष्क्रियता यामुळे राज्यातील जनतेमध्ये निर्माण झालेले चिंतेचे वातावरण आणि संतापाची भावना, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. पतंगराव कदम (शालेय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : महोदय, राज्यातील दीड ते दोन कोटी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी निगडित ही लक्षवेधी सूचना आहे. गेली दोन वर्षी सीबीएसई आणि आयसीएसई या दोन बोर्डांच्या तुलनेत आपले विद्यार्थी मागे पडतात. अन्य प्रवेश परीक्षेत मागे पडतात व याबाबत वारंवार मागणी झाली त्यावेळी पर्सेंटाईलसंबंधीचा निर्णय उशिराने राज्यात झाला. त्यामुळे प्रकरण उच्च न्यायालयात गेले, अजून सर्वोच्च न्यायालयात सरकार गेलेले नाही. एक मात्र मान्य केले पाहिजे की, नवीन मंत्री महोदय आल्यानंतर फरक पडल्याचे निवेदनातून दिसून येत आहे. याबाबत माझा असा प्रश्न आहे की, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लागेल तो लागेल, त्याला वेळ लागू शकतो परंतु त्यावर अवलंबून न राहता काही मुलभूत बदल करण्याची गरज आहे. दिल्ली बोर्टाचा विज्ञान आणि गणिताचा जो अभ्यासक्रम आहे त्याला समांतर अभ्यासक्रम आपल्या बोर्डानेही सुरु करणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

तुकडयांची पटसंख्या 40 वरुन 25 वर आणण्याची आवश्यकता आहे. या प्रश्नाच्या संदर्भात अजूनही उत्तर मिळालेले नाही. इंग्रजी आणि त्रिभाषा सुत्र या दोन प्रश्नाबाबत स्पष्टीकरण या निवेदन आलेले नाही त्यामुळे माननीय मंत्रीमहोदय या तीन प्रश्नांची उत्तरे देणार आहेत काय कारण आपल्याकडे वेळ फार कमी असून हा विषय लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणार आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंदर्भात विभागाने आदेश काढला होता. त्यानंतर ही केस कोर्टात गेली. कोर्टात दोन जजेसचे भिन्न मते तयार झाल्यामुळे ही केस तिस-या जजेसकडे गेल्यानंतर तिस-या जजेसने या केसच्या विरोधात निर्णय दिल्यामुळे आता आपण सुप्रिम कोर्टात गेलेलो आहे. मधील काळात या विषयाच्या संदर्भात एक तज्ज्ञ समिती नेमून हा प्रश्न मार्गी लावला जाणार आहेत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी म्हटल्या प्रमाणे आपल्या मुलांवर अन्याय होणार नाही याची निश्चितपणे काळजी घेतली जाईल.

श्री. अलका देसाई : सभापती महोदय, आदरणीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी उत्तर दिले आहे की, ही केस आता सुप्रिम कोर्टात गेलेली आहे. पर्सेंटाईल हे महाराष्ट्रातील मुलांना सुध्दा असावयास पाहिजे. दिल्ली बोर्ड दादागिरी करुन आमच्या मुलांना दाबण्याचे काम करीत असते. गेल्यावर्षी ज्या मुलांना 88-90 टक्के मार्क्स होते त्या मुलांनाही चांगल्या कॉलेजेसमध्ये प्रवेश मिळाला नाही. त्यामुळे अगोदरच्या निर्णयामुळे आपल्या मुलांना अत्यंत अडचण निर्माण झाली. काही श्रीमंत मंडळी एकत्र आली व आमच्या विरुध्द कटकारस्थान केले. या सर्व गोंधळामध्ये सामान्य माणसांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये, मागे पडू नये यासाठी शासनाने खंबीर धोरण आखले पाहिजे. जेव्हा आपण इंजिनिअरींग आणि मेडीकलला जातो तेव्हा सायन्स आणि गणितात चांगले मार्क्स असावे लागतात. आपण आता दुसरीपासून इंग्रजी सुरु केलेले आहे. प्रश्न असा आहे की, या बाबतीत निर्णय घेत असतांना महाराष्ट्र सरकार कोणत्या बाजूने निर्णय घेणार आहे ते सांगावे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी स्पष्टपणे सांगितले आहे की, कोर्टबाजी झाल्यामुळे आपण एक आठवडयाच्या आत समिती नेमून या समितीच्या माध्यमातून या प्रश्नातून मार्ग कसा काढला जाईल आणि आपल्या मुलांवर अन्याय कसा होणार नाही यासंदर्भात निर्णय घेतला जाईल.

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपल्या गुणदान पध्दतीत तीन गोष्टी महत्वाच्या आहेत. आपल्या गुणदान पध्दतीत मुल्यमापन पध्दती आणि परीक्षा पध्दतीत जमीन अस्मानाचे अंतर आहे. त्यामुळे आपल्याला हे अंतर ताबडतोबीने संपवावे लागेल. पटसंख्येच्या डिसलेक्सीयामुळे 10 विद्यार्थ्यांपैकी 4 मुले मागे पडतात अशा वर्गामध्ये आपल्याला पटसंख्या 80 वरुन 25 वर आणावी लागेल. आपण असे केले नाही तर आपण प्रचंड मागे पडू.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंदर्भात तज्ज्ञ समिती निर्णय देईल. आपल्या राज्यात 25 चा पट करणे मला तरी मुळीच शक्य वाटत नाही.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, खरे म्हणजे हा ॲकॅडमिक निर्णय आहे. माननीय मंत्रिमहोदय तज्ज्ञांची कमिटी नेमत आहे ही स्वागतार्ह बाब आहे. मागे या संदर्भात चर्चा झाली होती. आता सुप्रीम कोर्टाचा आणि कमिटीचा निर्णय येईपर्यंत या बॅचचा विचार आपणास करावा लागणार आहे. तत्कालीन शिक्षण मंत्री प्रा.पुरके यांनी सांगितले होते की, जर आपल्या बाजूने कोर्टात निकाल लागला नाही तर सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.सी. शाळांना बारावी चालू करायला लावू. तेव्हा त्याप्रमाणे आदेश काढण्यात येतील काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,आठ दिवसांत तज्ज्ञांची समिती नेमली जाईल. या प्रकरणी कोर्टाच्या निर्णयाची वाट न पाहता आम्ही निर्णय घेऊ.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदय या वर्षीच्या 10 वीच्या बॅच संदर्भात खुलासा करतील काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या वर्षीच्या 10 वीच्या बॅचला कसा फायदा मिळेल यासाठी लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, यावर्षी महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाच्या दहावीच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना अकरावीच्या प्रवेशाच्या बाबतीत सी.बी.एस.ई. आणि आय.सी.एस.ई.च्या विद्यार्थ्यांचे अडथळे येणार नाहीत असे मंत्रिमहोदय आश्वासन देतील काय ?

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, अशाप्रकारचा निर्णय मी एकटा घेऊ शकत नाही. यासंबंधी एक्स्पर्ट कमिटीचा रिपोर्ट आल्यानंतर निर्णय घेण्यात घेईल.... (अडथळा ) आठ दिवसांच्या आत कमिटी नेमून त्या कमिटीस लवकर निर्णय देण्याबाबत बंधन घालण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पर्सेन्टाईलचा प्रश्न सर्वप्रथम श्री.कपिल पाटील, श्री. विनोद तावडे आणि मी उपस्थित केला होता. त्यावेळी तत्कालीन शिक्षण मंत्री प्रा.पुरके यांनी सांगितले होते की, या संदर्भात कोणीही कोर्टात गेले तरी आमचा निर्णय कायम राहणार आहे. आता मंत्रिमहोदय सांगत आहेत की, या संदर्भात तज्ज्ञांची एक कमिटी नेमून निर्णय घेण्यात येईल.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

आय.सी.एस.ई. आणि सी.बी.एस.ई. परीक्षेचा पॅटर्न 20 टक्के ओरल आणि 80 टक्के लेखी परीक्षा असा आहे. ओरलमध्ये विद्यार्थ्यांना 20 पैकी 19 किंवा पैकीच्या पैकी मार्क्स मिळतात. तेव्हा आपल्याकडील मूल्यांकन पध्दतीमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. तर आपले विद्यार्थी स्पर्धेत उतरु शकतील तेव्हा या संदर्भात ठोस निर्णय घेण्यात येईल काय ?

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्याबाबत कमिटीमध्ये विचार करण्यात येईल. कमिटी नेमण्याच्या अगोदर निर्णय जाहीर करणे योग्य होणार नाही. तेव्हा कमिटीचा रिपोर्ट आल्यानंतर त्यावर शासन निर्णय घेईल.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : सभापती महोदय, सध्या इयत्ता 9 वी आणि 10 वी साठी सामान्य गणित विषय सुरु केलेला आहे. त्यामुळे इयत्ता 9 वी आणि 10 वीचा दर्जा कमी झालेला आहे. सी.बी.एस.ई.च्या तुलनेत आपल्या 10 वीच्या गणिताचा दर्जा कमी आहे. निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे की, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विज्ञान आणि गणिताचा संपूर्ण अभ्यासक्रम हा सी.बी.एस.ई.प्रमाणे करण्याच्या प्रश्न विचाराधीन आहे.तेव्हा पुढील वर्षापासून सी.बी.एस.ई.प्रमाणे अभ्यासक्रम सुरु करणार काय ?

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात तज्ज्ञ कमिटीचा रिपोर्ट आल्यानंतर निर्णय घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्याच्या दृष्टीने इयत्ता पाहिली पासून इंग्रजी विषय सक्तीचा करीत आहोत. त्यासाठी 20 टक्के जागा इंग्रजी माध्यमातून बी.एड.झालेल्यांसाठी राखून ठेवण्याचा विचार शासन करील काय ?

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना विचारलेला प्रश्न मूळ लक्षवेधीला सोडून आहे. इयत्ता पहिली पासून इंग्रजी विषय सक्तीचा केल्यानंतर त्याबाबत विचार करण्यात येईल.

----------------

यानंतर श्री.गायकवाड..

**लक्षवेधी क्रमाक 4 सबंधी**

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरी लक्षवेधी सूचना क्रमांक 4 है.

श्री.विनोद तावडे : लक्षवेधी सूचना क्रमांक 4 ही गृह विभागाकडे दाखविण्यात आलेली असली तरी ती शिक्षण विभागाशी संबधित आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मेरी लक्षवेधी सूचना क्रमांक 4 है. मुझे इस संबंध में कुछ बताना है इसलिए कृपया आप इस सूचना को पुकारिए.

**तालिका सभापति** : क्रमांक 4 की लक्षवेधी सूचना को पुकारने का प्रश्न ही नहीं उठता है क्योंकि यह सूचना आज चर्चा के लिए नहीं ली जा रही है.

श्रीमती फौजिया खान : ठीक है. मुझे अपनी लक्षवेधी सूचना के बारे में यही बताना है कि इस लक्षवेधी सूचना का उत्तर गृह विभाग से संबंधित दिखाया गया है. लेकिन मुझे शालेय शिक्षण विभाग से उत्तर अपेक्षित है इसलिए मेरी यह लक्षवेधी सूचना सोमवार को सदन में चर्चा के लिए रखी जाए.

**तालिका सभापति** : ठीक है.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी** : मुंबईतील कामाठीपुरा येथील कुमार बिल्डींग ही इमारत धोकादायक म्हणून घोषित करुनही पाडण्याची कार्यवाही न करणे

**मु.शी** : मुंबईतील कामाठीपुरा येथील कुमार बिल्डींग ही इमारत धोकादायक म्हणून घोषित करुनही पाडण्याची कार्यवाही न करण्याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, संजय केळकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनोद तावडे ( विधान सभेने निवडलेले ) सभापती महोदय, नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"मुबईतील कामाठीपुरा येथील धोकादायक इमारत म्हणून म्हाडाने घोषित केलेल्या कुमार बिल्डिंगमधील रहिवाशांना म्हाडाने 8 वर्षापूर्वी संक्रमण शिबिरात हलविणे, इमारत मालक सदर धोकादायक इमारत पाडण्यास विरोध करीत असल्याचे दिनांक 23.11.2008 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, इमारत पाडण्यासाठी गेलेल्या अधिकारी आणि कामगारांना राजकीय दबावापोटी पुन्हा परतावे लागणे, सर्व सबंधित रहिवाशांनी मुख्य अधिका-यांना इमारत तोडण्याची विनंती एकमताने करुनही अद्यापपर्यंत इमारत पाडली न जाणे, शासनाने या प्रकरणी तातडीने लक्ष घालून रविाशांना न्याय देण्याची होत असलेली मागणी या मागणीकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनतेमध्ये शासना विषयी पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना, यावर शासनाची प्रतिक्रिया "

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर ( गृह निर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस /: कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे )



VTG/ KTG/ KGS/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाच्या पान नंबर दोन मध्ये असे म्हटले आहे की, "प्रस्तुत इमारत मंडळाने बैठक क्रमांक 106 दिनांक 15.03.2008 अन्वये म्हाडा कायदा कलम 88 (3) अंतर्गत म्हणजे दुरुस्ती पलिकडे घोषित करण्यात आली होती " ही इमारत पाडण्याकरिता दिनांक 7.10.2008 रोजी ठेकेदाराची नेमणूक केली होती. म्हणजे सात ते आठ महिने ठेकेदाराची नेमणूक करण्यामध्ये घालविण्यात आले आहे. ही इमारत कोसळायला आली असून ती राहण्यास लायकीची नाही. म्हणूनच मुंबई महानगरपालिका तसेच अग्निशमन विभागाने नोटीस दिली होती. ही इमारत जर पडली तर त्यात राहणारे भाडेकरु मृत होऊ शकतात असे असतांना कलम 88(3) अंतर्गत इमारत दुरुस्तीच्या पलीकडे आहे असे दिनांक 15.3.2008 रोजी घोषित केले होते आणि ठेकेदार मात्र 7 ऑक्टोबर 2008 ला नेमला हा विलब का झाला, कशामुळे झाला, ज्यांनी हा विलब केला होता त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय? ज्यावेळी प्रत्यक्ष इमारतीचे काम पाडण्यास दिनांक 14 व 15 ऑक्टोबर रोजी लोक गेले होते तेव्हा मालकाने आक्षेप घेतला होता. या अगोदरही मालकाने आक्षेप घेतला होता त्याचबरोबर ही इमारत तोडण्यास मजूर आत गेल्यावरही आक्षेप घेतला होता त्यामुळे हे लोक परत आले त्यानंतर मालक 20 तारखेला कोर्टात गेला होता. या मालकाला कोर्टात जाण्यास संधी मिळावी म्हणून एका राजकीय नेत्याने दबाव आणला व त्यामुळे या मालकाला चार पाच दिवस देण्यात आले होते. लोकांच्या जीविताशी खेळण्याचे काम तेथील अधिकारी करीत आहेत. त्या ठिकाणचे नेतृत्व करणारे मंत्री करीत आहेत. वास्तविक ही माननीय मंत्रिमहोदयांची जबबदारी होती तेव्हा कोणाचा राजकीय दबाव आपल्यावर आला होता ? इमारत कोसळल्यामुळे अनेक जण मृत्युमुखी पडतात तेव्हा ही दिरंगाई करणा-या अधिका-या विरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सदरहू इमारत धोकादायक म्हणून जाहीर केल्यानंतर तेथे राहणा-या भाडेकरुंना नोटीसेस देण्यात आल्या. त्याप्रमाणे पुढची कार्यवाही केली. होती. या नोटीसेस प्रमाणे दोन भाडेकरु संक्रमण शिबिरात रहात होते..

श्री.विनोद तावडे :माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही.

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर :मी आपल्या प्रश्नाचे उत्तर देत आहे. या इमारतीचा मालक सिटी सिव्हील कोर्टात गेला होता त्या ठिकाणी त्यांना स्टे मिळाला नाही म्हणून तो हाय कोर्टात गेला होता....



श्री.विनोद तावडे : तोपर्यत आपण वाट पहात होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर :वाट पाहण्याचे काही कारण नाही. त्या इमारतीचा एक मजला आणि दोन खोल्या पाडण्यात आल्या होत्या . ही इमारत तोडण्याची कार्यवाही झालेली आहे परतु या इमारतीचा मालक प्रथम सिटी सिव्हील कोर्टात गेला. त्यानंतर तो हायकोर्टात गेला होता.

नंतर श्री.सुंबरे

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. शेगावकर ....

त्याने हायकोर्टाला सांगितले की, मला इमारत दुरूस्त करावयाची आहे त्यासाठी परवानगी द्या. तेव्हा हायकोर्टाने त्याला मंडळाकडे त्यासाठी प्रस्ताव देण्यास सांगितले आहे. त्याप्रमाणे त्याने मंडळाकडे प्रस्ताव दिला पण त्याला भाडेकरूंनी विरोध केल्यामुळे तो प्रस्ताव मंडळाने रद्द केला. त्यानंतर मंडळाने भाडेकरू आणि मालक यांची बैठक घेतली आणि त्यातही भाडेकरूंनी विरोध केला असल्याने मंडळाने त्याची एनओसी रद्द केली. त्यामुळे मग ही इमारत मंडळाला तोडावी लागली. त्याविरोधात मालक खंडपीठाकडे गेला असता खंडपीठाने यामध्ये स्थगिती दिली आहे. सभापती महोदय, कोर्ट प्रोसेसमुळे यामध्ये दिरंगाई झालेली आहे. कोर्टाने ज्याप्रमाणे डायरेक्टशन्स दिल्या आहेत त्यानुसारच कारवाई झालेली आहे. आता खंडपीठान याला पुन्हा स्थगिती दिली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी या ठिकाणी अतिशय नेमका प्रश्न विचारलेला आहे. नियम 88(3)ची नोटीस तुम्ही 15 मार्चला दिली त्यानंतर प्रत्यक्ष ठेकेदाराला 7.10 ला आदेश दिले. तर हा मधला काळ जो विलंब झालेला आहे त्याचे कारण काय ? ही इमारत पाडण्यासाठी तुम्ही 14 तारखेला गेला होता. मग 20 तारखेपर्यंत मालकाला कोर्टात जाण्याची संधी का दिली ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, इमारत मालक हा 26.10 ला सिटी सिव्हिल कोर्टामध्ये गेलेला आहे. ..

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मालक कोर्टामध्ये गेला हे आपले म्हणणे बरोबर आहे. पण त्याला कोर्टात जाण्याची संधी मिळावी यासाठी आपल्या ज्या अधिकाऱ्यांनी कारवाईस विलंब लावला आहे त्याबद्दल आपण काय केले ? मालकाला कोर्टात जावे यासाठी संधी दिली त्याचे कारण काय ?

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, अधिकाऱ्यांनी असे केले असेल तर जरूर त्याबद्दल आपण चौकशी करू. परंतु खंडपीठाने स्थगिती दिल्यामुळे आपल्याला पुढील कारवाई करता आली नाही. आता 26 तारखेला म्हणजे आजच या प्रकरणी खंडपीठापुढे सुनावणी हाती. पण आता ती उद्या म्हणजे सोमवारी ठेवण्यात आली आहे. त्यावेळी खंडपीठ जसे आदेश देईल त्यानुसार कारवाई केली जाईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कोणा अधिकाऱ्याने यात कारवाई करण्यास दिरंगाई केली असेल तर त्याबाबत आपण चौकशी करू.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी राज्यमंत्री महोदयांना विनंती करीन की, कृपा

..... 4एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करून आपण कोणाला संरक्षण देण्याचा प्रयत्न करू नये. नियम 88 ची नोटीस जारी केल्यानंतरही प्रत्यक्ष कारवाई करण्यास 11 महिन्यांचा कालावधी लागलेला आहे त्याचे कारण काय आहे ? आता यामध्ये एफएसआय वाढवून देण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे देखील असे होत असेल. त्याची जी एक्स्ट्रा अमाऊंट होती तोपर्यंत हे थांबले नाहीत. परंतु आता ही इमारत दुरूस्तीच्यापलिकडे गेली आहे, ती केव्हाही कोसळेल अशी नोटीस दिल्यानंतर मंडळ प्रत्यक्षात त्यापुढील कारवाई करण्यासाठी 11 महिने का थांबले ? त्या 11 महिन्यात मालकाने काहीही केलेले नाही. असा काय मोठा धोरणात्मक निर्णय होता की त्यासाठी खंडपीठापुढे जाणार होता ? कामाठीपुऱ्यातील ही एक साधी इमारत, तिची अवस्था धोकादायक झाली असताही ती पाडण्याची कारवाई न करता त्यास विलंब लावला गेला आहे तर तेथे आपले अधिकारी गूळ खात बसले होते का ? सभापती महोदय, दुसरा प्रश्न असा की, आपले मंडळ 88 ची नोटीस दिल्यानंतरही प्रत्यक्ष कारवाईसाठी 11 महिने का थांबले ? या निवेदनात आपण म्हटले आहे की, "मुंबई उच्च न्यायालयाने 19.12.2008 च्या आपल्या आदेशात असे नमूद केले आहे की, 'प्रतिवादीच्या वकीलांनी विषयांकित बाब मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडे सुनावणीसाठी पाठविणे आवश्यक असल्याने नमूद केले व याचिकाकर्त्यांने दरम्यानच्या काळात त्याची इमारत जबरदस्तीने खाली करून पाडण्याची शक्यता असल्याने त्याचे हित जपण्याचे आवश्यक असल्याचे उल्लेखित केलेले आहे. ..." पुढे आपण म्हटले आहे की, "तसेच याचिकाकर्त्याच्या विनंतीनुसार अंतरिम आदेश दिलेले असल्याने दरम्यानच्याकाळात इमारत कोसळून दुर्घटना झाल्यास, त्यास याचिकाकर्ता वैयक्तिकरित्या जबाबदार राहील व त्यामुळे होणारे सर्व घटनाक्रम तसेच गुन्हेगारी कारवाईस पात्र राहील." सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री आम्हाला हे उत्तर देतात तर खरे म्हणजे त्यांनी हेच मेन्शन करून कोर्टाला सांगितले पाहिजे होते की, आपण याला स्टे देत आहात, पण उद्या इमारत कोसळून माणसे मृत्यूमुखी पडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार ? तसे आपण का केले नाही?

**तालिका सभापती** : 88 ची नोटीस दिल्यानंतर मध्यंतरीचा 11 महिन्यांचा कालावधी का लागला या सन्माननीय सदस्योच्या प्रश्नाचे उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी द्यावे.

ॲड. प्रीतमकुमार शेगावकर : सभापती महोदय, याबाबत दिरंगाई झालेली आहे किंवा काय याबद्दल चौकशी करण्यात येईल. बाकी या प्रकरणी दुसरे काहीही करता येणार नाही. खंडपीठाने स्थगिती दिल्याने या प्रकरणी आता आपल्याला काहीही करता येणार नाही.

( यानंतर श्री.सरफरे....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्रिमहोदयांचा पूर्ण आदर ठेवून मी सांगतो की, आपल्याकडे ब्रिफिंगसाठी जे अधिकारी फाईल्स घेऊन येतात ते "हरीचे लाल" असतात. त्यांना आपण विचारले पाहिजे की, याला 11 महिने कां लागले? मला सभागृहामध्ये उत्तर द्यावयाचे आहे. याचे कारण आपण त्यांना विचारले पाहिजे. तसे आपण कोर्टाला सांगितले पाहिजे. या निवेदनामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, "इमारत कोसळून दुर्घटना झाल्यास, त्यास याचिकाकर्ता वैयक्तिकरित्या जबाबदार राहिल व त्यामुळे होणारे सर्व घाटनाक्रमास तसेच गुन्हेगारी कारवाईस पात्र राहील", हे उत्तर आपण माननीय न्यायालयाच्या लक्षात आणून दिले पाहिजे. आपण 2.5 एफ.एस.आय. देतांना एन.ओ.सी. मिळवून त्यानंतर सेलेबल एफ.एस.आय. वापरायाचा असतो. ज्या ज्याठिक्ाणी इमारत दुरुस्त केली जाते त्याठिकाणी या गोष्टी केल्या जातात. याबाबत आपण कृपया ही बाब वैयक्तिक स्वरुपामध्ये घेऊ नये. लहान सहान असलेल्या गोष्टींच्या बाबतीत सुध्दा आपण काळजी घेतली पाहिजे. तेव्हा ही लक्षवेधी सूचना आता राखून ठेवून उद्या घेणार काय?

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : मंत्रिमहोदय, याठिकाण्ी लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने काही नवीन प्रश्न उपस्थित झाले आहेत. याबाबत आपणास एक गोष्ट करता येईल की, अधिवेशन संपल्यानंतर हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुंबईमध्ये या विषयासंदर्भात सर्व आमदारांची एक बैठक आपणास आयोजित करता येईल काय?

ॲड. प्रीतम शेगावकर : सभापती महोदय, चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. माननीय खंडपीठाचा निर्णय झाल्यानंतरच या सर्व गोष्टी करता येतील.

**तालिका सभापती** : आपण अधिक माहिती पटलावर ठेवावी.

ॲड. प्रीतम शेगावकर : सभापती महोदय, या प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. माननीय खंडपीठाचा जो निर्णय येईल त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : तोपर्यंत पावसाळयात ही माणसे मरतील...

ॲड.प्रीतम शेगावकर : माननीय खंडपीठाचा निर्णय झाल्याबरोबर तात्काळ कारवाई केली जाईल असे मी आश्वासन देतो.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, तसे नाही. या निवेदनामध्ये काय म्हटले आहे ते मंत्रिमहोदयांनी वाचावे. "याचिकाकर्त्याने न्यायालयीन सुट्टीच्या काळात खंडपीठाकडे वाटल्यास

अर्ज करावा". असे न्यायालयाने म्हटले आहे. परंतु याचिकाकर्त्याने तशाप्रकारचा अर्ज केल्यामुळे हे प्रकरण खारीज करावे असे आपल्याला खंडपिठाला सांगावे लागेल.

ॲड. प्रीतम शेगावकर : सभापती महोदय, मला पुन्हा पुन्हा सांगावे लागत आहे की, माननीय खंडपीठाचा निर्णय झाल्यानंतर ताबडतोब कारवाई करण्यात येईल. त्याबाबत एक बैठकही आयोजित करु.

**तालिका सभापती** : दुसरा एक प्रश्न निर्माण होत आहे. माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, समोरच्या पार्टीला कोर्टामध्ये जाण्यासाठी भरपूर वेळ दिला गेला. अशी त्यांची हरकत आहे. तेव्हा ती बाब सुध्दा तपासली गेली पाहिजे. या सभागृहाची अशी प्रथा आहे की, माननीय सदस्य सभागृहामध्ये जी बाब लक्षात आणून देतात ती गृहीत धरावी लागते. त्यादृष्टीने लवकरात लवकर माननीय खंडपीठाचा निर्णय होण्यासाठी आपण प्रयत्न करावेत असे मी सूचित करतो.

ॲड. प्रीतम शेगावकर : सभापती महोदय, याबाबत सोमवारी निर्णय होणार असल्यामुळे आपण एक दिवस वाट पहावी. त्यांतर कारवाई करण्यात येईल.

**तालिका सभापती** : ठीक आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ. शी.** : मौजे कान्नापूर (ता.परळी, जि.बीड) या गावात भूकंपसदृश आवाज येणे

**मु. शी.** : मौजे कान्नापूर (ता.परळी, जि.बीड) या गावात भूकंपसदृश आवाज येणे यासंबंधी सर्वश्री श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री विक्रम काळे, जितेंद्र आव्हाड, गोविंदराव आदिक,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे कान्नापूर (ता. परळी, जि. बीड) या गावात मोठ्याप्रमाणात भूकंपसदृश आवाज येणे, कान्नापूरच्या एका विहिरीतील पाण्यामध्ये उकळ्या फुटत असल्याचे निदर्शनास येणे, तसेच काही घरांच्या भिंती पडल्या असून काही भिंतींना तडे जाणे, सदर गावातील ग्रामस्थांनी तालुका प्रशासनाकडे वारंवार तक्रार करुन देखील तहसिलदारांनी याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही न करणे, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पाहणी करुनही शासनातर्फे अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी, स्थानिक नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. सतीश पाटील ( भूकंप पुनवर्सन व मदत कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेवर करण्यात आलेले निवेदन संदिग्ध स्वरुपाचे आहे. निवेदनात असे म्हटले आहे की, "मौजे कान्नापूर, ता. धारुर, जि. बीड या गावाच्या 5 कि.मी. अंतरावर असणाऱ्या मोहा या गावात भूकंप सदृश गूढ आवाज आले होते" या वाक्याला माझी हरकत आहे.

(यानंतर श्री. बरवड)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

फक्त मोहा गावातच गूढ आवाज आले नाहीत तर मोहा गावाच्या बाजूला असलेले वंजारवाडी, घोरपडदरा, मालदरा, कान्नापूर आणि कऱ्हेवाडी या गावासह मोहा गावामध्ये अशा प्रकारचे गूढ आवाज आले. निवेदनामध्ये पुढे असे म्हटले आहे की, तत्कालीन तहसीलदार, धारुर यांनी दिनांक 22.9.2008 रोजी मंडळ अधिकारी, तलाठी यांचे समवेत पाहणी केली. त्या पाहणीच्या वेळी मी स्वत: हजर होते. निवेदनामध्ये असे म्हटले अहे की, पाच घरांना बारीक भेगा पडल्या. हे निवेदन चुकीचे आहे. ज्या ठिकाणी मातीची आणि माळवदाची घरे आहेत या सर्व घरांच्या बाबतीत एक तर माळवदाची माती पडलेली आहे किंवा घरांना भेगा पडलेल्या आहेत. या निवेदनावर माझा आक्षेप आहे. निवेदनामध्ये पुढे असे म्हटले आहे की, 1.10.2008 रोजी...

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, निवेदनावर आक्षेप घेण्यापेक्षा आपण प्रश्न विचारावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, रेकार्डवर पूर्ण स्पष्ट यावे म्हणून मी थोडासा वेळ घेतला त्याबद्दल मी क्षमा मागते. दिनांक 1.10.2008 रोजी जी बैठक घेण्यात आली त्या बैठकीमध्ये आपला असा निर्णय झाला की, या ठिकाणच्या घरांची दुरुस्ती करावयाची आणि पुनर्गठन करावयाचे. 1.10.2008 च्या या निर्णयानंतर मोहा, वंजारवाडी, मालदरा, घोरपडदरा, कऱ्हेवाडी आणि कान्नापूर या गावच्या पुनर्गठनाचे प्रस्ताव शासनाने मागवले आहेत काय ? नसतील तर किती दिवसामध्ये मागवले जातील ? शासन हे पुनर्गठन करणार आहे काय ?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी आलेली लक्षवेधी सूचना ही जमिनीतून गूढ आवाज आल्याच्या संदर्भात आहे. ज्यावेळी याबाबत तक्रार आली त्यावेळी तहसीलदार यांच्या माध्यमातून आणि जिऑलॉजिकल सर्व्हे डिपार्टमेंटकडून याची सर्व माहिती घेतली गेली. हा काही भूकंप किंवा वेगळ्या प्रकारचा प्रश्न नाही. भूकंप म्हणून तो आवाज झालेला नाही. जमिनीच्या खालची जी पाण्याची पातळी असते त्याच्यात डिस्टर्बन्स आल्यामुळे तो आवाज निर्माण झाला असा त्यांचा अहवाल आहे. तरी देखील मी आपल्याला सांगेन की, जिल्हाधिकाऱ्यांनी पुनर्गठनाच्या संदर्भामध्ये प्रस्ताव तयार केला असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. असा काही प्रस्ताव आजमितीपर्यंत आमच्याकडे प्राप्त झालेला नाही. परंतु सन्माननीय सदस्य आणि संबंधित अधिकारी

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सतीश पाटील ......

यांची परत एकदा बैठक घेऊन आपण जिल्हाधिकाऱ्यांकडून असा पुनर्गठनाचा प्रस्ताव तात्काळ मागवून घेऊ आणि तांत्रिक सल्लागाराच्या मदतीने याबाबतीत तात्काळ विचार करण्यात येईल.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, यामध्ये मी उल्लेख केलेल्या सर्व गावांचा समावेश असेल काय ?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या गावांचा उल्लेख केला त्या सर्व गावांचा यामध्ये समावेश असेल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, भिंतीला तडे जाणे आणि गूढ आवाज येणे हा विषय बरोबर आला आहे पण पुढे सर्वेक्षणाची जी बाब आहे ती मोलाची आणि महत्वाची आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, नांदेड, बीड आणि नाशिक या जिल्ह्यामध्ये म्हणजे तो संपूर्ण पट्टा गोदावरीचा जो आहे, त्या ठिकाणी भारतीय भूजल सर्वेक्षण यांच्या मार्फत विस्तृत अभ्यास करण्याचे देखील भारतीय भूजल सर्वेक्षण यांनी या विभागास अवगत केलेले आहे. निवेदनात असेही म्हटले आहे की, आवाज भूगर्भातील सखोल भागातून ( shallow nature ) येत नसून भूगर्भातील पाण्याच्या पातळीमध्ये बदल झाल्यामुळे असा आवाज येतो. याचा अर्थ जमिनीच्या खाली जी पाण्याची पातळी आहे ती बदलत आहे. तीचा फोर्स बदलत आहे. क्षेत्र बदलत आहे. त्यामध्ये जमिनीचे खालीवर होणे हे भूकंपासारखेच असणार आहे. घरे कोसळण्याचा वगैरे प्रकार आहे. हा सर्वेक्षणचा अहवाल तातडीने मिळवून नाशिक पासून नांदेड पर्यंतचा सबंध गोदावरीचा जो परिसर आहे त्या ठिकाणी असे होत असेल, भूकंप न होता अशा प्रकारे खालच्या भूगर्भामध्ये पाण्याची पातळी अशा प्रकारे जर बदलली तर एकदम जी कॅव्हीटी निर्माण होईल त्यामध्ये जमीन जाऊन बसणार. त्याच्या अंतर्गत येणारा जो पट्टा असेल तेथे उत्पात होतील. त्यादृष्टीने हा अहवाल किती तातडीने आपण उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करणार आणि त्यासंदर्भातील उपाययोजना आदरणीय मंत्रिमहोदय डॉ. पतंगराव कदम यांच्याकडे जे पुनर्वसनाचे खाते आहे त्यांच्यामार्फत यासंदर्भामध्ये तातडीने उपाययोजना करणार काय ?

डॉ. सतीश पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे प्रामुख्याने नाशिक, बीड आणि नांदेड या तीन जिल्ह्यांमध्ये हा प्रश्न निर्माण झालेला आहे आणि

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

डॉ. सतीश पाटील .....

तसा जिऑलॉजिकल डिपार्टमेंटकडून आपण संपूर्ण सर्व्हे करुन घेतलेला आहे. फक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून तो प्रस्ताव तात्काळ मागविण्याच्या संदर्भात आपण जी सूचना केली आहे तो आम्ही मागवून घेऊ आणि या संदर्भात कारवाई करु. 15 दिवसांच्या आत हा सर्व्हे रिपोर्ट मागवून घेऊ.

श्री. दिवाकर रावते : नागपूरच्या सॅटेलाईट सर्व्हेचा रिपोर्ट आहे काय ? नसेल तर ते करुन ध्यावे.

डॉ. सतीश पाटील : ते आपण करुन घेऊ आणि तात्काळ याचा रिपोर्ट मागवून घेऊ.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी परळी, बीड यामधील कान्नापूर आणि आसपासच्या परिसरातील अनेक गावांमध्ये जे बदल होत आहेत त्याबाबतीत लक्षवेधी सूचना या ठिकाणी मांडलेली आहे. या सभागृहामध्ये या विषयाची जबाबदारी माननीय मंत्रिमहोदयांकडे नव्याने आलेली आहे. आमचा अनुभव असा आहे की, जेव्हा जेव्हा असे भूकंपसदृश धक्के बसतात असे लोक तक्रार करतात अशा वेळेला आपत्ती व्यवस्थापनाची व्यवस्था त्या त्या जिल्ह्यामध्ये काय असते ?

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ....

याचा आढावा घेतला जाईल काय, बहुतेक वाहिन्यांवर अशावेळी बातम्या येतात किंवा वर्तमानपत्रात बातम्या आल्यावर लोकांनी घाबरुन जाऊ नये असे जिल्हाधिकारी आवाहन करतात. सध्या उस्मानाबाद व लातूर जिल्हयाचे भूकंप मापक यंत्र बंद आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्हयामध्ये आपत्ती व्यवस्थापन केंद्र व भूमापक यंत्राचा आढावा घेतला जाईल काय ?

डॉ.सतीश पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे आढावा घेण्यात येईल. जिल्हया जिल्हयात जी जी परिस्थिती निर्माण होईल त्याला शासन सामोरे जाईल आणि याबाबत त्या त्या जिल्हयातून अहवाल मागविला जाईल.

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 4 व 5 पुढे ढकलण्याबाबत</u>

**उपसभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या क्रमांक 4 व 5 वरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

**पृ. शी.** : रिलायन्स एनर्जी कंपनीने घरगुती ग्राहकांकडून सर्व्हिस लाईन कॉन्ट्रिब्यूशनच्या नावाखाली बेकायदेशीरपणे कोट्यवधी रुपये गोळा करणे

**मु. शी.** : रिलायन्स एनर्जी कंपनीने घरगुती ग्राहकांकडून सर्व्हिस लाईन कॉन्ट्रिब्यूशनच्या नावाखाली बेकायदेशीरपणे कोट्यवधी रुपये गोळा करणे यासंबंधी डॉ.दीपक सावंत, सर्वश्री दिवाकर रावते, अरविंत सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब, श्री.किरण पावसकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई उपनगरांमध्ये वीज पुरवठा करणाऱ्या रिलायन्स एनर्जी कंपनीने नवीन वीजपुरवठा घेणाऱ्या घरगुती वीज ग्राहकांकडून सर्व्हीस लाईन कॉंट्रीब्युशनच्या नावाखाली तब्बल 60 कोटी रुपये बेकायदेशीरपणे जमा केलेले असणे, ग्राहकांना वीजपुरवठा देताना वीज कंपनीने नवीन जोडण्यासाठी किती रक्कम आकारायची याचे दरपत्रक (शेड्यूल ऑफ चार्जेस) ठरलेले असणे, असे असतांना नियमबाह्य घरगुती हजारो ग्राहकांकडून घेण्यात आलेल्या सर्व्हीस लाईन चार्जेसपोटी 60 कोटी रुपयांची रक्कम वीज ग्राहकांना तातडीने रिलायन्स एनर्जी कंपनीने परत करण्याबाबत राज्य शासनाकडे तक्रारी करुनही शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, रिलायन्स एनर्जी कंपनीने घरगुती वीज ग्राहकांकडून नियमबाह्यरित्या घेतलेली अतिरिक्त रक्कम, परिणामी मुंबई उपनगरांमधील हजारो वीज ग्राहकांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने हस्तक्षेप करुन रिलायन्स एनर्जी कंपनीने ग्राहकांना 60 कोटी रुपये व्याजासह परत करण्याबाबत केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.सुनील देशमुख ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या लक्षवेधीमध्ये विचारलेल्या सर्व विषयाला निवेदनात फाटा दिलेला आहे. लक्षवेधीतील कोणत्याही प्रश्नाला उत्तर देण्यात आलेले नाही. या लक्षवेधीच्या विषयात असे नमूद केले होते की, "नियमबाह्य घरगुती हजारो ग्राहकांकडून घेण्यात आलेल्या सर्व्हिस लाईन चार्जेससाठी 60 कोटी रुपयांची रक्कम वीज ग्राहकांना तातडीने रिलायन्स एनर्जी कंपनीने परत करण्याबाबत राज्य शासनाकडे तक्रारी करुनही त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष." या कंपनीने घरगुती ग्राहकांकडून बेकायरेदशीरपणे सर्व्हिस लाईन कॉन्ट्रिब्यूशनच्या नावाखाली 60 कोटी रुपये गोळा केले आहेत. याबाबत वीज नियामक आयोगाने निर्णय दिला आहे त्याचा या निवेदनात कोठेही उल्लेख केलेला नाही. हे 60 कोटी रुपये कोणत्या हेडखाली व का घेण्यात आले असा माझ ा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, हा 60 कोटी रुपये ग्राहकांना परत केव्हा दिले जाणार आहेत ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगतो की, हा आकडा 60 कोटी नसून 12.39 कोटी असा आहे. या कंपनीने सर्व्हिस इन्स्टॉलेशनसाठी 1500 रुपये आकरणी केली आहे. यासंदर्भात वीज नियामक आयोगाकडे तक्रार करण्यात आल्यावर आयोगाकडे हियरिंग झाले आहे. 2004 ते 2006 च्या मधल्या काळातील हे 12.39 कोटी रुपये आहेत जे बेकायदेशीर आहेत असा निर्णय घेऊन तो निर्णय आयोगाला कळविला आहे. माननीय ऊर्जा मंत्र्यांनी कंपनीच्या अधिका-यांना बोलविले होते. 12.39 कोटी रुपये व्याजासह लोकांना परत करण्यास सांगितले आहे. त्यांचे असे म्हणणे होते की, या रकमेचा बिलामध्ये उल्लेख करु. त्यासाठी प्रत्येक ग्राहकानी कंपनीकडे अर्ज करावा. ते देखील शासनाने मान्य केलेले नाही. जो पैसा घेतला आहे तो बेकायदेशीर आहे. कंपनीने स्वत:च्या स्तरावर हा पैसा वजा करुन लोकांना बिल द्यावे असा निर्णय घेतलेला आहे. बेकायदेशीरपणे लोकांकडून घेतलेला पैसा परत करण्याबाबत शासनाने अनुकूल असा निर्णय घेतलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : रिलायन्सचा विषय निघाला आहे म्हणून मी सांगू इच्छितो की, रिलायन्सच्या बाबतीत एक गोष्ट नक्की की त्यांचे अधिकारी येतात, तुम्ही म्हणाल ते कबूल करतात, लिहून देतात. परंतु प्रत्यक्षात तसे ते कधीच वागत नाहीत. हे अनुभवाचे बोल आहेत. उदाहरण म्हणून मी वस्तुस्थिती सांगतो की, पुण्यातील काही शेतक-यांना पैसे देतो असे सांगून रिलायन्सने त्यांच्या जमिनी ताब्यात घेतल्या. परंतु शेतक-यांना आजपर्यन्त त्यांच्या जमिनींचे पैसे मिळालेले नाहीत. उदाहरणार्थ सुनील देशमुख नावाच्या एका शेतक-याला 5 लाख रुपये देतो असे सांगून रिलायन्सच्या अधिका-यांनी त्याची जमीन ताब्यात घेतली. त्याला चेक घेण्यासाठी बोलावले त्यावेळी त्याला सांगण्यात आले की तुला एवढे पैसे मिळणार नाहीत. केवळ 2 लाख रुपये मिळतील. अशा त-हेने शेतक-याचे 3 लाख रु. हडप करण्यात आले. त्या अधिका-याचे नाव गोडसे आहे हे देखील मी सांगतो. रिलायन्स कंपनी ही ख-या अर्थाने "Not reliable" कंपनी आहे. माननीय राज्यमंत्री महोदय, शासनाच्या वतीने येथे उत्तर देत आहेत. त्यांनी या मंडळींवर रिलाय राहू नये, हे रिलायबल नाहीत. मी सांगितलेली वस्तुस्थिती खरी आहे. या अधिका-याने अनेक लोकांना फसविले आहे. हा अधिकारी करोडपती झाला आहे आणि शेतकरी मात्र भिकारी झाले आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला देखील असाच अनुभव आलेला आहे. माझ्या शिक्षण संस्थेची जागा रिलायन्स कंपनीसाठी घेण्यात आलेली असून आजपर्यन्त त्या जागेचे पैसे कंपनीने दिलेले नाहीत. हे पैसे ग्राहकांना मिळावयाचे आहेत ते त्यांना चेकने किंवा ड्राफ्टने किती दिवसात मिळतील ?

डॉ. सुनील देशमुख : ही रक्कम जानेवारीच्या बिलामध्ये वळती करुन घेण्यात येईल. उदा. एखाद्या ग्राहकाला दीड हजार रु. द्यावयाचे असतील आणि त्याचे बिल 1700 रु. असेल तर दीड हजार रुपये वळते करुन ग्राहकाला 200 रु.चे बिल पाठविण्यात येईल. जेवढे पैसे ग्राहकाला द्यावयाचे असतील ते व्याजासहीत जानेवारीच्या बिलामध्ये वळते करण्यासाठी त्यांना निदेश दिलेले आहेत.

श्री. अरविंद सावंत : माननीय मंत्री महोदयांनी जे पॉझिटिव्ह उत्तर दिले त्याचे मी स्वागत करतो. माननीय उपसभापतींनी सांगितल्या प्रमाणे Reliance is not reliable. ते फार बदमाश लोक आहेत. सर्व्हिस लाईन टाकण्याबाबतचा संपूर्ण खर्च अर्जदाराकडून वसूल करण्याची परवानगी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...

होती म्हणून तो खर्च त्यांनी वसूल केला. हा खर्च परत करायला लावण्यासंबंधी आपण उत्तर दिले त्याचे मी स्वागत करतो. त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने केस क्रमांक 25/2006 प्रकरणी त्यांच्या दि. 2 नोव्हेंबर, 2006च्या निदेशानुसार 5 केडब्ल्यू पर्यन्त रु. 1500/- इतकी रक्कम व रु. 2000/- इतकी रक्कम 5 ते 10 केडब्ल्यू पर्यन्त वसूल करण्यास मान्यता दिली आहे. हे नक्की काय आहे ? यामुळे किलो वॅट पर्यन्त वसुली केली जाणार आहे. तेव्हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे जाऊन हे चार्जेस घेण्यासही प्रतिबंध करायला पाहिजे, तसा तो करण्यात येईल काय ? हे लोक सर्व्हिस लाईनचे पैसे घेणार आहेत. एकाद्या 10 घरांच्या वस्तीला यांनी टॅपिंग केले तर तर ते 600 रु. ऐवजी 1500 रु. घेतील. दुपटीपेक्षा जास्त पैसे ते घेतील. म्हणून हे चार्जेस ताबडतोब रद्द करण्यात येतील काय ?

डॉ. सुनील देशमुख : हा निर्णय विद्युत नियामक आयोगाने घेतलेला आहे. श्री. प्रताप घोडके यांनी कोर्टामध्ये पिटीशन दाखल केले होते. त्यांनी हे लक्षात आणून दिले की, विनापरवानगी हे पैसे वसूल केले जात आहेत. 2006नंतर विद्युत नियामक आयोगाने ही परवानगी दिली. विद्युत नियामक आयोगाने दिलेला निर्णय आपणाला मान्य करावा लागतो.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख....

2004 ते 2006 या मधल्या काळात त्यांना परवानगी नव्हती. या कालावधीत त्यांना एमईआरसीने परवानगी दिली नव्हती. तेव्हाचे पैसे आपण त्यांच्याकडून वळते करीत आहोत.

श्री. अरविंद सावंत : ग्राहक संघटना एमईआरसीकडे गेली आणि त्यांनी सांगितले की, यांनी अनधिकृतपणे पैसे वसूल केले आहेत. ही गोष्ट एमईआरसीने मान्य केली आहे. त्यांना परतावा द्यावयास सांगतला आहे. आपण ते किती दिवसात द्याल, कसा द्याल याबाबत मी काही विचारीत नाही. आपण याबाबतीत पॉझिटिव्ह असे उत्तर दिले आहे. त्यानंतर एमईआरसीने जो काही उद्योग केला आहे, त्या उद्योगाच्या बाबतीत शासन काही कार्यवाही करणार आहे की नाही? आयोगाने काहीही म्हटले तरी शासनाने त्यांना प्लीड केले पाहिजे. गरिबांच्या विरोधात शासन सुप्रीम कोर्टापर्यंत जाते. यासंदर्भात आपण नियामक आयोगाकडे जाऊन झोपडपट्टीधारकांना देण्यात येणा-या वीज पुरवठयासंदर्भात अशा प्रकारचा चार्ज घेणे हे गैर आहे. ते आपण थांबविणार काय?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, दि इलेक्ट्रीसिटी ॲक्ट, 2003 नुसार पॉवर टू रिकव्हर एक्सपेंडीचर अन्वये त्यांना ही परवानगी आहे. नंतर महाराष्ट्र इलेक्ट्रीसिटी रेग्युलेशन कमिशनचे इलेक्ट्रीक सप्लाय कोड ॲन्ड अंदर कंडीशन्स याप्रमाणे त्यांना परवानगी आहे. ही बाब 2005 या वर्षातील आहे. 2004 ते 2006 या काळात त्यांना परवानगी नव्हती. ॲग्रीमेंट होण्याच्या पूर्वी त्यांनी जी गडबड केलेली आहे, त्या अनुषंगाने आपण रिकव्हरी करीत आहोत. 2006 नंतर एमईआरसीने ऑलरेडी त्यांना परवानगी दिलेली आहे. मधल्या काळात त्यांच्याकडे परवानगी नव्हती, त्यावेळी जी गडबड केली आहे, ती रक्कम व्याजासह त्यांच्याकडून रिकव्हर करीत आहोत.

श्री. दिवाकर रावते : त्यांनी बेकायदेशीरपणे दहा रुपयाचे पंधरा रुपये घेतले म्हणून त्यासंदर्भात आपण त्यांना बोलावले, त्यांना दम दिला, ती रक्कम बिलात वळती करा, ती रक्कम व्याजासहीत द्यावी वगैरे सुंदर माहिती आपण या ठिकाणी दिली. दुस-या बाजूने कायदा आल्यानंतर प्रत्येकाकडून 2000 हजार रुपये घेण्यास नियामक आयोगाने मान्यता दिली. म्हणजे काय झाले की, व्याजासहीत वसुली केली. झोपडपट्टीला वीज देतांना त्यांच्याकडून मिटरचे पैसे घेतात. इन्फ्रास्ट्रक्चर टाकल्यानंतर त्यांना पैसे मिळतील. झोपडपट्टीधारकांकडून अशा प्रकारे पैसे घेणे बरोबर नाही.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : हा कायदा आपणच केला आहे. त्या ॲक्टनुसारच त्यांना परवानगी दिलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, झोपडपट्टीधारकांवर अन्याय करणारी ही गोष्ट आहे.

**उपसभापती** : रिलायन्स ईज नॉट रिलायबल यासंबंधी मी मघाशीच उल्लेख केलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : माननीय मंत्री महोदयांनी गरीब झोपडीधारकांसाठी नियामक आयोगाकडे एकदा तरी जाऊन ऑर्ग्यूमेंट करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. अरविंद सावंत : 25 झोपडयांना 2 हजार रुपये घेणार आहेत. म्हणजे झोपडीधारकांकडून ते दुपटीने, तिपटीने पैसे घेणार आहेत.

श्री. दिवाकर रावते : रिलायन्सने लाखो ग्राहकांकडून 12 कोटी रुपये बेकायेशीरपणे वसूल केले व एक प्रकारे गुन्हा केला म्हणून त्यांचे लायसन्स रद्द करणार काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, जेव्हा हे पिटीशन दाखल केले होते, त्याच्यामध्ये वन ऑफ दि प्ली हाही होता. यांनी अशा प्रकारचा गडबड घोटाळा केल्यामुळे त्यांचे लायसन्स रद्द करावे. एमईआरसीने जो निर्णय दिला आहे, तो मी या ठिकाणी सांगू इच्छितो. "With this, the contentions regarding filing of Class action becomes irrelevant and so does the need to invoke Section 128 of the Electricity Act, 2003." म्हणजे त्यांनी सांगितले हे पैसे परत करा. एवढी मोठी शिक्षा देण्याची गरज नाही. मी याबाबतीत लिगल इंटरप्रिटेशन करीत नाही. यांनी 12 कोटी रुपये घेतलेले आहेत, ते परत करावे. लायसन्स रद्द करण्याच्या बाबतीत त्यांनी तसा ॲप्रोच घेतला नाही.

श्री. दिवाकर रावते : या कंपनीने लाखो लोकांना बेकायदेशीरपणे लुटले असेल तर त्यांचे लायसन्स रद्द करावे. बी.ई.एस.टी.ने सांगितले आहे की, आम्ही मुंबईतील सर्व उपनगरास विद्युत पुरवठा करण्यास तयार आहोत.

**उपसभापती** : रिलायन्सने 12.50 कोटी रुपये वसूल केले आहेत. ती वसुली बेकायदेशीर केली आहे ही गोष्ट तर खरी आहे. याचा अर्थ त्यांनी गुन्हा केलेला आहे. मी तर म्हणतो की, राज्य शासनाने त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल करावा. हा सर्वोत्तम उपाय राहील. जनतेला



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KGS/ KTG/

**उपसभापती** .......

खरोखरच न्याय द्यावयाचा असेल तर जे धनदांडगे आहेत, जे गरिबांचे खिसे कापतात, त्यांना धडा मिळाला पाहिजे. मंत्री महोदय, आपल्याला काही मर्यादा आहेत याची मला जाणीव आहे. वास्तविक हे सगळेच लोक त्यांच्या विरुध्द खटले दाखल करु शकले असते. सामान्य माणसाला वकील देणे इत्यादी भानगडी पुढे येतात, त्यास सामान्य माणूस तोंड देऊ शकत नाही. म्हणून आहे त्याच्या आधारे त्यांच्या विरोधात फौजदारी गुन्हा दाखल करावा अशी मी पीठासीन अधिकारी म्हणून सूचना करतो. मला वाटते की, त्यांच्या विरुध्द फौजदारी गुन्हा लवकर दाखल करावा.

डॉ. सुनील देशमुख : आपण दिलेल्या निदेशाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

-----------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या विशेष उल्लेखाच्या सूचनेतील पहिल्या क्रमांकाची सूचना आज न मांडता नंतर मांडण्याची मला संधी देण्यात यावी अशी मी विनंती करतो.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दोन वर्षापूर्वी भंडारा जिल्हयात अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या खटल्याचा अद्याप निकाल न लागणे

**मु. शी.** : दोन वर्षापूर्वी भंडारा जिल्हयात अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या खटल्याचा अद्याप निकाल न लागणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, भंडारा जिल्हयामध्ये 13 ऑक्टोबर, 2006 रोजी कु.अंकिता लांजेवार या 11 वर्षाच्या अल्पवयीन मुलीवर सुधाकर रामटेके या आरोपीने अमानुषपणे अत्याचार करुन, क्रूरपणे तिची हत्या केूली. या घटनेला तीन वर्षे पूर्ण झाली. बहुचर्चित खैरलांजी खटला झाला त्याचवेळेला या मुलीवर भंडारा जिल्हयात अत्याचाराची घटना घडली. दुर्दैवाने खैरलांजी खटल्याबद्दल जेवढे वातावरण पेटले होते त्या तुलनेत या कुटुंबाकडे कोणी लक्ष दिलेले दिसत नाही. म्हणून तीन वर्षे होऊनही या घटनेबाबतचा खटला भंडारा जिल्हा सत्र न्यायालयात चालू आहे. अद्यापपर्यंत या खटल्याचा निकाल लागलेला नाही. कु.अंकिता लांजेवार यांची आई श्रीमती कल्पना लांजेवार यांनी आयटीआयमध्ये डिझेल मेकॅनिकची परीक्षा पास केली आहे. सध्या त्या भंडारा येथे आपल्या 5 वर्षाच्या मुलीसोबत झोपडपट्टीत राहतात. त्यांना धमक्या येत आहेत. दरवेळी घरात जात असताना धमक्या येत असल्यामुळे त्यांना पोलिसांचे संरक्षण मिळालेले नाही. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख व जिल्हयाचे पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी कल्पना लांजेवार यांना वर्ग.4 मध्ये नोकरीचे आश्वासन दिले होते. भंडाऱ्यामध्ये मोटार युनिट आहे. त्या डिझेल मेकॅनिकची परीक्षा पास असल्यामुळे नोकरी करु शकतात. परंतु कल्पना लांजेवार यांनी अनेक वेळा शासन दरबारी फेऱ्या मारल्या. परंतु काहीही हाती लागलेले नाही. कु.अंकिता लांजेवार अत्याचाराचा खटल्याचा वेगाने निकाल लागावा आणि श्रीमती कल्पना लांजेवार

..3..

डॉ.नीलम गोऱ्हे..........

यांना भंडारा येथील मोटार युनिटमध्ये वर्ग.4 ची नोकरी मिळावी. तसेच त्यांना इंदिरा आवास योजनेमधून घरकूल मिळावे व त्यांच्या 5 वर्षाच्या लहान मुलीच्या शिक्षणासाठी मदत मिळावी अशी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे विनंती करते.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोल्हापूर शहरातील शाहूकालीन वहिवाटीचा रस्ता बंद केला जाणे

**मु. शी.** : कोल्हापूर शहरातील शाहूकालीन वहिवाटीचा रस्ता बंद केला जाणे याबाबत श्री.भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, कोल्हापूर शहरामध्ये 100 वर्षापासून कळंबा जेल ते कळंबा तलावापासून गिरगांवकडे जाणारा रहदारीचा पक्का रस्ता शाहूकालीन वहिवाटीचा असून हा रस्ता डेव्हलपमेंट प्लॅनमधील 10 मीटर रुंदीचा रस्ता आहे. तो रस्ता कळंबा जेलमधील जेलरने जबरदस्तीने त्या रस्त्याचा ताबा घेऊन रस्ता बंद केला व कुंपणही घातले. त्यामुळे दररोज ये-जा करणाऱ्या लाखो लोकांचे हाल होत असून त्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असणे, याबाबत कोल्हापूर जिल्हाधिकारी यांना दि.5.12.2008 रोजी निवेदन देऊनही यावर कोणतीही चौकशी झाली नसल्याने चौकशी करुन बंद केलेला रस्ता पूर्ववत सुरु करावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे सूचना करीत आहे.

---------

..5..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अकोला महानगरपालिकेंतर्गत प्राथमिक शिक्षकांना वेतन वेळेवर न मिळणे

**मु. शी.** : अकोला महानगरपालिकेंतर्गत प्राथमिक शिक्षकांना वेतन वेळेवर न मिळणे याबाबत श्री.वसंतराव खोटरे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री.वसंतराव खोटरे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, अकोला महानगरपालिका अंतर्गत प्राथमिक शिक्षकांनी थकित दोन महिन्यांचे वेतन त्वरित अदा करणे, दरमहा 1 तारखेस वेतन मिळणे, भविष्य निर्वाह निधीमध्ये 13 महिन्यांची थकित रक्कम रु.2 कोटी जमा न करणे, वाढीव डी.ए.ची रक्कम त्वरित मिळणे, उन्हाळी प्रशिक्षणाची मानधनाची रक्कम त्वरित देण्यात यावी या न्याय मागण्यांसाठी महानगरपालिका, अकोला शिक्षक कृती समितीद्वारे 24.11.2008 ते 26.11.2008 य काळात आंदोलन करण्यात आले होते. दिनांक 11.12.2008 पासून ताटवाटी आंदोलन करण्यात आले. त्यानंतर त्यांनी शहरात भीक मांगो आंदोलन केले व दिनांक 20.11.2008 पासून साखळी उपोषण सुरु केले असून ते अद्यापही सुरु आहे.

सभापती महोदय, अकोला महानगरपालिकेमध्ये जवळपास 300 ते 350 प्राथमिक शिक्षक कार्यरत आहेत. त्यांना मागील 7-8 वर्षापासून 1 तारखेला कधीच वेतन मिळालेले नाही. दोन-तीन महिन्यांचे वेतन विलंबाने मिळते. आजही मागील तीन महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. त्याचप्रमाणे भविष्यनिर्वाह निधीतील 12 महिन्यांची थकित 2 कोटी रुपयांची रक्कम दुसरीकडे वळवून अद्याप त्यांच्या खात्यात जमा केलेली नाही. वाढीव डी.ए.ची रक्कम त्यांना अद्याप मिळालेली नाही. सहाव्या वेतन आयोगाची अग्रीम रक्कम कमीत कमी 6 हजार रुपये देय असताना कोणाच्या खात्यात 3 हजार, कोणाच्या खात्यात 4 हजार तर कोणाच्या खात्यात 5 हजार रुपये जमा करण्यात आले. म्हणून त्यांनी 24.11 ते 26.11.2008 या काळात विविध प्रकारची आंदोलने केली. काळ्या फिती लावल्या, ताटवाटी आंदोलन केले, भीक मांगो आंदोलन केले. आमरण

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे...........

उपोषणास बसले. आजही त्यांचे उपोषण सुरु आहे. या प्रश्नाकडे मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

-------------

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : इतर मागासवर्गीयांना विविध शैक्षणिक सवलती मिळणे

**मु. शी.** : इतर मागासवर्गीयांना विविध शैक्षणिक सवलती मिळणे याबाबत श्री. केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"दिवसेदिवस वाढत असलेली नोकऱ्यांची मागणी व उपलब्धता यांच्यात असलेली दरी कमी करण्याच्या दृष्टीने स्वयंरोजगाराला चालना देण्याच्या दृष्टीने शासनाच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत इतर मागासवर्गीय प्रवर्गाकरिता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त विकास महामंडळाची 23 एप्रिल, 1999 रोजी स्थापना करण्यात येणे, सदर महामंडळामार्फत शैक्षणिक सवलती, स्वयंरोजगाराच्या सवलती आणि शासकीय सवलती जाहीर करण्यात येणे, या सवलतींमध्ये शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना, राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी व परीक्षा फी परतावा, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी 50 टक्के शुल्काची प्रतिपूर्ती तर मागासवर्गीयांसाठी केंद्र पुरस्कृत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत पायलट प्रशिक्षण, इतर मागास प्रवर्गातील व्यक्तिंचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी करणे या योजनांचा समावेश असणे, महाराष्ट्रात इतर मागासवर्गीय प्रवर्गात 346 पोटातींचासमावेश करण्यात येणे, या प्रवर्गाची स्थिती सुधारावी म्हणून वर्षाकाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करणे, परंतु असे असले तरी या योजनांची प्रसिध्दी पाहिजे त्या प्रमाणात झाली नसल्याने प्रवर्गातील लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित असणे, त्यामुळे कित्येक योजना कागदोपत्री असून निधीची विल्हेवाट पाहिजे त्या प्रमाणात न लागणे, त्यामुळे इतर मागासवर्गीय प्रवर्गातील लाभार्थ्यांमध्ये पसरलेला असंतोष आणि त्यांची होणारी फसवणूक लक्षात घेता शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

----------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

**पृ. शी.** : क्राफ्ट शिक्षकांच्या नेमणुकीसाठी पदे निर्माण करणे

**मु. शी.** : क्राफ्ट शिक्षकांच्या नेमणुकीसाठी पदे निर्माण करणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यामध्ये क्राफ्टचे शिक्षण घेतलेल्या उमेदवारांमध्ये बऱ्याच उमेदवारांना अपुऱ्या पदांमुळे नेमणूक मिळत नाही. जिल्हा परिषद अंतर्गत असलेल्या शाळांमध्ये सध्या क्राफ्टचे शिक्षण जवळजवळ बंद झालेले आहे. त्यामुळे क्राफ्टचे प्रशिक्षण घेतलेले बरेच उमेदवार नोकरीपासून वंचित राहिल्यामुळे बेकारीचे दिवस जगत आहेत. क्राफ्टचे प्रशिक्षण घेण्यासाठी या उमेदवारांनी स्वत:चा खर्चही केला आहे. या उमेदवारांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय आहे.

तरी क्राफ्टचे शिक्षण घेतलेल्या या शिक्षकांना राज्यातील महिला बचत गटांना शिक्षण देण्यासाठी देखील चांगला उपयोग होऊ शकतो. त्यानुसार महिला बचत गटांना प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने प्रस्ताव मंजूर करुन या क्राफ्ट शिक्षकांच्या बेकारीचा प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावा" म्हणून मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

**पृ. शी.** : नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये होत असलेले घोटाळे

**मु. शी.** : नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये होत असलेले घोटाळे याबाबत
श्री. मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील नागरी सहकारी पतसंस्थातील वाढते घोटाळे व ठेवींच्या संरक्षणासाठी सहकार विभागाने या संस्थातील संचालकांवर बंधने घातली आहेत. 90 टक्के पतसंस्थांत संचालकांनीच चुकीच्या पध्दतीने कर्जवाटप केल्याने अनेक संस्था अडचणीत आल्याचे सहकार खात्याने उघड केले आहे. कर्जवाटप करताना अर्जाची योग्य छाननी न करता कर्ज वाटप करणे, वसुलीचे अल्प प्रमाण व ठेवीदारांचे प्रश्न यातून मार्ग काढणे अवघड झाले आहे. याकरिता सहकार खात्याने पतसंस्थांच्या संचालकांवर बंधन आणण्यास सुरुवात केली आहे. यामध्ये संचालक होणाऱ्यांना पतसंस्थेमध्ये ठेव ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. अशा जाचक अटी घालण्यात आल्या आहेत. "

----------

......4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

**पृ. शी**. : विद्यार्थ्यांना शाळेतूनच जातीचा व अधिवासाचा दाखला मिळणे

**मु. शी**. : विद्यार्थ्यांना शाळेतूनच जातीचा व अधिवासाचा दाखला मिळणे याबाबत श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

( सन्माननीय सदस्य अनुपस्थित )

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

**पृ. शी.** : कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी परवाने देण्याच्या अधिकाराचा होत असलेला गैरवापर

**मु. शी.** : कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी परवाने देण्याच्या अधिकाराचा होत असलेला गैरवापर याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

""महाराष्ट्र राज्यात कुठलाही मराठी/हिंदी/गुजराथी किंवा इतर अन्य भाषांच्या गाण्याच्या कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी महाराष्ट्र शासनाचा तिकीट विक्री परवाना, कार्यक्रम सादरीकरणाचा (परफॉर्मिंग) परवाना तसेच सेन्सॉर प्रमाणपत्र बंधनकारक आहे. यापैकी पहिल्या दोन परवान्यांची मान्यता शासनाच्या पोलीस दलामार्फत तर तिसऱ्या परवान्याची मान्यता रंगभूमी परिनिरीक्षण मंडळ, महाराष्ट्र शासन यांचेमार्फत देण्यात येते व त्याचे महसुली उत्पन्न राज्य शासनाच्या तिजोरीत जमा होते.

महाराष्ट्र शासनाचे वरील तीनही परवाने काढले असताना देखील मागील दोन तीन वर्षापासून इंडियन परफॉर्मिंग राईटस सोसायटी लिमिटेड (IPRS) ही खाजगी संस्था त्यांचे मनमानी शुल्क भरल्याखेरीज कुठेही गाण्याचा कार्यक्रम कुठल्याही नाटयगृहात अथवा खुल्या मैदानात सादर करु देण्यास प्रतिबंध करते. या संस्थेचा प्रचंड दबाव प्रामुख्याने मुंबईतील बंदिस्त नाटयगृहातील व्यवस्थापनावर तसेच खाजगी हॉटेल्स व खुल्या मैदानाच्या व्यवस्थापनावर असून त्यांचे व्यवस्थापन IPRS या खाजगी संस्थेचा परवाना काढल्याशिवाय त्यांच्या जागेवर कुठल्याही प्रकारचा गाण्याचा कार्यक्रम करण्यास परवानगी देत नाही. IPRS ही संस्था खाजगी असून शासनमान्य नाही. सदरची संस्था ही वाद्यवृंद आयोजकांकडून काही हजारो रुपये बंदिस्त नाटयगृहासाठी तर काही लाख रुपये हॉटेल्स वा खुल्या मैदानातील कार्यक्रमाच्या सादरीकरणासाठी, परवान्यापोटी आकारीत असते. IPRS व हॉटेल्स/खुल्या मैदानांचे व्यवस्थापन संगनमताने अशा प्रकारचे आर्थिक शोषण सांस्कृतिक कार्यक्रम आयोजकांचे करीत असते.

.....6



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

श्री. रामनाथ मोते .....

तरी, IPRS या संस्थेच्या अशा या मनमानी कारभाराची शासनाला जाणीव आहे काय? अशा प्रकारचे बेबंद परवाना शुल्क आकारण्याची मंजुरी राज्य शासनाने या संस्थेस दिली आहे काय? त्यांनी परवाना शुल्कापोटी गोळा केलेला महसूल राज्य शासनाच्या तिजोरीत जमा होत नाही व परिणामी शासनाचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्याचप्रमाणे राज्यातील उदयोन्मुख कलावंतांचा आर्थिक व मानसिक छळ होत असल्यामुळे सांस्कृतिक क्षेत्रात पुढे येण्यास व सर्वसामान्य जनतेला अल्प पैशात निखळ करमणूक व मनोरंजनाचा लाभ मिळण्यापासून वंचित रहावे लागत आहे. सबब, IPRS संस्थेच्या कारभाराची राज्य शासनाने चौकशी करुन नवोदित कलाकार व सर्वसामान्य जनतेला दिलासा देण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी."

सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा तसेच सर्वसामान्य जनतेच्या भावना एकवटलेल्या आहेत. माझी अशी विनंती आहे की, या विषयाच्या संदर्भात शासनाला निदेश द्यावेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : प्रश्न असा आहे की, या विषयाच्या संदर्भात बरेच कलाकार गायक, वाद्यवृंद मला येऊन भेटलेले आहेत. हे कलाकार साधारणत: 20 ते 25 हजार रुपयांमध्ये आपली कला सादर करीत असतात. परंतु नाट्यगृह असेल तर आयपीआरएस संस्था या कलाकरांकडून प्रत्येक सीटमागे 16 रुपये घेत असते. म्हणजे एखाद्या नाट्यगृहात 1000 सिट्स असतील तर 16X50 म्हणजे 8000 रुपये एका शोचे घेते. ही संस्था अशा प्रकारे कलाकारांकडून पैसे वसूल करीत असते. आयपीआरएस ही संस्था शासन मान्य संस्था नाही. खरे म्हणजे ही संस्था जे काही पैसे वसूल करते ते पैसे रॉयल्टी म्हणून ज्याचे गीत असेल किंवा ज्याने गीत गायले असेल त्यांना ते देते असे त्या संस्थेचे म्हणणे आहे परंतु वस्तुस्थिती तशी नाही. ही संस्था रॉयल्टी म्हणून एकही पैसा संबंधितांना देत नाही अशी कलाकारांची तक्रार आहे. ही संस्था त्या पैशाचे काय करते याचा काही सुध्दा हिशोब देत नाही. खरे म्हणजे या संस्थेला अशा प्रकारे पैसे गोळा करण्याचा काही सुध्दा अधिकार नाही. त्यामुळे या संस्थेची चौकशी करावी व नियमानुसार जी काही कारवाई असेल ती करावी. आयपीआरएस ही संस्था रजिस्टर्ड सुध्दा नाही. या संस्थेने केंद्रशासनाची तसेच राज्य शासनाची कोणतीही परवानगी न घेता पैसे गोळा करण्याचे काम करीत आहे. या संस्थेने परफॉर्मन्स लायसन्स देखील घेतलेले नाही, या संस्थेचा राज्यशासनाशी दुरान्वयाने सुध्दा काही संबंध येत नाही. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात माझी स्वत:ची शासनाला अशी विनंती आहे की, आयपीआरएस संस्था जी अशा प्रकारे वसूली करीत आहे ती वसुली त्वरित थांबविण्यात यावी, स्थगितीचे आदेश द्यावेत. या संस्थेची व्यवस्थित चौकशी करावी व या संस्थेने आतापर्यंत वसूल केलेल्या पैशांची कशी विल्हेवाट लावली याचाही हिशोब घ्यावा.

श्री. सुरेश वरपुडकर : सभापती महोदय, आपल्या आदेशा प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

**उपसभापती** : तोपर्यंत आपण या संस्थेला स्थगिती देणार काय?

श्री. सुरेश वरपुडकर : होय.

--------------

...2..

**पृ. शी.** :मराठवाडयात दोन विभागीय कार्यालये निर्माण करणे.

**मु. शी.** :मराठवाडयात दोन विभागीय कार्यालये निर्माण करणे याबाबत श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते : (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाच्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मराठवाडा हा भौगोलिक दृष्टया मोठा आहे. आठ जिल्हयांचा मिळून मराठवाडा तयार झालेला आहे. नांदेड पासून ते लातूर,धाराशिव येथील जनतेला संभाजीनगरला येऊन काम करणे कष्टाचे आणि वेळ खाऊ आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

मराठवाड्यामध्ये दुसरे विभागीय कार्यालय सुरु करावे अशी तेथील लोकांची वर्षानुवर्षे मागणी आहे. दुसरे विभागीय कार्यालय लातूर, परभणी आणि नांदेड येथे सुरु करण्याबाबत मोठा वाद आहे. त्यासाठी या तीनही जिल्ह्यांमध्ये आंदोलने होत आहेत. मी वैधानिक विकास महामंडळाचा अध्यक्ष असताना विभागीय कार्यालय परभणी येथे असावे अशाप्रकारचा ठराव मंजूर केलेला आहे. तरी सुध्दा विभागीय कार्यालय राजकीय प्रभावाचा लाभ घेऊन नांदेड व लातूर येथे आणण्यात आलेली आहेत. तेव्हा तीन जिल्ह्यामध्ये विभागीय कार्यालय असण्याबाबत असलेला असंतोष लक्षात घेऊन ज्येष्ठ न्यायमूर्तीची एक सदस्यीय समिती नेमून याबाबत निर्णय घ्यावा व माननीय न्यायमूर्तीनी दिलेला निर्णय लोकांनी मान्य करावा अशी सूचना मी या विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.**: जळगाव जिल्ह्यातील प्रभात विद्यालयाच्या आवारात गुंडाकडून मुख्याध्यापकांना व कर्मचाऱ्यांना झालेली मारहाण

**मु. शी.**: जळगाव जिल्ह्यातील प्रभात विद्यालयाच्या आवारात गुंडाकडून मुख्याध्यापकांना व कर्मचाऱ्यांना झालेली मारहाण याबाबत श्री.दिलीपराव सोनावणे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.दिलीप सोनवणे,वि.प.स.यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

जळगाव जिल्ह्यातील प्रभात विद्यालय, हिंगोणे, ता.यावल येथे दिनांक 17.12.2008 रोजी शालेय कामकाज सुरु असताना शाळेच्या आवारात शाळा बाह्य व गुंडागिरी करणाऱ्या टोळक्याकडून मुख्याध्यापक व शिपाई यांना मारहाण करण्यात आली. शाळा बाह्य टारगट मुले मुलींची छेडखानी करण्याच्या हेतूने शालेय मैदानात आली असताना मुख्याध्यापकांकडून त्यांना बाहेर जाण्यास सांगण्यात आले असताना काही टारगट युवकांनी उध्दट भाषेत बोलून मुख्याध्यापकांना शिवीगाळ केली. मुख्याध्यापकास काठीने व लाथाबुक्कीने मारहाण केल्यामुळे मुख्याध्यापकास जबर इजा झ ाली. या टारगट मुलांनी व गावातील पालकांनी शाळेत येऊन शालेय कर्मचारी व मुख्याध्यापकांना जबर मारहाण केली. त्याचप्रमाणे मुख्याध्यापकांचे कार्यालय, शिक्षक खोलीतील सामान व साहित्यांचे मोठ्या प्रमाणावर नासधुस केली. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये भयाचे वातावरण निर्माण होऊन ते भीतीने इकडे तिकडे सैरावैरा पळाले. त्यामुळे गावांत भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने प्रभाव विद्यालयास पोलीस संरक्षण देण्याची वेळ आली आहे अशी सूचना मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनबाबत**</u>

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी याठिकाणी एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, पुणे शहराचे अतिरिक्त पोलीस आयुक्त श्री.राजेंद्र सोनावणे यांनी अर्ध्या तासापूर्वी पुणे सी.पी.ऑफीस उडवून देणार अशी माहिती गुप्तचर यंत्रणेकडून मिळाली आहे असे एका चॅनलला सांगितले.......

**उपसभापती** : पुणे सी.पी.ऑफीसने दक्षता घेतलेली आहे.

आजच्या काजकाजपत्रिकेवरील राहिलेले कामकाज माननीय सभापतींच्या परवानगीने त्या त्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, उद्या फक्त विधेयकांवर चर्चा करणार आहोत. उद्या लक्षवेधी सूचना, नियम 93 च्या सूचना घेणार नाही.

**उपसभापती** : आपण उद्या लक्षवेधी सूचना घेणार आहोत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शनिवार, दिनांक 27 डिसेंबर 2008 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 59 मिनिटांनी, शनिवार, दिनांक 27 डिसेंबर, 2008 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही